VOLUME 7 ISSUE 4

APRIL 2022

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# MODLIB *E-Bulletin of Library and Information Centre*




## *Heartiest Congratulations to Hon'ble Prof. Dr. Gajanan Ekbote, Chairman, P.E.Society on being awarded as 'Brands of Maharashtra'*

**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.
**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.
**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable
**E-mail:** librarian@moderncollegepune.edu.in
MCASC Library Website and WebOPAC

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: April 2022

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# *Table of Contents*


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Heartiest Congratulations to Hon'ble Prof. Dr. Gajanana Ekbote, Chairman, P.E.Society, Pune-5 on being awarded as 'Brands of Maharashtra' | 06 - 08 |
| 2 | शिक्षण हेच परिवर्तनाचा साधन - Article by Prof. Dr. G.R.Ekbote | 09 |
| 3 | ग्रेट भेट- Visit of Hon'ble Shri. Devendraji Fadnavis in P.E.Society, Pune- | 10 |
| 4 | Work of Appreciation by Prof. Mrs. Jyotsna Ekbote | 11 - 12 |
| 5 | Heartiest Congratulations to Prof. Dr. Nivedita Ekbote | 13 |
| 6 | 'अयोध्या' माझी जननी अन जन्मभूमी हि स्वर्गापेक्षा श्रेष्ठ–Article by Dr. Nandkishore Ekbote | 14 |
| 7 | Heartiest Congratulation to principal Dr. Rajendra Zunjarrao on the publication of his anthology of poems 'ओंजळ' | 15 - 18 |
| 8 | Visit of Dr. Swati Barnabas, Librarian, IMSCDR, Ahmednagar | 19 |
| 9 | Event organised by NSS in April 2022 | |
| | *- मराठी सोशल मिडिया संमेलन २०२२* | 21 |
| 10 | Events organised by/in Library and Information Centre in April 2022 | |
| | *- Mahatma Jyotiba Phule Jayanti* | 22 - 23 |
| | *- Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Jayanti and Readathon* | 24 - 28 |
| | *- Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti* | 30 |
| 11 | Events organised by the Departments in April 2022 | |
| | *- Vyapar Mela 2022* | 32 - 34 |
| | *- Parents Meet, Department of Animation* | 35 |

# *Table of Contents*



| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| | *- Alumni Meet, Department of Animation* | 36 |
| | *- Guest Lecture, Department of Mathematics* | 37 |
| | *- Arts Circle* | 38 |
| | *- Farewell Function and Books Received in Gratis, Department of Hindi* | 39 - 43 |
| | *- Comparative research on two German literary novels, Department of German* | 44 - 45 |
| | *- Counselling Camp, Department of Psychology* | 46 - 47 |
| 12 | **Faculty Members invited as Resource Persons** | |
| | *- Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi* | 49 |
| | *- Dr. Vaijayantimala Jadhav, Department of Marathi* | 50 |
| | *- Dr. Shantashree Sengupta, Librarian (as Rapporteur in International Conference)* | 51 - 52 |
| | *- Dr. Shantashree Sengupta, Librarian* | 53 - 55 |
| 13 | **Modern Achievements** | |
| | *- Dr. Shantashree Sengupta, Librarian* | 57 |
| | *- Mr. Akash Pawar, Student, M.Sc Mathematics* | 58 |
| | *- NCC Cadet Anurag Phand and NCC Cadet Sonia Yenpure* | 59 |
| | *- Dr. Prerna Ubale, Head, Department of Hindi* | 60 |
| | *- Miss. Ankura Chaudhari, Student, SYBA* | 61 |
| | *- Dr. Kalyani Salla, Department of Computer Science* | 62 |
| | *- Miss. Arya Chandekar, Student* | 63 |
| | *- Dr. Rajesh Kulkarni, Head, Department of History* | 64 |
| | *- Dr. Rupesh Bansode, Associate Professor, Department of Commerce* | 65 |

# *Table of Contents*


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| | *- Miss. Afsha Mashayak, NSS Volunteer* | **66 - 68** |
| | *- Rasika Kulve and Gajanan Khandagale, NCC Cadets* | **69** |
| | *- Department of Political Science* | **70** |
| | *- Dr. Priyanka Joshi More, Department of History* | **71 - 74** |
| **14** | **New Arrivals of Books in Library and Information Centre in April 2022** | **75** |
| **15** | **Newspaper Clippings** | **76 - 192** |
| **16** | **Condolence Message** | |
| | *- Late Prof. K.T.Kashid, Department of Statistics* | **193** |
| **17** | **Upcoming Events** | **194** |

# *Congratulations Honorable Prof.Dr.Gajanan Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune -5*

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष माननीय डॉ. गजानन एकबोटे सरांना सकाळतर्फे ***'ब्रँड्स ऑफ महाराष्ट्र'*** हा पुरस्कार घोषित झाला आहे. त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा !






# *Congratulations Honorable Prof.Dr.Gajanan Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune -5*

Felicitation of Progressive Education Society as Maha Brands of Maharashtra State by Daily Sakal. This prestigious award is received by Hon'ble Prof. Dr. Gajanan R Ekbote Chairman Progressive Education Society, in the august presence of Hon'ble Shri. Sharadchandraji Pawar Saheb, Hon'ble Shri. Devendraji Fadanvis Saheb, Hon'ble Shri. Sushilkumar Shinde Saheb and Hon'ble Shri. Prataprao Pawar Saheb. Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote, Principal Dr. Sanjay Kharat, Principal Dr. Rajendra Zunjarrao and Prof. Shamkant Deshmukh were present on this occasion. Hearty Congratulations to one and all....! Best Wishes and Regards

Dt. 25.4.2022











# *Congratulations Honorable Prof.Dr.Gajanan Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune -5*

सकाळ

## 'महाब्रँड्स' यशोगाथेचे कॉफीटेबल बुक प्रकाशित

व्यवसाय करीत असताना अनेक आव्हाने पेलत स्पर्धेत टिकण्यासाठी कायम नावीन्याचा ध्यास घेत दूरदृष्टी ठेवत आणि योग्य व्यवस्थापन करीत 'ब्रँड' म्हणून नावारूपास आलेल्या 'महाब्रँड्स'ची यशोगाथा मांडणारे कॉफी टेबलबुक रविवारी (ता. २४) प्रकाशित करण्यात आले. या बुकचा लोकार्पण सोहळा म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार, केंद्रीय सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण आणि 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते या कॉफीटेबल बुकचे प्रकाशन पार पडले.

शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या, आपल्या कौटुंबिक व्यवसायाला आणखी मोठे रूप देणाऱ्या आणि नवकल्पनेतून उद्योग सुरू करून दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल करीत अनेकांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या 'महाब्रँड्स'चा 'सकाळ माध्यम समूहा'च्यावतीने गौरव करण्यात आला. हे महाब्रँड्स नेमके काय?, कोण आहेत?, कोणाच्या नेतृत्वाखाली हे ब्रँड निर्माण झाले?, या कंपन्यांचे व्हीजन काय आहे?, व्यवसायाच्या स्थापनेपासून त्यांचा आत्तापर्यंतचा प्रवास मांडणारी संपूर्ण माहिती या कॉफीटेबल बुकमध्ये आहे. कृषी, ऑटोमोबाईल, बांधकाम, उद्योग-व्यवसाय, शेती पूरक व्यवसाय यांसह विविध क्षेत्रातील उद्योजकांचा यात समावेश आहे.

महाब्रँड्सने आपल्या क्षेत्रात कशी प्रगती केली आणि कोणत्या धोरणांच्या जोरावर उत्तुंग भरारी घेतली याच्या विलक्षण प्रेरणादायी कथा या कॉफीटेबल बुकमध्ये मांडण्यात आल्या आहेत.

काहीतरी नवीन करू पाहत असलेल्या नवउद्योजकांना व्यवसाय सुरू करण्यासाठीची अत्यावश्यक माहिती या पुस्तकातून मिळेल. तसेच या यशस्वी उद्योजकांची यशोगाथा वाचून अनेकांना प्रेरणा मिळेल. त्यातून मिळालेल्या ऊर्जेतून आपला उद्योग उभारत यशस्वी झालेल्या महाब्रँड्सची संख्या वाढू शकेल, असे मत कॉफीटेबल बुकच्या प्रकाशन समारंभात उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

### कॉफीटेबल बुकची वैशिष्ट्ये...

- राज्यातील ६३ महाब्रँड्सची यशोगाथा
- व्यवसायात उत्तुंग भरारी कशी घेतली, याचे अनेक अनुभव
- यशस्वी होण्यासाठी काय करावे, याबाबत मार्गदर्शन
- व्यवसायातील आव्हानांचा सामना कसा केला, याबाबतचे अनेक स्वानुभव
- शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्यांचा प्रेरणादायी प्रवास

Pune, Main
25/04/2022 Page No. 8

सकाळ

**या 'महाब्रँड्स'चा झाला गौरव**

• अमनोरा पार्क टाउन • अमृता हॅचरीज अँड फूड्स • अनुरूप विवाहसंस्था • अथर्व ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज • बँक ऑफ महाराष्ट्र • भारत फोर्ज • बीव्हीजी • चितळे डेअरी • कॉन्फिडन्स ग्रुप • दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. • कॉटनकिंग • डी. वाय. पाटील ग्रुप • दिलीप ओक अकादमी • डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ • डीव्हीपी उद्योग समूह • फिनोलेक्स केबल्स लि. • गरवारे हाय-टेक फिल्म्स लि. • घाटगे ग्रुप (मोहन ऑटो) • हिंदुस्थान फीड्स • आयकॉन स्टील्स • जीतो पुणे • किर्लोस्कर ब्रदर्स लि. • कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स • के. टी. ट्रॅक्टर • लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी • मगरपट्टा सिटी ग्रुप • मार्वलस इंजिनिअर्स प्रा. लिमिटेड • मेटारोल इस्पात प्रायव्हेट लिमिटेड • मेट्रो लाइफ सिटी डेव्हलपर्स • महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ • नेचर डिलाईट डेअरी • न्युरॉन हॉस्पिटल • निरामय वेलनेस सेंटर • नोबेल हॉस्पिटल • पी. एन. गाडगीळ ज्वेलर्स • परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लि. • पॅरासन मशिनरी • पल्की हॉस्पिटल • पायोड इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड • प्रकाश फूड प्रा. लिमिटेड • पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट • प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी • रावेतकर • रांका ज्वेलर्स • श्री रामकृष्ण ऑइल मिल्स • रुबी हॉल क्लिनिक • एस. एस. इंजिनिअर • सह्याद्री फार्म्स • सह्याद्री हॉस्पिटल • साई श्री हॉस्पिटल • सारस्वत बँक • शिव समर्थ मल्टी को-ऑप. सोसायटी लि. • शारंगधर फार्मा • सिद्धी असोसिएट्स • सिद्धी ग्रुप • सिंहगड इन्स्टिट्यूट • सेंट पॉल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज • सुदर्शन • सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट • सिंबायोसिस • तापडिया डिस्ट्रिब्यूटर • तुनवाल ई व्हेईकल • वरद क्रॉप सायन्स प्रा. लिमिटेड.

Pune, Main
25/04/2022 Page No. 8

## *Article by Honorable Prof.Dr.Gajanan Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune -5*

सामना



डॉ. गजानन एकबोटे

# शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन

**शिक्षणामुळे परिवर्तन होते, हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही. कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गाढ श्रद्धा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही डॉ. आंबेडकर यांना होती. 'व्यक्तीला स्वतःची जाणीव करून देते, स्वाभिमानाने जगायला शिकविते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या ते करीत असत.**

ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया होय. म्हणून प्रत्येकाने बुद्धीचा विकास करण्यासाठी हालअपेष्टा सहन करून शिक्षण मिळवले पाहिजे आणि ज्ञानाच्या बळावर स्वतंत्रपणे विचार करावयास शिकले पाहिजे, असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. बुद्धीचा विकास करणे आणि शिक्षण घेणे हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळे तो विकास साधता येतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर देशातील दलित समाजाच्या विकासासाठी, प्रगतीसाठी आणि शिक्षणासाठी लढा दिला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१३ मध्ये कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी गेले होते. हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थिती आणि अमेरिकेतील सामाजिक परिस्थितीमधील फरक पाहाता त्यांना हिंदुस्थानातील वंचित आणि पीडितांच्या आयुष्यात शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे कळले. म्हणून त्यांनी आपल्या वडिलांच्या मित्राला लिहिलेल्या पत्रात असा उल्लेख केला की, "पालक मुलांच्या जन्माचे साथी आहेत, कर्माचे नव्हे, या संकल्पनेचा आता त्याग केला पाहिजे." अशी जाणीव करून देताना पुढे "पालक मनात आणतील तर ते आपल्या मुलांचे भवितव्य साकारू शकतात. मुलांच्या शिक्षणाबरोबर आपल्या मुलींच्या शिक्षणाचाही तेवढ्याच गंभीरतेने विचार करावा आणि त्यानुसार कृती करावी." पुढे याच पत्रात शेक्सपियरच्या एका इंग्रजी नाटकातील वाक्य उद्धृत करून बाबासाहेब म्हणतात की, 'प्रत्येक माणसाच्या जीवनात जेव्हा संधी येते, तेव्हा तो माणूस त्यावर आरूढ झाला तर तो समृद्धीच्या मार्गावर जातो, परंतु त्याने जीवनाच्या प्रगतीचा मार्ग त्यागला तर माणसाच्या वाट्याला दुःखच येणार. वंचितांच्या आणि पीडितांच्या जीवनात आलेली शिक्षणाची संधी त्यांनी न गमावता शिक्षण घेऊन ज्ञानी झाले पाहिजे. त्यासाठी येईल ते दुःख सहन करावयास पाहिजे', असाही सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर देतात.

शिक्षणाविना माणूस विकासाच्या प्रत्येक आघाडीवर मागेच राहिला आहे, परंतु शिक्षणामुळे त्यांच्याही आयुष्यात क्रांती होईल आणि प्रस्थापित समाजात मान उंचावून तो स्वाभिमानाने जगू शकेल, अशी आशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना होती. त्यामुळे त्यांच्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, अशी मागणी त्यांनी शासनाकडे केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे. त्याकरिता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही कोणत्याही भौतिक लाभाचा त्याग करू शकतो, पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्कांचा आम्ही त्याग करण्यास तयार नाही. आता दलितांना जाणवले आहे की, शिक्षणाशिवाय त्यांचे अस्तित्वच सुरक्षित नाही. त्यांना स्वाभिमानाने जगता येणार नाही."

शिक्षणामुळे परिवर्तन होते, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचे सूत्र आहे. समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन या जगात नाही. कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची गाढ श्रद्धा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडविण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही डॉ. आंबेडकर यांना होती. 'व्यक्तीला स्वतःची जाणीव करून देते, स्वाभिमानाने जगायला शिकविते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या ते करीत असत.

### उच्च शिक्षणाचे महत्त्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वानुभवाने उच्च शिक्षणाचे किती महत्त्व आहे ते मिलिंद महाविद्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणातून सांगतात, "हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे जीवनात शिक्षणाचे किती महत्त्व आहे हे मी जाणतो. दलित समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे सांगण्यात येते, पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे. ज्यामुळे दलित समाजाची प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्यांचे गुलाम व्हावे लागते, तो न्यूनगंड त्यांच्या जीवनातून नाहीसा करणे, चालू समाज पद्धतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले आहे, त्यांच्या जीवनात उच्च शिक्षणाचे काय महत्त्व आहे याची त्यांना जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसारानेच हे साध्य होणार आहे. प्रस्थापित समाज व्यवस्थेमुळे विकृतपणे लुबाडण्यात आलेल्यांच्या जीवनात उच्च शिक्षणाचे काय महत्त्व आहे, तसेच राष्ट्राच्या उभारणीसाठी त्याची आवश्यकता काय, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानातून स्पष्ट होते. डॉ. आंबेडकरांच्या मते, शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौद्धिक विकास करून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शस्त्र आहे. व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी विद्येची चोवीस तास साधना करावी लागेल. कारण विद्या ही एखाद्या महासागरासारखी आहे. विद्येची ही साधना यशस्वी झाली, तर माणूस जगाच्या पाठीवर आपली कीर्ती पसरवू शकतो. डॉ. आंबेडकर ज्ञानाची चोवीस तास पूजा करीत असत. त्यामुळेच ज्या ठिकाणी कार्ल मार्क्स, मॅझिनी, लेनिन, सावरकर इ. थोर व्यक्तींनी संशोधनाचे कार्य केले, त्या लंडन म्युझियममध्ये त्यांना खुल्या वातावरणात शिक्षण घेता आले. असेच प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात घडावे, शिक्षण सर्वांना अवगत व्हावे, अशी अपेक्षा डॉ. आंबेडकर बाळगत होते. शिक्षणानेच सामाजिक परिवर्तन घडून येते, यावर त्यांचा विश्वास होता. व्यक्तीच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण होतो, व्यक्ती आत्मनिर्भर होते.

शिक्षणक्षेत्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र व स्वायत्त हवे असेल तर या क्षेत्रावर व्यक्तिसत्ता असणे धोक्याचे आहे, हा बाबासाहेबांनी दिलेला इशारा आजही तंतोतंत लागू पडतो. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच व्यक्तींना शिक्षण म्हणजे काय, शिक्षणाचे ध्येय कोणते किंवा शिक्षणाच्या पद्धती कोणत्या याचे पूर्णतः ज्ञान असतेच असे नाही. याची चर्चा करताना अपात्र लोकांचा भरणा शिक्षणक्षेत्रात कसा झाला आहे आणि त्यामुळे बारभाईचा कारभार कसा सोकावला आहे याचे अत्यंत मार्मिक व स्फोटक असे चित्र डॉ. बाबासाहेबांनी रेखाटले आहे. त्याअनुषंगाने आपली जळजळीत प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केली. ही बाब, रस्ते बांधणे, गटार साफ करणे वगैरे बाबींपेक्षा निराळ्या प्रकारची आहे. शिक्षणक्षेत्रातल्या शूचितेवर व नीतिमत्तेवर भर देताना प्रांतिक स्वायत्तता मागा आणि राष्ट्रीय दृष्टीने शिक्षणाचे धोरण ठरवा, आमची त्याला हरकत नाही, परंतु शिक्षणामध्ये एकसूत्रीपणा असला पाहिजे. शाळांचा कारभार शिस्तीने चालला पाहिजे आणि शिक्षण चोख दिले पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. शिक्षणक्षेत्रात सूत्रमयता तर असावीच, पण शिक्षणक्षेत्राला स्वतंत्र प्रतिष्ठा असावी. त्यासाठी शिक्षणक्षेत्राबाहेरील म्हणजे शिक्षणक्षेत्राशी संबंध नसणाऱ्या व्यक्तींचा या क्षेत्रात शिरकाव नसावा, असे त्यांनी निःसंदिग्धपणे प्रतिपादन केले आहे.

शिक्षण हे पवित्र आहे आणि त्याचे पावित्र्य राखण्याची नितांत गरज आहे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची श्रद्धा होती. शिक्षण हा एकूणच मानवी जीवनाचा पायाभूत संस्कार आहे आणि शाळा हे संस्कार केंद्र आहे. थोर समाजचिंतकांनी विद्येला, ज्ञानाला महत्त्व का दिले याचे इंगित हेच आहे. विद्या जीवनाला वळण देते, सुधारते. विद्येची वाढ होणे सार्वजनिक हितासाठी आवश्यक असल्याचे लोकहितवादींनी प्रतिपादिले होते. नव्या ज्ञानाचे दरवाजे उघडण्यासाठी प्राचीन व्यवस्थेची चिकित्सा करणे त्यांना आवश्यक वाटत होते. आगरकर नव्या ज्ञानक्षेत्रासाठी व्यक्तिजाणिवांना प्राधान्य देत होते, तर महात्मा जोतीराव फुले यांनी "विद्येविना मती गेली" असे विद्येचे महत्त्व प्रतिपादून अविद्या हे सर्व अनर्थाचे मूळ आहे, असे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेदेखील शिक्षणाकडे, ज्ञानाकडे व्यक्तिविकासाचे सोपान म्हणून पाहतात. शिक्षण हे परिवर्तनाचे, स्वतःची जाणीव करून देणारे, न्यूनगंड नाहीसे करणारे महत्त्वाचे साधन आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रहाने प्रतिपादन करीत असत.

*(लेखक प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणेचे कार्याध्यक्ष आहेत)*

Pune Edition
Apr 14, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# ग्रेट भेट

Hon'ble Shri. Devendraji Fadnavis, MLA visited Progressive Education Society's Office on 19.04.2022.



Hon'ble Shri. Devendraji Fadnavis with Hon'ble Prof. Dr. G.R.Ekbote, Chairman, P.E.Society and Prof. Mrs. Jyotsna Ekbote, Joint Secretary, P.E.Society

# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote*



लोकमत

## टाटा टी प्रिमियम सर्वगुणी सखीची शोभायात्रा उत्साहात साजरी

गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर, 'टाटा टी प्रिमियम', आणि लोकमतच्या सहकार्याने, महिलांनी भव्य शोभायात्रेत सहभागी होऊन एक नवीन शुभ सुरुवात केली.

पुण्यात अभिनेत्री सई ताम्हणकर आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या ज्योत्स्नाताई एकबोटे आणि इतर मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून या भव्य सोहळ्याला सुरुवात केली. मॉडर्न प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीपासून शेकडो महिलांची बाइक रॅली सुरु झाली आणि जंगली महाराज रोडवरील गुडलक चौकात संपली. नंतर सर्वांनी पुन्हा मॉडर्न प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मैदानावर रॅली काढली. रंगीबेरंगी रांगोळ्यांच्या सोबतीला आणि ढोल-ताशांच्या निनादात रॅलीत चैतन्य आले.

औरंगाबादमध्येही हा सोहळा थाटामाटात संपन्न झाला. उत्सवाचा एक भाग म्हणून, सुंदर पारंपरिक पोशाख परिधान करून, डोक्यावर फेटे बांधून, दुचाकीवरुन आलेल्या शेकडो महिलांवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. या सोहळ्याला महानगरपालिकेच्या उपायुक्त अपर्णा थेटे, ओरायन सिटीकेअर हॉस्पिटलचे डॉ. पांडुरंग वट्टमवार, गव्हर्नमेंट मेडिकल हॉस्पिटलच्या डॉ. प्रिया वट्टमवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या ऑन-ग्राउंड इव्हेंटद्वारे टाटा टी प्रिमियम आपला हायपर लोकल दृष्टीकोन आणि महाराष्ट्रीयन स्त्री - एक गृहिणी आणि रॉकस्टारचा बहुआयामी अवतार साजरे करून, सर्वगुणी भावनेचे खरे उदाहरण म्हणून विस्तारित केले आहे.



Pune Main
Page No. 3 Apr 10, 2022
Powered by: erelego.com

# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote*

**सामना**

## शतकवीर रक्तदात्यांचा सन्मान



***निवृत्तीराव*** मारणे (वस्ताद) यांच्या स्मरणार्थ रामदास मारणे, शाम मारणे आणि मित्र परिवारातर्फे आयोजित रक्तदान शिबिरात शंभरहून अधिक वेळा रक्तदान करणाऱ्या शतकवीर रक्तदात्यांचा आणि कोरोनाकाळात सर्वाधिक वेळा प्लाझ्मा दान करून रुग्णांचे प्राण वाचवणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. रक्तदाते प्रदीप कपिले, सदाशिव कुंदेन, संतोष गोपाळ, अंजू सोनावणे, सुरेश सकपाळ, शंतनू पानसरे, अजय मुनोत यांचा सन्मान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कोठाडिया, आनंद सराफ, डॉ. शैलेश गुजर, किसनराव भोसले, माजी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, दत्ता खाडे, आदित्य माळवे, रामदास मारणे, श्याम मारणे, उज्ज्वला मारणे यावेळी उपस्थित होते.

सादर

Pune Edition
Apr 18, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**सकाळ**

## शतकवीर रक्तदात्यांचा गौरव

**पुणे, ता. १७ :** शंभरहून अधिक वेळा रक्तदान केलेले शतकवीर रक्तदाते आणि कोविड काळात ज्यांनी सर्वाधिक वेळा प्लाझ्मा दान करून अनेकांचे जीव वाचविले, अशा पुणेकरांना एका विशेष कार्यक्रमात रविवारी गौरविण्यात आले.

रक्तदाते प्रदीप कपिले (१२५ वेळा रक्तदान), सदाशिव कुंदेन (१०९ वेळा), संतोष गोपाळ (९९ वेळा), अंजू सोनावणे (९८ वेळा), सुरेश सकपाळ (८६ वेळा), शंतनू पानसरे (७५ वेळा) आणि अजय मुनोत (५० वेळा रक्तदान व १४ वेळा प्लाझ्मादान) यांचा रामदास मारणे, शाम मारणे आणि मित्र परिवारातर्फे गुरुवर्य स्व. निवृत्तीराव मारणे (वस्ताद) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गौरव करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कोठाडिया, आनंद सराफ, डॉ. शैलेश गुजर, किसनराव भोसले, माजी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, माजी नगरसेवक आदित्य माळवे, दत्ता खाडे, आयोजक रामदास मारणे, शाम मारणे, उज्वला मारणे आदी उपस्थित होते. या वेळी रक्तदान शिबिरही झाले.

Pune, Main
18/04/2022 Page No. 5

# *Heartiest Congratulations to Prof.Dr. Nivedita Ekbote*



## 'दिल दिमाग और बत्ती'च्या गीतांचे प्रकाशन

दिल दिमाग और बत्ती या मराठी चित्रपटाचा ट्रेलर आणि म्युझिक लाँच सोहळा नुकताच एका दिमाखदार सोहळ्यात मोठ्या उत्साहात झाला. या प्रसंगी चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक हृषीकेश गुप्ते, प्रस्तुतकर्त्या डॉ. निवेदिता एकबोटे यांच्यासह सर्व कलाकार व तंत्रज्ञ उपस्थित होते. या चित्रपटातून अभिनेता सागर संत मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. सा क्रिएशन्सची पहिलीच निर्मिती असलेल्या दिल दिमाग और बत्ती मध्ये सोनाली कुलकर्णी, दिलीप प्रभावळकर, वंदना गुप्ते, पुष्कर श्रोत्री, किशोर कदम, आनंद इंगळे, वैभव मांगले, सागर संत, मयुरेश पेम, संस्कृती बालगुडे, सखी गोखले, पुष्करराज चिरपुटकर व अन्य कलाकार आहेत. हा चित्रपट २२ एप्रिल रोजी प्रदर्शित होईल.

Kesari 10.4.2022



# Article by Dr. Nandkishore Ekbote

नवराष्ट्र

# 'अयोध्या' माझी जननी अन् जन्मभूमी ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ



'अमृतभूमी' भारतातील सांस्कृतिक तीर्थक्षेत्र असलेल्या अयोध्या या भूमीवर किती वर्षापूर्वी मानवाची वस्ती झाली हे सांगणे कठीण आहे. परंतु अयोध्येचा अर्थ शब्दशः घेताना विचार केला तर असे दिसते, अ-युध्दा भूमी म्हणजे युध्द करूनसुध्दा जिंकता येणार नाही अशी भूमी म्हणजेच अयोध्या किंवा अयोध्दा.आपण सर्वजण नेहमीच एक श्लोक म्हणत आलो आहे.

अयोध्या मथुरा माया काशी कांञ्चि अवंतिका ।
एत:पुण्यतमः प्रोक्ता:पुरीणामुत्तमोत्तमा ।।

आयोध्येचा उच्चार केला की शरयू नदी आठवते. आता ही नदी कोठून आली रामायण बालकांडात २४/८ -१० वर्णन आहे. मानस सरोवर हिमालयात निर्माण झाले व त्या सरोवरापासून जो पाण्याचा स्त्रोत निघाला तो स्त्रोत अयोध्या भूमीच्या शेजारून जात आहे. तो स्त्रोत म्हणजे नदी व तो स्त्रोत सरोवरातून निर्माण झाला म्हणून त्याला सरयू म्हणू लागले. याचा उल्लेख अतिप्राचीन ऋग्वेदात असा आहे. सरस्वती सरयुः सिन्धुरुर्मिभिर्महो महीसखा यन्तू वक्षणी :

## सरस्वती, सरयू आणि सिंधू या भक्तरक्षक नदया

रामायणानुसार दशरथांची पिढी ही इक्ष्वाकु वंशाची पासष्ठावी पिढी. अयोध्या ही राजधानी परंतु त्यांच्या राज्याचे नाव कौशल राज्य होते. याचा उल्लेख भगवान बुध्दांच्या काळात किंवा त्यांच्या अगोदरच्या काळापासून संपूर्ण भारतात १६ जनपदे म्हणजेच (राज्ये) होती. त्यामध्ये कौशल राज्याचा उल्लेख आढळतो. रामायणानुसार प्रभु श्रीरामचंद्रांनी आपल्या कौशल राज्याची विभागणी केली. त्यामध्ये उत्तर कौशल लवाकडे देऊन 'शरावती' नावाची (श्रावस्ती) नवीन राजधानी लवाने वसवली. तसेच दक्षिण कौशल कुशाकडे देऊन 'कुशावती' नावाची नवीन राजधानी कुशाने वसवली. जैन साहित्यातील पुरावे श्रीरामपुत्र कुश असो वा ऋषभदेव असो श्रीरामानंतर अयोध्येचे पुनर्वसन होताच श्रीरामाच्या जन्मस्थानावर (त्या कालखंडातील परंपरेनुसार) अतिभव्य सुंदर मंदिर उभे राहिले. ही गोष्ट आजच्या कसोटीला उतरली आहे. अनेकवर्ष हे जन्मस्थान मंदिर सरयूनदी अयोध्यानगरी ही सर्व भारतीयांच्या श्रध्देचा भाग बनली. उदा. जैनमनी आचार्य हेमचंद्रसुरी लिखीत 'त्रिषष्टिशलाका पुरूषचरित' या ग्रंथात पुरुषांना ७२ विद्या व स्त्रियांना ६४ विद्या शिकविण्याची व्यवस्था असलेले जैन विद्यापिठ CE ६०० पूर्व कौशल राज्यात अयोध्येमध्ये होते, असा उल्लेख आहे.

बौद्ध साहित्यातील पुरावे बौध्द वाङ:मयातही कौशल महाजनपदाचा उल्लेख आहे. 'माज्झिमनिकाय' मध्ये बुध्ददेवांना कौशलक म्हटले आहे. धम्मपदछ कथेनुसार भगवान बुध्दांच्या काळी प्रज्ञेनजिता हा कौशलचा राजा होता. त्याच प्रमाणे श्रीरामपुत्र कुशाने वसविलेल्या श्रावस्ती या प्रमुख नगरामध्ये राज प्रसेनजित व भगवान बुध्द यांची भेट अनाथपिंडीकाच्या जेतवन विहारात झाली असा स्पष्ट उल्लेख 'माज्झिमनिकाय' मध्ये आहे. नंतरच्या कालखंडात चंद्रगुप्त मौर्य यांच्या राज्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या भूभागामध्ये कौशल राज्य विलीन झाले म्हणजेच स्वतंत्र कौशलचे अस्तित्व राहिले नाही. भारतीय पुरातत्त्वाचे पुरावे आणि संशोधन श्रीरामांचे जन्मस्थान मंदिर त्यांच्या वंशजांनी बांधलेल्या जागेवर होते. कारण त्याच जागेवरच्या भारतीय पुरातत्वाच्या अहवालानुसार त्याच भूमीवर उत्खननामध्ये ५४ पेक्षा जास्त खांब असलेले मंदिरांचे अवशेष मिळाले. एक महत्वाचा पुरावा भारतीय पुरातत्व सर्वोच्च न्यायालयात सादर केला. त्यामधील एक पुरावा विक्रमादित्याच्या काळातील जे रामजन्मभुमी मंदीर बांधले गेले याला पुष्टी मिळते. उत्खननात सापडलेल्या दगडाचे (सी - 14) कार्बन-- १४ टेस्ट घेऊन हे दगड CE १ ले शतकातले आसल्याचा निर्वाळा दिला आहे. भारतीय पुरातत्त्वाने सर्वोच्च ज्ञायालयात सादर केलेल्या "N" पार्ट मध्ये याचा खुलासा केलेला आहे व याच रामजन्मभूमीच्या वादग्रस्त जागेवरून स्थानीक हिंदू राजे व परकिय आक्रमक यांच्यात अनेक युध्ये झाली. उद्ध्वस्त केल्यावर स्थानिक लोकांच्या मनामध्ये भय निर्माण होते व आपणांस त्यांच्यावर राज्य करण्यास सोयीचे जाते हा प्रत्येक आक्रमकांचा उद्देश होता. परंतु अंतःकरणात असलेले राम किंवा श्रध्दास्थान उद्ध्वस्त होऊ शकत नाहीत. ग्रीक आक्रमकांनी उद्ध्वस्त केलेल्या मंदिराच्या जागेवरच दुमत्सेन यांनी ग्रीक राजाशी लढाई करून त्याला पळवून लावले आणि अयोध्या नगरी मुक्त केली त्यानंतर CE. ५०-



१०० च्या दरम्यान विक्रमादित्याच्या काळात अयोध्येला याच रामजन्मभूमीच्या जागेवर मंदिर निर्माण झाले. शकांचा पराभव याच काळात विक्रमादित्याने केला. इतिहासाच्या पुराव्यानुसार बौध्द तत्त्वज्ञान व जैन तत्त्वज्ञान यांचा प्रभाव अयोध्येवर होता. त्याचप्रामाणे सनातन वैदिक धर्म (हिंदूधर्म) यांच्या प्रभावाखाली असलेल्या राज्यांनी एकत्रितपणे समन्वयाने भारतीय संस्कृती टिकवून ठेवली. त्या समन्वयाला आक्रमकांमुळे तडा गेला.

सातव्या शतकातील भारताची स्थीती CE ६२२ मध्ये हजरात पैगंबरांनी मक्केत इस्लामाची स्थापना केली CE ६३८ मध्ये इस्लामाच्या उमर नावाच्या खलीफाने सिंधू भागावर आक्रमण केले. परंतू त्याचा पराभव झाला. पुढच्या शतकात CE ७१० पर्यंत इस्लामाचे सेनापती यांनी आक्रमणे केली व सर्व आक्रमणे हिंदू राज्यांनी मोडून काढली. एकंदरीत वरील कालखंडात नऊ खलीफांनी १५ आक्रमणे केली. त्यांना जे साध्य करावयाचे होते ते साध्य करू शकले नाहीत. देवल ऋषींचे अलौकीक कार्य याचसुमारास म्हणजेच CE ८०० च्या सुमारास देवल ऋषींनी 'देवल स्मृती' निर्माण केली. त्यामुळे अनेक परधर्मात गेलेले स्वधर्मात परत आले. हा एक मोठा झटका आक्रमकांना होता.

**- डॉ. नंदकिशोर रमाकांत एकबोटे**

Pune Plus Edition
11 April 2022 Page No. 4
epaper.navarashtra.com

# Congratulations Principal Dr. R . S . Zunjarrao

## प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या 'ओंजळ' या काव्य संग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न

पुणे:१६ मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कवी डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या 'ओंजळ' या दुसऱ्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच संपन्न झाला .यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मा.श्री.मिलिंद जोशी, कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव, महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्ष प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे उपस्थित होत्या . डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी लिहिलेल्या ८००कवितांपैकी ८९कवितांचा या संग्रहात समावेश आहे. सरस्वती वंदनेने सुरुवात होणाऱ्या या काव्य संग्रहामध्ये अनेक भावकविता, निसर्गकविता, बालकविता, प्रेरणादायी कविता अशा विविध कवितांचा समावेश आहे. 'ओंजळ' मधील कविता या कवीच्या काव्यसाधनेचा परिपाक आहेत. या कविता माणसाच्या आयुष्यातील चढ उताराचा एक आलेख आहेत . कवीचा आत्मविश्वास या सर्वच कवितांमधून दिसतो.यातल्या काही कविता हे कवीच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा नमुना आहेत.एका कुटुंबातील कर्त्या पुरुषाचा आधार नाहीसा झाल्यावर होणारी अवस्था 'रथ' या कवितेतून व्यक्त होते.तर 'लढत राहा 'सारख्या कवितेमधून कशीही परिस्थिती आली तरी माणसाने हार न मानता लढले पाहिजे हे सांगितले आहे.आजच्या काळातील तरुण पिढीला काही एक महत्वाचा संदेश देणाऱ्या कविता यात येतात,असे मत मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी व्यक्त केले.

जन्म आणि मृत्यू ,उत्त्पती आणि विनाश या गोष्टींपासून कुणाचीच सुटका नाही.या दोन टोकांमधले जगणे अधिक सुंदर करणे हे ज्याच्या त्याच्या हातात असते. आयुष्याची वाट साधी ,सोपी आणि सरळ कधीच नसते.फुलांच्या पायघड्या क्वचित वाट्याला येतात .एरवी काट्या कुट्यानी भरलेल्या रस्त्यावरूनच चालावे लागते.असे माणसाच्या जगण्याच्या पसाऱ्यातील अनेक विषय कवी डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या 'ओंजळ' मधील कवितेत येतात असे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मा.श्री.मिलिंद जोशी म्हणाले.आजच्या काळात छंदोबध्द मराठी कविता अभावाने आढळते. या काळात छंदोबध्द कवितांचे वेगळेपण राजेंद्र झुंजारराव यांच्या या कवितेतून दिसते .कवीची कविता निर्मिती ही एक साधना आहे आणि या साधनेतून कवीला जे आत्मबळ मिळाले आहे ,ते त्यांच्या 'तरतील माझ्या कविता' सारख्या कवितेतून दिसते. आपल्या ओंजळीत कविता आहे हे कवीला लवकर उमगले .कविता हा वाङ्मय प्रकार सर्वात कठीण. संतांनी कवितेचे बोट पकडले कारण या माध्यमातून सर्वसामान्याला उपदेश करता येतो हे त्यांच्या लक्षात आले. कवी यांची झुंजारराव कविता अनुभवाने समृध्द आहे अनुभवाची समृध्दी नसेल तर शब्द पोकळ होतात. कवितेसाठी अनुभवांच संचित आवश्यक असते.कविता म्हणजे फक्त शब्दांचा फुलोरा न्हवे.तर आशय,अनुभव संपन्नता आवश्यक असते. आसक्ती आणि विरक्ती या दोन टोकांकडे न जाता जीवनाचे दोन मध्य साधणारी कविता आहे. असेही मत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मा.श्री.मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या या प्रसंगी मॉडर्न महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्षाआणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे उपस्थित होत्या. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.ए.के .पांडे उपस्थित होते. 'ओंजळ' मधील कविता या महाविद्यालयाचे कामकाज सांभाळत असताना आलेल्या अनुभवावर आणि त्यातून मनात आलेल्या विचारांवर आधारित आहेत.पहाटेची काव्य निर्मिती मला दिवस भरासाठी काम करण्यासाठी उर्जा पुरवते असे मनोगत कवी राजेंद्र झुंजारराव यांनी व्यक्त केले . या कार्यक्रमाला प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे विविध पदाधिकारी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ,प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, मॉडर्न महाविद्यालयाचे काव्य रसिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

# *Congratulations Principal Dr. R . S . Zunjarrao*

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी राजेंद्र झुंजारराव यांच्या सरस्वती वंदन या कवितेचे गायन शौनक कुलकर्णी यांनी केले. अरुण गावडे या विद्यार्थ्याने ओंजळ मधील दोन कवितांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. अंजली सरदेसाई यांनी केले. कार्यक्रमाचे आभार साहित्य विश्व प्रकाशनाचे प्रकाशक श्री.विक्रम शिंदे यांनी मानले.या कार्यक्रमासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष मा.प्रा.डॉ.गजानन एकबोटे यांचे मार्गदर्शन लाभले.














# *Congratulations Principal Dr. R . S . Zunjarrao*


















# *Congratulations Principal Dr. R . S . Zunjarrao*

लोकमत

## 'ओंजळ'मधील कविता तरुण पिढीला मार्गदर्शक

### डॉ. झुंजारराव यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या भावकविता, निसर्गकविता, बालकविता, प्रेरणादायी असून तरुणांसाठी मार्गदर्शक आहेत, असे विचार प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव, प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी व्यक्त केले.

मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. झुंजारराव यांच्या 'ओंजळ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रा. एकबोटे म्हणाल्या, माणसाच्या आयुष्यातील चढ-उताराचा आलेख 'ओंजळ' मध्ये आहे. कवितांमधून कवीचा आत्मविश्वास दिसतो. संकटसमयी हार न मानता पुढे चालण्याचा संदेश देणाऱ्या कविता यात आहेत. तसेच तरुण पिढीला मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. अनेक कविता सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा नमुना आहेत. प्रा. जोशी म्हणाले, आजच्या काळात अभावानेच आढळणारी छंदोबध्द कविता 'ओंजळ'मध्ये दिसते. ही कविता अनुभवाने समृध्द असून आसक्ती आणि विरक्तीकडे न जाता जीवनाचे दोन मध्य साधणारी कविता आहे. डॉ. झुंजारराव यांनी मनोगत व्यक्त केले. शौनक कुलकर्णी, अरुण गावडे यांनी कवितेचे सादरीकरण केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.ए. के. पांडे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अंजली सरदेसाई यांनी केले.

Hello Pune
Page No. 8 Apr 17, 2022
Powered by: erelego.com



# *Visit of Dr. Swati Barnabas Librarian IMSCDR, Ahmednagar*











Dr. Swati Barnabas, Librarian, IMSCDR, Ahmednagar visited the College Library and Information Centre on 18.04.2022. She is an Alumni of the Department of Chemistry of our College from early 1990s. She interacted with Principal Dr. Rajendra Zunjarrao and visited the Department of Chemistry. Dr. Sachin Sakte, Associate Professor, Department of Chemistry showed her the Central Instrumentation Facility. Dr. Swati Barnabas expressed her gratitude towards the college.

# Events Conducted by National Service Scheme (NSS) in April 2022

# मराठी सोशल मिडिया संमेलन २०२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच डी.
संचालक

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

### राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ: रासेयो/२०२२–२३/५९६ | कार्यालयीन आदेश | दि. २७/०४/२०२२

डिजिटल मीडिया प्रेमी मंडळी (डिमीप्रेमी), राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र सायबर, संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभाग (रानडे इन्स्टिट्यूट), मराठी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरे मराठी सोशल मिडिया संमेलन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दिनांक २९, ३० एप्रिल आणि १ मे २०२२ या कालावधीत करण्यात येणार आहे.

मराठी सोशल मिडिया संमेलनातील २५०० श्रोतेसंख्या लक्षात घेता हे संमेलन खाशाबा जाधव क्रीडा संकुलातील नव्या इनडोअर हॉलमध्येच आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनातून विद्यापीठ परिसरातील सुमारे ८०० ते १००० विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेतील सुमारे १५०० विद्यार्थी यांचे शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन होणार आहे.

या तीन दिवसीय संमेलन आयोजनाकरिता संचालक, रासेयो यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. सविता कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उपक्रम नियोजन समिती घटीत करण्यात आलेली आहे.

| नं. | नाव | महाविद्यालयाचे नाव | पद |
|---|---|---|---|
| १ | डॉ. सविता कुलकर्णी | अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर | अध्यक्ष |
| २ | डॉ. शिवाजी पाचारणे | अप्पासाहेब जेधे महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे | सदस्य |
| ३ | डॉ. नाना शेजवळ | एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ४ | डॉ. प्रभाकर वऱ्हाडे | मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे | सदस्य |
| ५ | प्रा. भारत राठोड | नेस वाडीया महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| ६ | प्रा. सुशिल थिगळे | स.प. महाविद्यालय, टिळक रोड, पुणे | सदस्य |
| ७ | डॉ. अमित गोगावले | अप्पासाहेब जेधे महाविद्यालय, शुक्रवार पेठ, पुणे | सदस्य |
| ८ | प्रा. मिनल भोसले | डॉ.डि.वाय. पाटील महाविद्यालय, आकुर्डी | सदस्य |
| ९ | डॉ. सविता इटकरकर | भारती विद्यापीठ महिला अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे | सदस्य |
| १० | प्रा. ज्ञानेश्वर जांभूळकर | बी.आर. घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे | सदस्य |
| ११ | प्रा. सारिका मोहोळ | प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, निगडी, पुणे | सदस्य |
| १२ | प्रा. वैशाली वाघुले | डॉ. डि.वाय. पाटील महिला महाविद्यालय, आकुर्डी | सदस्य |
| १३ | प्रा. नितीन मोटे | शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, वडगाव | सदस्य |
| १४ | डॉ. प्रभाकर घोडके | एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे | सदस्य |

सदर आयोजन समितीची ऑनलाईन सभेचे आयोजन दिनांक २८/०४/२०२२ रोजी स.११.०० वाजता डॉ. सविता कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेले आहे. तरी वरीलप्रमाणे ऑनलाईन नियोजन बैठकीकरिता व दिनांक २९, ३० एप्रिल व १ मे २०२२ रोजी सदर संमेलनाच्या नियोजनाकरिता सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०७.०० या वेळेत आपण रासेयो विभागामध्ये उपस्थित रहावे. सदर कालावधीत संबंधित महाविद्यालयांच्या मा. प्राचार्यांनी समिती सदस्य यांची कर्तव्य रजा मंजूर करावी. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

Website : http://www.unipune.ac.in/nss Email : nss@pun.unipune.ac.in, nss@unipune.ac.in

# *Events Conducted in the Library during April 2022*

## *1.Mahatma Jyotiba Phule Jayanti: 11th April 2022*

On 11.04.2022, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Mahatma Jyotiba Phule Jayanti as per Government of Maharashtra GR.

Under the guidance of Principal Dr.Rajendra Zunjarrao Sir, Prof. Dr. Milind Bodke, Department of Electronics, Library Staff members and the students paid their respect to the great reformer Mahatma Phule.

Jyotirao Govindrao Phule was an Indian social activist, thinker, anti-caste social reformer and writer from Maharashtra. Principal Sir said how Mahatma Phule's work extended to many fields, including eradication of untouchability and the caste system and for his efforts in educating women and exploited caste people. Mahatma Phule and his wife, Savitribai Phule, were pioneers of women education in India. He, along with his followers, formed the Satyashodhak Samaj (Society of Truth Seekers) to attain equal rights for people from exploited castes. People from all religions and castes could become a part of this association which worked for the upliftment of the oppressed classes. Mahatma Phule is regarded as an important figure in the social reform movement in Maharashtra.

All the rules of physical distancing were followed during the programme. I am thankful to Prof. Dr.Milind Bodke, Library Staff members and students who were present during the program.

Regards,
Dr. Shantashree Sengupta,
Librarian.


















# *Events Conducted in the Library during April 2022*















# *Events Conducted by the Library during April 2022*

## *2.Bharat Ratna Dr.Babasaheb Ambedkar Jayanti: 14th April 2022*

Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Bharat Ratna Dr.Babasaheb Ambedkar Jayanti on 14.04.2022.
The celebrations of the 'Knowledge Day' started from Wednesday, 13.04.2022 by organising 'READATHON' (14 hours Abhyas Abhiyan) from 06:30 a.m. to 08:30 p.m. Several students, teaching and non -teaching staff participated in the Reading Movement which aims to inculcate reading habits.
On Thursday, 14.04.2022, in the presence of Respected Principal Dr. Rajendra Zunjarrao; Prof. Shamkant Deshmukh , Secretary, P.E.Society and Vice Principal; Prof.Dr. Ashok Kamble, Vice Principal, Faculty of Commerce; Prof. Subhash Karekar, Prof.Dr. Harsh Gaikwad, Prof. Dr. Milind Bodke, Dr. Prabhakar Varade, College Registrar Ganesh Sathe , teaching and non-teaching staff members and students were present for the program and paid respect to Dr. Babasaheb Ambedkar. A short movie made by ABP Majha Channel was played by Prof. Ashok Kamble, NCC Officer on Dr.B.R.Ambedkar.
Prof. Shamkant Deshmukh Sir presented the Biography of Dr.B.R.Ambedkar and Principal Sir also expressed his views on the multifaceted personality and the First Law Minister of Independent India.
All the participants of the 14 Hours Abhyas Abhiyan were presented with Certificate of Participation.
Dr. Shantashree Sengupta did comparing of the Program and Mr. Amit Salunke have the Vote of Thanks.
Regards,
Dr. Shantashree Sengupta,
Librarian.

























# *Events Conducted in the Library during April 2022*





















# *Events Conducted by the Library during April 2022*



































# *Events Conducted by the Library during April 2022*




































# *Events Conducted by the Library during April 2022*




**सकाळ**

## डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सलग चौदा तास अभियानाचे आयोजन करून त्यांना अभिवादन केले. १४ एप्रिल हा जागतिक ज्ञान दिन आहे. वाचन सवयींना चालना देण्यासाठी लायब्ररी आणि माहिती केंद्रातर्फे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांच्या मार्गदर्शनाखाली १३ एप्रिलला सकाळी ६.३० ते ८.३० या वेळेत १४ तासांच्या 'रीडाथॉन'चे आयोजन करण्यात आले. या वेळी समन्वयक डॉ. मिलिंद बोडके, ग्रंथपाल शांतश्री सेनगुप्ता आदी उपस्थित होते.

Pune, Pune-Today
16/04/2022 Page No. 3

# *Events Conducted in the Library during April 2022*

## *3.Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti: 30th April 2022*

On 30th April 2022, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated the Birth Anniversary of Rashtrasant Tukdoji Maharaj as per the instructions in Government of Maharashtra's GR under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir.

Principal Sir mentioned that Tukdoji Maharaj was born in Amravati District of Maharashtra and was a disciple of was a disciple of Aadkoji Maharaj. Tukdoji Maharaj was involved in social reforms in the rural regions of Maharashtra, including construction of roads. He wrote Gramgeeta which describes means for village development. Many of the development programs started by him have continued to work efficiently after his death. Tukdoji Maharaj once attended a World Religions and World Peace Conference in Japan.

Saint Tukdoji Maharaj performed rigorous penance and spiritual exercises in self-realisation. He also was a great orator and a musician who composed more than 3000 bhajans (spiritual poems) in Hindi and Marathi, having performed for the spiritual teacher Meher Baba in 1937 and 1944. He has also written many articles on Dharma, society, nation and education. He studied the existing religious sects and other schools of thought and discussed religious and secular problems of the devotees. He was determined to re-define socio-Spirituality and revitalise and awaken the nation. Saint Tukdoji Maharaj worked immensely for the Status of Women in Society. In 2005, the Nagpur University was renamed to Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University.

Under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta, Prof. Dimple Bhatia, Department of Psychology and Library Staff paid their respect to Sant Tukdoji Maharaj.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

Regards,
Dr. Shantashree Sengupta,
Librarian.







# *Events Conducted in the Library during April 2022*



























# *Events Conducted by Departments in April 2022*

# *Vyapar Mela 2021-2022*



# *Vyapar Mela 2021-2022*

व्यापार मेळा २०२१-२२' या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांमध्ये व्यवहार कौशल्य विकसित करण्यासाठी व त्यांच्यात उद्योजकतेचे बीजारोपण करण्यासाठी महाविद्यालयात गेली अनेक वर्षे हा उपक्रम राबविला जात आहे. महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी सजवलेल्या विविध स्टॉल्सवर आज दिवसभर विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर सहकारी यांच्यात उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळत आहे.












# *Vyapar Mela 2021-2022*







Faculty members and students visiting the various stalls during the *Vyapar Mela* 2022

# *Department of Animation*




The Department of Animation organised Parents Meet on 09.04.2022.

# *Department of Animation: Alumni Meet on 23th April 2022*






# *Department of Mathematics*

The Department of Mathematics organized Guest lecture by Retired Head of the Department Prof. A. V. Rayarikar for the UG and PG students on 20.4.2022.









## कला मंडळ व साहित्य संघटना : आशयाना गजल



# Department of Hindi

दिनांक 06 मार्च 2022 को हिंदी विभागीय ग्रंथालय को प्रोफेसर ओमप्रकाश शर्मा (पूर्व हिंदी विभागाध्यक्ष, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे) जी ने 60 हिंदी पुस्तकें एवं पत्रिकाएँ भेंट-स्वरुप प्रदान कीं ।

- डॉ . प्रेरणा उबाळे,

हिंदी विभागाध्यक्षा











# Department of Hindi



प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटी का

मॉडर्न कला, विज्ञान और वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे- 05

हिंदी विभाग

हॉल नं. 432 A के संदर्भ में सूचना 22/04/2022

दि. 23/04/2022 को सुबह- 9.30 से दोपहर 02:30 बजे तक हॉल नं. 432 A में हिंदी विभाग द्वारा "बिदाई समारोह , विशेष उपलब्धिप्राप्त हिंदी छात्र सम्मान और सांस्कृतिक कार्यक्रम " का आयोजन किया गया है। इस कार्यक्रम हेतु हिंदी विशेष स्नातक और एम.ए. हिंदी साहित्य के सभी छात्र उपस्थित रहनेवाले हैं।

अत: सभी आदरणीय विभागप्रमुखों को सादर निवेदन है कि कृपया इस दिन अपनी तासिकाओं का नियोजन उपर्युक्त समय में न करें तथा हिंदी विभाग को सहयोग प्रदान करें। सहयोग की अपेक्षा के साथ धन्यवाद।

| | | |
|---|---|---|
| 22/04/2022 | P.Ubale 22/4/2022 | |
| डॉ. राजकुमार बारमुख | डॉ. प्रेरणा उबाळे | डॉ. राजेंद्र झुंजारराव |
| वनस्पतिशास्त्र विभाग | सहायक प्राध्यापक | प्राचार्य |
| मॉडर्न महाविद्यालय | हिंदी विभागप्रमुख | मॉडर्न महाविद्यालय |



प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटी का

मॉडर्न कला, विज्ञान और वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे – 05

हिंदी विभाग

बिदाई समारोह , विशेष उपलब्धि प्राप्त छात्र सम्मान और सांस्कृतिक कार्यक्रम "

दिनांक : 20/04/2022

हिंदी विभाग के तृतीय वर्ष कला, हिंदी विशेष एवं द्वितीय वर्ष कला, एम. ए. हिंदी साहित्य के सभी छात्रों को सूचित किया जाता है कि शनिवार, दिनांक 23 अप्रैल 2022 को सुबह 11.30 बजे ऑनलाइन प्रणाली से उनके लिए बिदाई समारोह आयोजित किया जा रहा है। प्रस्तुत कार्यक्रम में छात्र हिंदी विभाग एवं मॉडर्न महाविद्यालय के संदर्भ में मंतव्य, हिंदी विभाग एवं महाविद्यालय में प्राप्त अनुभव अभिव्यक्त कर सकते हैं। साथ ही स्वरचित कविता का पाठ अथवा गीत-गायन कर सकते हैं।

इसके अतिरिक्त छात्रों के लिए सांस्कृतिक कार्यक्रम / Funfair Games का आयोजन किया गया है। कृपया इस कार्यक्रम में हिंदी के सभी छात्र उपस्थित रहें।

| | |
|---|---|
| डॉ. प्रेरणा उबाळे | डॉ. राजेंद्र झुंजारराव |
| हिंदी विभागाध्यक्षा | प्राचार्य |
| (संपर्क : 7028525378) | मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त) |





# *Department of Hindi*

## *हँसते- खेलते बिदाई, छात्र सम्मान और सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न"*

दिनांक 23 अप्रैल 2022 को हिंदी विभाग द्वारा आयोजित तृतीय वर्ष, कला और एम. ए. हिंदी साहित्य द्वितीय वर्ष के बिदाई समारोह का आयोजन किया गया था। उनके नए भविष्य के लिए हिंदी विभाग की ओर से शुभकामनाएँ प्रदान की गईं।

इसके साथ ही हिंदी विशेष के छात्रों ने अन्य महाविद्यालयों में जाकर जो पुरस्कार अर्जित करनेवाले धवल बारेवार, आफ़शा मशायक, अरुण गावडे, कृष्णा पांचाळ इन छात्रों का सम्मान आदरणीय प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव सर के करकमलों से किया गया। इस अवसर पर प्राचार्य डॉ. झुंजारराव सर ने छात्रों के उज्ज्वल भविष्य की कामना की तथा अपनी दो कविताएँ पढ़कर सुनाईं। कला शाखा की उपप्राचार्या डॉ. अमृता ओक मॅडम ने हिंदी विभाग के छात्रों को शुभकामनाएँ प्रदान कीं।

इन दो कार्यक्रमों के बाद छात्रों ने कुछ खेलों का आयोजन किया था, जिसमें उपस्थित छात्र और हिंदी के सभी प्राध्यापकों को सहभागी होकर अत्यंत प्रसन्नता हुई।

बिदाई समारोह, छात्र सम्मान और सांस्कृतिक कार्यक्रम का संयोजन हिंदी विभागाध्यक्ष डॉ. प्रेरणा उबाळे जी ने किया तथा कार्यक्रम का मंच- संचालन प्रा. असीर मुलाणी और प्रा. संतोष तांबे जी ने किया।

हिंदी विभाग,

मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त), पुणे 05

Dt: 23.4.2022









# *Department of Hindi*










# *Department of Hindi*

दिनांक 26 अप्रैल 2022 को हिंदी विभाग, मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त), पुणे 05 के तैयार होनेवाले स्वतंत्र ग्रंथालय हेतु डॉ. वासंती वैद्य (पूर्व राजभाषा अधिकारी, अनुवादक, हिंदुस्तान पेट्रोलियम, चर्चगेट, मुंबई) जी ने अपने संचय की लगभग 40 पुस्तकें भेंट-स्वरुप प्रदान कीं। डॉ. वासंती वैद्य मैडम के प्रति बहुत आभार।



# *Department of German*

A collaborative seminar was organised by three German Departments, namely Savitribai Phule Pune University, Fergusson College and Modern College on 23rd April 2022. Students from Fergusson and Modern College did an extensive comparative research on two German literary novels – 'Aus dem Leben eines Taugenichts' by a renowned German author Joseph von Eichendorff from the literary epoch of Romanticism from the 18th century and the contemporary version of this book written by Prof. Dilip Rajguru, a retired German Professor from Pune, titled 'Aus dem Leben eines indischen Taugenichts'. A book club was formed by the Head of the German Department – Prof. Sneha Mahajan. The students read and studied both the novels in this 10-days long book club assisted by Prof. Mahajan and later, under the guidance of Prof. Mahajan, the students wrote and presented small research papers based on the comparative studies of these works. They also staged a couple of scenes from the novels and presented self-musicalized and self-composed poems from the novel.

For the students, this was their first encounter with research. They did exceedingly well in writing the papers; their ability to think critically and their understanding of the literary works were appreciated by all the teachers and guests at the seminar. It was also their first ever interaction with students from other colleges and they very well excelled at it and learned a lot from this experience.

The Seminar was attended by the author of the novel 'Aus dem Leben eines indischen Taugenichts' himself – Prof. Dilip Rajguru Sir, and was interviewed about his debut novel. The students got a chance to pose their questions to Rajguru Sir about his novel and its autobiographical nature, as also about the linguistic aspects of his book. They intriguingly engaged in the talk by asking curious questions, thereby taking Sir down the memory lane.

The Seminar ended with a cultural program, namely with a live German theatre play 'Long live die deutsche Sprache' by a Pune based German theatre group called 'Die Quatschköpfe'.

All in all, it was a super enriching experience for the students. It really gave them the required edge, but more importantly boosted their confidence about their language skills further more.

- Prof. Sneha Mahajan
Head, Department of German
MCASC, Pune-5.

# *Department of German*










# *Department of Psychology*



# *Department of Psychology*

मानसशास्त्र विभागातर्फे २९ अणि ३० एप्रिल 22 रोजी ***Counselling Camp –2022*** घेण्यात आला. कॉलेजचे विद्यार्थी आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरीकांनी याचा लाभ घेतला. डॉ. श्रद्धा साकतकर यांनी या कॅम्प चे आयोजन केले होते. प्राचार्य झुंजारराव यांनी सर्वांचे अभिनंदन केले.
















# *Faculty Members Invited as Resource Persons during April 2022*

# *Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi Invited as Resource Person*

## पुणे बार असोसिएशनतर्फे व्याख्यान

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२ -** क्रांतिज्योती महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुणे बार असोसिएशनच्या वतीने मॉडर्न कॉलेजच्या मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. निशा भंडारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.



**पुणे :** पुणे बार असोसिएशनच्या वतीने डॉ. निशा भंडारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात प्रथम क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग थोरवे यांनी केले. यावेळी बारचे उपाध्यक्ष ॲड. विवेक भरगुडे, ॲड. लक्ष्मण येळे पाटील, सचिव ॲड. अमोल शितोळे, ॲड. सुरेखा भोसले, खजिनदार ॲड. प्रथमेश भोईटे, ऑडिटर ॲड. शिल्पा कदम आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पुणे बार असोसिएशनच्या सचिव ॲड. सुरेखा भोसले यांनी केले. तर, आभार कार्यकारिणी सदस्य ॲड. तेजस दंडगव्हाळ यांनी मानले.

Dr SP Lawande, state president, Maharashtra Federation of University and College Teachers Organisation (MFUCTO), said, "The NAAC is constituted by the University Grants Commission (UGC). This system is for the assessment and accreditation of all universities and colleges. The NAAC team cross-checks information given by the administration during spot visits. Now, the NAAC has directed higher education institutions to submit self-assessment reports. This will create chaos. Most colleges are run by politicians. Principals and professors may suffer mental stress during the submission of reports. Some colleges from suburban and rural areas may submit fake information. The NAAC team visit should be mandatory. The option of self-assessment has always failed in India. We will oppose this decision."

Pune Mirror 28.4.2022

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# मॉडर्न प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा सुवर्णमहोत्सवी स्नेहमेळावा

**पुणे** : मंगलमय सनईचे सूर, मोगऱ्याच्या सजावटीने सर्वत्र दरवळलेला सुगंध, रांगोळ्या अन् फुलांच्या पायघड्या अशा प्रफुल्लित वातावरणात परस्परांशी गळाभेट घेत सुवर्णमहोत्सवी माजी विद्यार्थी मेळावा नुकताच साजरा झाला. जंगली महाराज रस्त्यावरील मॉडर्न प्रशालेतून १९७१ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेले आणि वयाची पासष्ठी ओलांडलेले १२० विद्यार्थी -विद्यार्थिनी घंटा खणाणल्यावर मनाने जणू शाळेतल्या बाकावरच जाऊन पोहोचले. अर्धशतकाचा काळ लोटल्यावर आणि करोना प्रादुर्भावानंतर मित्रमंडळींना भेटण्यासाठी अनेक जण परगावहून मेळाव्यामध्ये सहभागी झाले होते.

शाळेतील पी. के. जोशी, नेनेबाई आणि महाजनसर या गुरुवर्यांचा सत्कार त्यांच्या निवासस्थानी जाऊन करण्यात आला. विविध क्षेत्रांत नावाजलेल्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या दोन पुस्तकांचे प्रकाशन मित्र परिवाराच्या उपस्थितीत झाले. स्नेहमेळाव्याची आठवण म्हणून विद्येची देवता सरस्वतीची मूर्ती सर्वांना देण्यास आली. भारलेल्या वातावरणात पुन्हा लवकरच भेटण्याच्या बोलीवर सर्वांनीच एकमेकांचा निरोप घेतला.

लोकसत्ता
Fri, 29 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67736299

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# ‘मॉडर्न’च्या विद्यार्थ्यांना मिळाली ‘को-पायलट’ होण्याची संधी

**औंध, ता. ३ :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूल (मुलांची) या शाळेतील इयत्ता नववीत शिकणारे एनसीसीचे विद्यार्थी अभिषेक गायकवाड, प्रसाद रासगे, प्रांज पेरकर यांना को-पायलट म्हणून विमानाच्या कॉकपिटमध्ये बसून उंच अवकाशात भरारी घेण्याची संधी मिळाली.

ग्रुप कॅप्टन रमेश जाधव, प्रशालेचे शिक्षक व एनसीसी ऑफिसर अमित ओमासे यांच्यासमवेत विद्यार्थ्यांनी एनडीए खडकवासला येथून हा प्रवास केला. प्रवासादरम्यान आलेला अनुभव हा विद्यार्थ्यांसाठी रोमहर्षक व संस्मरणीय ठरला. उड्डाण करतानाचा थरार, पुणे शहरावरून दिसणारे विहंगम दृश्य याची अनुभूती विद्यार्थ्यांनी घेतली. त्याचबरोबर विमान कसे चालवायचे याचा प्रत्यक्ष अनुभव रमेश जाधव यांनी दिला. कॅडेट प्रसाद रासगे याने या उपक्रमामुळे सैन्यात भरती होण्यासाठी मोठे प्रोत्साहन मिळाल्याचे सांगितले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष गजानन एकबोटे, संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, प्रशालेचे निरीक्षक उद्धव खरे, मुख्याध्यापिका रोहिणी काळे, उपमुख्याध्यापिका वंदना सोनोने, पर्यवेक्षक निवृत्ती गोपाळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



**पुणे : मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी को-पायलट म्हणून प्रत्यक्ष विमानातून भरारी घेण्याचा अनुभव घेतला.**

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**पुढारी**

# बारावीचा शेवटचा पेपर उद्या

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या बारावी परीक्षेचा शेवट गुरुवारी (दि.७) भाषा विषयाच्या पेपरने होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षेतून सुटका होणार आहे.

दहावीपाठोपाठ बारावीची परीक्षादेखील संपत असल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबरच राज्य मंडळ, परीक्षेच्या कामातील यंत्रणादेखील सुटकेचा नि:श्वास टाकणार आहे.

राज्यात बारावीची परीक्षा ४ मार्च ते ७ एप्रिलदरम्यान घेण्यात येत आहे. त्यानुसार इंग्रजी विषयाने सुरू झालेल्या परीक्षेचा भाषा विषयाच्या पेपरने शेवट होणार आहे. पहिल्या सत्रात १०.३० ते २ दरम्यान मराठी, गुजराती, सिंधी, कन्नड, मल्याळम, तमीळ, तेलगू, पंजाबी, बंगाली आदी विषयांचे पेपर होणार आहेत. तर दुपारच्या सत्रात ३ ते ६.३० दरम्यान उर्दू, फ्रेंच, स्पॅनीश, पाली आदी विषयांचे पेपर होणार आहेत.

मार्च २०२० मध्ये कोरोना प्रादुर्भावाचे परीक्षेवर संकट होते. त्यानंतर २०२१ मध्ये दहावी-बारावीची परीक्षा रद्द करावी लागली. यंदा मात्र कोरोनाचा फारसा प्रादुर्भाव नसल्यामुळे परीक्षा सुरळीत सुरू आहे.

> कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष महाविद्यालयात येऊन परीक्षा देता येते याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत आहे. विद्यार्थी उत्साहात पेपर लिहीत आहेत. परीक्षा कालावधीत पूर्णवेळ विद्यार्थी वर्गात उपस्थित असल्यामुळे चांगल्या पद्धतीने पेपर लिहीत असल्याचे दिसत आहे.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

Pune Edition
Apr 6, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# लस न घेतलेल्यांना कॉलेजांत प्रवेश



**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने राज्यातील कॉलेजे शंभर टक्के उपस्थितीने सुरू झाली आहेत. त्यामुळे आता लसीकरण पूर्ण नसलेल्या विद्यार्थ्यांनाही कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार आहे. महाविद्यालयात येण्यासाठी लशींचे दोन्ही डोस घेण्याची अट शिथिल करण्यात आली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी याबाबत घोषणा केली. करोनाचा प्रादुर्भाव ओसरल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तिसऱ्या लाटेनंतर महाविद्यालये सुरू करण्यात आली. तेव्हा लसीकरण झालेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जात होता. १५ ते १८ या वयोगटातील विद्यार्थ्यांचे लसीकरण उशिरा झाल्याने त्यांना पहिला डोस घेतल्यानंतर प्रवेश देण्यात आले. आता मात्र, विद्यार्थ्यांनी लशीचा एकही डोस घेतला नसेल किंवा एकच डोस घेतला असेल तरीही कॉलेजमध्ये प्रवेश मिळू शकणार आहे.

सामंत यांनी घेतलेल्या निर्णयाचे पुण्यातील प्राचार्यांनी स्वागत केले आहे. शहरातील जवळपास ८० टक्के विद्यार्थ्यांनी लशींचे एक किंवा दोन डोस घेतले आहेत. 'विद्यार्थ्यांमध्ये करोनाविषयी जनजागृती झाली असून, गर्दीच्या ठिकाणी नियमांचे पालन करण्याची सवय लागली आहे. मास्कचाही वापर केला जात आहे. त्यामुळे आता करोनाविषयी कोणतीही बंधने न लादता केवळ जनजागृती करून शिक्षण पुढे न्यायला हवे,' असे मत प्राचार्यांनी मांडले आहे. दोन्ही लशींची अट शिथिल केल्यामुळे विद्यार्थ्यांचे कॉलेजला येण्याचे प्रमाण वाढेल, असा विश्वासही प्राचार्यांनी व्यक्त केला.

> "उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. मुलांमध्ये आता करोनाविषयी मुबलक जनजागृती झाली आहे. अनेकांना त्याचे गांभीर्य लक्षात आले आहे. त्यामुळे आता स्वतःहून काळजी घेण्याचे प्रमाण वाढल्याने त्यांच्यावर लसीकरण बंधनकारक करण्यासारख्या अटी लादण्यात काहीच अर्थ नाही. उच्चशिक्षण मंत्र्यांचा हा निर्णय अतिशय योग्य आहे.
>
> **- डॉ. सविता दातार,** प्राचार्या, स. प. महाविद्यालय

> लसीकरण बंधनकारक असल्याची अट शिथिल केल्याने विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. आता करोनाचे सावट संपत असून, विद्यार्थ्यांचे शिक्षण मूळ पदावर येणे ही प्राथमिकता असायला हवी. प्रशासकीयदृष्ट्याही हा निर्णय सोयीचा आहे.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

Maharashtra Times 11.4.2022

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

# मॉडर्न कॉलेजमध्ये 'नीरज व गीत लेखन कार्यशाळा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर येथील हिंदी विभागाच्या 'हिंदी फिल्म क्लब' अंतर्गत 'प्रसंग नीरज : कवि नीरज गीत-कविता वाचन, विश्लेषण और गीत लेखन कार्यशाला' नुकतीच झाली. यामध्ये डॉ. देवधर यांनी कविता, गीत, गझल साहित्य प्रकारांमध्ये असलेली भिन्नता विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. तसेच गीत लेखन, छंद व गझलेतील घटकांवर त्यांनी सारगर्भित मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत, हिंदी विभाग, (मॉडर्न कॉलेज) हा आधुनिक भारतीय भाषेच्या हिंदी भाषा शिक्षण विषयक कार्यशाळा आयोजित करणारा पहिला विभाग ठरला आहे. हिंदी विभाग प्रमुख डॉ. प्रेरणा उबाळे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले व कार्यशाळेमागील भूमिका सर्वांसमोर मांडली. मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी मनोगत व्यक्त केले. सचिव प्रा. श्यामकांत देशमुख यांनी आयोजनासाठी सहकार्य केले.

सूत्रसंचालन हिंदी विभागाचे प्रा. असीर मुलाणी आणि संतोष तांबे यांनी केले.

Hello Pune
Page No. 2 Apr 10, 2022
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

सकाळ

# 'ऑफलाइन'साठी सज्ज व्हा, उठा चला!

## परीक्षेसाठी अंतर्गत मूल्यमापन, सराव, चर्चेवर भर देण्याचे तज्ज्ञांचे आवाहन

**पुणे, ता. २७ :** उन्हाळी सत्राची परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यास बहुतेक सर्वच विद्यापीठांनी पसंती दर्शवली आहे. अशा वेळी विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षांसाठी स्वतःची मानसिकता तयार करायला हवी. त्याचबरोबर अंतर्गत मूल्यमापन, लेखी परीक्षेचा सराव, अभ्यासाचे नियोजन आणि गटचर्चेवर भर दिल्यास विद्यार्थी सचोटीने परीक्षेत यश संपादन करू शकतात, असा विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.



उशिराने झालेल्या हिवाळी परीक्षा अन् अल्पावधीत उरकणारे उन्हाळी सत्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आव्हानात्मक ठरत आहे. अशा वेळी ऑनलाइन परीक्षा घेऊन संपूर्ण प्रक्रियाच लवकर उरकण्याची मागणी विद्यार्थी करत आहे. याच पार्श्वभूमीवर कुलगुरूंनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यासोबत झालेल्या बैठकीत नेहमीच्या ऑफलाइन परीक्षेला प्राधान्य देणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता ऑफलाइन परीक्षेसाठी मानसिकता तयार करण्याचे आवाहन प्राध्यापक करत आहे. अभियांत्रिकी महाविद्यालय पुणेचे डॉ. जयंत करजगीकर म्हणाले, "सीओईपीच्या परीक्षा आता ऑफलाइन पद्धतीने होत आहेत. विद्यार्थ्यांनी आता डोळ्यात तेल घालून गांभियनि अभ्यास करायला हवा."

### विद्यार्थी म्हणतात...

- हिवाळी परीक्षा मार्चमध्ये संपल्या, जूनपर्यंत अभ्यासक्रमाबरोबरच प्रात्यक्षिके, प्रकल्प, कार्यानुभव पूर्ण करणे आव्हानात्मक
- राज्यासह जगभरातील उच्च शिक्षणासाठीच्या प्रवेश परीक्षा जूनपासून सुरू होतात. अशा वेळी प्रवेशांना अडचणी येणार
- ऑफलाइन परीक्षेमुळे अंतिम परीक्षेचा निकाल लांबल्यास, नोकरभरती आणि इतर प्रवेशासाठी अडचणी वाढणार

### अशी आहे त्रिसूत्री

- ऑफलाइन परीक्षेची मानसिकता तयार करा
- अंतर्गत मूल्यमापनासह हातात असलेल्या गुणांवर विशेष लक्ष द्या
- गट चर्चा, लेखी सराव, प्राध्यापकांनी मार्गदर्शन करावे

"अडीच महिन्यांपासून महाविद्यालये ऑफलाइन सुरू झाली असून, परीक्षेच्या दृष्टीनेही सर्व तयारी पूर्ण झाली आहे. विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन परीक्षेत तासाला १५ मिनिटे वाढली आहेत. तसेच द्वितीय सत्राचा कालावधीही वाढवून मिळाला आहे. विद्यार्थ्यांचे अहित होऊ नये म्हणून सर्व काळजी घेतली आहे. भविष्यातील नोकरी, व्यवसायाच्या संधीसाठी विद्यार्थ्यांनी ऑफलाइन परीक्षांना महत्त्व द्यावे.

**- डॉ. राजेंद्र झुंझारराव,** मॉडर्न कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पुणे

"ऑफलाइन परीक्षेची विद्यार्थ्यांनी विनाकारण चिंता करू नये. परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना दोन पेपरमध्ये काही दिवसांचा अवधी मिळणार आहे. त्याचा निश्चित फायदा घ्यायला हवा. महाविद्यालय स्तरावर प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांना परीक्षेबद्दल मार्गदर्शन करायला हवे.

**- डॉ. के. सी. मोहिते,** प्राचार्य, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर

---

"एसटी सेवा आता पुन्हा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा प्रश्न मिटला आहे. त्यामुळे आता त्यांनी वर्गात नियमित बसायला हवे. वेळच्यावेळी वर्गातील अभ्यासक्रम पूर्ण करून घेणे गरजेचे आहे. कधी ना कधी तरी ऑफलाइन परीक्षा द्यावीच लागणार आहे. येत्या परीक्षेसाठी १५ मिनिटे अधिकचा वेळ मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी न घाबरता परीक्षेला समोर जावे.

**- डॉ. संजय चाकणे,** कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

Pune, Main
28/04/2022 Page No. 1

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाचे मोल मिळायला हवे

## अधिसभा सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला कुलगुरूंकडून उत्तर

**पुणे, दि. ३१** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कमवा व शिका योजनेत विद्यार्थी संख्येमागील निधीची वाढविण्यात यावी, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली. यासंदर्भात कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, कमवा व शिका योजनेत विद्यार्थी करत असलेल्या कामाचा त्यांना कितपत उपयोग होतोय हे तपासले पाहिजे. विद्यार्थ्यांनी केवळ गवत उपटण्याचे काम करू नये. त्यांनी काय काम केले पाहिजे, याची रूपरेषा ठरविली पाहिजे. विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाचे मोल मिळायला हवे.

विद्यापीठाच्या अधिसभेत मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पावर सदस्यांनी विविध कपात सूचना मांडत प्रशासनाला धारेवर धरले. विद्यापीठाचे घटलेले उत्पन्न, कमवा व शिका योजनेतील गैरप्रकार, परीक्षा विभागाच्या कामकाजातील त्रुटी, बांधकाम विभागातील अनियमितता व इतर पायाभूत सुविधांवरील तरतुदींवर सदस्यांनी आक्षेप नोंदवले. गेल्या पाच वर्षांपासूनच विद्यापीठातील बांधकाम सातत्याने सुरू आहे. एकदाचे काय सर्व पैसे घेऊन बांधकाम संपवा, अशी मागणी अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी यावेळी केली.

याबाबत राजेश पांडे म्हणाले, केवळ अधिकाऱ्यांना दोष देऊन चालत नाही. बांधकामात मागील चार वर्षांत अनियमितता दिसत होती. आता आपण बांधकाम दिरंगाईला दंड लावण्याचे काम सुरू केले आहे. प्रत्येक दिरंगाईला काहीना काही कारण आहे. जाणीवपूर्वक ते केले नाही. आता आपण अपूर्ण काम पूर्ण करण्यावर भर देत आहे. काहींचे शुल्क अजून देणे बाकी आहे, म्हणून ही तरतूद केली आहे.

### कागदपत्र उपलब्धच नाही

अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर यांनी परीक्षा विभागाच्या गलथान कारभाराकडे लक्ष वेधले. परीक्षेच्या गुणपत्रिका विद्यार्थ्यांना वेळेवर मिळाल्या नाहीत. कागदाच्या अभावामुळे गुणपत्रिकाच छापता न येणे हे विद्यापीठासाठी मोठी नामुष्की आहे. हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. वेळेत गुणपत्रक न मिळाल्याने अनेक विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशाला मुकावे लागले आहे. मोठा आर्थिक डोलारा असलेल्या विद्यापीठाला गुणपत्रिकांसाठी योग्य तरतूद नसणे हे निश्चितच भुषणावह नाही, असेही त्या म्हणाल्या. दरम्यान, गुणपत्रिकांसंबंधी झालेली ही चूक निश्चितच गंभीर असून, यापुढे अशी चूक होणार नाही, अशी ग्वाही विद्यापीठ प्रशासनाने दिली.

प्रभात Fri, 01 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67181996

पुढारी

# प्रश्नांमुळे विद्यापीठाचे प्रशासन घायाळ!

## शेवटच्या अधिसभेत विविध विषयांवरून जोरदार खडाजंगी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाचे कर्मचारी उद्धट वागतात... परीक्षा विभागाचे कामकाज व्यवस्थित नाही... अशा एक ना अनेक प्रश्नांनी विद्यापीठाचे सभागृह अधिसभा सदस्यांनी दणाणून सोडले. परंतु या प्रश्नांनी कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि कुलसचिव मात्र घायाळ झालेले दिसले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि अधिसभा सदस्यांची शेवटची दोन दिवसीय अर्थसंकल्पीय अधिसभा पुणे विद्यापीठात पार पडली. जवळपास साडेचार वर्षे शांततेत आणि गोडीगुलाबीत होत असलेल्या अधिसभेचे स्वरूप गुरुवारी मात्र वेगळेच होते. कधी सदस्य आणि प्रशासन यांच्यात तर कधी सदस्यांमध्येच खडाजंगी झाली.



अधिसभेच्या दुसऱ्या दिवशी अर्थसंकल्पातील कपात सूचना मांडण्यात आल्या. त्यावर व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी स्पष्टीकरण दिले आणि सदस्यांनी कपात सूचना मागे घेतल्या नंतर १८ कोटी तुटीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. डॉ. संजय खरात यांनी महाविद्यालयांची गुणवत्ता, एनएसएससाठीची तरतूद याबाबत, बागेश्री मंठाळकर यांनी कमवा व शिका योजना, विद्यार्थ्यांना उशिरा मिळालेल्या गुणपत्रिका तर डॉ. कान्हू गिरिमकर यांनी महाविद्यालयांना चुकीच्या कार्याबद्दल होत असलेल्या दंडाबद्दल धारेवर धरले. शशिकांत तिकोटे यांनी पीएचडीच्या प्रश्नावरून तर गिरीष भवाळकर यांनी विविध प्रश्नांवरून प्रशासनाला जेरीस आणले. त्यांच्या विद्यापीठातील बांधकामाबाबतच्या अनियमिततेच्या प्रश्नावर तर अधिसभा सदस्यांमध्ये जुंपल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यापीठाची डॉ. करमळकर यांची शेवटची अधिसभा वादळी झाली.

**कुलगुरूंकडून कर्मचाऱ्यांचा निषेध**

विद्यापीठातील अनेक कर्मचारी मग्रूरपणे वागतात, याचा किस्सा एका सदस्याने सांगितला. त्यावर डॉ. करमळकर म्हणाले, 'विविध अधिकार मंडळे ठराविक काळच असतात, असे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना वाटते. त्यामुळे ते ऐकत नाहीत, असा अनुभव मलादेखील आला आहे. अशा प्रवृत्तीचा निषेध करतो.'

**कमवा-शिका म्हणजे गवत उपटणे नव्हे**

कमवा व शिका म्हणजे केवळ गवत उपटण्यासारखी कामे नसून, विद्यार्थ्यांना कौशल्याबाबत योग्य मानधन देणे अपेक्षित आहे. त्यामुळे या योजनेची पुनर्बांधणी करण्याची मागणी अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर यांच्यासह इतर सदस्यांनी केली.

### बांधकाम अनियमिततेवरून जुंपली

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील बांधकामासंदर्भात 'कॅग'ने ताशेरे ओढले होते. त्यासंदर्भातील प्रश्नोत्तरे सुरू असताना विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांमध्येच जुंपल्याचे दिसून आले. कॅगच्या अहवालातील त्रुटींचा आढावा घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने समितीही नेमली. मात्र या समितीचे सदस्य आणि अध्यक्षांबरोबरच समितीला विद्यापीठ प्रशासनाकडून सहकार्य होत नसल्याचा आरोप करण्यात आला. अधिसभा सदस्य गिरीश भवाळकर यांनी २०१२ ते २०१६ या काळातील बांधकामावर कॅगच्या अहवालासंबंधित प्रश्न विचारला. विशेष म्हणजे यासंबंधी जी समिती गठित केली आहे तिचे भवाळकर सदस्य आहेत. त्याहून गमतीची बाब म्हणजे या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी समितीचेच अध्यक्ष डॉ. महेश अबाळे समोर उभे होते. समितीच्या आजवर झालेल्या चार बैठकींना स्थावर मालमत्ता विभागाने संबंधित आकडेवारी अथवा कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याचे या चर्चेतून समोर आले. ही अतिशय गंभीर बाब असल्याचे सदस्य बागेश्री मंठाळकर यांनी समोर आणले. समितीच्या रेंगाळलेल्या कामाबद्दल बोलताना डॉ. कान्हू गिरमकर यांनी काही आक्षेप घेतले असता डॉ. अबाळे यांनीही आक्रमक पद्धतीने त्याला प्रत्युत्तर दिले. त्यामुळे सभागृहातील सदस्यांमध्ये काही काळ वादळी चर्चा झाली. अखेर यावर कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी येत्या तीन महिन्यांत ठोस कार्यवाही करण्याचे अश्वासन दिले.

Pune Edition
Apr 1, 2022 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सकाळ

# मग्रूर कर्मचाऱ्यांचा कुलगुरूंकडून निषेध

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पी अधिसभा पडली पार

**पुणे, ता. ३१ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील काही कर्मचारी व अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना अनेकदा अपमानकारक वागणूक मिळते. कित्येकदा छोट्या-मोठ्या कामांसाठी तासनतास थांबावे लागते, सर्वसामान्य विद्यार्थी या व्यवस्थेत भरडले जात आहेत. आता याची झळ अधिसभा सदस्यांनाही बसली असून, गुरुवारी (ता. ३१) अधिसभेत त्यांनी हा मुद्दा उचलला गेला धरला. यावर कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी आपल्यालाही असे अनुभव आल्याचे सांगत, मग्रूर कर्मचाऱ्यांचा जाहीर निषेध केला.

विद्यापीठाची अर्थसंकल्पी अधिसभा गुरुवारी पार पडली. या वेळी अधिसभा सदस्य डॉ. गिरीश भवाळकर मुद्दा उपस्थित करत म्हणाले, ''पुण्यातीलच एका महाविद्यालयातील विद्यार्थिनीचे परीक्षा विभागात काम अडले होते. चार तास थांबूनही विद्यार्थिनीचे काम होत नाही. मी स्वतः संबंधित कर्मचाऱ्याशी मोबाईलवर बोलतो. तरी त्याने माझे ऐकले नाही. आम्हाला अधिसभा सदस्य वगैरे माहिती नाही असे उद्धट उत्तर त्याने दिले. आता तुम्ही कुणाशीही बोला या विद्यार्थिनीचे काम होणार नाही. एका अधिसभा सदस्यांशी कर्मचारी सौजन्याने वागू शकत नाहीत, तर सर्वसमान्य विद्यार्थ्यांचा विचारच नको.'' डॉ. भवाळकर यांच्यासारखा आम्हालाही अनुभव आल्याचे अनेक सदस्यांनी या वेळी सांगितले. विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालयांमध्ये अशा अनेक अडचणींना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे. या चर्चेची दखल घेत डॉ. करमळकर म्हणाले, ''कुलगुरू असो की अधिसभा सदस्य पाच वर्षांनंतर तो जाणार आहे. मात्र आपण कायम इथेच आहोत अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये दिसते. त्यामुळे त्यांच्यात मग्रुरी आली असून, मी याचा जाहीर निषेध करतो.''

विद्यापीठातील विविध विभागांना दरवर्षी पायाभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपये देण्यात येतात. मागील पाच वर्षांपासूनच सातत्याने बांधकाम सुरू आहे. एकदाचे काय सर्व पैसे घेऊन बांधकाम संपवा, अशी मागणी अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी केली. या संबंधीची अर्थसंकल्पीय दुरुस्ती त्यांनी सुचविली होती. अनेक प्रकल्पांची मुदत संपली तरी विकासकांकडून बांधकाम पूर्ण करण्यात आले नाही. सायन्स पार्कमध्ये पाण्याची आणि ड्रेनेजची कामे अपूर्ण आहेत. सामाजिकशास्त्र विभागाचे काम मागील १० वर्षांपासून चालू आहे. अजूनही ते पूर्ण झाले नाही. तर अशा बांधकामांना दरवर्षी ही तरतूद का करायची, असा प्रश्नही ढोरे यांनी विचारला. विद्यापीठातील बांबू प्रशिक्षण केंद्राचा किती विद्यार्थ्यांना फायदा झाला, त्यातील उपक्रम नक्की किती पार पडले याची माहिती द्यावी, असेही ढोरे यांनी विचारले.

**परीक्षेसंबंधीचे मानधन थेट खात्यावर**

महाविद्यालयांमधील सेवकांचे परीक्षेसंबंधीचे मानधन आता थेट बँक खात्यावर जमा करणार आहे. विद्यापीठाच्यावतीने लवकरच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर (डीबीटी) प्रणालीचा अवलंब करणार आहे. प्रा. डॉ. सुधाकर जाधवर यांनी लेखा परीक्षण अहवाल सादर करताना ही माहिती दिली. तसेच राष्ट्रीयकृत बँकांबरोबरच आता सहकारी क्षेत्रातील शेड्यूल्ड बँकांमध्ये विद्यापीठाच्या ३० टक्के रकमेची गुंतवणूक करण्यात येणार आहे. यामुळे व्याजाच्या उत्पन्नामध्ये भर पडण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

### गुणपत्रक दिरंगाईवर घरचा आहेर

कागद नसल्यामुळे गुणपत्रकाची छपाई उशिरा करण्याची नामुष्की विद्यापीठावर आली होती. त्या विषयाचे गांभीर्य लक्षात आणून देत, बागेश्री मंठाळकर यांनी विद्यापीठाला घरचा आहेर दिला. त्या म्हणाल्या, ''हा अत्यंत गंभीर प्रकार असून, वेळेत गुणपत्रक न मिळाल्याने अनेक विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशाला मुकावे लागले. मोठा आर्थिक डोलारा असलेल्या विद्यापीठाला गुणपत्रिकांसाठी योग्य तरतूद नसणे निश्चितच भूषणावह नाही.'' गुणपत्रिकांसंबंधी झालेली ही चूक गंभीर असून, यापुढे अशी चूक होणार नाही, अशी ग्वाही विद्यापीठ प्रशासनाने दिली.

### समितीची हतबलता चव्हाट्यावर

विद्यापीठातील बांधकामांसंदर्भात 'कॅग'ने ताशेरे ओढले होते. कॅगच्या अहवालातील त्रुटींचा आढावा घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने एक समितीही नेमली. मात्र, या समिती सदस्य आणि अध्यक्षांबरोबरच समितीच्या साहाय्यासाठी कार्य करणाऱ्या बांधकाम विभागाची तत्परता चव्हाट्यावर आली आहे. प्रश्नोत्तराच्या तासात सदस्यांमधील शाब्दिक खडाजंगी पाहायला मिळाली. गिरीश भवाळकर यांनी सन २०१२ ते १६ या काळातील बांधकामवर कॅगच्या अहवालासंबंधी प्रश्न विचारला. विशेष म्हणजे यासंबंधी जी समिती गठित केली आहे. तिचे भवाळकर सदस्य आहेत. त्याहून गमतीची बाब म्हणजे या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी समितीचेच अध्यक्ष डॉ. महेश अबाळे समोर उभे होते. या समितीचे कामकाज मागील साडेचार वर्षांत काहीच झाले नसल्याचे समोर आले. तसेच समितीच्या बैठकींना स्थावर मालमत्ता विभागाने संबंधित आकडेवारी अथवा कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याचे या चर्चेतून समोर आले.

Pune, Main
01/04/2022 Page No. 2

सकाळ

# पेपर तपासणीवर शिक्षकांचा बहिष्कार

## विनाअनुदानित संघटनांनी उपसले अस्त्र

**पुणे, ता. ३१ :** विनाअनुदानित शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सातत्याने पाठपुरावा करूनही त्या पूर्ण न झाल्यामुळे दहावी-बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर शिक्षकांनी बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे उत्तरपत्रिका वेळेत तपासल्या जातील का?, असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, संबंधित शिक्षकांना पेपर तपासण्यास सांगण्यात येत असल्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत सांगण्यात आले आहे.

विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान द्यावे, या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण मिळावे, या प्रमुख मागण्यांसाठी विनाअनुदानित शिक्षक संघटनेमार्फत गेल्या काही वर्षांपासून सातत्याने राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु, या मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करत असल्याने अखेर शिक्षकांनी पेपर न तपासण्याचा पवित्रा घेतला आहे. दरम्यान, दहावी-बारावीच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम सुरू असून, परीक्षेचा निकाल वेळेत लावण्याचा राज्य मंडळाचा प्रयत्न आहे. या बाबत महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित शाळा कृती समितीचे विभागीय अध्यक्ष संजय डावरे म्हणाले, ''विनाअनुदानित शाळांमध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर पान ७ वर »

> **"विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आणि विद्यार्थी-पालकांच्या मानसिकतेचा विचार करून, विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांनी पेपर तपासणी करावी, अशी विनंती केली जात आहे. या विनाअनुदानित शिक्षक संघटनांच्या मागण्यांचे निवेदन राज्य सरकारकडे पाठविण्यात आले आहे. दरम्यान, परीक्षांचा निकाल वेळेत लावण्यासाठी मंडळस्तरावरून प्राधान्याने कार्यवाही सुरू असल्याचे प्रकटन मंडळामार्फत करण्यात आले आहे.**
>
> **– शरद गोसावी,**
> अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune, Main
01/04/2022 Page No. 201

सकाळ

### पेपर तपासणीवर शिक्षकांचा बहिष्कार

» पान I वरून

कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे वेतन मिळायला हवे. विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान मिळावे, ही आमची प्रमुख मागणी आहे. परंतु शासन मागणीची पूर्तता करण्यात टाळाटाळ करत आहे. शाळा कृती समितीने २४ फेब्रुवारी रोजी शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अन्यथा दहावी-बारावीच्या पेपर तपासणीवर बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशारा दिला होता. तरीही विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांकडे विभागीय मंडळामार्फत पेपर तपासणीसाठी पाठविण्यात येत आहेत. आम्ही अद्याप पेपर तपासण्यास सुरुवात केलेली नाही. यामध्ये राज्यातील जवळपास २५ हजार शिक्षक सहभागी झाले आहेत.''

Pune, Main
01/04/2022 Page No. 7

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# विद्यापीठाच्या मग्रूर कर्मचाऱ्यांचा कुलगुरूंनीच केला निषेध

## अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील परीक्षा विभागात विविध कामानिमित्ताने येणाऱ्या विद्यार्थी व महाविद्यालयांमधील कर्मचाऱ्यांना काही मग्रूर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थी भरडले जात असून, अधिसभा सदस्यांनाही त्याची झळ बसत असल्याचे गुरुवारी अधिसभेच्या बैठकीत मांडले गेले. त्यामुळे खुद्द विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यापीठाच्या या मग्रूर कर्मचारी व अधिकाऱ्यांचा गुरुवारी निषेध केला.

विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. गिरीश भवाळकर यांनी विद्यापीठातील परीक्षा विभागातील काही मग्रूर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना अत्यंत वाईट वागणूक



दिली जात असल्याचे सांगितले. अधिसभा सदस्य म्हणूनही विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकडे विद्यार्थी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले असता त्यांच्याकडून प्रतिसाद दिला जात नाही. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे व कुलसचिव प्रफुल्ल पवार यांच्याशी बोलणे झाले असल्याचे सांगितल्यानंतरही संबंधित अधिकारी दाद देत नाहीत. उलटसुलट उत्तरे देतात, असेही भवाळकर यांनी यावेळी सभागृहाला सांगितले. त्यावर इतरही सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या वाईट वागणुकीचा पाढा वाचला. तसेच अशा मग्रूर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली.

विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. संजय खरात, डॉ. के.एल. गिरमकर यांनीही आपल्या अनुभवाचे कथन केले. परीक्षा विभागातील वरिष्ठ अधिकारी चांगल्या पद्धतीने काम करीत असले तरी कनिष्ठ अधिकारी मग्रुरीने वागत असल्याचे अधिसभा सदस्यांनी स्पष्ट केले. त्यावर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनीसुद्धा नाराजी व्यक्त केली. विद्यापीठ अधिकार मंडळातील सदस्य हे पाच वर्षांसाठीच असतात; पण प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी हे कायमस्वरूपी असतात. त्यामुळे ते मग्रुरीने वागत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मीसुद्धा याचा निषेध करतो, असे कुलगुरूंनी सभागृहात सांगितले.

Hello Pune
Page No. 2 Apr 01, 2022
Powered by: erelego.com

पुणे महाराष्ट्र टाइम्स । पुणे । शुक्रवा

# कर्मचाऱ्यांची मग्रुरीची भाषा

## विद्यापीठात विद्यार्थ्यांना त्रास देणाऱ्यांचा कुलगुरूंकडूनही निषेध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'कुलगुरू, अधिकार मंडळ, सिनेट सदस्य हे पाच वर्षांसाठी असून, विद्यापीठातील कर्मचारी कायमस्वरूपी असल्याची भावना काही कर्मचाऱ्यांमध्ये आहे. त्यामुळेच त्यांना मग्रुरी आली असून, त्याचा मी निषेध करतो,' असे सांगून कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी त्यांना स्वतः आलेल्या मग्रुरीच्या अनुभवाबाबत स्पष्ट मत गुरुवारी मांडले. राज्यात दोन वर्षे करोनाचा प्रादुर्भाव असतानाही, पुणे विद्यापीठाने कौतुकास्पद कामगिरी केल्याने डॉ. करमळकर आणि अधिकाऱ्यांचे सदस्यांनी आपल्या भाषणातून अभिनंदन केले.

पुणे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय सिनेट गुरुवारी झाली. या वेळी अध्यक्षस्थानी डॉ. नितीन करमळकर उपस्थित होते. २०२२-२३च्या अर्थसंकल्पाच्या कपातीबाबत झालेल्या चर्चेत सदस्य गिरीश भवाळकर, संतोष ढोरे, अभिषेक बोके, शशिकांत तिकोटे, बाळासाहेब आगरकर, डॉ. पंकज मिनियार, बागेश्री मंठाळकर, बाळासाहेब सागडे, डॉ. कान्हू गिरमकर, डॉ. नंदू पवार, राजीव साबडे, दादाभाऊ शिनलकर आदींनी सहभाग घेऊन मत मांडले. यावर व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी स्पष्टीकरण दिले. त्यानंतर सुधारणांसह अर्थसंकल्प मजूर करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी या वेळी उपस्थित होते.

करोनाच्या काळात आलेल्या वाईट अनुभवाबाबत भवाळकर म्हणाले, 'पुण्यातीलच एका महाविद्यालयातील विद्यार्थिनीचे परीक्षा विभागात काम होते. अडलेल्या कामासाठी विद्यार्थिनी परीक्षा विभागात जाते. चार तास थांबूनही तिचे काम होत नाही. मी स्वतः संबंधित कर्मचाऱ्याशी बोललो. त्यांना अधिसभा सदस्य असल्याचे सांगितल्यावरही त्यांनी माझे ऐकले नाही. 'आम्हाला अधिसभा सदस्य-बिदस्य माहिती नाही. तुम्ही कुणाशीही बोला, काम होणार नाही,' असे उलट उत्तर दिले. एका सिनेट सदस्याशी कर्मचारी सौजन्याने वागू शकत नाही, तर सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा, तक्रारींचा विचारच होणार नाही.' या प्रकारातून विद्यार्थ्यांच्या कामात अडथळा निर्माण करण्याचे कामही कर्मचारी करीत असून, अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणीही भवाळकर यांनी केली. पीएचडीच्या विद्यार्थ्यांनाही अशा त्रासाला समोरे जावे लागल्याचे डॉ. गिरमकर यांनी सांगितले. चौकशी कक्ष, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रवेश विभाग आदी विभागांमध्ये विद्यार्थ्यांना अशा अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे सदस्यांनी सांगितले. या वेळी डॉ. करमळकर म्हणाले, 'कुलगुरू असो की सिनेट सदस्य, पाच वर्षांनंतर तो जाणार आहे. मात्र, आपण कायम इथेच आहोत, अशी भावना काही कर्मचाऱ्यांमध्ये दिसते. मलाही याचा अनुभव आला आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये मग्रुरी आली असून, मी याचा जाहीर निषेध करतो,' असे डॉ. करमळकर यांनी स्पष्ट केले.

### कमवा-शिका, गुणपत्रिकांना होणारा उशीर, पीएचडी प्रवेशावर चर्चा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कमवा व शिका योजनेच्या कार्यपद्धतीबाबत; तसेच विद्यार्थ्यांना उशिरा मिळालेल्या गुणपत्रिकांच्या मुद्द्यावर बागेश्री मंठाळकर यांनी नाराजी व्यक्त केली. कमवा व शिका म्हणजे केवळ गवत उपटण्यासारखी कामे नसून, विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याबाबत योग्य मानधन देणे अपेक्षित आहे. त्यातून ते आपले शिक्षण पूर्ण करणार आहे. त्यामुळे या योजनेची पुनर्बांधणी करण्याची मागणी मंठाळकर यांच्यासह इतर सदस्यांनी केली. डॉ. करमळकर यांनी योजनेमध्ये सुधारणा करण्याचे स्पष्ट केले. डॉ. खरात यांनी महाविद्यालयांची गुणवत्ता, 'एनएसएस'ची तरतूद याबाबतचे मुद्दे मांडले. डॉ. गिरमकर यांनी अंतर्गत गुणांबाबत महाविद्यालयांकडून चुक झाल्यास, त्यांना दंड करण्यात येत असल्याचा मुद्दा मांडला. शशिकांत तिकोटे यांनी पीएचडीच्या प्रवेशाचा मुद्दा उपस्थित केला. निवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना विद्यापीठाकडून सुवर्णमुद्रा देण्याची योजना बंद करण्याबाबत बोके, डॉ. मिनियार यांनी मुद्दे उपस्थित केले.



Maharashtra Times 1.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# Senate members slam arrogant SPPU staff, officials; VC agrees

### First time in the history of varsity, vice-chancellor admits to arrogance by staff

FILE PHOTO



It is alleged that staffers treat students with disrespect

Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Savitribai Phule Pune University (SPPU) vice chancellor Nitin Karmalkar on Thursday admitted that the staff and officials are arrogant while performing their duties. This is the first time in the history of the university when a VC, who is the administrative head of the SPPU, has made such an observation.

The comment by Karmalkar, who will be retiring on May 17, came during the senate meeting, which witnessed an uproar over some issues on the second consecutive day, including the behaviour of the staff and officials from various departments.

It was alleged that the university staff are not cooperative, behave arrogantly and often treat students with disrespect. The other charges made at the meeting were that students are made to wait for hours for minor work, and in some cases, they also demand bribes.

Karmalkar admitted that he himself had faced similar situation in the past with the staff and officials and condemned the arrogance of the SPPU employees from the dais.

The issue was raised by senate member Girish Bhawalkar. "A student from a college in Pune visited the examination department for some work. She could not get her work done even after waiting for four hours. I personally talked to the staff member concerned, but in vain," he said.

Replying to his observations, Karmalkar said, "The SPPU staff cannot treat a member of the senate and students like this. They have to be courteous towards the people who visit them for official work."

KL Giramkar, a senate member, levelled a serious allegation against the staff, saying that PhD students also face difficulties. "Some employees even expect bribes for doing their work."

Participating in the discussion, Karmalkar made a serious observation: "The staff and officials feel that they are permanently placed in the university while the vice-chancellor and the members of the senate are there for five years only."

### Gold coin scheme, D Litt for Pawar

Senate member Abhishek Bokey strongly opposed the scheme to distribute 10-gm gold coins to retired employees. He demanded discontinuation of the practice. He suggested that a memento instead of a gold coin can be given to retired employees. Lakhs of rupees are being spent on this scheme when the university has been facing funds crunch. However, Nitin Karmalkar rejected the demand.

Abhishek Bokey, Sharad Pawar's grandson, also moved a proposal before the senate for awarding honorary Doctorate of Literature (D Litt) degrees to NCP supremo and veteran cricketer Chandu Borde. It was accepted by the senate.

### CAG report on anomaly goes missing

The Comptroller and Auditor General (CAG) had passed strictures in its report against the construction work carried out by the SPPU during 2012-2016. A three-member inquiry committee was appointed in 2017. Committee chairman Girish Bhavalkar made a shocking revelation in the Q&A session that the CAG documents pointing out anomalies in the SPPU estate department works have gone missing. This caused a huge uproar in the senate. He promised to submit a report in two months.

### Congratulatory motion passed

Senate member and veteran journalist Rajeev Sabade presented a proposal to congratulate Shantishree Pandit, the first woman vice chancellor of Jawaharlal Nehru University (JNU), New Delhi, who earlier served in the SPPU. It was accepted without reading the proposal, which could have caused a din in the meeting. Registrar Prafulla Pawar avoided a possible ruckus and hurriedly accepted the proposal.

Pravin Agencies Pravin Agencies Pravin Agencies Pravin Agencies Pravin Agencies P

Pune Mirror 1.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# SPPU incubator gets ₹5 crore seed funding from Startup India

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** Startups working with the Savitribai Phule Pune University's (SPPU) Research Park Foundation (RPF) will have more opportunities for funds and support now, thanks to the Rs5 crore in seed funding being awarded to the incubator by Startup India.

SPPU-RPF has been ranked in the 'Leaders' category as per the latest evaluation done by the Maharashtra State Innovation Society, which has 17 incubators under its fold. This is the second year in a row that SPPU-RPF is in the leader slot and the only state university incubator to be in this category. It is also mentoring two 'Beginners': PDKV Akola and UDDYAM of Solapur university.

### VARSITY'S VANTAGE POINT

- ₹5 crore seed funding has been awarded to Savitribai Phule Pune University's Research Park Foundation (SPPU-RPF) by Startup India
- The incubator began in 2019
- Today, it has created over 200 jobs with 60 mentors, and business of more than ₹10 crore
- Maharashtra State Innovation Society has ranked it in the 'Leader' category

**STARTUPS WITH SPPU-RPF HAVE GROWN FROM:**

| | |
|---|---|
| 2019 | 11 |
| 2020 | 27 |
| 2021 | 40 |
| 2022 | almost 50 |

Director of Innovation, Incubation and Linkages at SPPU-RPF, Apoorva Palkar, told **TOI**, "This seed funding will open opportunities to provide funds to startups associated with the varsity. We have been working with some very unique startups."

Some prominent ones include Cognilement in the prop tech space, Innovation in agritech, Deeptek in health tech, GSE Hiring in the HR tech space, and Social Index in social innovation.

The recent Atal Rankings of institutions for innovation achievements placed SPPU nationally at the eighth position in the university category. "It's the effort and work of startups, mentors, investors and partners that have helped us achieve this in a short span of three-odd years," summed up Palkar.

The Times of India 1.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

## उत्तरपत्रिका वितरणासाठी पोस्टाची स्वतंत्र यंत्रणा

### बारावीचा निकाल वेळेवर; वाहतुकीसाठी एसटीचा वापर नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : गेले चार ते पाच महिन्यांपासून सुरू असलेल्या एस.टी.च्या संपामुळे इयत्ता बारावीचा निकाल उशिरा लागेल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. परंतु, उत्तरपत्रिकांच्या वितरणासाठी पोस्टाने यंदा स्वत:च्या वाहतूक यंत्रणेचा वापर केला आहे. त्यामुळे बारावीचा निकाल वेळेतच प्रसिद्ध होईल. निकालावर एस.टी.च्या संपाचा कोणताही परिणाम होणार नाही, असे तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षा घेतल्या जात आहेत. परीक्षा झाल्यानंतर तत्काळ उत्तरपत्रिका संबंधित शिक्षकांकडे तपासणीसाठी पाठविल्या जातात. त्यासाठी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे पोस्टाकडे जमा केले जातात.

यापूर्वी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे शिक्षकांकडे पाठविण्यासाठी एस.टी.चा वापर केला जात होता. परंतु, गेल्या काही महिन्यांपासून एस.टी.चा संप आहे. त्यामुळे एस.टी.वर अवलंबून न राहता पोस्ट ऑफिसने स्वत:च्या वाहनांचा वापर करून शिक्षकांकडे उत्तरपत्रिका तपासण्यासाठी पाठविण्यात आल्या आहेत.

### उत्तरपत्रिका कशा पाठविल्या जातात ?



उत्तरपत्रिका पोस्टाकडून दिलेल्या पत्त्यावर विना विलंब पाठविल्या जातात. शिक्षक व मॉडरेटर यांना मोटारीच्या साहाय्याने विभागीय मंडळाकडे उत्तरपत्रिकांचे गठ्ठे पोहोचविता येतात. त्याचा खर्चही राज्य मंडळाकडून दिला जातो.

उत्तरपत्रिकांचे गठ्ठे एस.टी.ने पाठविले जात नाहीत. पोस्टाची स्वतंत्र वाहतूक यंत्रणा त्यासाठी काम करीत आहेत. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणीत कोणत्याही अडचणी येत नाहीत. शिक्षक व मॉडरेटर वेळेत काम पूर्ण करीत आहेत. त्यामुळे निकाल वेळेत जाहीर होण्यास कोणतीही अडचण नाही.

**- महेंद्र गणपुले, प्रवक्ता, मुख्याध्यापक संघ**

पोस्ट विभागाच्या लाल रंगाच्या वाहनांमधून बोर्डाच्या उत्तरपत्रिकांची वाहतूक केली जात आहे. एस.टी.चा संप असल्याने पोस्ट कार्यालयाने स्वत:च्या वाहनांमधूनच ही वाहतूक सुरू ठेवली आहे. त्यामुळे यंदा उत्तरपत्रिका वितरणासाठी एस.टी.वर अवलंबून राहावे लागले नाही.

**-आय. डी. पाटील, सहायक पोस्ट मास्तर, पुणे**

Hello Pune
Page No. 4 Apr 04, 2022
Powered by: erelego.com

## करोना संपूनही विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षेची मागणी म्हणजे धोक्याची घंटा

### उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांचे स्पष्ट मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : करोना प्रादुर्भाव संपल्यानंतर ऑनलाइन परीक्षा घ्या, असे म्हणणे म्हणजे धोक्याची घंटा आहे. यातून विद्यार्थ्यांनी बाहेर पडावे. ऑफलाइन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे समुपदेशन करणे आपली जबाबदारी आहे. विद्यार्थिनींनी ऑफलाइन शिक्षणाची चळवळ उभारावी, असे मत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी रविवारी मांडले.

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या एसएनडीटी महिला विद्यापीठाशी संलग्नित बी. सी.ए आणि बी. डिझाइन पदवी अभ्यासक्रमाच्या दीक्षान्त समारंभात सामंत बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष रवींद्र देव, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव, विद्या कुलकर्णी, मल्लिका सामंत, समीक्षा निकम आदी या वेळी उपस्थित होते. ६५० विद्यार्थिनींना पदवी प्रदान करण्यात आली.

नवीन शैक्षणिक धोरणात समान संधी मंडळ प्रत्येक ठिकाणी असावे, ही शासनाची भूमिका आहे. समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. उच्च शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देण्यासोबत शैक्षणिक गुणवत्तेकडेही लक्ष देण्यात येत आहे. संस्थेचे ३६ कोटी रुपये लवकरच देणार असल्याचे देखील सामंत यांनी सांगितले.

### परीक्षा रद्द करणारा मंत्री म्हणून माझी ओळख

उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा मंत्री म्हणून काम करताना गेल्या दोन वर्षांत परीक्षा रद्द करणारा मंत्री म्हणून माझी ओळख झाली. त्यामुळे मी कुठेही गेलो तरी परीक्षा रद्द करणारा मंत्री आला असेच म्हटले जात असल्याचे सामंत म्हणाले.

लोकसत्ता Mon, 04 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67233382

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# नोकरीसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे सहकार्य

## करून घेणार नोकरीच्या मुलाखतीची तयारी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नोकरीसाठी मुलाखतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म' सुरू केले असून, त्यावर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार असून त्या अनेक कंपन्यांना पाठविण्यात येणार आहे.

**'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म' उपलब्ध : अनेक कंपन्यांना त्या पाठविण्यात येणार**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पिंपरी-चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी प्रकल्प यांच्या एकत्रित प्रयत्नातून 'स्टिक' या उपक्रमांतर्गत ही संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक कौशल्ये या माध्यमातून देण्यात येतील तसेच या व्यासपीठाच्या माध्यमातून वैश्विक स्तरावर संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर, अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, अधिसभा सदस्य संतोष ढोरे उपस्थित होते.



डॉ. करमळकर म्हणाले, जग सातत्याने बदलत असताना काल जे घडलं ते आज अभ्यासक्रमात येण्याची गरज आहे. यासाठी विद्यापीठाकडून सिफोरआयफोर, डिग्री प्लस सारखे उपक्रम घेऊन येत आहे. 'स्मार्ट इंटरव्ह्यू' हेही तशाच प्रकारचे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांना 'इंडस्ट्री रेडी' बनविण्यासाठी व जगातील कंपन्यांशी जोडण्यासाठी त्याची मदत होईल.

प्रभात Tue, 05 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67258481

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### यंत्रमानव, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विद्यार्थ्यांची मुलाखत

#### पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी-पुणे विद्यापीठाचा संयुक्त उपक्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** नोकरीच्या मुलाखतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म या मंचाची निर्मिती केली आहे. या मंचावर यंत्रमानव किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्या कंपन्यांना पाठवल्या जातील.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पिंपरी-चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी प्रकल्प यांच्या एकत्रित प्रयत्नातून स्टिक या उपक्रमांतर्गत या मंचाची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक कौशल्ये या माध्यमातून देण्यात येतील. तसेच या व्यासपीठाच्या माध्यमातून वैश्विक स्तरावर संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ. अपूर्वा

> **जगात सातत्याने होत असलेले बदल अभ्यासक्रमात येण्याची गरज आहे. स्मार्ट इंटरव्ह्यू हा त्याचाच एक भाग आहे. विद्यार्थ्यांना उद्योगांच्या गरजांच्या दृष्टीने घडवण्यासाठी, जगातील कंपन्यांशी जोडण्यासाठी त्याची मदत होईल.**
> — **डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पालकर, अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, अधिसभा सदस्य संतोष ढोरे आदी उपस्थित होते. या मंचावर यंत्रमानव किंवा मशीनच्या माध्यमातून मुलाखत घेतली जाईल. ही मुलाखत अनेक कंपन्यांच्या प्रतिनिधींना पाहता येईल, त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या माध्यमातून कौशल्य विकसित करण्याची संधी मिळू शकेल.

डॉ. पालकर म्हणाल्या, तीनशेपेक्षा जास्त कंपन्या जोडलेल्या या मंचाचा पिंपरी-चिंचवडमधील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना विनाशुल्क वापर करता येईल. डिग्री प्लस व्यासपीठावरही हा उपक्रम लवकरच सुरू करण्यात येईल.

लोकसत्ता Tue, 05 April 2022 https://epaper.loksatta.com/c/6724



### पदवी अभ्यासक्रमाची नवी रचना रोजगार देणार का?

प्रभात Exclusive

**व्यंकटेश भोळा**

**चारवर्षीय अभ्यासक्रमाचा मसुदा तयार**

**पुणे, दि. ४** - नवीन शैक्षणिक राष्ट्रीय धोरण लागू करण्यात येत आहे. त्यात आता तीनऐवजी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम असणार आहे. देशभरात टप्प्याटप्प्याने असे अभ्यासक्रम लागू केले जातील. चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणारा विद्यार्थी हा पूर्ण क्षमतेने पदवी घेऊन बाहेर पडणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नव्या शैक्षणिक राष्ट्रीय धोरणातील चारवर्षीय पदवी अभ्यासक्रमाचा मसुदा जाहीर केला आहे. त्यात संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय मागवण्यात आले आहेत. त्यानंतर अभ्यासक्रम लागू करण्यासाठी कार्यवाहीला सुरू होणार आहे.

#### जुन्या पदवीधारकांचा विचार व्हावा

सध्या तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यास रोजगाराची संधी मिळण्याची शक्यता अत्यल्प आहे. तर, नव्या अभ्यासक्रमानुसार चार वर्षीय अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला रोजगारक्षम बनविण्यात येणार आहे. पण, जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धीसाठी कोणताही निर्णय घेतला गेलेला दिसत नाही. त्याबाबत विचार होणे गरजेचे आहे.

#### अशी असेल रचना

- प्रवेशानंतर एक वर्ष म्हणजेच दोन सत्र (सेमिस्टर) पूर्ण केल्यास विद्यार्थ्याला प्रमाणपत्र मिळेल.
- दोन वर्षे म्हणजे चार सत्र पूर्ण केल्यास पदविका (डिप्लोमा) पूर्ण होईल.
- तीन वर्षे म्हणजे सहा सत्र पूर्ण केल्यास त्याला पदवी मिळेल. हा विद्यार्थी आधीप्रमाणेच दोन वर्षांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्र असेल.
- विद्यार्थ्याने संपूर्ण आठ सत्र पूर्ण केल्यास त्याला चार वर्षांची पदवी मिळेल.
- हा विद्यार्थी एक वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा पीएच.डी. प्रवेशासाठी पात्र असेल.

> चारवर्षीय पदवी अभ्यासक्रमात रोजगाराभिमुख आणि संशोधन क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे या पदवीचे मूल्य वाढणार आहे. चांगले पदवीधर निर्माण होतील. मात्र, पदवीची योग्य पद्धतीने आणि प्रभावीपणे अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे.
> **प्रा. डॉ. संजीव सोनवणे,** अधिष्ठाता, आंतरविद्या शाखीय अभ्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रभात Tue, 05 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67242996

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# Pune university professors march against 'favouritism'

## Staffers Say Moves Lower Standard, V-C Denies Claims

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Members of Savitribai Phule Teachers' Association (SPTA) from Pune university took out a march on Monday protesting against 'favouritism' by vice-chancellor Nitin Karmalkar in appointment of directors to departments.

The teachers also accused the administration of lack of transparency in giving research funds and in faculty promotions and many worthy professors are being neglected and the quality of academics is taking a hit.

However, vice-chancellor Nitin Karmalkar denied any wrongdoing and said that all appointments are done as per the Maharashtra Public Universities Act and when a committee is formed for appointments or promotions, he does not interfere.

### Skewed appointments

SPPU recently regrouped its departments into a school system aimed at better management of resources and utilizing the already less-than-required permanent faculty in the university. Teachers pointed out that the school system, as implemented by the V-C, was a weak model and also expressed dissatisfaction with the nomination of directors of such schools which they feel has been done without following due process and given to people close to the V-C.

Karmalkar said a committee was set up to finalize the school system and they had nominated the director since the statutes of appointment were yet to be drafted and approved by the governor. "Once approved, we will have appointments as per the guidelines," he added.

### Many posts for some

SPTA said that some teachers are given 3-5 positions while others are ignored. "Once teachers retire, it will take others a long time to catch up. Also, because one person is holding so many positions, they cannot concentrate on any, affecting decision-making. HoDs must be rotated every three years as per seniority but there are departments in which the same HoD is working for five years or more," a professor said.

Karmalkar pointed out that in many departments, there is just one permanent staff member or no teacher at the level of a professor who is generally given HoD's post. "Since the state government has not allowed recruitment for a long time, many senior teachers have retired due to which there is no internal option available. In some departments, I have made lecturers as HoD. When it comes to giving responsibility for administrative work, hardly anyone comes forward to accept but for a few due to which they tend to get it," he added.

### Hike in salary

SPTA said that while the university pays just Rs 30,000 for contractual teachers who work as much as the regular staff, the V-C has appointed certain emeritus professors at higher salaries some who come to the department once or twice a month and hardly do any academic activity.

Karmalkar said, "We used to pay Rs 22,000 for the contract teachers, but it was increased to Rs 30,000 in my tenure. The university employs over 100 contractual staff. Funding is a major issue for us too."

### RUSA FUNDING FOR A FEW

- SPTA has said that select faculty were made beneficiaries of funding for research under Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan while the majority were marginalized. "It was implemented in a shoddy manner with no open calls for proposals or any scrutiny of proposals with just one department getting all the funds," the association said
- Karmalkar countered it by saying calls for proposals were made before his tenure and a detailed project report was made, a committee was made to scrutinize the proposals which selected the proposals



### FEW GIVEN PROMOTIONS

- SPTA accused the university administration of not allowing the promotion of some while a select few were given promotions. "Even our applications were kept pending for years before we were called for an interview post which, without giving any reason, they would reject our proposal stating just one line 'not recommended for promotion'. This creates frustration and feeling of insecurity," a member said.
- Karmalkar denied any wrongdoing and said that the committee treats everyone equally. "Some professors, who have multiple papers published and are senior professors, were not able to answer even a single question during the interview. How can we promote such teachers? There is no interference or favouritism in this process. Everything is done fairly by an independent committee and I never interfere with their decisions," he added



The Times of India 5.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### प्राध्यापकांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजीचा सूर

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाच्या विरोधात विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील प्राध्यापकांकडून नाराजीचा सूर उमटला आहे. तीन महिने भेटीसाठी वेळ मागूनही भेट होत नसल्याने त्याच्या निषेधार्थ संघटनेच्या सदस्यांनी काळ्या फिती लावून कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या कार्यालयात प्रवेश करत मागण्यांचे निवेदन सादर केले.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील प्राध्यापकांनी एकत्र येऊन संघटनेची स्थापना केली आहे. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी संघटनेकडून कुलगुरूंच्या भेटीची वेळ मागण्यात येत होती. तीन महिने पाठपुरावा करूनही कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी भेटीसाठी वेळ न दिल्याने निषेध म्हणून संघटनेच्या सदस्यांनी काळ्या फिती लावून कुलगुरूकार्यालयात प्रवेश करत मागण्यांचे निवेदन सादर केले.

विविध प्रशालांची निर्मिती आणि त्यांच्या निर्देशकांच्या नियुक्त्यांमध्ये पारदर्शकता असावी, एक व्यक्ती व एक पदानुसार नेमणुका व्हाव्यात, विभागप्रमुखांच्या नियुक्त्या पारदर्शक पद्धतीने व्हाव्यात, कंत्राटी प्राध्यापकांचे वेतन पन्नास हजार रुपये करावे, प्राध्यापकांना दिल्या जाणाऱ्या संशोधनाचे वाटप न्याय्य पद्धतीने करावे, प्राध्यापकांची पदोन्नती, विमा योजना, रजा आणि सुट्टीबाबत तातडीने कार्यवाही केली जावी इत्यादी मागण्या करण्यात आल्याची माहिती संघटनेकडून देण्यात आली.

लोकसत्ता Wed, https

लोकमत

### विद्यापीठाच्या रिसर्च पार्क फाऊंडेशनला पुन्हा 'लीडर्स' चा दर्जा

#### पाच कोटी रुपयांचा सीड फंड

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'एसपीपीयू रिसर्च पार्क फाऊंडेशन' ला 'लीडर्स'चा दर्जा मिळाला असून पाच कोटी रुपयांचे बीज भांडवलसुद्धा (सीड फंड) देण्यात आले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची रिसर्च पार्क फाऊंडेशन ही सेक्शन ८ अंतर्गत येणारी कंपनी आहे. मागील वर्षी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य विभागाला हा लिडर्सचा दर्जा देण्यात आला होता. या वर्षी महाराष्ट्रातील १७ नवोपक्रम केंद्रांमध्ये फाऊंडेशनला हा दर्जा मिळाला आहे तर सोलापूर विद्यापीठाच्या 'उद्यम' आणि अकोल्यातील 'पीडीकेव्ही' या केंद्रांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारीही सोपविण्यात आली आहे. ही दोन्ही केंद्र सुरुवातीच्या टप्प्यामध्ये गणली जातात.

रिसर्च पार्क फाऊंडेशनच्या माध्यमातून २०१९ मध्ये ११, २०२० मध्ये २७ तर २०२१ मध्ये ५० स्टार्टअपवर काम सुरू आहे, असे नमूद करून विद्यापीठातील इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या, फाऊंडेशनच्या माध्यमातून २०० पेक्षा अधिक नोकऱ्या निर्माण करण्यात आल्या आहेत. विद्यापीठाशी संबंधित काही प्रमुख स्टार्टअपमध्ये प्रॉप स्पेसमधील कोम्प्लिमिेंट, ॲग्री टेकमधील इनोव्हेशन, हेल्थटेक मध्ये दिपटेक, सोशल इनोव्हेशनमध्ये सोशल इंडेक्सचा समावेश आहे.

> तीन वर्षांच्या अल्प कालावधीत विद्यापीठाने केलेल्या कामाची ही पावती आहे. महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटीने अकोला आणि सोलापूर येथील नवोपक्रम केंद्रांचे मार्गदर्शक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची निवड केली याचा नक्कीच आनंद आहे.
>
> \- डॉ. अपूर्वा पालकर, संचालिका, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य केंद्र



Pune Main
Page No. 2 Apr 06, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# एसपीपीयू रीसर्च पार्क फाऊंडेशनला पाच कोटींचा निधी

**महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीतर्फे सलग दुसऱ्यांदा लीडर दर्जा**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एसपीपीयू रीसर्च पार्क फाउंडेशनला केंद्र सरकारच्या स्टार्टअप इंडियाकडून पाच कोटींचा निधी देण्यात आला आहे. तर महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटीकडून सलग दुसऱ्यांदा लीडर दर्जा मिळाला आहे.

एसपीपीयू रीसर्च पार्क फाऊंडेशन ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची नोंदणीकृत कंपनी आहे. गेल्या वर्षी पहिल्यांदा विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य विभागाला हा लीडर दर्जा देण्यात आला होता. यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातील १७ नवोपक्रम केंद्रांमध्ये फाऊंडेशनला हा दर्जा मिळाला आहे. रीसर्च पार्क फाउंडेशनच्या माध्यमातून २०१९ मध्ये ११, २०२० मध्ये २७ तर २०२१ मध्ये ५० नवउद्यमींवर काम सुरू असल्याचे विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य विभाग प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर यांनी सांगितले.

### दोन केंद्रांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी

सोलापूर विद्यापीठाचे उद्यम आणि अकोल्यातील पीडीकेव्ही ही दोन केंद्रे सुरुवातीच्या टप्प्यावर आहेत. या केंद्रांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी रीसर्च पार्क फाऊंडेशनकडे देण्यात आल्याचे डॉ. पालकर यांनी सांगितले.

पाच कोटींच्या निधीचा उपयोग नवउद्यमींना भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी करता येईल. आतापर्यंत फाऊंडेशनकडून २०० हून अधिक नोकऱ्यांची निर्मिती झाली आहे. विद्यापीठाशी संबंधित काही प्रमुख नवउद्यमींमध्ये कृषी तंत्रज्ञान, आरोग्य तंत्रज्ञान आदी क्षेत्रातील नवउद्यमींचा समावेश आहे. अटल रँकिंग फॉर इनोव्हेशन या क्रमवारीत विद्यापीठाने आठवे स्थान प्राप्त केले. तर लीडर दर्जा ही तीन वर्षांत विद्यापीठाने केलेल्या कामाची पावती आहे, असेही डॉ. पालकर यांनी नमूद केले.

लोकसत्ता Wed, 06 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67278894

पुढारी

# नवा 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म'

## पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी आणि विद्यापीठाचा उपक्रम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नोकरीसाठी मुलाखतीची तयारी करत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आता एक नवीन व्यासपीठ घेऊन आले आहे. 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म'वर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार असून त्या अनेक कंपन्यांना पाठविण्यात येणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पिंपरी चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी प्रकल्प यांच्या एकत्रित प्रयत्नातून स्टिक या उपक्रमांतर्गत ही संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक कौशल्ये या माध्यमातून देण्यात येतील, तसेच या व्यासपीठाच्या माध्यमातून वैश्विक स्तरावर संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड शहरातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि प्लेसमेंट ऑफिसर उपस्थित होते.

डॉ. पालकर म्हणाल्या, '३०० पेक्षा जास्त कंपन्या जोडलेल्या या व्यासपीठाचा पिंपरी चिंचवडमधील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना विनाशुल्क वापर करता येईल. तसेच लवकरच डिग्री प्लस व्यासपीठावरसुद्धा हा उपक्रम नाममात्र शुल्कात सुरू करण्यात येणार आहे.'

### अशी होणार विद्यार्थ्यांची मुलाखत...

- रोबो किंवा मशिनच्या माध्यमातून उमेदवाराची मुलाखत होणार
- ती मुलाखत अनेक कंपन्यांच्या प्रतिनिधींना पाहता येणार
- त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत
- विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या माध्यमातून कौशल्य विकसित करण्याची संधी

"जग सातत्याने बदलत असताना काल जे घडले ते आज अभ्यासक्रमात येण्याची गरज आहे यासाठी विद्यापीठाकडून सिफोरआयफोर, डिग्री प्लस यासारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. 'स्मार्ट इंटरव्ह्यू' हेही तशाच प्रकारचे व्यासपीठ असून विद्यार्थ्यांना 'इंडस्ट्री रेडी' बनविण्यासाठी व जगातील कंपन्यांशी जोडण्यासाठी त्याची मदत होईल.

**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
Apr 6, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# रोबो घेणार विद्यार्थ्यांची मुलाखत

**विद्यापीठात आता 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म'**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नोकरीसाठी मुलाखतीची तयारी करीत असणाऱ्या विद्यार्थ्यांची मुलाखत आता 'रोबो' घेणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म' ही संकल्पना तयार करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या साह्याने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार असून, त्या अनेक कंपन्यांना पाठविण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पिंपरी-चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी प्रकल्प यांच्या एकत्रित प्रयत्नातून 'स्टिक' या उपक्रमांतर्गत ही संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक कौशल्ये या माध्यमातून देण्यात येतील; तसेच या व्यासपीठाच्या माध्यमातून वैश्विक स्तरावर संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, 'इनोव्हेशन सेल'च्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर, अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, अधिसभा सदस्य संतोष ढोरे आदी या वेळी उपस्थित होते.

'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म'च्या माध्यमातून एखादे मशिन किंवा रोबो विद्यार्थ्यांची मुलाखत घेईल. मशिनने किंवा रोबोने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना द्यावी लागणार आहेत. एकाच वेळी हा इंटरव्ह्यू अनेक कंपन्यांमध्ये पाहिला जाईल. या व्यासपीठाशी ३०० पेक्षा जास्त कंपन्या जोडलेल्या असून, पिंपरी-चिंचवडमधील सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना याचा विनाशुल्क वापर करता येणार आहे. याशिवाय पुण्यासह जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी लवकरच डिग्री प्लस व्यासपीठाच्या माध्यमातून हा उपक्रम नाममात्र शुल्कात सुरू करण्यात येणार आहे.

> "जग सातत्याने बदलत असताना काल जे घडले ते आज अभ्यासक्रमात येण्याची गरज आहे. यासाठी विद्यापीठाकडून सिफोर आयफोर, डिग्री प्लससारखे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. 'स्मार्ट इंटरव्ह्यू'हेही तशाच प्रकारचे व्यासपीठ असून, विद्यार्थ्यांना 'इंडस्ट्री रेडी' बनविण्यासाठी व जगातील कंपन्यांशी जोडण्यासाठी त्याची मदत होईल.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**असा असेल स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म...**

- रोबो किंवा मशिनच्या माध्यमातून तुमची मुलाखत होणार.
- ती मुलाखत अनेक कंपन्यांच्या प्रतिनिधींना पाहता येणार.
- त्यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत.
- विद्यार्थ्यांना मुलाखतीच्या माध्यमातून कौशल्य विकास करण्याची संधी मिळणार.
- मुलाखतींची तयारी करण्यासाठीही हे व्यासपीठ उपयुक्त.

Maharashtra Times 6.4.2022

**सामना**

# एमफिल शिक्षकांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा

मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी) – विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एमफिलधारक शिक्षकांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा केला आहे. या शिक्षकांना कालबद्ध पदोन्नतीचे सर्व लाभ देण्याच्या सूचना यूजीसीने जारी केल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून एमफिलधारक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत शिक्षकांची मस्ट संघटना पाठपुरावा करीत होती. संघटनेच्या मागणीला अखेर यश आले असून यूजीसीने या शिक्षकांना कालबद्ध पदोन्नतीचे (कॅस) लाभ देण्याच्या सूचना जारी केल्या आहेत.

वर्ष २००६ ते २००९ पर्यंत सेवेत असणाऱ्या शिक्षकांनाच कॅस पदोन्नतीचा लाभ देण्यात येईल. त्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, असे विचित्र धोरण उच्च व तंत्रशिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी अवलंबले होते. याविरोधात न्यायालयाने निकाल देऊनही हा प्रश्न यूजीसीकडे टोलवण्यात येत होता. अखेर यूजीसीनेच याप्रकरणी खुलासा केला असून १ जानेवारी १९९४ ते ११ जुलै २००९ या कालावधीत सेवेत रुजू झालेल्या आणि १४ जून २००६ पूर्वी विद्यापीठ निवड समितीद्वारे निवड झालेल्या तसेच नेट/सेटमधून सूट मिळालेल्या आणि नियमित नियुक्ती झालेल्या सर्व शिक्षकांना CASचे (कॅस) म्हणजेच कालबद्ध पदोन्नतीचे सर्व लाभ देण्यात यावेत, असे यूजीसीने जाहीर पत्राद्वारे जाहीर केले आहे. या निर्णयाचे मस्ट संघटनेचे अध्यक्ष डॉ. विजय पवार आणि महासचिव डॉ. शांतज देशभ्रतार यांनी स्वागत केले आहे.

Mumbai Edition
Apr 6, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सकाळ



हेल्थ केअर

डॉ. नानासाहेब थोरात




# ब्रेन मशिन इंटरफेस : भविष्य आणि संधी

मागील आठवड्यातील लेखामध्ये आपण ब्रेन मशिन इंटरफेस या तंत्रज्ञानाची ओळख करून घेतली. या लेखामध्ये आपण या तंत्रज्ञानाचे भविष्य आणि त्यामधील संधी पाहूया.

इतर मेडिकल तंत्रज्ञानाच्या तुलनेत ब्रेन मशिन इंटरफेस नावीन्यपूर्ण कल्पना असून भविष्यात हे व्यवहार्य जगात वेगाने वापरले जाईल. हे तंत्रज्ञान फक्त रुग्णालयात न राहता डॉक्टरांच्या विशेष वैद्यकीय उपचारांच्या पलीकडे वापरले जाईल. या तंत्रज्ञानाच्या जोडीला वेअरेबल इलेक्ट्रॉनिक्स सारखी उपकरणे ब्रेन सेन्सर तंत्रज्ञानाने सुसज्ज असतील जिथे वापरकर्ता डिव्हाइस नियंत्रित करण्यासाठी 'एंटर' आणि 'डिलीट' सारख्या सोप्या आदेशांचा विचार करू शकेल.

सध्या रुग्णालयात ईईजी तसेच एमआरआयसारखे तंत्रज्ञान मेंदूच्या आजारांचे निदान करण्यासाठी वापरले जाते. याउलट मेंदूच्या वेगवेगळ्या आजारणावर मात्र औषधांचाच वापर केला जातो. ही औषधे पूर्णतः मेंदूचे आजार बरे करत नाही. याउलट ब्रेन-कॉम्प्युटर इंटरफेस हा कमी आक्रमक पर्याय आपल्या मेंदूच्या लहरींची नोंद करणारे एक बाह्य उपकरण असेल. हे आता वापरात असलेल्या ईईजी, इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राफी, किंवा ईईजी, कदाचित एमआरआय याहीपेक्षा वेगळे असेल. त्याचबरोबर न्यूरल क्रियाकलाप रेकॉर्ड करण्यासाठी दुसरे-सर्वोत्तम उपकरण असेल.

## करिअरच्या संधी

१ हे सध्या बाल्यावस्थेत असणारे क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असणार आहेत. कॉम्प्युटर इंजिनिअर, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर, मेडिकल डॉक्टर्स, परिचारिका आणि मेडिकल उपकरणे तयार करणारे उद्योजक याना या क्षेत्रात नवीन उपलब्ध होतील.

२ छोट्या स्वरूपातील उपकरणांचे संगणकीय प्रोग्रॅम तयार करणे आणि त्यांना मानवी संवेदनांचे स्वरूप देणे हे नवीन क्षेत्र उदयास येईल, यामध्येही वरील सर्व कौशल्य असणाऱ्या तरुणांना संधी निर्माण होतील.

३ हे तंत्रज्ञान मानवी विचार शारीरिक क्रिया संगणक प्रतिसाद यांच्यातील अंतर दूर करेल. त्यामुळे एखाद्या तरुण इंजिनिअरिंग आणि मेडिकल क्षेत्रातील कौशल्ये असतील तर त्यांना या क्षेत्रात संधी निर्माण होतील.

## विद्यापीठांना नवीन अभ्यासक्रमाच्या संधी

सध्या भारतामध्ये नवीन शैक्षणिक धोरण राबवण्याचे नियोजन सुरू आहे. त्याचजोडीला भारतमध्ये दर महिन्याला एक नवीन खासगी विद्यापीठ उभे राहत आहे. या स्पर्धेच्या युगात अनेक खासगी आणि सरकारी विद्यापीठांना नवनवीन अभ्यासक्रम तयार करणे आणि त्यामधून विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी निर्माण करणे अशा दोन्ही आव्हानांवर काम करावे लागणार आहे. ज्याप्रमाणे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे युग आले त्याचप्रकारे भविष्यात अनेक विद्यापीठांमध्ये ब्रेन-मशीन इंटरफेस या तंत्रज्ञानावर आधारित नवीन अभ्यासक्रम तयार करता येतील. त्याचजोडीला ज्या विद्यापीठांमध्ये इंजिनिअरिंग आणि मेडिकल ही दोन्ही अभ्यासक्रम आहेत त्यांना या संधीचा फायदा लगेच घेता येईल. ही दोन्ही क्षेत्रे एकत्र करण्याचे आव्हान शैक्षणिक संस्थांना पेलता आल्यास या क्षेत्रात फक्त नवीन कौशलेच नाही तर त्यावर आधारित नोकरीच्या लाखो संधी निर्माण करता येतील.

Pune, Pune-Today
06/04/2022 Page No. 7

# पुणे विद्यापीठ-मेलबर्न विद्यापीठाचे हातात-हात

## प्रशिक्षण आणि संशोधनासाठी 'यूओएम-एसपीपीयू अकॅडमी'ची स्थापना

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठ यांनी प्रशिक्षण आणि संशोधनासाठी एकत्रितपणे 'यूओएम-एसपीपीयू अकॅडमी'ची स्थापना केली. या अकॅडमीच्या माध्यमातून या दोन्ही विद्यापीठांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांना एकमेकांच्या विद्यापीठात जाऊन प्रशिक्षण व अध्यापन करता येणार आहे. शिवाय, संयुक्त प्रकल्पही हाती घेता येणार आहेत.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठाने अशा प्रकारे स्थापन केलेली ही पहिलीच अकॅडमी आहे. याचे बुधवारी उद्घाटन 'इंटरडिसीप्लिनरी स्कुल ऑफ सायन्स' येथे करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, डॉ. अविनाश कुंभार, मेलबर्न विद्यापीठाचे उपकुलगुरू मिशेल वेसले, प्रा. मुथुपंडियन अशोककुमार, विज्ञान शाखेच्या प्रा. मोयरा ओब्रॅन उपस्थित होते.



> मेलबर्न विद्यापीठाबरोबर झालेल्या करारातून सध्या आपण विज्ञान शाखेत अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ही केवळ सुरुवात असून भविष्यात सामाजिक शास्त्र, शिक्षणशास्त्र, डिजाइन थिंकिंग आदीही विषयात अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न आहे.
> – **डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मेलबर्न विद्यापीठासोबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बी.एस्सी. (ब्लेंडेड) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याअंतर्गत जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र अशा चार विषयांचे मूलभूत शिक्षण दिले जाते. दरम्यान, 'बी.एस्सी. ब्लेंडेड केल्यानंतर मेलबर्न विद्यापीठातून 'एम.एस्सी. ब्लेंडेड' केलं असून सध्या मेलबर्न विद्यापीठामध्ये संशोधन करत आहे. मेलबर्नमध्ये पुढील अभ्यासक्रम करण्यासाठी अनेक प्रकारच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. संकेतस्थळावर जाऊन या सगळ्याची व्यवस्थित माहिती घेणे गरजेचे आहे,' असे मेलबर्न विद्यापीठात सध्या संशोधन करणारी विद्यार्थिनी ऋचा पाटील हिने स्पष्ट केले.

प्रभात Thu, 07 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67286613

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# युनिव्हर्सिटी कॅम्पस पुन्हा गजबजणार

## सर्व महाविद्यालये ऑफलाइन पद्धतीने सुरू होणार

**मुंबई, दि. ६** - राज्यात काही दिवसांपासून करोना नियंत्रणात असल्याने करोनचे सर्व निर्बंध हटवण्यात आले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये शाळा आणि महाविद्यालयेही ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्यात आले आहेत. मात्र अजूनही राज्यातील युनिव्हर्सिटी कॅम्पस सुरू करण्यात आले नव्हते. मात्र आता उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यासंबंधीची घोषणा केली आहे.

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणारी विद्यापीठे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वर्ग ऑफलाइन पद्धतीने सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उदय सामंत यांनी ट्विट करून दिली आहे. यामुळे दोन



वर्षांपासून ओस पडलेले युनिव्हर्सिटी कॅम्पस पुन्हा गजबजणार आहेत.

सर्व युनिव्हर्सिटी कॅम्पस आणि त्या अंतर्गत येणारे कॉलेजेस आणि विद्यापीठं बंद होते. मात्र आता करोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे कमी झाला असून नियमही हटवण्यात आले आहेत. म्हणूनच आता सर्व युनिव्हर्सिटी कॅम्पस पुन्हा ऑफलाईन पद्धतीने सुरु करण्याचे आदेश उदय सामंत यांनी दिले आहेत. यामुळे करोनाचे सर्व नियम पाळून आणि करोना प्रतिबंधक उपाय योजना पाळून राज्यातील युनिव्हर्सिटी कॅम्पस आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणारी विद्यापीठे, महाविद्यालय पुन्हा सुरु करावीत असा निर्णय घेण्यात आला आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे करोना लसीचे दोन्ही डोस झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये ऑफलाईन पद्धतीने उपस्थित राहता येणार आहे. मात्र ज्यांनी अजूनही करोना लस घेतली नाही अशा विद्यार्थ्यांना उपस्थित राहता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

प्रभात Thu, 07 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67299160

# परदेशी विद्यापीठासह पुणे विद्यापीठाकडून प्रथमच संयुक्त अकादमीची स्थापना

## मेलबर्न विद्यापीठासह सामंजस्य करार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परदेशी विद्यापीठासह प्रथमच अकादमीची स्थापना केली आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठासह सामंजस्य कराराअंतर्गत 'युओएम-एसपीपीयू ॲकॅडमी'ची स्थापना करण्यात आली असून, या अंतर्गत नवीन अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासह संशोधन, प्रशिक्षणाचे उपक्रम राबवले जातील.

गेल्या वर्षीच या अकादमीची स्थापना झाली होती. मात्र करोना प्रादुर्भावामुळे त्याचे प्रत्यक्ष उद्घाटन होऊ शकले नव्हते. बुधवारी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करारावर स्वाक्षरी आणि अकादमीचे उद्घाटन करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, इंटरडिसीप्लिनरी स्कुल ऑफ सायन्स चे प्रमुख डॉ. अविनाश कुंभार, मेलबर्न विद्यापीठाचे उपकुलगुरू मिशेल वेसले, सहायक उपकुलगुरू प्रा. मुथुपंडियन अशोककुमार, विज्ञान शाखेच्या अधिष्ठाता प्रा. मोयरा ओब्रॅन आदी उपस्थित होते. राज्यातील विद्यापीठाने परदेशी विद्यापीठासह पहिल्यांदाच अकादमीची स्थापना केली आहे. मेलबर्न विद्यापीठासह सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून ब्लेंडेड बीएस्सी हा अभ्यासक्रम चालवला जातो. आता डिप्लोमा इन अर्ली चाइल्डहुड आणि बॅचलर ऑफ एज्युकेशन हे दोन अभ्यासक्रम सुरू केले जातील.

नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षण संस्थांना मोकळीक देण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात मेलबर्न विद्यापीठाच्या सहाय्याने सामाजिक शास्त्र, शिक्षणशास्त्र, डिझाईन थिंकिंग अशा विषयात अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रयत्न आहे, असे कुलगुरू डॉ. करमळकर यांनी सांगितले. नवीन शैक्षणिक धोरणात नवसंकल्पनांवर भर आहे. त्यामुळे शिक्षणात नावीन्य, प्रयोगशीलता आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील काही अभ्यासक्रम मेलबर्न विद्यापीठात सुरू करता येऊ शकतात. मेलबर्न विद्यापीठात शिकण्यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू शकते, असे वेसले यांनी नमूद केले.

### दुहेरी पदवी अभ्यासक्रम प्रस्तावित

येत्या काळात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह दुहेरी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचे प्रस्तावीत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) दुहेरी पदवीबाबतचा धोरण निश्चित करण्यात आल्यावर हा अभ्यासक्रम सुरू केला जाईल. त्या अंतर्गत ऑस्ट्रेलियातील विद्यार्थीही पुण्यात शिकायला येऊ शकतील, असे प्रा. मुथुपंडियन अशोककुमार यांनी सांगितले.

लोकसत्ता Thu, 07 April 2022 https://epaper.loksatta.com/c/67299263

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सकाळ

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नियमावली

## गैरप्रकार रोखण्यासाठी पोलिस व संस्थाचालकांमध्ये बैठक

पुणे, ता. ६ : शाळा, महाविद्यालयांच्या परिसरातील गैरप्रकार रोखण्यासाठी पोलिसांनी शहरातील शिक्षण संस्थांचे चालक, प्राचार्य, मुख्याध्यापकांची बैठक आज (ता. ६) पोलिस मुख्यालयात आयोजित केली होती. शहरातील विविध शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये पुरेशा सुरक्षाविषयक उपाययोजना करण्यात याव्यात, अशा सूचना पोलिसांनी दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत नियमावली सादर करण्यात आली. पोलिस आयुक्तालयात मध्यभागातील (परिमंडळ एक) शाळा, महाविद्यालयांचे पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक आदींची बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत परिमंडळ एकच्या पोलिस उपायुक्त डॉ. प्रियंका नारनवरे, विश्रामबाग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील माने, राजेंद्र लांडगे, अनिता मोरे, विक्रम गौड, मुरलीधर करपे, विष्णू ताम्हाणे उपस्थित होते.

**पोलिसांनी केलेल्या सूचना...**

- शाळा, महाविद्यालयांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत
- कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण वर्षभर साठविण्याची सुविधा असावी
- संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वारात नोंदणी पुस्तिका ठेवावी
- बाहेरून येणाऱ्या व्यक्तींची नोंदणी करूनच संस्थेच्या आवारात प्रवेश
- शाळा भरणे, सुटण्याच्या वेळेत कर्मचारी, शिक्षक, सेवकवर्गाने प्रवेशद्वारावर उपस्थित राहावे.
- सुरक्षारक्षक नेमताना त्याची पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी करावी

Pune, Main
07/04/2022 Page No. 2

नवभारत

# स्कूल, कॉलेज प्रमुखों के साथ बैठक

**पुणे.** स्कूल, कॉलेज परिसर में होने वाली गड़बड़ी पर रोक लगाने के लिए पुलिस ने शहर के शिक्षण संस्थाओं के संचालकों, प्राचार्यों, मुख्याध्यापकों की बैठक पुलिस आयुक्तालय में बुलाई थी. बैठक में आये शहर के सभी स्कूलों और कॉलेज से पर्याप्त सुरक्षा उपाय करने के निर्देश पुलिस की तरफ से दिए गए. स्कूल, कॉलेज के परिसर में पुलिस काका, पुलिस दीदी के मोबाइल नं. उपलब्ध कराने के निर्देश दिए गए. इन नंबरों पर किसी भी तरह की परेशानी आने पर संपर्क करें.

Pune Edition
07-apr-2022 Page No. 3
epaper.enavabharat.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# शाळा, महाविद्यालयांच्या परिसरातील गैरप्रकार रोखण्यासाठी उपाय

### पोलिसांकडून संस्थाचालकांना सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शाळा, महाविद्यालयांच्या परिसरातील गैरप्रकार रोखण्यासाठी पोलिसांकडून शहरातील शिक्षण संस्थांचे चालक, प्राचार्य, मुख्याध्यापकांची बैठक पोलीस आयुक्तालयात आयोजित करण्यात आली. शहरातील विविध शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये पुरेशा सुरक्षाविषयक उपाययोजना करण्यात याव्यात, तसेच अनोळखी व्यक्तीला शाळा, महाविद्यालयांच्या आवारात प्रवेश देण्यात येऊ नये, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या.



पोलीस आयुक्तालयात मध्यभागातील (परिमंडळ एक) शाळा, महाविद्यालयांचे पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक आदींची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत परिमंडळ एकच्या पोलीस उपायुक्त डॉ. प्रियंका नारनवरे, विश्रामबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील माने, फरासखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र लांडगे, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिता मोरे, पोलीस निरीक्षक विक्रम गौड, डेक्कन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे, समर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे, खडक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्रीहरी बहिरट आदी या प्रसंगी उपस्थित होते.

या बैठकीत पोलिसांनी शाळा महाविद्यालयातील पदाधिकारी, मुख्याध्यापक, प्राचार्यांना विविध सूचना दिल्या. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत नियमावली सादर करण्यात आली. नियमावलीची अंमलबजावणी करण्याच्या सूचना पोलीस उपायुक्त नारनवरे यांनी दिल्या.

### अनोळखी व्यक्तीला प्रवेश नाकारावा

शाळा, महाविद्यालयांच्या परिसरात पोलीस काका, पोलीस दीदी यांचे मोबाइल क्रमांक चिटकवावेत. या क्रमांकावर कोणतीही अडचण आल्यास त्वरित संपर्क साधावा. शाळेतील संरक्षक भिंत उंच असावी. अनोळखी व्यक्तीला शाळेच्या आवारात प्रवेश देऊ नये. सुरक्षा उपाययोजनेबाबत नियमित बैठका घेण्यात याव्यात तसेच पोलिसांशी नियमित संपर्क साधावा, असेही सांगण्यात आले आहे.

### पोलिसांच्या सूचना नेमक्या काय?

शाळा, महाविद्यालयांच्या आवारात उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. कॅमेऱ्यांचे चित्रीकरण वर्षभर साठविण्याची सुविधा असावी. संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वारात नोंदणी पुस्तिका ठेवावी. बाहेरून येणाऱ्या व्यक्तीचे नाव, पत्ता, मोबाइल क्रमांकाची नोंद करूनच त्याला संस्थेच्या आवारात प्रवेश देण्यात यावा. शाळा भरणे, सुटण्याच्या वेळेत संस्थेतील कर्मचारी, शिक्षक, सेवकवर्गाने प्रवेशद्वारावर उपस्थित रहावे. संस्थेच्या आवारात शक्यतो सेवानिवृत्त सैनिकांना सुरक्षारक्षक म्हणून नेमून त्यांची पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी करणे गरजेचे आहे. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांचा परवाना, आधारकार्ड, चारित्र्य पडताळणीची प्रत जमा करावी, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.

लोकसत्ता Thu, 07 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67287461

# देशभरातील उच्च शिक्षण संस्था आता एका संकेतस्थळावर

### ‘एज्युकेशन इंडिया’ संकेतस्थळाची निर्मिती, उच्च शिक्षण संस्थांना नोंदणीची सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** परदेशी विद्यार्थ्यांना भारतातील उच्च शिक्षण संस्थांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी ‘एज्युकेशन इंडिया’ या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. देशभरातील उच्च शिक्षण संस्थांना या संकेतस्थळावर नोंदणी करून माहिती उपलब्ध करून देण्याची सूचना करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) यांनी या संदर्भातील संयुक्त परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. देशभरातील उच्च शिक्षण संस्थांची क्षमता आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना समजावी, उच्च शिक्षण संस्थांची माहिती एका ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी एज्युकेशन इंडिया या संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ इच्छिणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना त्यांची क्षमता दाखवण्याची संधी मिळेल. पहिल्या टप्प्यात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेल्या उच्च शिक्षण संस्थांना नोंदणी करावी लागेल. त्यानंतर आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना देशभरातील उच्च शिक्षण संस्थांची माहिती पाहता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

देशभरातील उच्च शिक्षण संस्था आणि त्यांचे अभ्यासक्रम जगभरातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम या संकेतस्थळामार्फत केले जाईल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ इच्छिणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांनी तातडीने संकेतस्थळावर नोंदणी करावी, अशी सूचना देण्यात आली आहे.

लोकसत्ता Thu, 07 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67287409

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

## राज्यात उच्च शिक्षणावरील खर्चाचा आलेख घटताच

### नियंत्रक आणि महालेखापालांच्या अहवालात ताशेरे, शिक्षकांच्या पदांबाबत रुसाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रुसा) राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागांच्या पातळीवर झालेल्या त्रुटींबाबत नियंत्रक आणि महालेखापालांच्या अहवालातून (कॅग) गंभीर ताशेरे ओढण्यात आले आहेत. त्यात उच्च शिक्षणावर दोन टक्के खर्च करणे अपेक्षित असताना गेल्या पाच वर्षांत खर्च वाढण्याऐवजी घट झाल्याचे, शिक्षकांच्या जागांबाबत रुसाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होत नसल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालातून राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा कारभार उघड झाला आहे.

नियंत्रक आणि महालेखापालांनी केलेल्या आर्थिक लेखापरीक्षणाचा अहवाल उपलब्ध करण्यात आला आहे. त्यातील उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या आर्थिक लेखापरीक्षणासंदर्भात काही गंभीर त्रुटी अधोरेखित करण्यात आल्या आहेत. विशेषतः केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याने राबवल्या जाणाऱ्या रुसा या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये राज्य स्तरावर प्रशासकीय, आर्थिक, योजनेचे संनियंत्रण अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर झालेल्या त्रुटी सविस्तर मांडण्यात आल्या आहेत.

केंद्र सरकारकडून मिळालेला निधी राज्य प्रकल्प संचालनालयाने पंधरा दिवसांत शिक्षण संस्थांना वितरित करणे अपेक्षित असताना त्यात दिरंगाई झाल्याचे निरीक्षण कॅगने नोंदवले आहे. २०१५ ते २०२१ या सहा वर्षांत दरवर्षी दिरंगाई झाली आहे. २०१६-१७ मध्ये १५३ दिवस, २०१८-१९ मध्ये २९३ दिवस विलंब झाला. रुसाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाने उच्च शिक्षणावर दरवर्षी स्थूल उत्पन्नाच्या दोन टक्के खर्च करणे अपेक्षित आहे. मात्र गेल्या पाच वर्षांत खर्च वाढण्याऐवजी त्यात घटच झाली आहे. गेल्या पाच वर्षांत राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या ०.२८ टक्के ते ०.३७ टक्के एवढाच खर्च झाला आहे.

### दिरंगाईमुळे आर्थिक फटका

राज्य उच्च शिक्षण परिषदेची स्थापना, उच्च शिक्षण आराखडा तयार करणे, महाविद्यालयांचा समूह करून त्यांचे विद्यापीठात रूपांतर करणे, स्वायत्त महाविद्यालयांना विद्यापीठाचा दर्जा प्रदान करणे, नवीन मॉडेल डिग्री महाविद्यालयाची स्थापना करण्यात राज्य शासनाने दिरंगाई केल्याचे अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिरंगाईच्या कारभारामुळे रुसाअंतर्गत निधी गमवावा लागल्याचे दिसून येत आहे.

२०१५ ते २०२१ या वर्षांत राज्याचे स्थूल उत्पन्न ३४ टक्क्यांनी वाढले असले, तरी उच्च शिक्षणावरील खर्च केवळ १२ टक्क्यांनी वाढल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. रुसाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शिक्षकांच्या मंजूर पदांपैकी ८५ टक्के पदे भरलेली असणे आणि उर्वरित पदे टप्प्याटप्प्याने भरणे आवश्यक आहे. मात्र तपासणी केलेल्या २१ संस्थांमध्ये शिक्षकांची भरलेली पदे २२ ते ७७ टक्केच आहेत. तसेच शिक्षण संस्थांच्या प्रस्तावांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रतिसाद दिला नसल्याचे कारण दिले गेल्याचे अहवालातून नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Thu, 07 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67299339

---

### उत्तरपत्रिका तपासण्यात औरंगाबाद मागे; उपसंचालकांकडून कानउघाडणी

## दहावी-बारावीचा निकाल यंदा उशिरा?

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**औरंगाबाद :** दहावी आणि बारावीच्या उत्तर पत्रिका तपासणीच्या कामात औरंगाबाद विभागात कमालीचे शैथिल्य असून अनेक शाळा तसेच महाविद्यालयातून उत्तरपत्रिका तपासून वेळेत दिल्या नाहीत. त्यामुळे दहावी व बारावीचे निकाल उशिरा लागू शकतील. त्यामुळे या पुढे जर या कामी उशीर झाला तर मुख्याध्यापक व प्राचार्य यांच्यावर कारवाई केली जाईल अशी नोटीस शिक्षण उपसंचालकांनी बजावली आहे.

दहावी व बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीच्या कामात या पुढे हलगर्जीपणा झाल्यास संबंधित शाळेची मंडळ मान्यता व मंडळ संकेतांक काढून घेण्याची कारवाई केली जाईल, असा इशाराही विभागीय शिक्षण मंडळाच्या वतीने देण्यात आला आहे. दहावी व बारावीचे निकाल वेळेत लावण्यासाठी मुख्याध्यापक व प्राचार्यांनी जातीने लक्ष घालावे अशी सूचनाही देण्यात आली आहे.

### काय झाले?

औरंगाबाद वगळता अन्य विभागातील उत्तरपत्रिका तपासणीचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. औरंगाबाद विभाग मात्र खूप मागे असल्याने उपसंचालकांनी मुख्याध्यापक व प्राचार्यांची कानउघाडणी केली आहे.

### परिणाम काय?

करोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून शैक्षणिक वेळापत्रक बिघडले आहे. त्यातच यंदा परीक्षांचे निकाल उशिरा लागले, तर महाविद्यालयांमधील प्रवेशप्रक्रिया लांबू शकते. त्यामुळे निकाल नियोजित कालावधीतच लागावेत यासाठी मंडळ प्रयत्नशील असेल.



"प्रत्येक विभागात परीक्षेनंतरच्या कामकाजाचा राज्य मंडळाकडून आढावा घेतला जातो. त्यात औरंगाबाद विभागाचे काम थोडेसे मागे आहे. हे काम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचा निकालावर परिणाम होऊ दिला जाणार नाही.

**- शरद गोसावी,**
अध्यक्ष, राज्य मंडळ

लोकसत्ता Thu, 07 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67287145

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# ई-पुस्तकांच्या वेबसाइटचे उद्घाटन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : गुढीपाडव्यादिवशी सुमन विकास प्रतिष्ठानने मराठी भाषेला अधिक समृद्ध करण्यासाठी, तसेच मराठी साहित्य सर्व जनमानसात मोफत पोहोचवून निरक्षरतेचे उच्चाटन करण्यासाठी https://jai-bharat.in या वेबसाइटचे उद्घाटन केले आहे. या वेबसाइटवर शिक्षणाशी संबंधित आणि इतर मराठी, हिंदी आणि इंग्लिश भाषेतील दहा हजारांपेक्षा अधिकपेक्षा अधिक ई-पुस्तके एकाच ठिकाणी पूर्णपणे मोफत उपलब्ध असतील. सर्व ई-पुस्तके कोणतीही नाव नोंदणी न करता किंवा वैयक्तिक माहिती न देता एका क्लिकवर डाऊनलोड करता येतील.

सुमन विकास प्रतिष्ठानच्या मोफत ई-लर्निंग आणि ई-पब्लिशिंग या मोहिमेंतर्गत, सर्व गुणी साहित्यिक, लेखक, कवी आणि तज्ज्ञ व्यक्ती, त्यांच्या नवीन कथा, कादंबरी, कविता संग्रह, शैक्षणिक अथवा इतर ई-पुस्तके पूर्णपणे मोफत ई-प्रकाशित करू शकतात, तसेच आधी प्रकाशित केलेली ई-पुस्तके देखील वेबसाइटवर पूर्णपणे मोफत ई-प्रकाशित करता येतील.

या वेबसाइटचे उद्घाटन अध्यक्ष अॅड. शरद ढोबळे यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. याप्रसंगी मुकुंद धजेकर, अनिलकुमार मल्लेवार, प्रा. घुमे, सुनीता वरणकर, दत्तात्रेय पारपल्लीवार, महादेव भाले, विशाल बोपुलकर उपस्थित होते.

Hello Pune
Page No. 7 Apr 07, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# विद्यार्थ्यांना मिळणार मेलबर्नची डिग्री

## पुणे विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी 'यूओएम-एसपीपीयू'ची स्थापना

पुणे, ता. ६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलियातील मेलबर्न विद्यापीठ यांनी प्रशिक्षण आणि संशोधनासाठी एकत्रितपणे 'युओएम-एसपीपीयू अॅकॅडमी'ची स्थापना केली आहे. अॅकॅडमीच्या माध्यमातून या दोन्ही विद्यापीठांमधील शिक्षक व विद्यार्थ्यांना एकमेकांच्या विद्यापीठात जाऊन प्रशिक्षण व अध्यापन करता येणार आहे. तसेच संयुक्त प्रकल्पही हाती घेण्यात येतील. यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांना मेलबर्नची 'डिग्री' मिळणार आहे.

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठाने अशा प्रकारे स्थापन केलेली ही पहिलीच अॅकॅडमी आहे. या अॅकॅडमीची स्थापना आभासी पद्धतीने एक वर्षभरापूर्वीच झाली असून, आज (ता.६)याचे प्रत्यक्ष उद्घाटन 'इंटरडिसीप्लिनरी स्कूल ऑफ सायन्स' येथे करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, इंटरडिसीप्लिनरी स्कूल ऑफ सायन्सचे प्रमुख डॉ. अविनाश कुंभार, मेलबर्न विद्यापीठाचे उपकुलगुरू मिशेल वेसले, सहायक उपकुलगुरू प्रा. मुथुपंडियन अशोककुमार, विज्ञान शाखेच्या अधिष्ठाता प्रा. मोयरा ओब्रैन आदी उपस्थित होते. मेलबर्न विद्यापीठ हे ऑस्ट्रेलियातील पहिल्या क्रमांकाचे विद्यापीठ असून त्यांच्यासोबत विद्यापीठाने बीएस्सी (ब्लेंडेड) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे.

### दोन नवीन अभ्यासक्रमांची निर्मिती

नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने 'मेलबर्न ग्रॅज्युएट स्कूल ऑफ एज्युकेशन' आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'फॅकल्टी ऑफ एज्युकेशन' यांनी एकत्रित येत सामंजस्य करार केला. त्यात वय वर्ष ३ ते १८ पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून शिक्षकांसाठी पदवी आणि पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

**"मेलबर्न विद्यापीठाबरोबर झालेल्या करारातून सध्या आपण विज्ञान शाखेत अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ही केवळ सुरुवात असून भविष्यात सामाजिक शास्त्र, शिक्षणशास्त्र, डिझाइन थिंकिंग आदी विषयांतही अभ्यासक्रम सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे.**

**- डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Main
07/04/2022 Page No. 2

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांसमोर वाढला अडचणींचा डोंगर

## प्राध्यापकांनाही क्लिष्ट प्रक्रियेचा मनस्ताप

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविली जात असून, अनेक विद्यार्थी पीएच.डी. प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, केवळ विद्यार्थीच नाही, तर मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळालेल्या प्राध्यापकांनासुद्धा विद्यापीठाच्या क्लिष्ट प्रक्रियेचा मनस्ताप होत आहे. त्यात अधिक सुटसुटीतपणा आणावा, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.

विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधनाला चालना देणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांनीसुद्धा विविध विषयांवर संशोधन केले पाहिजे. मात्र, दरवर्षी हजारो विद्यार्थी विद्यापीठाकडे पीएच.डी. प्रवेशासाठी अर्ज करतात. परंतु, त्यातील फारच कमी विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी प्रवेश मिळतो. विद्यापीठाकडे मार्गदर्शकांचा तुटवडा असल्याने विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात.

विद्यापीठाच्या अधिकार मंडळामध्येही याबाबत वेळोवेळी चर्चा होते. या प्रवेश प्रकियेतील अडसर दूर करून प्रवेश प्रक्रिया अधिक गतिशीलपणे राहावी, अशी मागणी नुकत्याच झालेल्या अधिसभेच्या बैठकीत करण्यात आली.

विद्यापीठाने प्रवेशाची पहिली फेरी सुरू होण्यापूर्वीच अनेक प्राध्यापकांना मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली. त्यांना या वर्षीच मार्गदर्शन करण्यासाठी पीएच.डी.चे विद्यार्थी मिळणे अपेक्षित आहे. तसेच मार्गदर्शक नाही म्हणून अनेक वर्षांपासून प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा मार्गदर्शक मिळायला हवेत.

मात्र, पहिली फेरी पूर्ण झाल्यानंतरही मार्गदर्शकांना ऑनलाईन नोंदणीसाठी विद्यापीठाने लिंक ओपन करून दिली नाही. त्यामुळे जागा असूनही प्राध्यापकांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येत नाही.



### तांत्रिक अडचणींचा फटका

- विद्यापीठाच्या तांत्रिक अडचणींचा फटका विद्यार्थ्यांना बसू नये, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने तत्काळ याबाबत परिपत्रक जाहीर करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध करून द्यावेत.
- अनेक विषयांसाठी पहिल्या फेरीत एकही प्राध्यापक मार्गदर्शक म्हणून उपलब्ध होऊ शकले नाहीत; अशा विद्यार्थ्यांनासुद्धा दुसऱ्या फेरीतून पीएच.डी. प्रवेशाची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

Hello Pune
Page No. 8 Apr 07, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# नवीन शैक्षणिक धोरणानुसार कलाशिक्षणाचे स्थान!



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २०२२-२०२३ नुसार एक विषय म्हणून, सर्व स्तरांवर कलाशिक्षणाची शिफारस करण्यात आलेली आहे व त्यात चित्र-शिल्प, संगीत, नृत्य, दृक्कला व नाट्य (रंगभूमी) या सहा मुख्य क्षेत्रांचा समावेश असून, त्यात निव्वळ निर्देशन वजा अध्यापनावर नव्हे, तर आंतरक्रियात्मक पद्धतींवर भर द्यावा, असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. कारण कला शिक्षणाचे ध्येय हे सौंदर्यदृष्टी, वैयक्तिक जाणीव व विविध माध्यमांद्वारे स्वतःला व्यक्त करण्याच्या कलेचा विकास व्हावा. भारताच्या पारंपरिक हस्तकलांचे सौंदर्यमूल्य व आर्थिकमूल्य दोन्ही शालेय शिक्षणात समर्पक व अर्थपूर्ण असल्याचे दिसून येते.

भारतीय कला हे धर्मनिरपेक्ष विणीचे व सांस्कृतिक बहुविविधतेचे जितेजागते उत्तम उदाहरण आहे. त्यामध्ये संगीत, नृत्य-नाटक, बोलक्या बाहुल्या, मातीकाम, दृक्कला (चित्र), तसेच भारतातील प्रत्येक राज्यातील विविध प्रकारच्या हस्तकला अशा अनेक लोककला व शास्त्रीय कलांचा समावेश शैक्षणिक धोरणानुसार निवडावा. कोणतीही कला शिकणे हे आपल्या छोट्या बालकांचे शालेय स्तरावरच नव्हे, तर पुढील सारेच जीवन समृद्ध करणारे असेल.

कला हे शिक्षणाचे नैसर्गिक माध्यम आहे. जिथे शब्द अपुरे पडतात. तिथे रंग, रूप, आकार त्याची पूर्तता करतात. हुंडाबळीवरील तीन तासांच्या भाषणापेक्षा ज्वालांनी वेढलेल्या स्त्रीचे चित्र पाहताच विषयाचे महत्त्व अशिक्षित व्यक्तीलाही समजू शकते. म्हणूनच शालेय स्तरावर कलाशिक्षण सर्व शिक्षणाचा पाया समजून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्यानुसार सहभागाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला पाहिजे.

कलाविषय प्रत्येकाच्या मनाला स्पर्श करणारे व जीवनाकडे पूर्णत्वाकडे नेणारी प्रक्रिया आहे. जीवनाकडे पाहण्याचा नवीन दृष्टिकोन कला विद्यार्थ्यांना देते. शालेय अभ्यासक्रमातच नव्हे, तर, भविष्यात प्रत्येक ठिकाणी तिचा आपणास उपयोग होणार असल्याचे पदोपदी दिसून येईल. शालेय कलाशिक्षणाने सर्व विद्यार्थी हे चित्रकार वा कलाकार बनवायचे नसून, त्यांना चित्र व सौंदर्याचा आस्वाद आताच्या धावपळीच्या जीवनात घेता येणे महत्त्वाचे आहे. कोणत्याही कलेचा आनंद घेता आला पाहिजे, हे मुख्य उद्दिष्ट या विषयाचे आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटल्याप्रमाणे - "जीवनाची स्वच्छता, सुंदरता हीच सर्वोत्कृष्ट कला होय." ही भावना विद्यार्थ्यांमध्ये कलाशिक्षकच रुजवू शकतो.

नृत्य-नाट्य हे लहान मुलांना सहज आवडणारे विषय आहेत. हालचालींमधून गोडवा, सहजता, डोलदारपणा आणि सुंदर दिसतील, अशा नृत्य-नाट्याची सुरुवात आहे. नृत्यनाट्यातून व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. सामाजिक, सामूहिक भान येते. तसेच वागावे कसे, बोलावे कसे, उभे कसे रहावे, डौल म्हणजे काय, अशा बाबी मुलांना समजून येतात. आस्वादाची भूमिका समजून देणे गरजेचे आहे, असे वाटते.

गायन आणि वादन ही संगीताची दोन अंगे असे आपण मानतो. गाणे मानवाच्या आवाजातून निर्माण होते, तर वादन वाद्यातून वाजवलेले संगीत आहे. संगीत शिक्षणाची सुरुवात विविध आवाजांच्या ग्रहणातून, श्रवणातून होते. संगीताचा आस्वाद घेता घेता मानसिक आणि बौद्धिक विकास होऊ लागतो, असे म्हणतात. गाणं गुणगुणत नाही, असा माणूस सापडणे दुर्मिळ! मग कुणी नाट्यगीत, कुणी चित्रपटगीत, कुणी भजन, अभंग, गजल, भावगीत, भक्तिगीत काहीही परंतु असा माणूस सापडणार नाही, की जो गुणगुणत नाही. संगीत आणि माणूस हे इतके एकरूप झालेत की, संगीताशिवाय माणूस ही कल्पना पण करता येत नाही. व्यायामाने, खेळाने शरीराचा जसा विकास होतो, तसा संगीताने आत्म्याचा विकास होतो. प्रत्येकाला आपल्या भावनांचे प्रतिबिंब संगीतात पाहावयाला मिळते आणि म्हणून संगीताला माणसाने हृदयात जपून ठेवले आहे.

गायन, वादन, चित्र, शिल्प, नृत्य या पाच ललित कला. या कलांवर प्रभुत्व मिळणे सहज साध्य नाही. अभ्यास, भरपूर मेहनत केल्यानेच हे साध्य होऊ शकते. त्यासाठी प्रशिक्षित कलाशिक्षकांचीही आवश्यकता आहे. सध्या ग्रामीण शाळांमधून अनेक विद्यार्थ्यांना चित्रकला, हस्तकला, गायन, वादन, शिल्पकला यांची आवड असते. गाण्याचे, वाद्य वाजविण्याचे योग्य मार्गदर्शन मिळावे, अशी त्यांची मनापासून इच्छा असते. परंतु ग्रामीण भागातील जिल्हा परिषदांच्या शाळांमधून प्रशिक्षित कला-संगीत या विषयांकरिता शिक्षकच उपलब्ध नाहीत. अनेक गुणी विद्यार्थी केवळ मार्गदर्शकाअभावी या क्षेत्रात पुढे जाऊ शकत नाहीत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्यांतूनही अनेक गोष्टींबद्दल ऊहापोह केलेला आहे. कलाशिक्षणासंबंधी आस्थापूर्वक इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वीपर्यंत हा विषय सक्तीचा आणि एक साधनदेखील बनला पाहिजे. त्यासाठी आवश्यक अशी रंगसाहित्य व साधनसामग्री सर्व शाळांमधून उपलब्ध केली गेली पाहिजे. असे स्पष्ट उल्लेख असताना मात्र महाराष्ट्र शासनाने चुकीच्या धोरणाने ३-४ दशकांपासून कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक साधनही दिलेले नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे. कला संचालनालयाचे शालेय कलाशिक्षण व उच्च कलेसंबंधी सर्व काही सध्याचे चित्र आनंदी-आनंद आहे. कला संचालनालयाचे अस्तित्व शालेय कलाशिक्षणासाठी योगदान म्हणून कोठेही दिसत नाही. शिक्षणाचे ध्येय, उद्दिष्ट साध्य करण्याकरिता प्राथमिक स्तरापासून नुसते तुटपुंजे ज्ञान असणाऱ्या इतर शिक्षकांकडून न देता ते प्रशिक्षित कला शिक्षकांकडून दिले गेले पाहिजे. या विचाराचा शिक्षण खात्याने पाठपुरावा केल्याशिवाय खऱ्या

अर्थाने शिक्षणाचा आनंद मुलांना मिळणार नाही. त्यापासून वंचित राहिल्यास आताचे शिक्षण भौतिक विषयावर मात करूच शकणार नाही, यावरून स्पष्ट दिसते की, अजूनही वेळ गेलेली नाही. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शालेय कलाशिक्षणाकडे शासनाने विचारपूर्वक लक्ष वेधल्यास बालकांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल.



मल्लिकार्जुन सिंदगी
माजी अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ, पुणे

Pune Main
Page No. 10 Apr 07, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# अर्ज प्रक्रियेमुळे परीक्षा न देता आलेल्यांना दिलासा

## विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षा देण्याची संधी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यावर्षीच्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्र परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले, परंतु महाविद्यालयामार्फत ते अर्ज विद्यापीठाकडे प्राप्त झाले नाहीत. तसेच ज्यांनी अर्ज केले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी वेळेत परीक्षा अर्ज करावे, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

विद्यापीठ व महाविद्यालयाच्या पहिल्या सत्र परीक्षेसाठी



ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ मध्ये अर्ज करण्याचे सूचित केले होते. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा मार्च-एप्रिलमध्ये पूर्ण होत आहे. मात्र, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत, परंतु काही कारणास्तव महाविद्यालयाने इनवर्ड केलेले नाहीत आणि ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरावयाचे राहून गेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी मिळावी, अशी मागणी युक्रांदसह अन्य विद्यार्थी संघटनांनी केली होती. त्यानंतर आता अशा विद्यार्थ्यांना दि. ८ ते १८ एप्रिल या कालावधीत ऑनलाइन प्रणालीद्वारे परीक्षा अर्ज भरण्यासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

महाविद्यालयांनी प्राप्त झालेले परीक्षा अर्ज विनाविलंब १९ ते २० एप्रिल या कालावधीपर्यंत इनवर्ड करावेत. या विद्यार्थ्यांची परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा होणार आहे.

**वेळेत परीक्षा अर्ज करण्याचे विद्यापीठाचे आवाहन**

तसेच महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या अंतर्गत, प्रात्यक्षिक, मौखिक इत्यादी परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार संगणक प्रणालीद्वारे गुण भरावेत, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत. पहिल्या सत्र परीक्षेसाठी ज्यांनी परीक्षा अर्ज केले नाहीत, त्यांची परीक्षा होणार आहे. ही बाब महाविद्यालयातील सर्व घटकांनी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी आणि विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज मुदतीत भरण्यासाठी सूचना कराव्यात, असेही परीक्षा विभागाने म्हटले आहे.

प्रभात Fri, 08 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67320411

लोकमत

# बाहेरून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येणार

## पुणे विद्यापीठाचा निर्णय : प्राध्यापक भरती बंद असल्याने समितीच्या शिफारसीनुसार सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये पीएच.डी. मार्गदर्शकांची संख्या पुरेशा प्रमाणात नाही. विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आता विद्यापीठात बाह्य मार्गदर्शक घेण्यास मुभा दिली आहे. विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा औद्योगिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येणार आहे. सध्या नवीन प्राध्यापक



भरती बंद असल्याने पुणे विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे.

पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. मार्गदर्शक पुरेशा संख्येत नसल्याच्या कारणावरून बाह्य मार्गदर्शकांच्या नियुक्तीसाठी विद्यापीठाने समिती नियुक्त केली होती.

या समितीने केलेल्या शिफारसींनुसार विद्यापीठ प्रशासनाने बाह्य मार्गदर्शक नियुक्तीबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा व्यावसायिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येऊ शकेल. विभागाबाहेरील पीएच.डी. मार्गदर्शकांपैकी ५० टक्के संलग्न महाविद्यालयातील आणि ५० टक्के औद्योगिक आस्थापना किंवा संशोधन संस्थांतील असावेत.

पीएच.डी. विद्यार्थी स्वीकारल्यावर संबंधित मार्गदर्शकांना आठवड्यातून किमान दोन वेळा शैक्षणिक विभागात येऊन संशोधक विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने संवाद साधणे बंधनकारक असेल.

Pune Main
Page No. 2 Apr 08, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**पुढारी**

### पुणे विद्यापीठात बाह्य मार्गदर्शकांना मुभा

**पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने बाह्य मार्गदर्शक घेण्यास परवानगी दिली आहे. विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा औद्योगिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच. डी. मार्गदर्शक पुरेसे नसल्याने येणाऱ्या अडचणींचा विचार करून बाह्य मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यासाठी समिती नियुक्त केली होती.**

My Pune Edition
Apr 8, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

**लोकमत**

### पहिल्या सत्र परीक्षेसाठी पुन्हा अर्ज करण्याचे आवाहन; पुरवणी परीक्षा घेणार

#### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अर्ज करण्यास २० एप्रिलपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्र परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत. मात्र, महाविद्यालयामार्फत ते अर्ज विद्यापीठाकडे प्राप्त झाले नाहीत. तसेच ज्यांनी अर्ज केले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी वेळेत परीक्षा अर्ज करावे, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

महाविद्यालयांनी प्राप्त झालेले परीक्षा अर्ज विनाविलंब १९ ते २० एप्रिल या कालवधीपर्यंत इनवर्ड करावेत. परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा होणार आहे. तसेच महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या अंतर्गत, प्रात्यक्षिक, मौखिक इत्यादी परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार संगणक प्रणालीद्वारे गुण भरावेत, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

विद्यापीठ व महाविद्यालयाच्या पहिल्या सत्र परीक्षेसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ मध्ये अर्ज करण्याचे सूचित केले होते. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा मार्च-एप्रिलमध्ये पूर्ण होत आहे. मात्र ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत. परंतु, काही कारणास्तव महाविद्यालयाने इनवर्ड केलेले नाहीत आणि ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरावयाचे राहून गेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी मिळावी, अशी मागणी युक्रांदसह अन्य विद्यार्थी संघटनांनी केली होती. त्यानंतर आता अशा विद्यार्थ्यांना ८ ते १८ एप्रिल या कालावधीत ऑनलाइन प्रणालीद्वारे परीक्षा अर्ज भरण्यासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Apr 08, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेची मागणी : अन्यथा शिक्षण संचालक कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण

## तासिका तत्त्वावरील पदभरतीची अंमलबजावणी तातडीने करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्राध्यापक पदभरतीच्या १२ नोव्हेंबर २०२१च्या शासन निर्णयाची तसेच तासिका तत्त्वावरील (सीएचबी) डॉ. माने समिती अहवालाची तात्काळ अंमलबजावणी करून शासकीय शिक्षण संचालक व ग्रंथपाल या पदांसह अकृषी विद्यापीठातील सहायक प्राध्यापक पदभरती त्वरित सुरू करावी तसेच इतरही प्रलंबित मागण्या मान्य कराव्यात. अन्यथा येत्या सोमवारपासून (दि. ११) शिक्षण संचालक कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर यांनी दिला आहे.




- वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण संचालक व ग्रंथपाल या पदांसह अकृषी विद्यापीठातील सहायक प्राध्यापक पदभरती त्वरित सुरु करावी.
- १ ऑक्टोबर २०१७च्या आकृतिबंधाला अंतिम मान्यता देऊन विनाअट डिसेंबर २०२१ पर्यंतची सर्व रिक्त पदे १०० टक्के भरावीत.
- महाराष्ट्र शैक्षणिक संस्था अधिनियम २०२१ कायद्याची अकृषी विद्यापीठातील आरक्षण कक्ष व मावक यांच्याकडून तात्काळ अंमलबजावणीचे आदेश द्यावेत.
- तासिका तत्त्व धोरणाबाबत स्थापन केलेल्या डॉ. धनराज माने समितीचा अहवाल तात्काळ स्वीकारून अंमलबजावणी करावी. राज्य सरकार व उच्च शिक्षण संचालक यांच्या आदेशाची अंमलबजावणी विभागीय सहसंचालक यांच्याकडून होत नसल्याने त्यांच्यावर त्वरित शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

डॉ. पाथ्रीकर यांनी सांगितले, की राज्यातील ११७१ अनुदानित महाविद्यालयांमध्ये १ ऑक्टोबर २०१७च्या विद्यार्थिसंख्येनुसार १२ नोव्हेंबर २०२१ला प्राध्यापक पदभरतीला ४० टक्क्यानुसार २०८८ जागांची भरतीला मान्यता दिली आहे. तसेच संवर्गनिहाय आरक्षण विधेयकाला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने मंजुरी दिली आहे, तर केंद्र शासनाने उच्च शिक्षण देणारे विद्यापीठ व संलग्न महाविद्यालय हे एक एकक मानून आरक्षण निश्चितीबाबत ९ जुलै २०१९ रोजी शिक्षक आरक्षण कायदा-२०१९ लागू केलेला आहे. त्यानंतर राज्यपालांनी राजपत्र काढून कायद्यात रूपांतर केले आहे. त्यानंतर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ आदेश प्रसिद्ध केले आहेत.

मात्र, अद्याप प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. संघटना २०१७ पासून नियमित पाठपुरावा करत आहे. मात्र, तरीही आकृतिबंधाला मान्यता मिळत नाही. याची तात्काळ दखल घ्यावी. अन्यथा ११ एप्रिल रोजी लाक्षणिक उपोषण करण्यात येईल.

Pune Main
Page No. 2 Apr 08, 2022
Powered by: erelego.com

## दीड लाख विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन परीक्षेची मागणी

### ऑनलाइन परीक्षेसह विविध मुद्द्यांवर ९ एप्रिलला आंदोलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाचा प्रादुर्भाव कमी होऊनही विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेची मागणी करणे ही धोक्याची घंटा असल्याचे मत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी मांडले होते. मात्र महाविकास आघाडी सरकारमधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक आणि विद्यार्थी संघटनेने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची उन्हाळी सत्राची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याची मागणी केली आहे. संघटनेतर्फे घेण्यात आलेल्या ऑनलाइन सर्वेक्षणात दीड लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षेच्या बाजूने कल नोंदवला असून, ऑनलाइन परीक्षेसह विविध मुद्द्यांवर ९ एप्रिलला विद्यापीठात आंदोलन करण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हिवाळी सत्राच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याचे नियोजन केले होते. मात्र करोनाच्या प्रादुर्भावामुळे ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागल्याने परीक्षांना विलंब झाला. आता महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू झाल्याने उन्हाळी सत्राच्या परीक्षा जून-जुलैमध्ये ऑफलाइन पद्धतीने आयोजित केल्या जाणार असल्याचे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे. मात्र काही विद्यार्थी, विद्यार्थी संघटनांकडून ऑनलाइन परीक्षेची मागणी करण्यात येत आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेस आणि राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस यांच्याकडून ऑनलाइन परीक्षेसंदर्भात ऑनलाइन सर्वेक्षण करण्यात आले. त्यात दीड लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सर्वेक्षणाच्या बाजूने कल नोंदवला आहे.

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विभागाचे अध्यक्ष ओंकार बेनके म्हणाले, की ऑनलाइन परीक्षेच्या मागणीसह विविध मुद्द्यांवर विद्यापीठात ९ एप्रिलला आंदोलन करण्यात येणार आहे. विद्यापीठाने हिवाळी सत्राच्या परीक्षा तीन महिने उशिराने ऑनलाइन पद्धतीने घेतल्या. उन्हाळी सत्राचा अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने शिकवण्यात आला.

आता ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे शेवटचे सत्र संपण्यास उशीर होणार असल्याने त्यांचे नुकसान होणार आहे. शैक्षणिक सत्र संपत येऊनही वसतिगृहे सुरू झालेली नाही. शासनाच्या आदेशानुसार शैक्षणिक शुल्कात कपात न होता शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांवर दबाव आणला जातो.

लोकसत्ता Fri, 08 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67307542

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# बाह्य पीएच.डी. मार्गदर्शक नियुक्तीस मुभा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये पीएच.डी. मार्गदर्शकांची संख्या पुरेशा प्रमाणात नसल्याने विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने बाह्य मार्गदर्शक घेण्यास परवानगी दिली आहे. विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा औद्योगिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येऊ शकेल.

पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. मार्गदर्शक पुरेशा संख्येत नसल्याने येणाऱ्या अडचणींचा विचार करून बाह्य मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठाने समिती नियुक्त केली होती. या समितीने केलेल्या शिफारसींनुसार विद्यापीठ प्रशासनाने बाह्य मार्गदर्शक नियुक्तीबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा व्यावसायिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येऊ शकेल.

विभागाबाहेरील पीएच.डी मार्गदर्शकांपैकी ५० टक्के संलग्न महाविद्यालयातील आणि ५० टक्के औद्योगिक आस्थापना किंव संशोधन संस्थांतील ते असावेत पीएच.डी. विद्यार्थी स्वीकारल्याव संबंधित मार्गदर्शकांना आठवड्यातू किमान दोन वेळा शैक्षणिक विभागा येऊन संशोधक विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने संवाद साधणे बंधनकारक असेल. विद्यार्थी आणि मार्गदर्शकांची नोंद आणि नियमनाची जबाबदारी विभागप्रमुख किंव प्रशाळा संचालकांची असेल विभागाची विभागीय समिती विभागाबाहेरील पीएच.डी मार्गदर्शकांच्या संलग्नतेची शिफारस करेल.

### संसाधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी

पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन संसाधने उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असते. ही संसाधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित बाह्य मार्गदर्शक आणि विद्यापीठ विभागाची असेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Fri, 08 April 2022 https://epaper.loksatta.com/c/

# पुरवणी परीक्षेसाठी अर्ज करण्याचे पुणे विद्यापीठाचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करावेत, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्र परीक्षेसाठी परीक्षा भरलेले अर्ज महाविद्यालयामार्फत विद्यापीठाकडे प्राप्त झाले नाहीत तसेच ज्यांनी अर्ज केले नाहीत, असे सर्व विद्यार्थी या पुरवणी परीक्षेसाठी पात्र ठरणार आहेत.

विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या पहिल्या सत्र परीक्षेसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ मध्ये अर्ज करण्याचे सूचित केले होते. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा मार्च-एप्रिलमध्ये पूर्ण होत आहे. मात्र, ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरले आहेत, परंतु काही कारणास्तव महाविद्यालयाने सादर केलेले नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरावयाचे राहून गेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी मिळावी, अशी मागणी युक्रांदसह अन्य विद्यार्थी संघटनांनी केली होती. त्यानंतर आता अशा विद्यार्थ्यांना शुक्रवारपासून (८ एप्रिल) ते सोमवार १८ एप्रिल या कालावधीत ऑनलाइन प्रणालीद्वारे परीक्षा अर्ज भरण्यासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे, असे परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

महाविद्यालयांनी प्राप्त झालेले परीक्षा अर्ज विनाविलंब १९ आणि २० मार्च या कालवधीपर्यंत विद्यापीठाकडे सादर करावेत. परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा होणार आहे. तसेच महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या अंतर्गत, प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षांचे प्रचलित पद्धतीनुसार संगणक प्रणालीद्वारे गुण भरावेत, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या आहेत.

### सूचना द्याव्यात

पहिल्या सत्र परीक्षेसाठी ज्यांनी परीक्षा अर्ज केले नाहीत, त्यांची परीक्षा होणार आहे. ही बाब महाविद्यालयातील सर्व घटकांनी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी आणि विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज मुदतीत भरण्यासाठी सूचना कराव्यात, असेही परीक्षा विभागाने म्हटले आहे.

लोकसत्ता Fri, 08 April 2022 https://epaper.loksatta.com/c/67314730

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

### पीएच.डी. प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर



**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी. अभ्यासक्रमाची दुसरी प्रवेश फेरी येत्या ३ ते ३१ मे या कालवाधीत होणार आहे. पहिल्या प्रवेश फेरीत अपात्र ठरलेले, अनुपस्थित राहिलेल्या विद्यार्थ्यांना सुद्धा पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत सहभागी होता येणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने पीएच.डी. प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीचे सविस्तर परिपत्रक शुक्रवारी प्रसिद्ध केले. त्यात पीएच.डी. पदवीपूर्व परीक्षेत सवलत मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. पीएच.डी.च्या दुसऱ्या फेरीसाठी उपलब्ध जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगीनमधून ऑनलाइन पद्धतीने विषयनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध जागांचा विचार करून येत्या ३० एप्रिलपर्यंत आवश्यकतेनुसार संशोधन केंद्र बदलण्याची कार्यवाही करावी. केंद्र बदलण्याची प्रक्रिया न केल्यास प्रथम फेरीसाठी असलेले संशोधन केंद्रच दुसऱ्या फेरीसाठी कायम ठेवले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित संशोधन केंद्राच्या संपर्कात राहावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

Hello Pune
Page No. 6 Apr 09, 2022
Powered by: erelego.com

### पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी दुसरी प्रवेश फेरी

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ८ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत पीएचडी अभ्यासक्रमाची दुसरी प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. ही प्रवेश फेरी ३ मे ३१ मेदरम्यान होणार आहे. पहिल्या प्रवेश फेरीत अपात्र ठरलेले, अनुपस्थित राहिलेले विद्यार्थीही पीएचडी प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत सहभागी होता येणार आहे.

पीएचडी प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीचे सविस्तर परिपत्रक विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने शुक्रवारी प्रसिद्ध केले. यात पीएचडी पदवीपूर्व परीक्षेत सवलत मिळालेले पात्र विद्यार्थी



अर्ज करू शकतील. या सर्व विद्यार्थ्यांना दि. २३ एप्रिल रोजी विद्यापीठ आणि संलग्नित संशोधन केंद्रावर पीएचडीच्या दुसऱ्या फेरीसाठी उपलब्ध जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगीनमधून ऑनलाइन पद्धतीने विषयनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध जागांचा विचार करून दि. ३० एप्रिलपर्यंत आवश्यकतेनुसार संशोधन केंद्र बदलण्याची कार्यवाही करावी. ज्यांनी केंद्र बदलण्याची प्रक्रिया केली नसल्यास प्रथम फेरीसाठी असलेले संशोधन केंद्रच दुसऱ्या फेरीसाठी कायम राहणार आहे. विद्यार्थ्यांनी संशोधन केंद्राच्या संपर्कात राहावे, असे आवाहन विद्यापीठाने केलेले आहे. दरम्यान, पीएचडी प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुख, संलग्नित संशोधन केंद्राचे प्राचार्य यांची राहील. या प्रवेशप्रक्रियेबाबत विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले.

प्रभात Sat, 09 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67341276

लोकमत

### अकरावी प्रवेशाबाबत पुढील आठवड्यात सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दहावीची परीक्षा संपली असून, आता विद्यार्थी-पालकांना अकरावी प्रवेशाचे वेध लागले आहेत, पण अकरावीच्या प्रवेशाबाबत कोणतीही माहिती प्रशासनाकडून देण्यात आली नव्हती. आता निकालाच्या आधीच्या सुटीत अकरावी प्रवेशाचा अर्ज भरण्याचा सराव विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यातील उपसंचालक विभागांना याबाबत सूचना देण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी दिली.

दरवर्षी अकरावी प्रवेश प्रक्रिया कशी राबवावी? विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची सराव प्रक्रिया व मूळ प्रक्रिया कधी घ्यावी, यासंदर्भातील सूचना दहावी परीक्षा संपण्याआधीच उपसंचालक कार्यालयांना दिल्या जातात. त्यानुसार उपसंचालक कार्यालयाकडून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून तयारी करून घेतली जाते. अनेक विद्यार्थी प्रवेशातील अर्धवट माहितीमुळे प्रवेशापासून दूर राहतात. त्यामुळे या सराव अर्जाची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. मात्र, यंदा अद्यापही उपसंचालक कार्यालये शिक्षण संचालनालयाकडून सूचनांच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र, ही प्रतीक्षा लवकरच संपणार असून, अकरावी प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाकडे पाठविला असल्याची माहिती पालकर यांनी दिली.

पहिल्या टप्प्यात नोंदणी आणि अर्ज भरण्याचा सराव अकरावी प्रवेश प्रक्रियेसंदर्भात राज्यस्तरावर एक बैठक झाली आहे. त्या बैठकीनंतर प्रस्ताव तयार करण्यात आला असून, तो मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. त्यानंतर पहिल्या टप्प्यात जागांची नोंदणी, त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरण्याची संधी दिली जाणार आहे.

Pune Main
Page No. 9 Apr 09, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### परदेशातील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्रातर्फे विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. त्यात जीआरई, टोफेल, आयईएलटीएस यांसारखे भाषा अभ्यासक्रम मोफत शिकवण्यात येणार आहेत.

'सिलेक्ट युवर युनिव्हर्सिटी ऑनलाइन डिजिटल एज्युकेशन फाउंडेशन' या दिल्ली येथील संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला असून करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे, अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, गिरीश भवाळकर, फाउंडेशनचे संचालक संदीप सिंग या वेळी उपस्थित होते.

अनेक विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिकण्याची इच्छा असते. पण बऱ्याचदा त्यांना योग्य माहिती, मार्गदर्शन न मिळाल्याने त्यांना अडचणी येतात. या कराराच्या माध्यमातून जीआरई, टोफेल आदी परीक्षांबाबत मार्गदर्शन केले जाईल. निवडक विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करून दिली जाईल, असे डॉ. खरे यांनी सांगितले. या बाबतची अधिक माहिती विद्यार्थ्यांना http:// www. unipune. ac. in/ dept/ International Centre/ वर उपलब्ध होईल. अनेक विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची इच्छा असते. पण त्यांना व्हिसा प्रक्रिया, परदेशी शिक्षण, त्याबाबची अधिक माहिती नसते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना मदत करण्याचा प्रयत्न आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 09 April 2022 https://epaper.loksatta.com/c/67

### दहावी, बारावीच्या परीक्षांचे निकाल जूनमध्येच

**प्रभात वृत्तसेवा**




**पुणे, दि. ८** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षांच्या पेपर तपासणीचे कामकाज व्यवस्थित सुरू आहे. यामुळे या दोन्ही परीक्षांचे निकाल हे जूनमध्येच लावण्यात येणार आहे.

यंदा करोनाची परिस्थिती आटोक्यात आल्यामुळे ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात आल्या. बारावीची परीक्षा ७ मार्च ते ७ एप्रिल तर दहावीची परीक्षा १५ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत घेण्यात आल्या. ज्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षण घेतात याच ठिकाणी त्यांना परीक्षा केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे परीक्षा प्रक्रिया सुरळीत झाली.

परीक्षांचे पेपर जस जसे झाले, त्याप्रमाणे त्यांच्या तपासणीचे कामकाजही शिक्षकांकडून करण्याला प्राधान्य देण्यात आले. काही शिक्षक संघटनांनी विविध प्रलंबित प्रश्न मार्गी न लागल्याने पेपर तपासणीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला होता. दरम्यान, या संघटनांना प्रलंबित प्रश्नाबाबत सकारात्मक आश्वासने मिळाल्यामुळे त्यांनी पेपर तपासणीत सक्रीयपणे सहभाग घेतला आहे. दरम्यान, विना अनुदानित शिक्षक संघटनांकडून अद्यापही आक्रमक पवित्रा घेत सक्षमपणे पेपर तपासणीचे कामकाज हाती घेतल्याचे आढळतेच असे नाही. त्यातच एसटी कर्मचारी संपामुळे पेपरची ने-आण करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्याचेही बोलले जात आहे. मात्र, या संपाचा फारसा पेपर तपासणीच्या कामकाजावर फारसा परिणाम होत नसल्याचे सांगण्यात आले.

> इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षांच्या पेपर तपासणीचे कामकाज सुरळीतपणे सुरू आहे. काही अडचणी येत असल्या, तरी त्यातून योग्य तो मार्ग काढून पुढे वाटचाल सुरू आहे. येत्या ३० एप्रिलपर्यंत पेपर तपासणीचे कामकाज पूर्ण करण्यात येणार आहे. सर्वसाधारणपणे बारावीच्या परीक्षेचा निकाल १० जूनच्या सुमारास तर दहावीच्या परीक्षेचा निकाल २० जूनच्या सुमारास लावण्याचे टार्गेट ठेवण्यात आले आहे.
>
> – **शरद गोसावी**, अध्यक्ष, राज्य शिक्षण मंडळ

प्रभात Sat, 09 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67327128

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# पुणे विद्यापीठाचे सुधारित शैक्षणिक वेळापत्रक जाहीर

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ८** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सत्रातील शैक्षणिक वर्षाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यापीठ विभाग आणि महाविद्यालयांना अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया व त्या पद्धतीने कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

'वाणिज्य व व्यवस्थापन' या विद्याशाखेंतर्गत एमबीए, एमसीए, कॉमर्स या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमाची पहिली सेमिस्टर १८ एप्रिल रोजी संपणार आहे. त्यानंतर दुसरे सत्र २ मे पासून सुरू होणार आहे. दुसरे सत्र २० ऑगस्टला संपणार आहे. त्याचप्रमाणे मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत कला, सामाजिक शास्त्र ही अभ्यासक्रमाचे पहिले सत्र १५ मार्चला संपले आहे. आता दुसरे सत्र २१ मार्चपासून सुरू झाले आहे. दुसऱ्या सत्रासाठी साधारणत: २७ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत विज्ञान, बी.फार्मसी, एम.फार्मसी, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर या अभ्यासक्रमाची पहिली सत्र ६ एप्रिल रोजी संपली आहे. आता दुसरी सत्रासाठी ११ एप्रिल ते २३ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे आंतरविद्या शाखीय विद्या शाखेंतर्गत शारीरिक शिक्षण, शिक्षणशास्त्र, ग्रंथालयशास्त्र या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या सत्रासाठी साधारणपणे २ मे ते ३० ऑगस्ट असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रभात Sat, 09 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67341324

सकाळ

# प्राध्यापकांच्या भरतीसाठी सोमवारी उपोषण

**पुणे, ता. ८ :** अकृषी विद्यापीठात सहायक प्राध्यापक पदभरती सुरू न होणे, तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांबाबतच्या निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी न होणे, विनाअनुदानित तुकड्यांना अनुदान देणे यांसह विविध मागण्यासाठी येत्या सोमवारी (ता.११) शिक्षण संचालक कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर आणि सचिव डॉ. मारोती देशमुख यांनी दिला आहे.

पद भरतीला परवानगी देताना शिक्षण संचालक, ग्रंथपाल तसेच विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील सहाय्यक प्राध्यापकांच्या भरतीला मान्यता न दिल्याने पात्रता धारकांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रमुख मागण्या...**

- अकृषी विद्यापीठातील सहायक प्राध्यापक पदभरती त्वरित सुरू करावी
- ऑक्टोबर २०१७च्या आकृतिबंधाला मान्यता देऊन डिसेंबर २०२१पर्यंतची सर्व रिक्त पदे भरावीत
- तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या धोरणाबाबत स्थापन केलेल्या समितीचा अहवाल स्वीकारून अंमलबजावणी करावी
- विनाअनुदानित तुकड्यांना त्वरित अनुदान द्यावे.
- २०१६ नंतरच्या सहाय्यक प्राध्यापकांना वेतनवाढ तत्काळ लागू करावी

Pune, Pune-Today
09/04/2022 Page No. 1

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# पीएच.डी.साठी इच्छुकांच्या संख्येत वाढ

## प्रवेश परीक्षा, निर्धारित वेळापत्रकामुळे ताणही वाढला

### पीएच.डी.चे वास्तव

सम्राट कदम : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ८ :** प्राध्यापक पदासाठी पीएच.डी.ची अट आणि करिअर ॲडव्हान्समेंट योजनेच्या (कॅस) निमित्ताने राज्यातील पीएच.डी. इच्छुकांची संख्या वाढली आहे. प्रवेश परीक्षा आणि निर्धारित वेळापत्रकामुळे आता इच्छुकांवरील ताणही वाढला आहे.

राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये पीएच.डी.साठी प्रवेश परीक्षा घेण्यात येत असून, इच्छुक उमेदवारांचीही संख्या वाढत आहे. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. भरत व्हनकटे म्हणाले, "आता कॅससाठी सहयोगी प्राध्यापक पदासाठी पीएच.डी आवश्यक आहे. लेव्हलनुसार तुमच्या शोधनिबंधांचे प्रकाशन आवश्यक आहे. त्यामुळे अर्थातच पीएच.डी.कडे कल वाढला आहे. मार्गदर्शक आणि संशोधक विद्यार्थी यांच्या दीर्घ चर्चेनंतर आणि सहमतीने पीएच.डी.ला प्रवेश मिळायचे. ही प्रक्रीया वर्षभर चालायची, आता वेळापत्रकाच्या साच्यामुळे थोडीशी गडबड वाढली आहे."

अकोले येथील अगस्ती महाविद्यालयात नुकतेच सहाय्यक प्राध्यापक म्हणून नियुक्त झालेले दीपक देशमुख म्हणतात, "पदोन्नतीबरोबरच संशोधन क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानासाठी सर्वांचाच पीएच.डी.कडे कल आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नवीन ज्ञान देता येते. त्याचबरोबर आपल्याकडे एक नवीन पदवी जोडली जाते. आता प्राध्यापकीबरोबरच संशोधनातील करियरसाठीही पीएच.डी.कडे कल वाढला आहे."

### पीएच.डी.कडे का कल?

१. पदोन्नतीसाठी सहायक प्राध्यापकांना आवश्यक

२. 'सीएचबी'वरील प्राध्यापकांना नव्या संधीसाठी उपयुक्त

३. प्राध्यापक पदासाठीचे कॉलिफिकेशन वाढते

४. कंत्राटी प्राध्यापकांना संशोधन शिष्यवृत्तीचा मोठा आधार

५. संशोधन क्षेत्रात करिअरसाठी पीएच.डी. पहिली पायरी




"कायमस्वरूपी प्राध्यापकपदाच्या भरतीसाठी पीएच.डी. असल्यावर अधिकचे गुण मिळतात. पर्यायाने नव्या संधींसाठी आपली पात्रता वाढते. त्याचबरोबर संशोधन क्षेत्रात जाण्यासाठीही पीएच.डी. गरजेची असून, याद्वारे मिळणाऱ्या संशोधन शिष्यवृत्तीचा आर्थिक आधार मिळतो. नेहमी अद्ययावत राहण्यासाठी पीएच.डी. एक उत्तम माध्यम आहे.

– विकास म्हस्के,
सहायक प्राध्यापक(सीएचबी),
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय,
मंचर

### तुम्हाला काय वाटते?

राज्यभरात पीएच.डी. संदर्भात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सर्वसामान्य व्यक्ती म्हणून तुम्ही पीएच.डी. कडे कसे पाहता?, याबाबत आपल्या प्रतिक्रिया नावासह editor.pune@esakal.com या मेलवर किंवा ८४८४९७३६०२ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवा.

Sakaal 9.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आता 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म'

पुणे : नोकरीसाठी मुलाखतीची तयारी करत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आता एक नवीन व्यासपीठ घेऊन आले आहे. 'स्मार्ट इंटरव्ह्यू प्लॅटफॉर्म' वर कृत्रिम बुद्धिमतेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार असून त्या अनेक कंपन्यांना पाठविण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पिंपरी चिंचवड महापालिका स्मार्ट सिटी प्रकल्प यांच्या एकत्रित प्रयत्नातून स्टिक या उपक्रमांतर्गत ही संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आवश्यक कौशल्ये या माध्यमातून देण्यात येतील तसेच या व्यासपीठाच्या माध्यमातून वैश्विक स्तरावर संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ.एन.एस.उमराणी, इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ. अपूर्वा पालकर, अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, अधिसभा सदस्य संतोष ढोरे आदी उपस्थित होते.

डॉ. पालकर म्हणाल्या, ३०० पेक्षा जास्त कंपन्या जोडलेल्या असलेल्या या व्यासपीठावर पिंपरी चिंचवडमधील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना याचा विनाशुल्क वापर करता येईल. तसेच लवकरच डिग्री प्लस व्यासपीठावरसुद्धा हा उपक्रम नाममात्र शुल्कात सुरू करण्यात येईल, असेही डॉ. पालकर यांनी सांगितले.

> जग सातत्याने बदलत असताना काल जे घडलं ते आज अभ्यासक्रमात येण्याची गरज आहे. यासाठी विद्यापीठाकडून सिफोरआयफोर, डिग्री प्लससारखे उपक्रम घेऊन येत आहे. 'स्मार्ट इंटरव्ह्यू' हेही तशाच प्रकारचे व्यासपीठ असून, विद्यार्थ्यांना 'इंडस्ट्री रेडी' बनविण्यासाठी व जगातील कंपन्यांशी जोडण्यासाठी त्याची मदत होईल.
>
> **– डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Kesari 9.4.2022

### जुलैमध्ये १३ भाषेत होणार 'सीयूईटी'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

केंद्रीय विद्यापीठांमध्ये पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी यंदापासून होणाऱ्या सामाईक विद्यापीठ प्रवेश परीक्षेसाठी (सीयूईटी) ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना सहा मेपर्यंत नोंदणीसाठी मुदत राहणार आहे. ही परीक्षा इंग्रजी, मराठीसह एकूण १३ भाषांमध्ये जुलैमध्ये ऑनलाइन पद्धतीने होणार आहे, अशी माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून (एनटीए) देण्यात आली आहे.

सीयूईटी परीक्षा देशातील ५४७ शहरांमध्ये आणि परदेशातील १३ शहरांमध्ये होणार आहे. ही परीक्षा दोन सत्रांत होणार असून, पहिल्या सत्रांत तीन तास १५ मिनिटांचा कालावधी राहणार आहे, तर दुसऱ्या सत्रात तीन तास ४५ मिनिटांचा कालावधी राहणार आहे. परीक्षेमध्ये एमसीक्यू पद्धतीने प्रश्न विचारण्यात येणार आहे. या परीक्षेला नोंदणी करण्यासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ६५० रुपये, ओबीसी आणि ईडब्ल्यूएस प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ६०० रुपये भरावे लागणार आहे. एससी, एसटी, दिव्यांग, ट्रान्सजेंडर आदी राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५०० रुपये भरावे लागणार आहे. सविस्तर माहिती एनटीएच्या वेबसाइटवर उपलब्ध होणार आहे.

**अधिकाधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न**

'सीयूईटी परीक्षेत देशातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. देशातील सर्व विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांनी सीयूईटी परीक्षा आत्मसात करण्याबाबत चर्चा करण्यात सुरू आहेत,' अशी माहिती 'यूजीसी'चे अध्यक्ष डॉ. एम. जगदेश कुमार यांनी सीयूईटीबाबत आयोजित कार्यक्रमात शुक्रवारी दिली.

Maharashtra Times 9.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सकाळ

# परदेशातील शिक्षणासाठी मोफत मार्गदर्शन

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंतरराष्ट्रीय केंद्राकडून सामंजस्य करार

पुणे, ता. ९ : भारतातील विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातूनच मोफत मार्गदर्शन मिळू शकणार आहे. होय, विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राकडून नुकताच एक सामंजस्य करार झाला आहे. या करारानुसार आता भारतातील विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी मोफत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याअंतर्गत जीआरई, टोफेल, आयईएलटीएस यांसारखे भाषा अभ्यासक्रम मोफत शिकविण्यात येणार आहेत.

विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राने दिल्ली येथील 'सिलेक्ट युवर युनिव्हर्सिटी ऑनलाइन डिजिटल एज्युकेशन फाउंडेशन' या संस्थेसोबत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. करारावर नुकत्याच स्वाक्षऱ्या करण्यात आल्या असून यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे, अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, गिरीश भवाळकर, फाउंडेशनचे संचालक संदीप सिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. खरे म्हणाले, ''अनेक विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची इच्छा असते. पण बऱ्याचदा या विद्यार्थ्यांना योग्य माहिती व मार्गदर्शन मिळत नाही, त्यामुळे परदेशात जाऊन शिकण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण होत नाही. या कराराद्वारे अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. त्याद्वारे निवडक विद्यार्थ्यांना ही संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.''

**"अनेक विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्याची इच्छा असते. परंतु त्यांना व्हिसा, परदेशी शिक्षण व त्याबाबतची अधिक माहिती नसते. त्यामुळे त्यांना इच्छा असूनही मार्ग शोधता येत नाही. अशा विद्यार्थ्यांना या कराराच्या माध्यमातून मदत करण्याचा आमचा प्रयत्न आहे.**

**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**"विद्यार्थ्यांना परदेशी जाण्यासाठी आवश्यक इंग्रजी भाषेचे मोफत शिक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, समुपदेशन अशी सर्वांगीण मदत करण्यात येईल. जेणेकरून होतकरू विद्यार्थ्यांचा परदेशी जाण्याचा मार्ग सुकर होईल.**

**- डॉ. विजय खरे,**
संचालक, आंतरराष्ट्रीय केंद्र,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

याबाबत अधिक माहिती विद्यार्थ्यांना 'http://www.unipune.ac.in/dept/International%20Centre/' या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Pune, Main
10/04/2022 Page No. 2

# विद्यापीठाच्या द्वितीय सत्र परीक्षा तीन महिने चालणार

## प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया विलंबाचा परिणाम



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १०** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्राचे शैक्षणिक वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार दुसरे सत्र अभ्यासक्रमनिहाय दि. १५ जून ते २० ऑगस्ट या कालावधीत संपणार आहे. त्यातच यंदा व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेस विलंब झाला आहे. त्यामुळे जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत दुसऱ्या सत्राची परीक्षा होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

पदवी, पदविका आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्राची परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होणार आहेत. या परीक्षा जून महिन्यात घेण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, दुसरे सत्राचे शैक्षणिक वेळापत्रक तयार करताना किमान ९० दिवसांचा कालावधी अध्यापनासाठी दिला आहे. त्यात अभ्यासक्रम शिकवून पूर्ण होणे अपेक्षित आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर गेली दोन वर्षे विद्यापीठ व महाविद्यालयातील शैक्षणिक वेळापत्रक कोलमडले आहे. त्यामुळे शैक्षणिक सत्र दोन-तीन महिने पुढे गेले आहे. आता करोनाचा प्रादुर्भाव कमी होत आहे. राज्य सरकारने करोनावरील सर्व निर्बंध उठविले आहेत. विद्यापीठाच्या पहिल्या सत्राची परीक्षा पूर्ण होत असून, आता दुसऱ्या सत्राच्या परीक्षेची तयारी विद्यापीठाने सुरू केली आहे.

### परीक्षेचे नियोजन महत्त्वाचे ठरणार

काही अभ्यासक्रमाचा कालावधी १५ जून, तर काही अभ्यासक्रमाचा कालावधी २० ऑगस्ट, तर शिक्षणशास्त्रचा अभ्यासक्रम सप्टेंबर महिन्यात संपणार आहे. या सर्व अभ्यासक्रमाचा कालावधीचा विचार करता त्याप्रमाणे परीक्षेचे नियोजन करून शैक्षणिक सत्र पूर्ववत आणण्यासाठी विद्यापीठाला पुढाकार घ्यावे लागणार आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर म्हणाले, बहुतांश प्राध्यापकांनी त्यापूर्वीच अध्यापनास सुरुवात केली आहे. त्यामुळे वेळेपूर्वीच बहुतांश अभ्यासक्रम शिकवून पूर्ण होतील. मात्र व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेशास उशिर झाला आहे. जी अभ्यासक्रमे शिकवून पूर्ण होतील, त्याची परीक्षा आधी घेण्याचे नियोजन आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची परीक्षा शेवटी घ्यावे लागतील.

प्रभात Mon, 11 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67378538

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**सामना**

# 'यूजीसी'वर सायबर हल्ला

## ट्विटर अकाउंट हॅक

हॅकरने प्रोफाईल बदलले, अनावश्यक ट्विट करून युजर्सना टॅग केले | गेल्या दोन दिवसांत तीन सरकारी संस्थांना हॅकर्सने बनवले लक्ष्य

नवी दिल्ली, दि. १० (वृत्तसंस्था) – विद्यापीठ अनुदान आयोगावर (यूजीसी) आज पहाटे सायबर हल्ला झाला. यूजीसीचे अधिकृत ट्विटर अकाऊंट अज्ञात व्यक्तीने हॅक केले. त्याने यूजीसीच्या अकाऊंटवरील छायाचित्रे बदलली तसेच एकापाठोपाठ एक ट्विट करत शेकडो युजर्सना टॅग केले. गेल्या दोन दिवसांत तीन सरकारी संस्थांवर अशाप्रकारे हॅकर्सनी हल्ला केला.

गेल्या दोन दिवसांत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कार्यालय आणि देशाच्या हवामान खात्याचेही ट्विटर अकाउंट हॅक झाले होते. आज यूजीसीला तो अनुभव आला. यूजीसीचे अकाऊंट हॅक करून त्यावर अनावश्यक शेकडो ट्विट केले गेले आणि जगभरातील युजर्सना टॅग केले गेले. हॅकरने यूजीसीचा नेहमीचा प्रोफाईल फोटो बदलून त्याजागी कार्टून पोस्ट केले. त्याप्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयातील पथक चौकशी करीत आहे.




■ *देशातील उच्च शिक्षण संस्थांवर नियंत्रण ठेवणारी यूजीसी ही एक महत्त्वाची सरकारी संस्था आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांना शैक्षणिक बाबींसाठी निधी पुरवणे तसेच उच्च शिक्षणाचा दर्जा कायम राखण्यासाठी कार्यक्रम राबवणे अशा जबाबदाऱ्या यूजीसीवर आहेत. उत्तर प्रदेश सरकारनेही मुख्यमंत्री कार्यालयाचे अकाउंट हॅक करणाऱ्याचा शोध घेण्यासाठी सायबरतज्ज्ञांची मदत घेतली आहे.*

Pune Edition
Apr 11, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

**सकाळ**

# 'यूजीसी'चे ट्विटर अकाउंट हॅक

## शिक्षण क्षेत्रात खळबळ; प्रोफाइलवर व्यंग्यचित्र वापरून अनोळखींना टॅग

पुणे, ता. १० : देशभरातील विद्यापीठांवर नियंत्रण ठेवणारी संस्था म्हणून ओळख असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) ट्विटर अकाउंट रविवारी पहाटे सायबर गुन्हेगारांनी हॅक केल्याचे उघडकीस आले. यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली. सायबर गुन्हेगारांनी त्यावर नियंत्रण मिळविल्यानंतर ट्विटरच्या प्रोफाइलवर व्यंग्यचित्र वापरून अनेक अनोळखी व्यक्तींना टॅग करण्यास सुरुवात केल्याचे आढळून आले.

'यूजीसी'च्या माध्यमातून देशातील बहुतांश विद्यापीठांवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले जाते. त्यामुळे यूजीसी देशातील शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठे नाव आहे. यूजीसीचे मुख्य कार्यालय दिल्लीत असून त्यांच्याकडून समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. युजीसीकडून वेबसाईट, ट्विटर अकाऊंटमार्फत विद्यापीठांची अद्ययावत माहिती, अधिनीयम, प्राध्यापक भरती, संशोधन यादी, विविध प्रकारच्या योजना व अन्य उपक्रमांबाबची माहिती सर्वांपर्यंत पोचविली जाते. विशेषतः त्यांच्या @ugc_india या ट्विटर अकाऊंटचे सुमारे तीन लाख फालोअर्स आहेत. दरम्यान, रविवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात सायबर गुन्हेगारांनी संबंधित ट्विटर अकाऊंट हॅक केले. त्यानंतर त्यांनी अनेक अनोळखी व्यक्तींना संबंधित अकाऊंटवरुन टॅग करण्यास सुरुवात केली. दरम्यान, यूजीसी प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन हा हल्ला थांबविण्यासाठीच्या उपाययोजना करण्यास सुरुवात केली. मागील काही दिवसात भारतीय हवामान खाते (आयएमडी), उत्तर प्रदेश मुख्यमंत्री कार्यालय या दोन मोठ्या संस्थांचे ट्विटर अकाऊंट हॅक करण्याच्या घटना घडल्यानंतर आता युजीसीचेही अकाऊंट हॅक झाले आहे.

**अकाउंटच्या रिकव्हरीचे काम सुरू**

अनोळखी सायबर गुन्हेगारांनी 'यूजीसी'चे अकाउंट हॅक करण्याचा प्रकार केला असल्याचे पुढे आले आहे. या प्रकारामागे नेमके कोण आहे, हे अद्याप पुढे आले नाही. त्यादृष्टीने 'यूजीसी'कडून ट्विटर अकाउंटची रिकव्हरी करण्याचे काम सुरू केले आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच सायबर गुन्हेगारांनी भारतीय हवामान खात्याचे (आयएमडी) ट्विटर अकाउंटही हॅक केले होते. त्याचबरोबर उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्री कार्यालयाचेही ट्विटर अकाउंट हॅक करण्यात आले होते. त्यापाठोपाठ 'यूजीसी'चेही अकाउंट हॅक झाल्याने सायबर हल्ल्याच्या घटनांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

Pune, Main
11/04/2022 Page No. 3

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# कोरोनात पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या 'प्लेसमेंट'चे काय?

## कंपनीच्या परीक्षेनंतरच विद्यार्थी ठरतो पात्र; गुणपत्रिकेचे महत्त्व कमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाचे सर्व निर्बंध हटविल्यानंतर कंपन्यांनी कामगार भरती मोठ्या प्रमाणावर सुरू केली आहे. मात्र, विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची निवड न करता आता कंपनी स्वत:च परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची पात्रता तपासत आहे. त्यामुळे कोरोनाने विद्यापीठांकडून देण्यात आलेल्या गुणपत्रिकेचे महत्त्व कमी केल्याची चर्चा सध्या शिक्षण वर्तुळात होत आहे.

गेल्या दोन वर्षांत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कोरोनामुळे ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घ्यावे लागले. अभियांत्रिकी अभ्यासक्रमासह सर्वच अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रॅक्टिकल (प्रात्यक्षिक)करता आले नाही. त्यातच विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. बहुपर्यायी प्रश्नांच्या आधारे (एमसीक्यू) झालेल्या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले. त्यामुळे नोकरी कोणाला द्यावी, असा प्रश्न कंपन्यांसमोर उभा राहिला. त्यामुळे कंपन्यांनी नोकरीसाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वत:च परीक्षा घेण्यास सुरुवात केली आहे.

कंपन्यांकडून प्लेसमेंट देताना विद्यार्थ्यांचा पहिल्या वर्षापासून ते शेवटच्या वर्षापर्यंतची शैक्षणिक प्रगती पाहिली जाते. मात्र,गेल्या दोन वर्षांत विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक परीक्षा नीटपणे दिल्या नाहीत. तसेच एका वर्गातील बहुतांश सर्व विद्यार्थ्यांना ८० ते ९० टक्के गुण मिळाले आहेत. त्यामुळे कोरोनाकाळाच विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर अधिक आहे की इतर वर्षीसुद्धा संबंधित विद्यार्थ्यांची प्रगती चांगली होती हे कटाक्षाने तपासले जात आहे.


संग्रहीत छायाचित्र

> कोरोनाचे निर्बंध उठले असले तरी आयटी कंपन्यांना आपल्या कामगारांकडून ऑनलाईन पद्धतीने करून घेणे परवडत आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून लहान-मोठ्या आयटी कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्लेसमेंट होत आहेत. मात्र, कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम झाला. परिणामी कंपन्यांकडून प्लेसमेंट पूर्वी विद्यार्थ्यांची एक 'बेसिक टेस्ट' घेतली जात आहे. त्यात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची निवड करूनच त्यांना कंपनीत काम करण्यासाठी पुढील प्रशिक्षण दिले जात आहे.
>
> **- डॉ. पराग काळकर, अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Pune Main
Page No. 2 Apr 11, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# 'अन्वेषण'मध्ये विद्यापीठाचे विद्यार्थी प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी हॅलोबेटिक या प्रकल्पाच्या माध्यमातून डायबेटिक जखमेसाठी एक नावीन्यपूर्ण ड्रेसिंग प्रकार तयार केला आहे. त्यास राष्ट्रीय स्तरावर आयोजित अन्वेषण स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.

नवी दिल्ली येथील भारतीय विश्वविद्यालय संघ आणि अ‍ॅकॅडमी ऑफ मेरिटाईम एज्युकेशन अँड ट्रेनिंग अभिमत विद्यापीठ चेन्नई यांच्या वतीने १० व ११ मार्च २०२२ या कालावधीत अन्वेषण स्पर्धेचे आयोजन केले होते. पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आरोग्यशास्त्र व संबंधित विषय तसेच औषधनिर्माणशास्त्र व पोषण या गटात हे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या गटात विद्यापीठातील गार्गी निकम, अमेय गावसकर, फैयाज मुजावर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांना एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील डॉ. राहुल पाडळकर यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 11, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सकाळ

# पीएच.डी.साठी मेमध्ये मुलाखती

## पहिल्या फेरीत अपात्र व अनुपस्थित विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीत संधी

पुणे, ता. १० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीने पीएच. डी. अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या प्रवेशफेरीचे आयोजन करण्यात आले आहे. या फेरीअंतर्गत विद्यार्थ्यांच्या मुलाखतींची प्रक्रिया ३ ते ३१ मे दरम्यान होणार आहे. पहिल्या प्रवेश फेरीत अपात्र ठरलेले, अनुपस्थित राहिलेले विद्यार्थीदेखील पीएच.डी. प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत सहभागी होऊ शकणार आहेत.



काही दिवसांपासून रखडलेल्या पीएच. डी. प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने प्रसिद्ध केले आहे. पहिल्या फेरीतील पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी भरलेल्या जागा विचारात घेऊन, उर्वरित रिक्त जागा भरण्यासाठी तसेच नव्याने मिळालेल्या मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शकांना व पदोन्नतीने प्रवेशासाठी वाढलेल्या अधिकच्या जागा भरण्यासाठी दुसऱ्या प्रवेश फेरीचे आयोजन करण्यात येत आहे. यात पीएच.डी. पदवीपूर्व परीक्षेत सवलत मिळालेले पात्र विद्यार्थी अर्ज करू शकणार आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना २३ एप्रिल रोजी विद्यापीठ आणि संलग्नित संशोधन केंद्रावरील पीएच.डीच्या दुसऱ्या फेरीसाठी उपलब्ध जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगिनमधून ऑनलाइन पद्धतीने विषयनिहाय, प्रवर्गनिहाय उपलब्ध जागांचा विचार करून ३० एप्रिलपर्यंत आवश्यकतेनुसार संशोधन केंद्र बदलण्याची कार्यवाही करायची आहे.

केंद्र बदलण्याची प्रक्रिया केली नसल्यास प्रथम फेरीसाठी असलेले संशोधन केंद्रच दुसऱ्या फेरीसाठी कायम राहणार आहे. या प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकास कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असे विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

### महत्त्वाच्या तारखा

- मार्गदर्शकांनी रिक्त जागा अद्ययावत करणे : १७ एप्रिलपर्यंत
- संशोधन केंद्रांनी प्रवर्गनिहाय रिक्त जागांना मान्यता देणे : १८ ते २२ एप्रिल
- केंद्रनिहाय प्रवर्गनिहाय रिक्त जागांचा तपशील ऑनलाइन उपलब्ध करणे : २३ एप्रिल
- आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांनी संशोधन केंद्र बदलण्याची प्रक्रिया करणे : २३ ते ३० एप्रिल
- मुलाखतप्रक्रिया : ३ ते ३१ मे

### विद्यार्थ्यांसाठी सूचना

- प्रथम फेरीस अपात्र ठरलेले, अनुपस्थित राहिलेले, तसेच पेट एक्झमटेड पात्र विद्यार्थी दुसऱ्या फेरीत सहभागी होऊ शकतात.
- विद्यार्थ्यांनी निवडलेल्या संशोधन केंद्रांच्या संपर्कात राहावे.
- दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी उपलब्ध जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'पीएच.डी. ॲडमिशन २०२१' या टॅबमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.
- विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगिनमधून ऑनलाइन पद्धतीने विषयनिहाय प्रवर्गनिहाय उपलब्ध जागांचा विचार करून ३० एप्रिलपर्यंत आवश्यकतेनुसार संशोधन केंद्र बदलण्याची कार्यवाही करावी.

Pune, Main
11/04/2022 Page No. 2

सकाळ

# पदवी, पदव्युत्तरसाठी सुधारित वेळापत्रक

पुणे, ता. १० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सत्रातील शैक्षणिक वर्षाचे सुधारित वेळापत्रक नुकतेच जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यापीठातील विविध विभाग आणि महाविद्यालयांना अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया व त्या पद्धतीने कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन या विद्याशाखेअंतर्गत एमबीए, एमसीए (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे पहिले सत्र १८ एप्रिल रोजी संपणार असून दुसरे सत्र २ मे पासून सुरू होईल. तसेच एमसीए (द्वितीय/तृतीय वर्ष), कॉमर्स या अभ्यासक्रमांचे पहिले सत्र मार्चमध्ये संपले आहे. एमसीएचे दुसरे सत्र १८ एप्रिलला सुरू होईल. त्याचप्रमाणे मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत कला, सामाजिक शास्त्र या अभ्यासक्रमाचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे पहिले सत्र १५ मार्चला संपले आहे. आता दुसरे सत्र २१ मार्चपासून सुरू झाले आहे. दुसऱ्या सत्रासाठी साधारणतः २७ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत विज्ञान, बी.फार्मसी, एम.फार्मसी, आर्किटेक्चर अभ्यासक्रमाचे पहिले सत्र मार्चमध्ये तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे पहिले सत्र ६ एप्रिल रोजी संपले आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाचे दुसऱ्या सत्रासाठी ११ एप्रिल ते १५ जूनपर्यंत मुदत दिली आहे. त्यानुसार अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे आंतरविद्या शाखीय विद्या शाखेअंतर्गत शारीरिक शिक्षण, शिक्षणशास्त्र, ग्रंथालयशास्त्र या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. एम.पी.एड, एम.एड (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे दुसरे सत्र २ मे ते ३० सप्टेंबर, तर बी.पी.एड (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे दुसरे सत्र ८ जूनला सुरू होऊन २६ सप्टेंबरदरम्यान संपेल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठाने प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक सत्राचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिले आहे.

Pune, Main
11/04/2022 Page No. 2

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# शिक्षणसंस्थांचे ऑनलाइन अभ्यासक्रम आता एका छताखाली

### राष्ट्रीय डिजिटल विद्यापीठाचा प्रस्ताव

**रसिका मुळ्ये, लोकसत्ता**

**मुंबई :** करोना साथीच्या काळात विस्तारलेल्या ऑनलाइन अभ्यासक्रमांना आता अधिक शिस्तबद्ध स्वरूप येणार आहे. राष्ट्रीय डिजिटल विद्यापीठ स्थापन करून विविध शिक्षणसंस्थांमधील अभ्यासक्रम त्याच्याशी जोडण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय डिजिटल विद्यापीठाचा आराखडा अंतिम टप्प्यात असून साधारण महिन्याभरात तो प्रसिद्ध करण्यात येईल, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष जगदेश कुमार यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. आयोगाने मान्यता दिलेल्या शिक्षण संस्थांमधील ऑनलाइन अभ्यासक्रमच यानंतर वैध ठरतील.

यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात राष्ट्रीय डिजिटल विद्यापीठाची घोषणा करण्यात आली होती. देशभरातील शिक्षणसंस्थांनी सुरू केलेले आणि सुरू होणारे ऑनलाइन अभ्यासक्रम या विद्यापीठाशी जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे सध्या



**परीक्षेवर देखरेख...**

ऑनलाइन परीक्षा, त्यातील गैरप्रकार, गुणवत्ता असे मुद्दे सध्या चर्चेत आहेत. डिजिटल विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे ऑनलाइन मूल्यमापन देखरेखीखाली होणार आहे. परीक्षा प्रॉक्टर्ड होतील. चांगल्या, सक्षम तंत्रज्ञानाचा वापर त्यासाठी करण्यात येईल. सावेबद्ध परीक्षेशिवाय मूल्यमापनासाठी इतरही काही पर्याय असतील, अशी माहिती कुमार यांनी दिली.

काहीशा विस्कळीत असलेल्या या नव्या शिक्षण प्रवाहाला शिस्तबद्ध आकार मिळू शकेल. कोणतीही विद्याशाखा, अभ्यासक्रमातील ४० टक्के श्रेयांक विद्यार्थी ऑनलाइन अभ्यासक्रमांच्या माध्यमातून मिळवू शकतील. हव्या असलेल्या शिक्षणसंस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाला नाही तरी त्या संस्थेतील ऑनलाइन अभ्यासक्रम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळू शकेल. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी कमाल मर्यादा असणार नाही. त्यामुळे कितीही विद्यार्थी एकावेळी एका संस्थेतील अभ्यासक्रमांचे शिक्षण घेऊ शकतील. प्रमाणपत्र, पदविका, पदवी अशा सर्व स्तरावरील अभ्यासक्रम या विद्यापीठांतर्गत उपलब्ध करून देण्यात येतील. ऑनलाइन शिक्षणाबाबत अधिक व्यापक आणि शिस्तबद्ध विचार या आराखड्यात करण्यात आल्याचे जगदेश कुमार यांनी सांगितले.

**संस्थांना स्वातंत्र्य**

शिक्षणसंस्थांच्या राष्ट्रीय क्रमवारीत अव्वल ठरलेल्या शिक्षणसंस्थांना ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आयोगाची परवानगी मिळेपर्यंत वाट पाहावी लागणार नाही. या शिक्षणसंस्थांकडे आवश्यक पायाभूत सुविधा असल्यास ऑनलाइन अभ्यासक्र सुरू करता येईल. त्याबाबतची नियमावलीही येत्या महिन्याभरात जाहीर करण्यात येईल, असेही कुमार यांनी सांगितले. त्याचबरोबर सध्या त्रयस्थ खासगी संस्था *(पान ४ वर)*

लोकसत्ता Tue, 12 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67392129

# शिक्षणसंस्थांचे ऑनलाइन अभ्यासक्रम आता एका छताखाली

*(पान ३ वरून)*

शिक्षणसंस्थांशी संलग्न होऊन अभ्यासक्रम उपलब्ध करून देत आहेत. या संस्थांसाठीही काही नियम करण्यात येणार आहेत.

**श्रेयांक बँकेला प्रतिसाद कमी**

लवचीकता हा ऑनलाइन शिक्षणाचा पाया आहे. त्यासाठी आयोगाने 'श्रेयांक बँक' तयार केली आहे. विद्यार्थ्यांनी विविध शिक्षणसंस्थांमध्ये केलेल्या अभ्यासक्रमात मिळवलेल्या श्रेयांकांची नोंद या प्रणालीवर होणार आहे. तेथे साठलेले श्रेयांक वापरून विद्यार्थी त्यांना हवी ती पदवी मिळवू शकतील. विद्यापीठांनी या प्रणालीशी जोडून घेणे अपेक्षित आहे. मात्र अद्याप देशातील १० टक्केच विद्यापीठांचा प्रतिसाद मिळाल्याचे कुमार यांनी सांगितले. सर्व राष्ट्रीय संस्था या प्रणालीशी जोडण्यात आल्या आहेत. मात्र, स्थानिक विद्यापीठे आणि शिक्षणसंस्था काहीशा उदासीन आहेत.

**प्रवेशाचा अधिकार विद्यापीठांचाच**

विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी यंदापासून राष्ट्रीय चाचणी घेण्यात येणार आहे. केंद्रीय विद्यापीठांमध्ये ही परीक्षा होणार आहे. त्याचबरोब राज्य विद्यापीठे, खासगी विद्यापीठांनाही आयोगाने य परीक्षेच्या माध्यमातून प्रवेश करण्याचे आवाहन केले आहे. विद्यापीठांनी केंद्रीय प्रवेश परीक्षा स्वीकारली तरीही प्रवेशाचे नियम हे त्यांचेच असतील आरक्षण, प्रवेश देण्याची प्रक्रिया याला धक्का लागणार नाही, असेही कुमार यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Tue, 12 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67392511

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# भरती, तासिका धोरणाच्या मानधनवाढीसाठी आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील महाविद्यालयांमधील प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथालय या पदांसह विद्यापीठातील सहायक प्राध्यापक पद भरती तत्काळ सुरू करावी, तासिका तत्त्वावरील धोरणाबाबत (सीएचबी) स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करावी आदी मागण्यांसाठी महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेने सोमवारी उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर आंदोलन केले. त्यानंतर शासनाने प्राध्यापक भरतीची नियमावली प्रसिद्ध केली असून प्राध्यापक भरतीसंदर्भातील सर्व अडचणी दोन दिवसांत दूर होतील, असे उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या जागा रिक्त असूनही शासनाकडून त्या भरल्या जात नाहीत. तसेच सीएचबी प्राध्यापकांना तुटपुंजा पदावर राबवून घेतले जाते. त्यामुळे महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेतर्फे वेळोवेळी आंदोलने करण्यात आली. उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी प्राध्यापक भरतीबाबत आश्वासन दिल्यानंतर ही आंदोलने मागे घेण्यात आली. परंतु, दिलेल्या आश्वासनानुसार अंमलबजावणी होत नसल्याने संघटनेतर्फे सोमवारी पुन्हा आंदोलन केले. त्यावर माने यांनी मंत्रालयातील अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधून प्राध्यापकांच्या मागण्यांबाबत चर्चा केली. तसेच हा प्रश्न दोन दिवसात मार्गी लागेल, असे सांगितले.

### या आहेत मागण्या

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक वर्गातील आरक्षण) अधिनियम २०२१ कायद्याची अकृषी विद्यापीठातील आरक्षण कक्ष व मागास वर्गीय कक्ष यांच्याकडून तत्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात यावेत. प्रत्येक जिल्ह्यात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे किमान एक शासकीय महाविद्यालय सुरु करावे, राज्य शासन व उच्च शिक्षण संचालक यांच्या आदेशाची अंमलबजावणी विभागीय सहसंचालकांकडून होत नसल्याने त्यांच्या शिस्तभंगाची कार्यवाही करावी. तसेच २०१६ नंतरच्या साहाय्यक प्राध्यापकांना पीएच. डी.च्या ५ वेतनवाढी तत्काळ द्याव्यात आदी मागण्यांसाठी प्राध्यापक संघटनेतर्फे आंदोलन करण्यात आले.

Hello Pune
Page No. 3 Apr 12, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# एकाच वेळी दोन पदव्यांचा अभ्यास?

**लोकमत न्यूज नेटवर्क :** नवी दिल्ली : एकाचवेळी दोन विभिन्न अभ्यासक्रमांची पदवी प्राप्त करण्याची संधी अभ्यासू विद्यार्थ्यांना लवकरच प्राप्त होणार आहे. एकाचवेळी एकाच विद्यापीठात वा दोन विद्यापीठांतून दोन पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता येऊ शकेल असे धोरण लवकरच राबविण्यात येईल, असे संकेत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.



### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण काय सांगते?

- विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये अंगीकारून स्वत:चा विकास घडवून आणावा या दृष्टिकोनातून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आली आहे.
- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत यूजीसीने विद्यार्थ्यांना एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता यावेत यासाठी मार्गदर्शक तत्त्वे आखली असून ती लवकरच जारी केली जातील, असे यूजीसीचे अध्यक्ष जगदीशकुमार यांनी स्पष्ट केले.**
- दोन पदवी अभ्यासक्रम एकाच वा दोन विद्यापीठांतून पूर्ण करता येतील, अशी त्यात तरतूद असेल. ऑनलाइन पद्धतीनेही विद्यार्थ्यांना एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता येणार असल्याचे जगदीशकुमार यांनी सांगितले.

### देशभरातील विद्यापीठांची संख्या

| १२६ | ५४ | ४०३ |
|---|---|---|
| अभिमत | केंद्रीय | खासगी |

### यूजीसी काय आहे?

- यूजीसी कायद्यांतर्गत येणाऱ्या तसेच केंद्रीय निधीसाठी पात्र असणाऱ्या महाविद्यालयांना यूजीसीकडून दरवर्षी ठरावीक अनुदान दिले जाते.
- या अनुदानातून महाविद्यालयांमध्ये विविध पाठ्यक्रम चालवले जातात. देशभराती सर्व राज्यांतील ४४४ विद्यापीठे यूजीसी अंतर्गत येतात.

**३,४३,००,०००**

विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी

Pune Main
Page No. 12 Apr 13, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# प्रत्येक विद्यापीठामध्ये युवा साहित्य संमेलन भरविणार

**ठाणे, दि. १२** - युवा साहित्य संमेलनासारख्या उपक्रमामुळे तरुण पिढी सक्षम होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात अशी युवा साहित्य संमेलने व्हायला हवीत. राज्यातील विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील तरुणांच्या साहित्य कलांना वाव देण्यासाठी प्रत्येक विद्यापीठांमध्ये देखील युवा साहित्य संमेलने व्हावीत, यासाठी कुलपती तथा राज्यपाल यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले.

कोकण मराठी साहित्य परिषद व ठाणे महानगरपालिका यांच्या वतीने आयोजित दुसऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य संमेलनाचे उद्घाटन मंगळवारी (दि.१२) ठाण्यातील काशिनाथ घाणेकर सभागृहात झाले. त्यावेळी मंत्री सामंत बोलत होते. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष युवा साहित्यिक प्रणव सखदेव, ज्येष्ठ साहित्यिक मधुमंगेश कर्णिक, माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर आदी यावेळी उपस्थित होते. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनाची सुरुवात सकाळी ग्रंथ दिंडीने झाली. विविध महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरस्वती पूजन व छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून संमेलनाचे उद्घाटन झाले.

कोणतीही निवडणूक न होता संमेलनाध्यक्षांची निवड करण्याचा चांगला पायंडा युवा साहित्य संमेलनाने पाडला आहे. अशा प्रकारचे संमेलन ग्रामीण भागात व्हावे, यासाठी पुढील संमेलन रत्नागिरीत घेण्याचे निमंत्रण मी आताच देत आहे, असे सांगून मंत्री सामंत म्हणाले की, सध्या सुरू असलेली ग्रंथालये का बंद पडत आहेत, मुलांपर्यंत साहित्य कसे पोहोचेल आणि वाचन संस्कृती कमी का होत आहे, या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज आहे. प्रत्येक जिल्ह्यात अशी संमेलने आयोजित करायला हवीत. साहित्याला राजाश्रय मिळायला हवा. मात्र, राजकिय अभिनिवेष त्यामध्ये येता कामा नये. ठाण्यामध्ये साहित्याला चांगला राजाश्रय मिळत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

### मुंबई - पुण्याबाहेरही महाराष्ट्र...

संमेलनाध्यक्ष सखदेव म्हणाले की, आजकालची मुले वाचत नाहीत, हे खरे आहे का ते तपासले पाहिजे. कारण इन्स्टाग्राम, फेसबुक सारख्या माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणावर तरुण लिहीत असतात. मुंबई, पुणे या परिघाबाहेरही खूप मोठा महाराष्ट्र आहे. पुढील काळात साहित्य, संस्कृती टिकविणारी पिढी ही या परिघाबाहेरची आहे. या परिघाबाहेरील तरुणांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाचनाची ऊर्जा आहे, ती जाणून घेता यायला हवी. आजही अनेक तालुक्यात पुस्तकांची दुकाने नाहीत. अशा ठिकाणी पुस्तकांची दुकाने सुरु करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा.

प्रभात Wed, 13 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/6741

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम

**पुणे, दि. १२** - विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील दिव्यांगांसाठी सुरू केलेल्या नवीन सुविधांच्या माध्यमातून पदविका अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. विद्यापीठाचा नेहमीच केवळ सहानुभूतीच्या पलीकडे विचार करून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्षात मदत करण्याची भूमिका राहिली आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले. या सुविधेतून माजी दिव्यांग विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.



विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभागांतर्गत दिव्यांग अभ्यास व सर्वसमावेशक शिक्षण केंद्र आणि युथ फॉर जॉब फाउंडेशन यांच्यात मंगळवारी सामंजस्य करार झाला. याप्रसंगी डिजिटल लायब्ररी व सहायक तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठीच्या नवीन सुविधांचे उद्घाटन कुलगुरूंच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी डॉ. शिल्पा भिडे, शिक्षणशास्त्र प्रशाळेचे संचालक डॉ. संजीव सोनवणे, मुक्त अध्ययन प्रशाळेचे प्रा. वैभव जाधव, समन्वयक प्रा. धनंजय भोळे, युथ फॉर जॉब फाउंडेशनचे रमेश दुरईकन्नन, धनश्री पागे उपस्थित होते. या करारांतर्गत युथ फॉर जॉब फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून कॅपजेमिनी सी.एस.आर यांनी २५ आधुनिक संगणक, एलसीडी प्रोजेक्टर, प्रिंटर, लॅपटॉप प्रत्येकी एक अशा सुविधा केंद्रास उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा उपयोग सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी केला जाणार आहे, अशी माहिती डॉ. संजीव सोनवणे यांनी दिली.

प्रभात Wed, 13 April 2022 https://epaper.eprabhat

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# महाविद्यालयांनी स्वायत्तता स्वीकारावी

**मुंबई, दि. १२ - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महाविद्यालयीन स्वायत्ततेचा पुरस्कार करणारे आहे. स्वायत्त महाविद्यालयांना शैक्षणिक स्वातंत्र्य मिळत असल्यामुळे गुणवत्ता वाढविणे सुलभ होते. यास्तव राज्यातील जास्तीत जास्त महाविद्यालयांनी स्वायत्तता स्वीकारावी व आपले राष्ट्रीय मानांकन सुधारावे, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.**



**■ राज्यपाल कोश्यारी यांचे आवाहन**

कांदिवली शिक्षण संस्थेच्या बी के श्रॉफ कला व एम एच श्रॉफ वाणिज्य महाविद्यालयाला क्यू.एस.आय. गेज संस्थेचे सुवर्ण मानांकन प्रमाणपत्र राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते सोमवारी समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नवीनता, इन्क्युबेशन यासोबत प्रादेशिक भाषांमधील शिक्षणाला महत्त्व दिले गेले असल्याचे सांगून राज्यातील महाविद्यालयांनी मराठी भाषेला प्राधान्य दिले तर त्यातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृती व भाषेचा स्वाभिमान वाढेल व राष्ट्रीय एकात्मता देखील वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असे राज्यपालांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी उत्तम इंग्रजी भाषा अवश्य शिकावी परंतु माता, मातृभाषा व मातृभूमीला विसरू नये, असेही त्यांनी सांगितले.

प्रभात Wed, 13 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67419812

## पदवीपूर्व, पदव्युत्तर अभ्यासक्रमात नवीन विषयाचा समावेश

# आता विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे शिक्षण

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२** - माहिती तंत्रज्ञानातील क्रांती आणि सुरक्षेशी संबंधित बाबींची वाढती मागणी पाहता सायबर सुरक्षेची गरज भासू लागली आहे. सायबर समस्यांवर योग्य तोडगा काढणे ही काळाची गरज बनली आहे. त्या पार्श्वभूमीवर आता देशातील विद्यापीठे व उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा अभ्यासक्रम विषय शिकवला जाणार आहे.

यासंदर्भातील परिपत्रक आणि या अभ्यासक्रमाचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे खूप गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षेचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची निर्मिती 'यूजीसी'कडून करण्यात आली आहे. पदवीपूर्व स्तरावर सायबर सुरक्षेची मूलभूत तत्त्वे आणि मध्यम पातळीवरील अभ्यासक्रम असेल. तर पदव्युत्तर पदवी स्तरावर मध्यम आणि प्रगत पातळीवरच्या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. दोन्ही स्तरावरील अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके आणि व्याख्याने यांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमासाठी चार क्रेडिट दिले जाणार आहेत.

**पुढील घटकांचा अभ्यासक्रमात असणार समावेश**

सायबर क्षेत्र, सायबर गुन्हे, सायबर गुन्ह्यांचा महिला आणि मुलांना असलेला धोका, सायबर गुन्ह्यांचे स्वरुप, समाजमाध्यमांवरील गोपनीयता, इंटरनेट बँकिंग, डिजिटल पेमेंट, मोबाइल पेमेंट, आधार, डेबिट किंवा क्रेडिट कार्ड पेमेंट सुरक्षा, मोबाइल फोन सुरक्षा, उपकरणे सुरक्षा, वाय-फाय सुरक्षा, अँटी व्हायरस, सायबर हल्ला, सायबर दहशतवाद, सायबर युद्ध, ऑनलाइन जॉब फ्रॉड, ब्लॉकचेन, सायबर गुन्हे आणि शिक्षा अशा घटकांचा सायबर सुरक्षा अभ्यासक्रमात समावेश असणार आहे.

प्रभात Wed, 13 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67420149

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# पदवीपूर्व, पदव्युत्तर स्तरावर आता सायबर सुरक्षा अभ्यासक्रम

### 'यूजीसी'कडून मसुदा प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठे आणि उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासून पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा विषय शिकवला जाणार आहे. त्यासाठी चार श्रेयांकांची तरतूद करण्यात आली असून, या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) या संदर्भातील परिपत्रक आणि अभ्यासक्रमाचा मसुदा संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होत असलेल्या प्रगतीमुळे खूप गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानातील क्रांती आणि सुरक्षेशी संबंधित बाबींची वाढती मागणी पाहता सायबर सुरक्षेची गरज भासू लागली आहे. सायबर समस्यांवर योग्य तोडगा काढणे ही काळाची गरज असल्याने त्याबाबत अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे.

पदवीपूर्व स्तरावर सायबर सुरक्षेची मूलभूत तत्त्वे आणि मध्यम पातळीवरील अभ्यासक्रम असेल तर पदव्युत्तर पदवी स्तरावर मध्यम आणि प्रगत पातळीवरच्या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. दोन्ही स्तरांवरील अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके आणि व्याख्याने यांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमासाठी चार श्रेयांक देण्यात आले आहेत.



### यात काय असेल?

पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रमात सायबर क्षेत्र, सायबर गुन्हे, सायबर गुन्ह्यांचा महिल आणि मुलांना असलेला धोका, सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, समाजमाध्यमांवरील गोपनीयता, इंटरनेट बँकिंग, डिजिटल पेमेंट, मोबाइल पेमेंट, आधार, डेबिट किंवा क्रेडिट कार्ड पेमेंट सुरक्षा, मोबाइल फोन सुरक्षा, उपकरणे सुरक्षा, वाय-फाय सुरक्षा, अँटी व्हायरस, सायबर हल्ला, सायबर दहशतवाद, सायबर युद्ध ऑनलाइन जॉब फ्रॉड, ब्लॉकचेन, सायबर गुन्हे आणि शिक्षा, सायबर सुरक्षा लेखापरीक्षण आदी पैलूंचे धडे दिले जातील.

लोकसत्ता Wed, 13 April 2022 https://epaper.loksatta.com/c,

# विद्यापीठातील शैक्षणिक विभागात बाह्य पीएच.डी. मार्गदर्शक नियुक्तीस मुभा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये पीएच.डी. मार्गदर्शकांची संख्या पुरेशा प्रमाणात नसल्याने विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने बाह्य मार्गदर्शक घेण्यास परवानगी दिली आहे. विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा औद्योगिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येऊ शकेल.

पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून संशोधन करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. मार्गदर्शक पुरेशा संख्येत नसल्याने येणाऱ्या अडचणींचा विचार करून बाह्य मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठाने समिती नियुक्त केली होती. या समितीने केलेल्या शिफारसींनुसार विद्यापीठ प्रशासनाने बाह्य मार्गदर्शक नियुक्तीबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार विद्यापीठ प्रशाळेतील विभागामध्ये तीन किंवा त्यापेक्षा कमी मार्गदर्शक असल्यास संलग्न महाविद्यालयातील किंवा व्यावसायिक आस्थापनांतून मिळून दहा मार्गदर्शकांची नियुक्ती करता येऊ शकेल. विभागाबाहेरील पीएच.डी मार्गदर्शकांपैकी ५० टक्के संलग्न महाविद्यालयातील आणि ५० टक्के औद्योगिक आस्थापना किंवा संशोधन संस्थांतील असावेत. पीएच.डी. विद्यार्थी स्वीकारल्यावर संबंधित मार्गदर्शकांना आठवड्यातून किमान दोन वेळा शैक्षणिक विभागात येऊन संशोधक विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष किंवा आभासी पद्धतीने संवाद साधणे बंधनकारक असेल. विद्यार्थी आणि मार्गदर्शकांची नोंद आणि नियमनाची जबाबदारी विभागप्रमुख किंवा प्रशाळा संचालकांची असेल. विभागाची विभागीय समिती विभागाबाहेरील पीएच.डी मार्गदर्शकांच्या संलग्नतेची शिफारस करेल. तीनपेक्षा अधिक मार्गदर्शक असलेल्या विभागांना औद्योगिक किंवा संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यताप्राप्त मार्गदर्शक करायचे असेल, एकत्रितपणे दहा मार्गदर्शक संलग्नित करून घेता येतील. मार्गदर्शक संलग्नित करून घेण्यासाठी विभागप्रमुख, प्रशाळा संचालकांची विभागीय समितीमार्फत कुलगुरूंची विशेष परवानगी घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### संसाधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी

पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन संसाधने उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असते. ही संसाधने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित बाह्य मार्गदर्शक आणि विद्यापीठ विभागाची असेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 13 April 2022 https://epaper.loksatta.com/c/67417599

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# एकाच वेळी दोन पदव्या घेण्याची मुभा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कला आणि विज्ञान विद्याशाखेतील पदवी, एखाद्या शाखेतील पदवी घेतलेली असल्यास दुसऱ्या शाखेतील पदवी आणि पात्रतेनुसार पदव्युत्तर पदवी एकाच वेळी मिळवण्याचे स्वातंत्र्य आता विद्यार्थ्यांना मिळणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने एकाचवेळी दोन पदव्या घेण्याची मुभा विद्यार्थ्यांना दिली आहे.

**होणार काय?** विद्यार्थी एका विद्यापीठातून बीए करताना दुसऱ्या विद्यापीठातून बी. कॉम. करू शकतील. म्हणजेच दोन वेगवेगळ्या विद्याशाखांतील अभ्यासक्रमांचे शिक्षण एकाचवेळी घेता येईल. एखाद्या विद्याशाखेतील दोन वेगवेगळ्या विषयांतील पदवीचे शिक्षण एकावेळी घेता येईल. म्हणजेच रसायनशास्त्रात बी.एससी करताना भौतिकशास्त्रातही बी.एससी करता येईल. एखाद्या विषयातील पदवी घेतलेली असल्यास दुसऱ्या विषयातील पदवी आणि पूर्वी घेतलेल्या पदवीला अनुषंगिक पदव्युत्तर अभ्यासक्रम करता येईल. म्हणजे इतिहास विषयात बीए.ची पदवी असेल तर इतिहास विषयात एम.ए करताना बी.कॉमही करता येईल.



शिक्षण संस्थांमध्ये प्रत्यक्ष प्रवेश घेऊन, ऑनलाइन किंवा एकत्रित स्वरूपात अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल. आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. जगदेशकुमार यांनी मंगळवारी याबाबतची घोषणा केली. याबाबतची सविस्तर नियमावली बुधवारी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

आतापर्यंत विद्यार्थ्यांना दोन पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण एकावेळी घेण्याची परवानगी नव्हती. पूर्णवेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेता येत होते. मात्र आता एकाचवेळी दोन पूर्णवेळ अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. त्यामुळे एकाचवेळी दोन पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा एक पदवी आणि पदव्युत्तर पदवी, पदविका आणि पदवी असे वेगवेगळे पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतील. दोन वेगवेगळ्या विद्यापीठांतून किंवा एकाच विद्यापीठाने पर्याय *(पान ४ वर)*

लोकसत्ता Wed, 13 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67417576

# एकाच वेळी दोन पदव्या घेण्याची मुभा

*(पान १ वरून)* उपलब्ध करून दिल्यास एकाच विद्यापीठातून अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. आयोगाच्या ३१ मार्च रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदीनुसार दोन पदवी अभ्यासक्रम एकावेळी करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांना यामुळे अधिक शैक्षणिक स्वातंत्र्य मिळेल. विद्यार्थ्यांनी त्यांच्यातील क्षमतांचा अंदाज घेऊन याबाबत निर्णय घ्यावा. मात्र, तासिकांवर आधारित अभ्यासक्रमांसाठीच ही तरतूद आहे. संशोधनावर आधारित म्हणजे एम.फिल. पीएच.डीसाठी साठी हा पर्याय उपलब्ध नाही , असे डॉ. जगदेशकुमार यांनी सांगितले.

**अभ्यासक्रम कसा करता येणार?**

दोन्ही अभ्यासक्रम शिक्षण संस्थांमध्ये प्रत्यक्ष प्रवेश घेऊन करता येतील, एक अभ्यासक्रम प्रत्यक्ष आणि एक ऑनलाइन किंवा दोन्ही ऑनलाइन पद्धतीने करता येतील. दोन अभ्यासक्रमांना प्रत्यक्ष महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी दोन्ही शिक्षणसंस्था अर्थातच एकाच शहरातील असणे आवश्यक आहे. मात्र, एक प्रत्यक्ष आणि एक ऑनलाइन किंवा दोन्ही ऑनलाइन अभ्यासक्रम करायचे असल्यास दोन वेगवेगळ्या राज्यांमधील शिक्षणसंस्थांमधील अभ्यासक्रमही करता येतील. मात्र, त्यासाठी दोन्ही अभ्यासक्रमांच्या तासिकांच्या वेळा एकत्र असू नयेत, अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली आहे. एक अभ्यासक्रम सकाळच्या सत्रातील तर दुसरा सायंकाळच्या सत्रातील असावा. त्यानुसार विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम किंवा संस्थांची निवड करावी लागेल. त्याचबरोबर विद्यापीठांनी अशा स्वरूपात प्रवेश घेण्यासाठी परवानगी दिलेली असणे आवश्यक आहे. दोन विद्यापीठे करार करून अभ्यासक्रम, परीक्षा यांच्या वेळांबाबत समन्वय साधूनही विद्यार्थ्यांसाठी पर्याय उपलब्ध करून देऊ शकतील, असे डॉ. जगदेशकुमार यांनी सांगितले. नवी रचना स्वीकारायची किंवा नाही, प्रवेशाचे नियम, हजेरीचे नियम, वेळापत्रक हे ठरवण्याचे अधिकार विद्यापीठांना असतील. तसेच विविध विद्याशाखांच्या नियामक प्राधिकरणांचीही परवानगी असणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Wed, 13 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67418

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### एकाच वेळी दोन पदव्या शक्य



नवी दिल्ली, ता. १२ (पीटीआय) : देशभरातील विद्यार्थ्यांना आता एकाचवेळी पूर्णवेळ आणि समकक्ष अशा दोन पदवी अभ्यासक्रमांना प्रत्यक्ष प्रवेश घेता येईल. हे अभ्यासक्रम त्यांना एकाच विद्यापीठातून किंवा वेगवेगळ्या विद्यापीठांतून पूर्ण करता येतील, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) अध्यक्ष एम. जगदीश कुमार यांनी सांगितले. या अनुषंगाने 'यूजीसी' लवकरच सविस्तर दिशानिर्देश जारी करणार आहे.

या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना हे पर्याय उपलब्ध करून देण्यात येतील असेही 'यूजीसी'कडून सांगण्यात आले. येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना कुमार म्हणाले की, "नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अनेक घटकांचा समावेश करण्यात आला असून विद्यार्थ्यांना बहुविध कौशल्ये आत्मसात करता यावीत म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून हे दोन्ही अभ्यासक्रम पूर्ण करता येतील. त्यांना या दोन पदव्या एकाच विद्यापीठातून पूर्ण करता येतील किंवा दोन वेगवेगळ्या विद्यापीठांतून त्या पूर्ण करता येतील. ऑनलाइन आणि प्रत्यक्षपद्धतीने हे दोन्ही अभ्यासक्रम पूर्ण करणे शक्य होणार आहे.

याबाबतचे सविस्तर दिशानिर्देश जेव्हा जारी करण्यात येतील त्यानंतर संबंधित संस्था आणि विद्यापीठे त्यांना अनुकूल अशा पद्धतीने नियोजन आखता येतील. या अशा पद्धतीने दोन पदवी अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याची गरज भासल्यास विद्यापीठाने त्या पद्धतीने ती घ्यावी. ज्या विद्यापीठांमध्ये अशाप्रकारच्या परीक्षा घेतल्या जात नाहीत तिथे विद्यार्थ्यांनी संबंधित प्रवेश प्रक्रियेचे पालन करावे."

#### निर्णयाला शिक्षणतज्ज्ञांचा आक्षेप

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यार्थ्यांना एकाचवेळी दोन पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्याची मुभा दिल्यानंतर अनेक शिक्षणतज्ज्ञांनी त्याबाबत चिंता व्यक्त केली आहे. याचा शिक्षणाच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम होऊ शकतो अशी भीती त्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली. एखाद्या पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला त्यावर पूर्ण लक्ष केंद्रित करणे गरजेचे असते. एखादी पदवी पूर्ण करताना अतिरिक्त कौशल्ये शिकणे ही वेगळी गोष्ट असून पूर्णपणे दुसऱ्या पदवीसाठी तयारी करणे ही देखील भिन्न बाब असल्याचे दिल्ली विद्यापीठातील प्रोफेसर आभा देव हबीब यांनी सांगितले. 'यूजीसी'च्या या निर्णयामुळे ते पदवी अभ्यासक्रमाला किती महत्त्व देतात हेच दिसून येते. जगात कोठेही अशा पद्धतीने शिक्षण दिले जात नाही. पदवी अभ्यासक्रमामध्ये असंख्य गोष्टींचा समावेश असतो त्यात वेळापत्रक, प्रत्यक्ष तासिका, स्वयंअध्ययनासाठीचा वेळ आणि अन्य शैक्षणिक उपक्रम यांचा समावेश होतो, असे त्यांनी नमूद केले. दिल्ली विद्यापीठाचे प्रोफेसर राजेश झा म्हणाले की, "यूजीसीला विद्यार्थी हे सुपरह्युमन वाटतात किंवा विद्यार्थी हे २४ तास सतत अभ्यासच करतात असे त्यांनी गृहीत धरले आहे. एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेणे हे त्या पदवी अभ्यासक्रमाचे अवमूल्यन घडवून आणण्यासारखे आहे."

Pune, Main
13/04/2022 Page No. 7

Sakaal 13.4.2022

### Two degrees can be pursued together at different univs too

Manash.Gohain
@timesgroup.com

**New Delhi:** UGC's new guidelines will now allow students to simultaneously pursue two full-time degree programmes in physical mode.

"As announced in the National Education Policy-2020 and in order to allow students to acquire multiple skills, the UGC is coming up with new guidelines to allow a candidate pursue two degree programmes simultaneously in physical mode. The degrees can either be pursued at the same or different universities," UGC chairperson M Jagadesh Kumar said on Tuesday.

The guidelines say, "With the rapid increase in demand for higher education and limited availability of seats in regular stream, several higher education institutions have started a number of programmes in open and distance learning mode to meet the aspirations of students... The issue of allowing students to pursue two academic programmes simultaneously has been examined by the UGC, keeping in view the proposals envisaged in the NEP 2020 which emphasises the need to facilitate multiple pathways to learning involving both formal and non-formal education modes."

Kumar said this is an attempt to provide students with as much flexibility as possible for their "holistic, integrated and learner-centric" education. HEIs can admit about 3% of students for on-campus learning.

"Many universities are now offering both ODL and online programmes. With the modified regulations for online education, which we are going to announce in a couple of weeks, many top quality institutes in India will also start offering degrees online," Kumar said.

"The degree or diploma programmes conducted after the new guidelines are implemented shall be governed by the regulations notified from time to time by the UGC and also by respective statutory and professional councils wherever applicable," he added.

Some educationists believe that the same objectives could have been achieved without new guidelines.

"Multiple skill set should be a subset of a single degree and cannot traverse between two degrees. This decision needs a review considering that there are existing options to achieve the desired objective without a need for this new policy to pursue two degrees simultaneously," said S Vaidhyasubramaniam, VC, SASTRA deemed university.

The Times of India 13.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# UGC allows 2 degrees at a time in physical mode

Manash.Gohain
@timesgroup.com

**New Delhi:** Students will now be allowed to simultaneously pursue two full-time degree programmes in physical mode, as per the UGC's new guidelines that will be notified today.

In May 2020, as was first reported by **TOI**, the UGC had approved a proposal to allow students to pursue two degree programmes at the same time —one in regular mode and the other in open learning/online format. The guidelines will not only allow pursuing two degrees at a time in physical mode but will also permit students to take courses in a mix of physical and online modes at the same university or at different varsities. The guidelines will be applicable to diploma, undergraduate and PG programmes pursued simultaneously.

**BOTH MODES ALSO OK**

- **New guidelines** will not only allow pursuing two degrees at a time in physical mode but will also permit students to take courses in a **mix of physical and online modes at the same university or at different universities**
- Will be **applicable to diploma, undergrad & PG programmes** pursued simultaneously

▶ Related report, P 12

# UGC okays two full-time courses simultaneously

Fareeha Iftikhar
fareeha.iftikhar@htdigital.in

**NEW DELHI:** College students will be allowed to pursue two academic courses at the same time as long as both are of the same level of advancement, the University Grants Commission (UGC) announced on Tuesday in a decision that represents a significant reform in the higher education system.

Once notified, students can pursue two undergraduate, postgraduate or a diploma courses at the same time as long as classes do not clash or if either one or both are being taught online. The option will not be available if either is a medical or an engineering course.

UGC chairperson M Jagadesh Kumar said the move was in accordance with the National Education Policy 2020, which supported multidisciplinary education across domains. "The NEP 2020 recommends providing as much flexibility as possible to students to personalise and customise their education so that they can receive multidisciplinary and holistic education across the disciplines. So, if the students want to pursue two degrees simultaneously, they will have an option now. It all depends on the choice of students," Kumar said, adding that the provision will be applicable to non-technical courses affiliated by the UGC.



UGC chairperson said reform is in accordance with NEP 2020. HT FILE

The UGC is planning to implement the reform from this year. "These guidelines shall come into effect from the date of their notification. No retrospective benefit can be claimed by the students who have already done two degrees simultaneously prior to the notification...," said the draft guidelines, a copy of which was reviewed by HT.

Experts and academics, however, raised concerns over the announcement, warning that the provision may reduce the purpose of education to just pursuing degrees or dilute the worth of the programmes themselves.

Abha Dev Habib, an associate professor of physics at Delhi University's (DU) Miranda House college, said: "The UGC, by issuing any such guidelines, will be diluting its full-time degrees and their worth. For holistic growth, classroom time has to be balanced with time for self-study, group study, extracurricular activities, summer projects etc... It is one thing to allow students to earn degrees with extra credits but to allow students to pursue two "full-time" degrees will be disastrous."

According to the draft guidelines, students can pursue two full-time degrees in three ways. First, pursuing both programmes in person provided that class timings do not overlap. Second, they can pursue one programme in person and another online or in distance learning. And third, they can pursue up to two programmes online or as distance learning.

"The two universities or colleges should be in proximity with each other. It is not possible to pursue two programmes in person from two universities located in different cities," the UGC chairperson said. Students can, he added, pursue a second programme from the same college or university.

The UGC also cautioned that under this provision, online programmes will only be allowed from higher education institutions recognised by the commission or the government of India.

Rajesh Jha, a political science professor at DU's Rajdhani College, said, "This will reduce the purpose of education to just getting degrees rather than acquiring knowledge..."

Hindustan Times 13.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सामना

### विद्यापीठांच्या ऑफलाइन परीक्षांसाठी वाढीव वेळ

प्रतितास १५ मिनिटे अधिक देण्याचा निर्णय

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) – मे महिन्यात होणाऱ्या राज्यातील विविध विद्यापीठांच्या ऑफलाइन परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रतितास १५ मिनिटांचा वाढीव वेळ देण्याचा निर्णय बुधवारी पार पडलेल्या कुलगुरूंच्या बैठकीत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केला. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षांत ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑफलाइन परीक्षांसाठी लिखाणाचा सराव नाही, त्यामुळे लेखी परीक्षांसाठी जादा वेळ देण्यात यावा, अशी मागणी युवासेनेच्या वतीने उदय सामंत यांच्याकडे करण्यात आली होती.

शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख, राज्याचे मंत्री आदित्य ठाकरे यांच्या सूचनेनुसार युवासेना सचिव वरुण सरदेसाई, कार्यकारिणी सदस्य साईनाथ दुर्गे यांनी विद्यापीठांच्या ऑफलाइन परीक्षांसाठी वेळ वाढवून देण्याची मागणी उदय सामंत यांच्याकडे केली होती. राज्यातील विविध विद्यापीठाअंतर्गत व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. आता कोरोनाचा प्रसार कमी असल्याने दोन वर्षांनंतर प्रथमच ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यात येत आहे. मात्र, मागील दोन वर्षांत ऑनलाइन आणि ● पान २

Pune Edition
Apr 14, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com

सामना

### विद्यापीठांच्या ऑफलाइन परीक्षांसाठी वाढीव वेळ

*(पान १ वरून)* एमसीक्यू पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना लिखाणाचा सराव नाही. त्यामुळे दिलेल्या वेळेत पेपर सोडवून होईल का याविषयी अनेक विद्यार्थ्यांच्या मनात शंका आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी परीक्षेच्या नियोजित वेळेपेक्षा अर्धा ते एक तास वाढवून देण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत शिक्षणमंत्र्यांनी प्रतितास १५ मिनिटांचा वाढीव वेळ देण्याच्या सूचना कुलगुरूंना दिल्या आहेत.

Pune Edition
Apr 14, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सामना

### वेगवेगळ्या विद्यापीठांमधून घेता येणार दोन पदव्या

नवी दिल्ली, दि. १३ (वृत्तसंस्था)– विद्यार्थ्यांना आता वेगवेगळ्या विद्यापीठांमधून एकाच वेळी दोन पदव्या वेगवेगळ्या शाखांमधून घेता येणार आहेत. यासंदर्भातील नियमावली आज विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) जाहीर केली आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक स्वातंत्र्य मिळणार आहे.

'यूजीसी'चे चेअरमन एम. जगदीशकुमार यांनी मंगळवारी यासंदर्भात घोषणा केली होती. आज मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. मार्गदर्शक तत्त्वे तत्काळ लागू झाल्याचे 'यूजीसी'ने म्हटले आहे.

#### 'यूजीसी'कडून मार्गदर्शक तत्त्वे?

- विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पदवी किंवा दोन पदविका किंवा एक पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि एक पदवी असे पर्याय उपलब्ध आहेत.
- एकाच विद्यापीठातून किंवा दोन वेगवेगळ्या विद्यापीठांमधून दोन पदव्या घेता येतील.
- प्रत्यक्ष प्रवेश घेऊन (ऑफलाइन) किंवा ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेता येईल.
- दोन वेगवेगळ्या राज्यांतील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतल्यास दोन्ही अभ्यासक्रमांच्या तासिकांची वेळ एक असू नये.
- एक अभ्यासक्रम सकाळच्या सत्रात, दुसरा सायंकाळच्या सत्रात असावा. अशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी शिक्षण संस्थांची निवड करावी.
- ही शैक्षणिक सुविधा पदवी शिक्षणाकरिता आहे, पी.एचडी., एम.फिल.साठी नाही.
- दोन विद्यापीठांनी एकमेकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांना पर्याय उपलब्ध करून द्यावेत.
- नवीन शैक्षणिक पद्धत लागू करण्याचे अधिकार विद्यापीठांना असतील. प्रवेशाचे, हजेरीचे नियम, तसेच वेळापत्रके विद्यापीठ ठरवतील.

Pune Edition
Apr 14, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

### भारतीय संस्कृती शिकण्याची अमेरिकनांना संधी

**पुणे :** अमेरिकेतील विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, भाषा, नागरी जीवनाचा अभ्यास करता येणार आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राकडून 'द अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडीज' या संस्थेसोबत करार केला असून, या कराराअंतर्गत अमेरिकेतील विद्यार्थ्यांना भारतात उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

विद्यापीठात नुकत्याच झालेल्या सामंजस्य करारावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, डॉ. प्रफुल्ल पवार, आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे, अधिसभा सदस्य गिरीश भवाळकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रसेनजित फडणवीस, 'द अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडीज'चे संचालक अनिल इनामदार उपस्थित होते.

द अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडीजकडून विद्यार्थ्यांच्या खर्चाची जबाबदारी उचलली जाईल. पाश्चात्त्य देशातील विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृती जगभर पोहोचण्यात हातभार लावण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार केल्याचे आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे यांनी सांगितले.

लोकसत्ता
Fri,
http

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# उच्चशिक्षित बेरोजगारांची वारी पोलिसांनी अडवली

### बैठक घेण्याचे निश्चित झाल्याने आंदोलन स्थगित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उच्चशिक्षित बेरोजगारांच्या समस्या मांडण्यासाठी नेट-सेट पीएच.डी. धारक संघर्ष समितीची बारामतीला जाणारी पायी वारी गुरुवारी पोलिसांकडून अडवण्यात आली. आंदोलकांना दिवसभर स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. मात्र समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी मंगळवारी बैठक घेण्याचे मंत्रालयाकडून पत्र देण्यात आल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

राज्यातील अनुदानित महाविद्यालयांतील ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक यांच्यासह प्राध्यापक पदांची १०० टक्के भरती, तासिका तत्त्वांचे धोरण बंद करण्यासाठी नेट-सेट पीएच.डी. धारक संघर्ष समितीतर्फे 'उच्चशिक्षित बेरोजगारांची वारी बारामतीच्या दारी' हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते. त्यात उच्चशिक्षित बेरोजगारांच्या समस्यांवर मार्ग काढण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांना विनंती करण्यासाठी पुणे ते बारामती पायी वारी करून पात्रताधारक आपल्या पदव्या अर्पण करणार होते. या आंदोलनाचे निवेदन सर्व संबंधित शासकीय यंत्रणांना देण्यात आले होते. मात्र पवार यांच्या मुंबईतील निवासस्थानी एसटी कर्मचाऱ्यांकडून झालेला प्रकार ताजा असल्याने पोलिसांकडून आंदोलकांची अडवणूक करण्यात आली.

संघटनेच्या नियोजनानुसार पुण्यातून वारी सुरू झाली. मात्र वानवडी येथे पोलिसांनी वारी अडवली. आंदोलकांना एम्प्रेस गार्डनमध्ये स्थानबद्ध करण्यात आले. तसेच पोलिसांकडून वारीबाबत मंत्रालयाला माहिती कळवण्यात आली. त्यानंतर मंत्रालय स्तरावर हालचाली होऊन बैठक घेण्याचे पत्र देण्यात आले. शासनाच्या हाय पॉवर कमिटी सदस्यांबरोबर उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव, वित्त विभागाचे प्रधान सचिव आणि नेट, सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीचे पाच सदस्य यांची एकत्रित बैठक होणार असल्याचे निश्चित झाल्याने आंदोलन स्थगित केल्याची माहिती समितीचे राज्य समन्वयक प्रा. सुरेश देवढे पाटील यांनी दिली.

लोकसत्ता Fri, 15 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67477442

# पदभरतीसाठी पुणे ते बारामती पायी वारी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४ -** राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयात सहायक प्राध्यापकांची १०० टक्के पद भरती करावी व तासिका तत्वावरील धोरण बंद करावे या मागणीसाठी नेट-सेट पीएच.डी. धारक संघर्ष समितीने राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेण्यासाठी पुणे ते बारामती पायी वारी सुरू केली आहे.



वित्तीय अडचणी, आरक्षणाचे प्रश्न, प्रशासकीय हलगर्जीपणा या कारणांमुळे गेली बारा वर्षांपासून सहायक प्राध्यापकांची भरती रखडलेली आहे. यामुळे उच्च शिक्षितांमधील बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. उच्च शिक्षणावरील शासनाकडून केलेल्या खर्चाबाबत कॅगने ताशेरे ओढले आहेत. विद्यार्थ्यांची विना प्राध्यापक ज्ञानदानात होत असलेली फसवणूक व उच्च शिक्षण व्यवस्थेचा वाजलेला बोजवारा अशा सर्व प्रश्नांवर वित्त विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची एकत्रित बैठक शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करून मार्ग काढावा. यासाठी 'उच्च शिक्षितांची वारी, बारामतीच्या दारी' या उपक्रमांअतर्गत पात्रताधारक सर्व पदव्या गोविंदबाग येथे पायी वारी करुन अर्पण करणार आहे. १५ एप्रिल रोजी ही वारी बारामतीला पोहचणार आहे.

यावारीबाबत नेट-सेट पीएच. डी. धारक संघर्ष समितीचे प्रा. सुरेश देवढे पाटील, प्रमोद तांबे, डॉ. परमेश्वर पोळ, विश्वास देशमुख, कांचन जोशी यांनी माहिती दिली.

प्रभात Fri, 15 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67452465

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**सामना**

### ‘भारतीय संविधानाची ओळख’ विषय कॉलेज अभ्यासक्रमात




मुंबई : ‘भारतरत्न’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने ‘भारतीय संविधानाची ओळख’ हा विषय सर्व विद्यापीठांतील सर्व विद्याशाखांसाठी अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची नुकतीच बैठक झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ट्विटरवरून दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि त्यांनी संविधान निर्मितीसाठी दिलेले योगदान याची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी असा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. या विषयामुळे विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांची ओळख होऊ शकेल, असे सामंत यांनी ट्विटरवर नमूद केले आहे. आपल्या न्याय्य हक्कांची, अधिकारांची आणि कर्तव्यांची जाणीव व्हावी यासाठी संविधान सर्वसामान्य जनतेला सहज उपलब्ध होणे गरजेचे आहे. म्हणूनच शिक्षण संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख करून दिली जात आहे.

Pune Edition
Apr 15, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

### राज्यातील कॉलेजांमध्ये राज्यघटनेचे धडे

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

सर्व विद्यापीठांतील सर्व विद्याशाखांसाठी ‘भारतीय संविधानाची ओळख’ हा विषय अनिवार्य करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या बैठकीत घेण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी ही माहिती दिली.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेच्या निर्मितीत दिलेल्या योगदानाची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी यासाठी सरकारतर्फे प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून ‘भारतीय संविधानाची ओळख’ हा विषय सर्व विद्यापीठांतील सर्व विद्याशाखांसाठी अनिवार्य करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना घटनेतील मूल्यांची ओळख होऊ शकेल. हा विषय अनिवार्य करण्याबाबत प्रत्येक विद्यापीठांसोबत बैठका घेतल्या जातील, या संदर्भात सविस्तर स्वतंत्र माहिती विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. सर्व विद्यापीठांमार्फत परित्रक काढण्यात येईल असे उच्च व तंत्रशिक्षण विभागातून सांगण्यात आले. पदवीच्या एका शैक्षणिक वर्षात या विषयाचे सुमारे १० ते १५ तास विद्यार्थ्यांना पूर्ण करावे लागणार आहेत. हा विषय नेमका कसा शिकवावा, श्रेणी विषय म्हणून या विषयाला दर्जा असेल का अशा विविध बाबींवर अद्याप उहापोह सुरू आहे. याबाबत मंत्री स्वतः लवकरच तज्ज्ञांशी चर्चा करून पुढील दिशा ठरवतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

Maharashtra Times 15.4.2022

### ‘संविधानाची ओळख’ विषय अनिवार्य

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने ‘भारतीय संविधानाची ओळख’ हा विषय सर्व विद्यापीठांतील सर्व विद्याशाखांसाठी अनिवार्य करण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. ‘आंबेडकरांनी संविधान लेखनात दिलेल्या योगदानाची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून ‘भारतीय संविधानाची ओळख’ हा विषय सर्व विद्यापीठांतील सर्व विद्याशाखांसाठी अनिवार्य करण्यात येणार आहे. यामुळे तरुण विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांची ओळख होऊ शकेल. हा विषय अनिवार्य करण्याबाबत प्रत्येक विद्यापीठासोबत बैठका घेतल्या जातील, या संदर्भात सविस्तर स्वतंत्र माहिती विद्यापीठांमार्फत विद्यार्थ्यांना दिली जाणार आहे. याबाबतचे परिपत्रक राज्यातील सर्व विद्यापीठांमार्फत काढण्यात येईल,’ असेही उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

Pudhari 15.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**पुढारी**

**संक्षिप्त**

### 'यूजीसी'च्या मार्गदर्शक सूचनांमुळे एकाच वेळी मिळणार 'दुहेरी पदवी'

**पुणे** : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एकाच वेळी 'दुहेरी पदवी' करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना दोन पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमांचे प्रत्यक्ष शिक्षण घेता येईल. मात्र, दोन्ही अभ्यासक्रमांच्या वेळा एक नसाव्यात, असे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्पष्ट करण्यात आले आहे.विद्यार्थ्याला एक पदवी अभ्यासक्रम पूर्णवेळ पद्धतीने, दुसरा पदवी अभ्यासक्रम ऑनलाइन किंवा दूरस्थ पद्धतीने पूर्ण करण्याची मुभा राहणार आहे. याची अंमलबजावणी विद्यापीठांनी करावी, अशी सूचना 'यूजीसी'ने केली आहे. यूजीसीने बुधवारी (दि.१३) याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आंतरविद्याशाखीय शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कला आणि विज्ञान शाखेतील अभ्यासक्रमांमध्ये दरी निर्माण होऊ नये; तसेच विद्यार्थ्यांनी एकाच शाखेतील शिक्षणापुरते मर्यादित न राहता, सर्व शाखेच्या शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी हा निर्णय घेतला आहे. 'यूजीसी'चे सचिव प्रा. रजनिश जैन यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. ऑनलाइन किंवा दूरस्थ पद्धतीने दुसऱ्या पदवीचे शिक्षण घेताना, संबंधित शिक्षण देणारे महाविद्यालय किंवा संस्थेला शिखर संस्थेची मान्यता गरजेची आहे. यापूर्वी, एकाच वेळी दोन पदव्यांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ घेता येणार नाही. 'यूजीसी'ची नियमावली पीएचडीव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी लागू राहील.

My Pune Edition
Apr 15, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# दुहेरी पदवीसाठी 'यूजीसी'च्या गाइडलाइन

### येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी

**पुणे, ता. १५** : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना एकाच वर्षात दोन वेगवेगळ्या पदव्या प्राप्त करण्याची संधी आगामी शैक्षणिक वर्षापासून उपलब्ध झाली आहे. मात्र, हे करताना विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) काही मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहे. दोन्ही पदव्यांची वेळ भिन्न असणे, तसेच दुसरा अभ्यासक्रम हा ऑनलाइन किंवा दूरस्थ पद्धतीचा असणे आवश्यक आहे.

नव्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपस्थितीच्या माध्यमातून दोन पूर्णवेळ पदवी परीक्षांचा अभ्यासक्रम शिकता येणार आहे. यूजीसीचे अध्यक्ष एम. जगदेशकुमार यांनी मंगळवारी (ता. १२) हा निर्णय घेतल्यानंतर लागलीच मार्गदर्शक तत्त्वेही जाहीर केली आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आंतरविद्याशाखीय शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. त्यानुसार यूजीसीने ही नियमावली प्रसिद्ध केली आहे. पीएच.डी. व्यतिरिक्त सर्व अभ्यासक्रमांना ही नियमावली लागू राहणार आहे.

**किमान हजेरी आवश्यक**

दोन्ही अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची किमान हजेरी आवश्यक आहे. त्यानुसार विद्यापीठांना या अभ्यासक्रमांसाठी हजेरीचे निकष ठरवावे लागतील. अनेक विद्यापीठे सध्या ऑफलाइन आणि ऑनलाइन अभ्यासक्रम प्रस्तावित करीत आहेत. ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यापीठ अनुदान आयोग काही आठवड्यांतर सुधारित नियम जाहीर करेल, असे जगदेशकुमार यांनी म्हटले आहे.

**महत्त्वाचे काय**

- २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून देशभरातील अभ्यासक्रमांसाठी लागू
- एकावेळी दोन पदविका व दोन पदवी किंवा दोन पदव्युत्तर अभ्यासक्रमांची निवड करता येईल
- पदव्युत्तर शिक्षण घेताना विद्यार्थ्याला दुसऱ्या विषयाच्या पदवी अभ्यासक्रमाचीही निवड करता येईल
- वर्गांच्या वेळा भिन्न असाव्या लागतील, दुसरा अभ्यासक्रम ऑनलाइन किंवा दूरस्थ असावा
- मार्गदर्शक तत्त्वे फक्त गैरतांत्रिक, व्याख्यानांवर आधारित पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच लागू



Pune, Pune-Today
16/04/2022 Page No. 1

Sakaal 16.4.2022

**सकाळ**

### 'परीक्षेपासून वंचित ठेवणाऱ्यांवर कारवाई करा'

**पुणे, ता. १५** : चालू शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शुल्क भरली नाही, अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयांकडून परीक्षेस बसण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. केवळ शुल्क भरले नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवू नये, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. या संबंधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि उच्च व तंत्र शिक्षण सहसंचालक मारुती जाधव यांना निवेदन देण्यात आले आहे, अशी माहिती शहराध्यक्ष विक्रम जाधव यांनी दिली. यावेळी शहर कार्याध्यक्ष शुभम माताळे, प्रदेश सरचिटणीस सुयश राऊत, पुणे शहर संघटक सचिव सत्यम पासलकर, ओंकार बेनके, अजय पवार, कार्तिक थोटे आदी उपस्थित होते.

Pune, Main
16/04/2022 Page No. 3

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### अध्यापक भरतीसाठी संवर्गनिहाय आरक्षण धोरण निश्चित

**पुणे, दि. १५ -** महाराष्ट्र शैक्षणिक संस्था अधिनियन २०२१ नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये, संस्थांमधील अध्यापक पदांच्या भरतीसाठी संवर्गनिहाय आरक्षण धोरण निश्चित करण्यात आलेले आहेत. या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचनाही जारी करण्यात आलेल्या आहेत.

प्रत्येक विद्यापीठातील तसेच एकाच व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखालील सर्व महाविद्यालयांतील अध्यापक संवर्गातील सर्व विषयांतील मंजूर पदे एकत्रित करावी लागणार आहेत. संवर्गनिहाय आरक्षण हे संवर्गातील एकूण मंजूर पदांची संख्या विचारात घेऊन आरक्षण धोरणातील टक्केवारीनुसार निश्चित करण्यात यावे. समांतर आरक्षणासंदर्भात शासनाच्या प्रचलित आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी. संवर्गातील एकुण मंजूर पदे व कार्यरत पदे विचारात घेऊन संवर्गाची बिंदूनामावली पदांच्या गोषवाऱ्यांसह नमुन्यात तयार करून ठेवावी लागेल.

रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय आरक्षण निश्चित होऊन बिंदुनामावली अंतिम झाल्यावर त्यानुसार रिक्त पदे भरण्यासाठी शासनाच्या प्रचलित कार्य पद्धतीचा अवलंब करून जाहिरात प्रसिद्ध करावी लागणार आहे.

प्रभात Sat, 16 April 2022 https://epaper.eprabhat

### परीक्षा शुल्क परतावा देण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**पुणे, दि. १७ -** करोनामुळे मागील वर्षाच्या इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षा रद्द करण्यात होत्या. या परीक्षाचा शुल्क परतावा विद्यार्थ्यांना देण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२०२१ मध्ये करोनामुळे परीक्षा रद्द करून अंतर्गत मुल्यमापनाद्वारे निकाल जाहीर झाले. परीक्षा झाल्या नसल्याने परीक्षा शुल्क परत मिळावे, अशी मागणी विद्यार्थी, पालक व विविध संघटनाकडून करण्यात आली होती. त्याची दखल घेत परीक्षा शुल्काचा अंशत: परतावा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परीक्षेसाठी नोंदणीकृत विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा परतावा करण्याबाबत १२ नोव्हेंबर २०२१ रोजी आदेश काढले होते. दरम्यान काही शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क परताव्याची नोंदणी केली नव्हती. ही बाब विचारात घेता शुल्क परताव्यासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना पुणे विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव अनुराधा ओक यांनी दिल्या आहेत.

प्रभात Mon, 18 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/

### 'क्यू एस रँकिंग'मध्ये रसायनशास्त्र विभागाची भरीव कामगिरी

#### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा रसायनशास्त्र विभाग ५०१ ते ५५० च्या गटात

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १७ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जागतिक स्तरावर महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या क्यू एस वर्ल्ड रँकिंग आजवर अनेक नवीन रेकॉर्ड प्रस्थापित केले असून, आता विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागानेही मागील वर्षीच्या तुलनेत भरीव कामगिरी केल्याचे पाहायला मिळत आहे. रसायनशास्त्र विभागाला यंदा ५०१ ते ५५० च्या गटात स्थान मिळाले आहे. मागील वर्षी हा विभाग ५५१ ते ६०० च्या गटात होता.

आंतरराष्ट्रीय रँकिंग एजन्सी क्वाक्वेरेली सायमांडस (क्यू एस) ही जगभरातील विद्यापीठांची क्रमवारीत ठरवते. नुकतीच या एजन्सीने २०२२ या वर्षीची विषयानुसार क्रमवारी जाहीर केली आहे. या क्रमवारीत विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाला मागील वर्षीच्या तुलनेत ५० ने अलीकडचे स्थान मिळाले आहे. एकूण १५४३ विद्यापीठ आणि संस्था वेगवेगळ्या ५१ विषयांमध्ये या क्रमवारीत आहे. त्यातून रसायनशास्त्र विभागाला ५०१ ते ५५० च्या गटात आहे. रसायनशास्त्र विषयात भारतात



विद्यापीठ १४ व्या स्थानावर असून आधीच्या स्थानांवर आयआयटी व आयएएस सारख्या संस्था आहेत. विशेष म्हणजे राज्य विद्यापीठांच्या क्रमवारीत विद्यापीठ दुसऱ्या क्रमांकावर आहे. या क्यू एस क्रमवारीत विद्यापीठांचे मूल्यांकन तेथील संशोधने, प्राध्यापक वर्ग, आंतराष्ट्रीय पोहोच, शैक्षणिक कामगिरी आदींच्या माध्यमातून ठरवली जाते.

> "जागतिक स्तरावर विद्यापीठ सातत्याने स्वतःला सिद्ध करताना दिसत आहे. रसायनशास्त्र विभागाने केलेली कामगिरी ही अभिमानास्पद असून, भविष्यात अन्य विभागही अशाच प्रकारे विद्यापीठासाठी भरीव योगदान देतील.
>
> **- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रभात Mon, 18 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67513099

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

पुढारी

### गुणवत्तेसाठी ऑफलाइन शिक्षण हाच पर्याय

**पीटर ट्रसवेल यांचे मत**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'कोरोनामुळे शिक्षण व्यवस्थेवर जे काही परिणाम झाले, त्यावरून हे सिद्ध झाले की ऑनलाइन शिक्षण व्यवस्था ही पारंपरिक शिक्षण व्यवस्थेला कायमस्वरूपी पर्याय ठरू शकत नाही,' असे मत मुंबईतील ऑस्ट्रेलियाचे महावाणिज्य दूत पीटर ट्रसवेल यांनी व्यक्त केले.

पीटर ट्रसवेल यांना सिम्बायोसिस सेंटर फॉर इंडिया-ऑस्ट्रेलिया स्टडीजच्या उद्घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ व भारतीय विद्यापीठांची संघटना यांच्यातर्फे आयोजित उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते.

ट्रसवेल म्हणाले, 'शैक्षणिक उपक्रम सुरळीत चालण्यासाठी सरकार आणि शिक्षण संस्था यांच्यात समन्वय असायला हवा.'

सिम्बायोसिस सेंटर फॉर इंडिया-ऑस्ट्रेलिया स्टडीजचा उद्घाटन समारंभ ही आमच्यासाठी सर्वात प्रतीक्षा असलेली अशी घोषणा होती. ऑस्ट्रेलियामध्ये आम्ही भारतीय विद्यार्थ्यांचे स्वागत करीत आहोत आणि दोन्ही देशांमधील संबंध यातून अधिक दृढ करत आहोत. मी भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेने अतिशय प्रभावित झालो आहे, असे त्यांनी सांगितले.

भारताच्याराष्ट्रीयशैक्षणिकधोरण २०२० ने भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील भागीदारीसाठी मजबूत संधी निर्माण केल्या आहेत. ज्यामध्ये क्रॉस लर्निंग, स्टुडंट एक्स्चेंज, नेटवर्क संधी, इंडस्ट्री- अकॅडेमिया पार्टनरशिप आदी बाबींचा समावेश आहे, असेही ट्रसवेल यांनी यावेळी सांगितले.

सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर म्हणाल्या, 'सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ हे अनेक ऑस्ट्रेलियन विद्यापीठांबरोबर काम करत आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी ऑस्ट्रेलियात जातात, परंतु शिक्षणासाठी भारतात येणाऱ्या ऑस्ट्रेलियन विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी आहे. भारतात आपल्याला परदेशी विद्यार्थ्यांना एक्स्पोजर देण्याची गरज आहे. जेणेकरून अधिकाधिक परदेशी विद्यार्थी येथे शिकण्यासाठी येऊ शकतील.'

सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय उपक्रम आणि सहयोग केंद्राच्या प्रमुख स्वाती सहस्रबुद्धे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

My Pune Edition
Apr 18, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

### शिक्षक भरती प्रक्रियेसाठी बिंदूनामावलीची तपासणी

पुणे, दि. १८ - विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक पदाच्या भरती प्रक्रियेसाठी बिंदूनामावलीची (रोस्टर) प्राथमिक तपासणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षामध्ये तारीख व वेळ आरक्षित करावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनने केले आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी काढले आहे. महाविद्यालयातील शिक्षक भरतीसाठी बिंदूनामावली तपासणी व त्यामध्ये शासन आदेशानुसार आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे. त्यासाठी शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणीचे आयोजन करण्यात येत आहे.

प्रभात Tue, 19
https://

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**लोकमत**

# अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक १ मेपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : शालेय शिक्षण विभागातर्फे इयत्ता अकरावी प्रवेशासाठी राबविल्या जाणाऱ्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक प्रसिद्ध केले असून, विद्यार्थ्यांना येत्या १ मेपासून प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरण्यास उपलब्ध करून दिला जाणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावीचा निकाल प्रसिद्ध होण्यापूर्वी अकरावी ऑनलाइन प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्याचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीत मिळालेल्या गुणांच्या आधारे आणि भरलेल्या पसंतीक्रमानुसार प्रवेश मिळावा, या उद्देशाने शिक्षण विभागातर्फे २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. यंदाही मुंबई महानगर क्षेत्र, पुणे-पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रांसह नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता अकरावीचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने दिले जाणार आहेत. उर्वरित कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश महाविद्यालय स्तरावर दिले जाणार आहेत.

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयांनी याबाबत विद्यार्थी व पालकांना आवश्यक मार्गदर्शन करावे, तसेच प्रवेशाबाबतचे आवश्यक नियोजन व कृती आराखडा तयार करावा, अशा सूचना राज्याचे माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी दिल्या आहेत, तसेच अकरावी प्रवेश प्रक्रिया प्रत्यक्षात येत्या मे महिन्यात सुरू होणार आहे, परंतु शिक्षण उपसंचालकांनी विद्यार्थी, पालक, कनिष्ठ महाविद्यालये यांचे उद्बोधन, प्रशिक्षण व जनजागृती करावी, अशाही सूचना पालकर यांनी दिल्या आहेत.



### प्रवेशासाठी तीन नियमित फेऱ्या

अकरावी प्रवेशासाठी या वर्षीही तीन नियमित फेऱ्या राबविल्या जाणार आहेत. त्यात पहिल्या फेरीसाठी १० ते १५ दिवस, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीसाठी प्रत्येकी ७ ते ९ दिवस दिले जाणार आहेत. त्यानंतर, विशेष फेरी व उर्वरित विद्यार्थ्यांसाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरीऐवजी वेटिंग लिस्ट पद्धतीचा अवलंब करून प्रवेश दिले जाणार आहेत.

| कालावधी | कार्यवाहीचे टप्पे |
|---|---|
| एप्रिल, २०२२ | विद्यार्थी, पालक, महाविद्यालयांमध्ये जागृती करणे |
| १ ते १४ मे २०२२ | संकेतस्थळावर नोंदणी व अर्जाचा भाग १ भरण्याचा सराव |
| १७ मे ते निकालापर्यंत | नोंदणी व प्रवेश अर्जाचा भाग १ भरण्यास प्रत्यक्ष सुरुवात |
| १७ मे ते निकालापर्यंत | महाविद्यालयांनी भरलेली माहिती तपासून व्हेरिफाय करणे |
| दहावी निकालानंतर | पाच दिवस अर्जाचा दुसरा भाग भरण्यास मुदत |
| दहावी निकालानंतर | पाच दिवस विविध कोट्यांतील प्रवेश सुरू राहणार |

Pune Main
Page No. 2 Apr 19, 2022
Powered by: erelego.com

**सामना**

# अकरावी प्रवेशप्रक्रियेचे संभाव्य वेळापत्राक जाहीर

## १७ मेपासून अर्जाचा पहिला भाग भरता येणार

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) - माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने यंदाच्या अकरावी प्रवेशप्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार येत्या १७ मेपासून विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठीचा पहिला भाग, तर दुसरा भाग दहावीचा निकाल लागल्यानंतर भरता येणार आहे.

यंदा प्रवेशाच्या नियमित तीन आणि एक विशेष फेरी राबविण्यात येणार आहे. तर, 'एफसीएफएस' फेरीऐवजी प्रतीक्षायादी लावण्यात येणार असल्याचे संचालनालयातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. २०१७-१८पासून मुंबई महानगर क्षेत्र, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रांसह नाशिक, संभाजीनगर, अमरावती व नागपूर महापालिका क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत.




२०२१-२२ची अकरावी प्रवेशप्रक्रिया ३१ डिसेंबर २०२१ रोजी पूर्ण झालेली आहे, तर राज्य मंडळाची दहावीची परीक्षा ४ एप्रिलला पूर्ण झालेली आहे. त्यामुळे दहावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२२-२३मधील प्रवेशप्रक्रियेची पूर्वतयारी सुरू करण्यात आली आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक महेश पालकर यांनी विभागीय उपसंचालकांना दिलेल्या सूचनांनुसार, अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रक्रिया २०२२-२३साठी पूर्वतयारी त्वरित सुरू करण्यात यावी. त्यासाठी प्रवेशप्रक्रियेचे टप्पे समजावून घेऊन त्यानुसार नियोजन करावे. विद्यार्थी-पालक यांच्यासाठी उद्‌भोदनवर्ग आयोजित करावेत, शाळा मार्गदर्शन केंद्रांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

### संभाव्य वेळापत्रक

- विद्यार्थी, पालक, कनिष्ठ महाविद्यालये यांचे उद्‌बोधन – एप्रिल २०२२.
- अर्जाचा भाग-१ भरणे सराव – १ ते १४ मे.
- विद्यार्थ्यांसाठी संकेतस्थळावर नोंदणी, अर्ज भाग-१ भरणे, तपासणे – १७ मे ते दहावी निकालापर्यंत.
- उच्च माध्यमिक शाळा नोंदणी – २३ मे ते दहावी निकालापर्यंत.
- अर्जाचा भाग-२ भरणे – दहावी निकालानंतर पुढील पाच दिवस.
- कोटाअंतर्गत राखीव जागांवरील प्रवेश सुरू – दहावी निकालानंतर पुढील पाच दिवस.
- प्रवेश फेऱ्या व ॲलॉटमेंट प्रवेश.
- नियमित फेरी-१ – १० ते १५ दिवस.
- नियमित फेरी-२ – ७ ते ९ दिवस.
- नियमित फेरी तिसरी – ७ ते ९ दिवस.
- विशेष फेरी – ७ ते ८ दिवस.

Pune Edition
Apr 19, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# FYJC mock form-filling from May 1, application process starts on May 17

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The online application process for admission to the first year of junior college (FYJC) in Mumbai, Nashik, Amravati, Nagpur, Pune and Pimpri Chinchwad municipal corporation areas will begin on May 17, a tentative schedule declared by Centralized Admission Process (CAP) Committee said.

The process of filling up Part 1 of the form will continue till the SSC results are declared. Students will be able to fill up Part 2 of the form with their preferences in colleges after the results are declared.

A mock registration round will be held between May 1 and 14 so that students can practice how to fill up the forms and understand what documents will be required while uploading their actual forms, Meena Shendkar, assistant director of education, Pune division said. She is also in-charge of the Centralized Admission Process (CAP) Committee in Pune.

Shendkar said that Part 2 of the form has to be submitted within five days of the declaration of SSC results by the state board.

"The state board students, after filling up Part 1 of the form, must put their exam roll number and their entire data will come pre-filled in the online application form leaving them with the option of only filling up the colleges in order of preference for admission. However, for other education board students, there is a formula which will be published and guidance centres will help in conversion of their marks," Shendkar added.

State director of secondary and higher secondary education Mahesh Palkar, in his letter to all the divisional offices, said, "SSC exams ended on April 4 and the logical next step is to start the Std XI admission process. Schools must be told to create awareness among students so that they can apply for and keep ready documents required for availing benefits of various quotas during admission. The respective divisional offices must request the revenue departments to come up with special drives so that students can get the documents in time. Awareness programmes for online admission process, training of school guidance cell officials, a grievance redressal cell to address problems of students and other queries must be undertaken."

### CHANGE IN FCFS METHOD

Every year, after the special round, various first-come-first-serve rounds of admission are held for FYJC seats. This year, the CAP committee has decided on a waiting list round. "After the special round, based on the preference filled up by the student in the special round, we will create a merit list for individual colleges and conduct admissions based on it," Meena Shendkar, assistant director of education, Pune division, said.

**A TIMELINE TO FOLLOW**

- **April** | Creating awareness about the FYJC online admission process
- **May 1 to 14** | Mock registration for students for practice
- **May 17 till the declaration of class X result** | Actual form-filling process of Part 1 and verification
- **May 17 to declaration of SSC result** | Verification of the Part 1 of forms by schools/ guidance cells
- **Students to fill Part 2 of the form** | Five days after the date of declaration of SSC examination
- **Admissions under various quotas like management, in-house and minority** | Five days after declaration of SSC results

**REGULAR ROUNDS**

**One** | 10-15 days
**Two** | 7-9 days
**Three** | 7-9 days

**Special round** | 7-8 days
**Waiting list round** | As per need

The Times of India 19.4.2022

पुढारी

# दिव्यांगांसाठी डिजिटल लॅबोरेटरी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उद्घाटन; माहिती तंत्रज्ञानाचे मिळणार प्रशिक्षण



डिजिटल लॅबोरेटरी व सहायक तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठीच्या नवीन सुविधांचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. नितीन करमळकर व इतर.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दिव्यांग अभ्यास व सर्वसमावेशक केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग व युथ फॉर जॉब फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विद्यापीठात डिजिटल लॅबोरेटरी व सहायक तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठीच्या नवीन सुविधांचे उद्घाटन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्र-कुलगुरू एन. एस. उमराणी, कुलसचिव प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी सी.ए. शिल्पा भिडे, शिक्षणशास्त्र प्रशालेचे संचालक प्रा. संजीव सोनवणे आदी उपस्थित होते.

युथ फॉर जॉब फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून कॅपजेमिनी सीएसआर यांनी २५ आधुनिक संगणक, एक एलसीडी प्रोजेक्टर, प्रिंटर, लॅपटॉप अशा सुविधा केंद्रास उपलब्ध करून दिल्या. याव्यतिरिक्त दोन संगणक प्रशिक्षक, सॉफ्ट स्किल प्रशिक्षक, प्रशासकीय कर्मचारी तीन वर्षासाठी उपलब्ध करून दिले आहेत.

या सुविधांचा उपयोग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत शिकणाऱ्या सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या रोजगारासाठी आवश्यक असलेले माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विविध प्रकारचे पदविका अभ्यासक्रमदेखील सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रा. संजीव सोनवणे यांनी दिली.

Pune Edition
Apr 19, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**पुढारी**

# दहावी, बारावीचा निकाल वेळेवरच

**औरंगाबाद : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना काळातही शिक्षण विभागाने सर्वतोपरी प्रयत्न करून, दहावी-बारावीचा निकाल वेळेवर लावला होता. यंदाही वेळेत निकाल लावणार असल्याचे शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

■ **शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांची माहिती**

मंत्री गायकवाड म्हणाल्या, की दहावी, बारावीचा निकाल वेळेवर लागेल. मागच्या वेळीही कोरोनामुळे अशीच परिस्थिती होती. कोरोना काळातही पोस्ट ऑफिस, शाळांमध्ये अडकलेले पेपर जमा करून, शिक्षकांच्या घरी तपासणीसाठी पाठविले होते. यंदाही निकाल वेळेवर लावण्यासाठी **पान ६ वर**

### शाळांचे वीज कनेक्शन कट करणार नाही

ऊर्जा विभागाला या पूर्वी ७ कोटी, तर यंदा १४ कोटी रुपये दिलेले आहेत. शाळांमध्ये घरगुती वीज कनेक्शन आहे की व्यावसायिक, याबाबत ऊर्जा आणि शिक्षण विभागाच्या वतीने सर्व शाळांचा सर्व्हे करण्यात येईल, घरगुती कनेक्शन कनव्हर्ट करण्याचे काम करण्यात येईल. कुठल्याही शाळेचे वीज कनेक्शन कट करू नये, असा निर्णय झालेला आहे. जे कट केलेले असतील, तर ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलून ते कनेक्शन त्वरित पुन्हा जोडण्यात येईल.

Pune Edition
Apr 19, 2022 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

**पुढारी**

# दहावी, बारावीचा निकाल वेळेवरच

आम्ही कटिबद्ध आहोत. बारावीचा निकाल जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आणि दहावीचा निकाल तिसऱ्या चौथ्या आठवड्यात लागतो. त्यासंदर्भात पुढील आठवड्यात बैठक होणार आहे, पण वेळेत निकाल लावण्याचा आमचा प्रयत्न आहे.शिक्षकांनी मुख्यालयात राहिले पाहिजे, यावर विचारले असता, त्या म्हणाल्या, शिक्षकांनी वेळेवर आले पाहिजे, शाळेत वेळ दिला पाहिजे, मोठ्या प्रमाणात त्यांनी काम केले पाहिजे. त्यांची राहण्याची सोय असेल, तर मुख्यालयात राहू शकतात. कोरोनाच्या काळातही शिक्षक जिथे राहत होते, तिथे शिकवले. सगळ्यांचे मत आहे, त्यांनी मुख्यालयात राहावे, परंतु परिस्थिती बघूनच काही निर्णय घ्यावे लागतात.

Pune Edition
Apr 19, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# यंदापासून पदवीचा डबलबार

## 'यूजीसी'कडून शिक्कामोर्तब : एकाचवेळी दोन पदव्या घेता येणार

- प्रवेशित विद्यार्थी संख्या वाढणार
- शिक्षणसंस्थांनाही मिळणार आर्थिक बळ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १८ - देशातील केंद्रीय विद्यापीठांमध्ये सामाईक विद्यापीठ प्रवेश परीक्षा (सीयुईटी) माध्यमातून प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे सूचित केले आहे. आता विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एकाच वेळेला दोन वेगवेगळ्या विषयांमध्ये पूर्णवेळ पदवी मिळवण्यासाठी मुभा दिली आहे. त्याची अंमलबजावणी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे. यामुळे प्रवेशित विद्यार्थी संख्या वाढणार असून, शिक्षणसंस्थांना आर्थिक बळ मिळणार आहे.



'यूजीसी'चे अध्यक्ष जगदीश कुमार यांनी एकाचवेळी विद्यार्थ्यांना दोन पदवी घेता येणार असल्याची घोषणा केली. याबाबतचा निर्णय गेल्याच वर्षी घेण्यात आला होता. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नव्हती. 'यूजीसी'च्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच कुमार यांनी या निर्णयाची अंमलबजावणीची कार्यवाही तातडीने सुरू करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.

प्रभात Exclusive

त्याबाबत 'यूजीसी'कडून लवकरच मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केले जाणार आहे.

केंद्र सरकारने नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना नवनवीन कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. एका विद्यार्थ्याला एकाच वेळेस दोन वेगवेगळ्या विषयांच्या पदव्या प्रत्यक्षरित्या मिळवता येतील. या पदव्या एकाच विद्यापीठातून किंवा दोन वेगवेगळ्या विद्यापीठांतूनही घेता येतील. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष म्हणजे ऑफलाइन आणि ऑनलाइन पद्धतीने एका वेळेस दोन पदव्या घेण्याची मुभा राहील.

> यूजीसीच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना त्यांना हवं असलेल्या अन्य विषय अथवा अभ्यासक्रमातून पदवी घेण्याची सोय होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक करिअर विस्तार करण्याची संधी आहे. याद्वारे वेगवेगळ्या क्षेत्रात अथवा विषयातील ज्ञान आत्मसात करता येणार आहे.
>
> – डॉ. संजीव सोनवणे, अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### शिक्षणसंस्थांना उभारी मिळणार

'यूजीसी'चा हा निर्णय शिक्षण संस्थांना फायदेशीर ठरणारा आहे. कारण विद्यार्थ्यांना दोन अभ्यासक्रमास एकाचवेळी कोणत्याही विद्यापीठ तथा महाविद्यालयातून प्रवेश घेता येणार आहे. त्यामुळे शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांची पसंती राहील. मात्र, त्यावरून विद्यार्थ्यांचे शुल्कावरून शोषण होणार नाही, अशी भीती व्यक्त होत आहे. त्यासाठी 'यूजीसी'ने अभ्यासपूर्वक नियमावली तयार करणे आवश्यक असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### या पदवीसाठी काही ठळक मुद्दे

- विषय निवडण्याची कोणतीही सक्ती नाही.
- दोन्ही पूर्णवेळ अभ्यासक्रम असतील.
- एकाच अथवा वेगवेगळ्या विद्यापीठातही प्रवेश घेता येणार
- एक अभ्यासक्रम नियमित, तर दुसरा दूरशिक्षण अथवा ऑनलाइन
- एकीकडे पदवी आणि दुसरीकडे पदव्युत्तर कोर्स अशी तरतूद नाही
- यूजीसीकडून या निर्णयांसाठी विद्यापीठांवर सक्ती नसेल

### दूरशिक्षणाला (डिस्टन्स लर्निंग) अच्छे दिन

विद्यार्थ्यांना एकाचवेळी नियमित अभ्यासक्रमाद्वारे दोन पदवी घेता येणे कठीण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दुसरा पर्याय हा ऑनलाइन शिक्षण पद्धत म्हणजेच दूरशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणे शक्य आहे. त्यामुळे आता दूरशिक्षण अभ्यासक्रमास प्रवेशाची संख्या वाढण्याची शक्यता अधिक आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे यांनी दिली आहे.

प्रभात Tue, 19 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67523356

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# प्राध्यापक भरतीसाठी 'रोस्टर'ची तपासणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून संलग्न महाविद्यालयातील प्राध्यापक पदाच्या भरती प्रक्रियेसाठी बिंदूनामावलीची (रोस्टर) प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षामध्ये तारीख आणि वेळ आरक्षित करावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी परिपत्रकाद्वारे केले आहे.



महाविद्यालयातील प्राध्यापक भरतीसाठी बिंदूनामावली तपासणी आणि त्यामध्ये सरकारी आदेशानुसार आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे. त्यासाठी प्राध्यापक पदांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणीचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमधील आरक्षण कक्ष येथे कार्यालयीन वेळेत दररोज एकूण १० महाविद्यालयांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करून देण्यात येणार आहे. त्यासाठी वेळ आणि तारीख आरक्षित करणे आवश्यक असल्याचे डॉ. पवार यांनी स्पष्ट केले आहे. प्राथमिक तपासणी झाल्यानंतर दोन दिवसांत संबंधित जिल्ह्यातील सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून प्राध्यापक पदांची बिंदूनामावली प्रमाणित करून घेतल्यानंतरच प्राध्यापक पदे भरण्याची तत्काळ कार्यवाही करावी. या तपासणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे आणि त्यांची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांनी कागदपत्रे सादर करावीत, अशा सूचना डॉ. पवार यांनी दिल्या आहेत.

Maharashtra Times 19.4.2022

# विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाला क्यूएसच्या विषय क्रमवारीत स्थान

**५०१ ते ५५० च्या गटात समावेश**

**पुणे :** जागतिक स्तरावर महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या क्यूएस जागतिक क्रमवारीतील विषय क्रमवारीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाने स्थान मिळवले आहे. रसायनशास्त्र विभागाने गेल्यावर्षीच्या तुलनेत कामगिरीमध्ये सुधारणा करत यंदा ५०१ ते ५५० च्या गटात स्थान प्राप्त केले आहे. क्वाक्वेरेली सायमंड्स (क्यूएस) क्रमवारीमध्ये जगभरातील विद्यापीठांची क्रमवारी ठरवली जाते.

नुकत्याच जाहीर झालेल्या २०२२ च्या विषय क्रमवारीत एकूण ५१ विषयांमध्ये जगभरातील एकूण १ हजार ५४३ विद्यापीठ आणि संस्थांचा समावेश आहे. त्यात आयआयटीसारख्या संस्था आघाडीवर आहेत. तर भारतातील संस्थांमध्ये रसायनशास्त्र विषयात विद्यापीठ १४ व्या स्थानावर आहे. विशेष म्हणजे राज्य विद्यापीठांच्या क्रमवारीत विद्यापीठ दुसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या वर्षी रसायनशास्त्र विभाग ५५१ ते ६०० या गटात होता, तर यंदा पन्नास स्थानांनी सुधारणा करत ५०१ ते ५५० च्या गटात पोहोचला आहे.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, की जागतिक स्तरावर विद्यापीठ सातत्याने स्वतःची पात्रता सिद्ध करण्याला प्राधान्य देत आहे. रसायनशास्त्र विभागाची कामगिरी अभिमानास्पद आहे.

लोकसत्ता Tue, 19 April 2022
https://epaper.loksatta.com/c/

# अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक शिक्षण विभागाकडून जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यात दरवर्षी अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया दहावीच्या निकालानंतरच सुरू केली जाते. मात्र यंदा दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये राबवल्या जाणाऱ्या अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक शिक्षण विभागाने जाहीर केले आहे. त्यानुसार १ ते १४ मे दरम्यान विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज ऑनलाइन भरण्याचा सराव करता येणार असून, १७ मेपासून प्रत्यक्ष अर्ज भरणे, अर्ज आणि कागदपत्रांची पडताळणीची प्रक्रिया सुरू होईल.

राज्यातील पुणे, पिंपरी चिंचवड, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, मुंबई महानगर क्षेत्र, नाशिक या महापालिका क्षेत्रांत अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाते. दरवर्षी दहावीच्या निकालानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू होत असल्याने प्रवेश प्रक्रिया लांबते. यंदा प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने आगामी शैक्षणिक वर्षातील अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेचे संभाव्य वेळापत्रक आणि मार्गदर्शक सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेमध्ये १७ मेपासून प्रवेश अर्जाचा भाग एक भरल्यानंतर निकाल जाहीर होईपर्यंत कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया राबवली जाईल. तर निकाल जाहीर झाल्यावर प्रवेश अर्जाचा भाग दोन भरून, महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवणे, गुणवत्ता यादी जाहीर करणे, प्रत्यक्ष प्रवेश देणे आदी प्रक्रिया होईल. प्रवेश प्रक्रियेत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी होईल, तर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरीऐवजी प्रतीक्षा यादी करण्याचे नियोजन असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी २३ मे ते दहावीचा निकाल जाहीर होईपर्यंत सुरू राहील. प्रवेश प्रक्रियेची अधिक माहिती https://11thadmission.org.in या संकेतस्थळावर मिळेल.

राज्यातील अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पूर्वतयारी तातडीने सुरू करावी, प्रवेश प्रक्रियेचे टप्पे समजावून घेऊन त्यानुसार नियोजन करावे, पालक विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग, शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करावेत, अशा सूचना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी दिल्या आहेत.

लोकसत्ता Tue, 19 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67521341

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# संवर्गनिहाय आरक्षणाला मान्यता, प्राध्यापक भरतीचे काय?

### पात्रताधारकांचा सवाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमध्ये संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्याचा निर्णय उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. मात्र प्राध्यापक भरतीबाबत वारंवार आश्वासने दिल्यानंतर आता संवर्गनिहाय आरक्षण लागू झाल्यावर तरी प्राध्यापक भरती होणार का, असा प्रश्न पात्रताधारकांकडून विचारला जात आहे.

केंद्रीय शिक्षण संस्था (शिक्षक संवर्ग आरक्षण) २०१९ अन्वये केंद्रीय विद्यापीठे आणि केंद्रीय शैक्षणिक संस्थांतील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीमध्ये संवर्गनिहाय आरक्षण लागू करण्यात आले आहे. राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यपकांच्या पदांसाठीही हे आरक्षण लागू करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. ही मागणी मान्य करून राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांमध्ये संवर्गनिहाय आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचा शासन निर्णय उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध केला.

राज्यात प्राध्यापकांच्या २ हजार ८८ पदांच्या भरतीला मान्यता देण्यात आली होती. मात्र ही भरती प्रक्रिया रखडलेली आहे. राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने संवर्गनिहाय आरक्षणाच्या शासन निर्णयानंतर तरी रखडलेली प्राध्यापक भरती पूर्ण करण्याची मागणी करण्यात येत आहे.

नेट, सेट, पीएच.डी पात्रताधारक संघर्ष समितीचे राज्य समन्वयक प्रा. सुरेश देवढे पाटील म्हणाले, की संवर्गनिहाय आरक्षणाचा कायदा पारित झाल्यानंतर आणि त्या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध होऊनही प्राध्यापक भरती रखडलेली आहे. हे आरक्षण लागू होऊनही प्राध्यापक भरतीसाठी उपलब्ध असलेली पदे ही पात्रताधारकांना न्याय देणारी नाहीत. त्यामुळे उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने सर्व रिक्त पदांची भरती केली पाहिजे. संवर्गनिहाय आरक्षणाबाबत समितीने सातत्याने ही मागणी मांडली होती. त्यामुळे आता किमा[n] रखडलेली पदभरती तरी वेगाने मार्गी लावली पाहिजे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने रिक्त पदांच्या ४० टक्के प्राध्यापकांची पदे भरण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र आता वित्त विभागाने ५० टक्के पदभरतीस मान्यता दिल्याने प्राध्यापकांची किमान ५० टक्के पदे भरण्याची आवश्यकता आहे. २०१७च्या आकृतिबंधानुसार राज्यातील विद्यापीठांच्या शैक्षणिक विभागांमध्ये दीड हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. या पदांसह शारीरिक शिक्षण संचालक, ग्रंथापालांची रिक्त पदे भरण्यासही मान्यता मिळालेली नाही. या सगळ्याचा विचार करून आता प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवणे आवश्यक आहे, असे महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर यांनी सांगितले.

### माने समितीचा अहवाल स्वीकारावा

घड्याळी तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांसंदर्भात उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने माने समिती नियुक्त केली होती. या समितीचा अहवाल स्वीकारून तो जाहीर करण्याची मागणीही पात्रताधारकांकडून करण्यात येत आहे.

### 'भरतीतील अडथळा लवकरच दूर'

संवर्गनिहाय आरक्षणाच्या प्रश्नामुळे मागासवर्गीय कक्षाकडून बिंदूनामावलीची तपासणी होत नव्हती. आता तो प्रश्न मार्गी लागला आहे. पुढील काही दिवसांत बिंदूनामावलीचे काम पूर्ण होऊन प्राध्यापक भरती प्रक्रिया मार्गी लागेल, अशी माहिती उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

लोकसत्ता Tue, 19 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67521355

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### विद्यापीठात अपंग विद्यार्थ्यांसाठी डिजिटल प्रयोगशाळा

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अपंग विद्यार्थ्यांसाठी डिजिटल प्रयोगशाळा उपलब्ध झाली आहे. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून, विविध पदविका अभ्यासक्रमही राबवण्याचे नियोजन आहे.

दिव्यांग अभ्यास आणि सर्वसमावेशक केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र आणि विस्तार विभाग, यूथ फॉर जॉब फाउंडेशन यांच्यातर्फे विद्यापीठातील डिजिटल प्रयोगशाळा आणि सहायक तंत्रज्ञान प्रशिक्षणासाठीच्या नवीन सुविधांचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी शिल्पा भिडे, शिक्षणशास्त्र प्रशालेचे संचालक प्रा. संजीव सोनवणे, विभागाच्या प्रमुख प्रा. मेघा उपलाने, यूथ फॉर जॉब फाउंडेशनचे वरिष्ठ प्रबंधक रमेश दुईकन्नन, समीर नायर, कॅपजेमिनी सीएसआर इंडियाच्या ऑपरेशन प्रमुख धनश्री पागे आदी या वेळी उपस्थित होते. डिजिटल प्रयोगशाळेसाठी २५ आधुनिक संगणक, एक एलसीडी प्रोजेक्टर, प्रिंटर, लॅपटॉप या साधनांसह दोन संगणक प्रशिक्षक, एक सॉफ्ट स्किल प्रशिक्षक आणि एक प्रशासकीय कर्मचारी तीन वर्षांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात शिकणाऱ्या सर्व प्रकारच्या अपंग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी या सुविधांचा वापर करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या रोजगारासाठी आवश्यक असलेले माहिती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाईल.

विद्यार्थ्यांसाठी विविध पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती प्रा. संजीव सोनवणे यांनी दिली.

लोकसत्ता Tue, http

### परदेशी विद्यापीठांची पदवी आता भारतीय शिक्षणसंस्थांमधून

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** भारतातील शिक्षणसंस्थांशी करार करून परदेशातील विद्यापीठांच्या चालणाऱ्या अभ्यासक्रमांची कक्षा आता विस्तारणार आहे. भारतीय आणि परदेशी विद्यापीठांना मिळून एकत्रित पदवी देण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने मंगळवारच्या बैठकीत परवानगी दिली. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय क्रमवारीत पहिल्या हजारांत स्थान मिळवलेल्या विद्यापीठांना परदेशी विद्यापीठांबरोबर एकत्रित अभ्यासक्रम सुरू करता येणार आहेत.



देशभरात परदेशी विद्यापीठांशी करार करून विद्यार्थी आणि शिक्षकांच्या आदान-प्रदान उपक्रमाला २०१२ पासून परवानगी आहे. त्या परिपत्रकात २०१६ मध्ये काही सुधारणा करून विद्यापीठांचे स्वातंत्र्य आणखी *(पान ४ वर)*

लोकसत्ता Wed, 20 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67540191

### परदेशी विद्यापीठांची पदवी आता भारतीय शिक्षणसंस्थांमधून

*(पान १ वरून)* वाढवण्यात आले. आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार परदेशी विद्यापीठांना भारतात अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या धोरणानुसार आयोगाने पावले उचलली असून, जोड अभ्यासक्रमाबरोबरच (ट्विनिंग प्रोग्रॅम), सामायिक पदवी (जॉइंट डिग्री) आणि दुहेरी पदवी (ड्युएल डिग्री) अभ्यासक्रमांनाही परवानगी



देण्यात आली आहे. सामायिक आणि दुहेरी पदवी अभ्यासक्रमांत विद्यार्थी परदेशी विद्यापीठातून ३० टक्क्यांपेक्षा अधिक श्रेयांक मिळवू शकतील.

'ड्यूएल डिग्री'मध्ये भारतीय आणि परदेशी विद्यापीठ मिळून पदवी देतील. मात्र, हे अभ्यासक्रम प्रत्यक्षच असणे आवश्यक आहे. ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी ही योजना लागू नाही. प्रवेश क्षमता, प्रक्रिया, शुल्क आणि पदवीचे नामाभिधान ठरवण्याचे स्वातंत्र्य विद्यापीठांना असणार आहे, असे आयोगाचे संचालक डॉ. एम. जगदेश कुमार यांनी सांगितले. या योजनेमुळे भारतात शिक्षणासाठी येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांची संख्या वाढेल आणि त्याचा फायदा संस्थांना आंतरराष्ट्रीय क्रमवारीत वरचे स्थान मिळवण्यासाठी होईल, असेही डॉ. कुमार यांनी सांगितले.

#### काय होणार?

**'ट्विनिंग प्रोग्रॅम'** - या योजनेत भारतीय आणि परदेशी विद्यापीठे एकत्रित अभ्यासक्रम सुरू करू शकतील. त्यासाठी परदेशातील विद्यापीठातून ३० टक्क्यांपर्यंत श्रेयांक विद्यार्थी मिळवू शकतील. या अभ्यासक्रमाची पदवी भारतीय विद्यापीठच देईल.

**'जॉइंट डिग्री'** - भारतीय आणि परदेशी विद्यापीठ एकत्रित पदवी अभ्यासक्रम सुरू करू शकतील. या अभ्यासक्रमाचा आराखडा दोन्ही विद्यापीठांनी एकत्रित ठरवणे आवश्यक आहे. त्यासाठी ३० टक्क्यांपेक्षा अधिक श्रेयांक विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठातून मिळवणे अपेक्षित आहे. या अभ्यासक्रमाची पदवी भारतीय विद्यापीठाची असेल. मात्र, त्याचबरोबर परदेशी विद्यापीठ प्रमाणपत्र देईल.

**'ड्युएल डिग्री'** - दोन्ही विद्यापीठे सामायिक पदवी देतील. मात्र या दोन स्वतंत्र पदव्या असणार नाहीत. एकाच विद्याशाखेतील ही पदवी असेल. या अभ्यासक्रमासाठी ३० टक्क्यांपेक्षा अधिक श्रेयांक परदेशी विद्यापीठातून मिळवावे लागतील. तिन्हीपैकी कोणत्याही अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना एक किंवा दोन सत्रांचा अभ्यासक्रम परदेशात जाऊन पूर्ण करावा लागेल. एखाद्या विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर त्याला या अभ्यासक्रम रचनेतून बाहेर पडायचे असल्यास त्याचीही मुभा मिळू शकेल.

**बहुतेक नामवंत विद्यापीठे पात्र:** 'क्यूएस' किंवा 'टीएचई' या संस्थांच्या आंतरराष्ट्रीय क्रमवारीत पहिल्या हजारात स्थान मिळवलेली, राष्ट्रीय क्रमवारीत (एनआयआरएफ) पहिल्या शंभरात स्थान मिळवलेली भारतीय विद्यापीठे परदेशी विद्यापीठांशी करार करू शकतील. या निकषामुळे भारतातील बहुतेक नामवंत विद्यापीठे यासाठी पात्र ठरणार आहेत.

लोकसत्ता Wed, 20 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67540255

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# वाहतुकीच्या नियमांबाबत जिल्ह्यातील पाच विद्यापीठांत अभ्यासक्रम

नियमांबाबत अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजय ससाणे यांनी ही माहिती दिली. दरम्यान, ग्रामीण पोलिसांनी ३९ नवी अपघात प्रवण ठिकाणे (ब्लॅक स्पॉट) शोधली असून या ठिकाणी होणारे अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.




जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी ससाणे यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, 'वाहतुकीच्या नियमांबाबत शाळांमधून बालभारती पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना माहिती देण्यात येत आहे. याबरोबरच जिल्ह्यातील विविध पाच विद्यापीठांत देखील असाच अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रयत्न सुरू आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय आणि महाविद्यालयीन जीवनातच वाहतुकीच्या नियमांबाबत विस्ताराने माहिती मिळण्यास मदत होईल.'

> रस्त्यावरील अपघाताचे प्रमाण कमी करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अपघात प्रवण स्थळे (ब्लॅक स्पॉट) कमी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने कार्यवाही करावी. अपघाताच्यावेळी मदतीसाठी त्वरीत धावून जाणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे.
>
> **- डॉ. राजेश देशमुख,** जिल्हाधिकारी

दरम्यान, नव्याने आलेल्या एकात्मिक रस्ते अपघात माहिती प्रणालीचे सादरीकरण राष्ट्रीय सूचना केंद्राच्या धनंजय देशपांडे यांनी केले. राज्यात पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रणालीचा सर्वात चांगला उपयोग करून ३९ नवी अपघात प्रवण ठिकाणे (ब्लॅक स्पॉट) शोधली आहेत. रस्त्यावरील अपघात कमी करण्याबाबत विविध अशासकीय संस्थांकडून बैठकीत सादरीकरण करण्यात आले. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी हिम्मत खराडे, पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संजय ससाणे आदी उपस्थित होते. ब्लुमबर्ग फिलांथ्रोपिस इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी संस्थेच्या स्वाती शिंदे, सेंन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्टच्या वतीने प्रशांत काकडे यांनी सादरीकरणाद्वारे जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. पोलीस अधीक्षक देशमुख यांच्या हस्ते जनजागृती उपक्रमात चांगले योगदान देणाऱ्या संस्था आणि प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

लोकसत्ता Wed, 20 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67551293

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### महाविद्यालयांतील प्राध्यापक भरतीसाठी बिंदुनामावलीची विद्यापीठामार्फत तपासणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक पदाच्या भरती प्रक्रियेसाठी बिंदूनामावलीची (रोस्टर) प्राथमिक तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या आरक्षण कक्षामध्ये तारीख व वेळ आरक्षित करण्याची सूचना विद्यापीठाने केली आहे.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी त्या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले. महाविद्यालयातील शिक्षक भरतीसाठी बिंदूनामावली तपासणी आणि त्यात शासन आदेशानुसार आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे.

त्यासाठी शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करण्यात येईल. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतमधील आरक्षण कक्षात कार्यालयीन वेळेत प्रत्येक दिवशी एकूण दहा महाविद्यालयांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी करून दिली जाईल. त्यासाठी वेळ आणि तारीख आरक्षित करणे आवश्यक आहे.

प्राथमिक तपासणी झाल्यानंतर दोन दिवसांत संबंधित जिल्ह्यातील मागासवर्ग कक्षाच्या सहायक आयुक्तांकडून शिक्षक पदांची बिंदूनामावली प्रमाणित करून घेतल्यानंतरच शिक्षक पदे भरण्याची कार्यवाही करावी, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Wed, 20 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67540282

### विद्यापीठाकडून दुसऱ्या सत्राचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२मधील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सत्राचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार दुसरे सत्र मार्च ते मे दरम्यान सुरू होणारे दुसरे सत्र जून ते सप्टेंबरदरम्यान संपणार आहे.

विद्यापीठाने प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक सत्राचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिले आहे. या वेळापत्रकानुसार शैक्षणिक कामकाज करावे लागणार आहे. वाणिज्य व व्यवस्थापन या विद्याशाखेअंतर्गत एमबीए, एमसीए (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे दुसरे सत्र २ मे पासून सुरू होईल. एमसीएचे दुसरे सत्र १८ एप्रिलला सुरू झाले आहे. तसेच मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत कला, सामाजिक शास्त्र या अभ्यासक्रमाचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे पहिले सत्र १५ मार्चला संपून २१ मार्चपासून दुसरे सत्र सुरू झाले आहे. तर २७ जूनपर्यंत दुसरे सत्र संपवण्यासाठी मुदत आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर पदवी, वास्तुकला अभ्यासक्रमांचे पहिले सत्र मार्चमध्ये, तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे पहिले सत्र ६ एप्रिल रोजी संपले. अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षाचे दुसऱ्या सत्रासाठी ११ एप्रिल ते १५ जूनपर्यंत मुदत देण्यात आली आहे. विज्ञान, औषधनिर्माणशास्त्र पदव आणि पदव्युत्तर पदवीचे दुसरे सत्र पूर्ण करण्यासाठी १५ जून आणि वास्तुकलासाठी २३ जुलैची मुद देण्यात आली आहे. आंतरविद्य शाखीय विद्या शाखेअंतर्ग एमपीएड, एम.एड (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे दुसरे सत्र २ मे ते ३ सप्टेंबर, तर बीपीएड (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाचे दुसरे सत्र ८ जूनल सुरू होऊन २६ सप्टेंबरदरम्या संपेल, असे विद्यापीठाने स्पष्ट केले.

लोकसत्ता Wed, 20 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67540269

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

लोकमत एज्यु कनेक्ट

epaper.lokmat.com ७

पुणे, गुरुवार, दि. २१ एप्रिल २०२२

# पेटंट : बौद्धिक स्वामित्व हक्क

सोप्या शब्दात सांगायचे झाले तर 'पेटंट' हा एक अधिकार आहे. जो एखाद्या व्यक्तीला अथवा संस्थांना दिला जातो. हा अधिकार त्यांनी स्वत: निर्माण केलेल्या सेवा तंत्रज्ञान, उत्पादन, डिझाईन अथवा प्रक्रियेसाठी दिला जातो. यालाच आपण कायदेशीर हक्क/ स्वामित्व हक्क अशा अर्थाने पाहू शकतो.

एखादी नवीन वस्तू, तंत्रज्ञान, सेवा अथवा उत्पादन करण्यासाठी खूप गुंतवणूक करण्याची आवश्यकता असते. यामध्ये आर्थिक गुंतवणुकीबरोबरच वेळेची आणि मनुष्यबळाची सुद्धा गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर केली जाते. ज्या व्यक्तीने अथवा संस्थेने एखाद्या नवीन तंत्रज्ञानाचा, सेवेचा, शोध लावला किंवा उत्पादन शोधून काढले असेल आणि त्याचा व्यावसायिक वापर स्वत: अथवा इतरांना देण्याची त्यांची इच्छा असेल तर त्या व्यक्तीला त्याने स्वत: निर्माण केलेल्या वस्तूचे, सेवेचे अथवा डिजाईनचे पेटंट घेणे आवश्यक आहे.



### पेटंटचे मुख्यत

दोन प्रकार आहेत पहिला प्रकार म्हणजे उत्पादन किंवा प्रॉडक्ट पेटंट आणि दुसरा प्रकार म्हणजे प्रोसेस अथवा प्रक्रिया पेटंट होय. उत्पादन अथवा प्रॉडक्ट पेटंटमध्ये एखाद्या वस्तूची रचना डिझाईन आकार पॅकिंग त्या वस्तूमधील तंत्रज्ञान उत्पादन पद्धती. या सर्वांची सोपी किंवा डुप्लिकेट प्रोडक्ट तयार करण्याला बंधन आहे. वेगवेगळ्या औषध कंपन्या, त्यांनी शोधून काढलेल्या रसायनाचा पेटंट घेत असतात. तसेच वेगवेगळ्या औद्योगिक कंपन्या त्यांनी तयार केलेल्या किंवा संशोधन करून निर्मित केलेल्या एखाद्या गाडीचे अथवा वस्तूचे डिझाईन पेटंट घेत असतात. अशा काही वस्तूंच्या मध्ये थोड्याफार फेरफार करून तसेच तंत्रज्ञानामध्ये किंवा रचनेमध्ये थोडासा बदल घडवून आणून पेटंटचा वापर होताना आपण बघत असतो; परंतु एकसमान वस्तू किंवा तंत्रज्ञान जसेच्या तसे कॉपी करण्यासाठी किंवा वापर करण्यासाठी पेटंटच्या माध्यमातून बंधन निर्माण होते.

### प्रक्रिया पेटंट अथवा प्रोसेस पेटंट

प्रक्रिया पेटंट हा तंत्रज्ञानाच्या संदर्भात आहे. कोणतीही व्यक्ती अथवा संस्था एखादे उत्पादन बनवण्याची प्रक्रिया पेटंट करू शकते. यामुळे मेहनतीने आणि संशोधनपूर्वक केलेली उत्पादन प्रक्रिया अथवा सेवा प्रक्रिया याची विनापरवाना कॉपी होऊ शकत नाही.

पेटंट हे देशपातळीवरचे किंवा जागतिक स्तरावर सुद्धा घेता येऊ शकते. प्रत्येक देशामध्ये त्या त्या देशाचे एक पेटंट कार्यालय असते. या कार्यालयामार्फत उत्पादन तंत्रज्ञान कल्पना किंवा सेवा जर नवीन आहे आणि तुम्ही ती शोधून काढली आहे? असा निर्णय झाला तर ते पेटंट आपल्या नावे मिळू शकते. एखाद्या संशोधकाने देशापुरते जर पेटंट घेतले असेल तर त्या पेटंटची नक्कल दुसऱ्या देशातल्या व्यक्तीने करून त्याचा वापर केल्यास पेटंटचे उल्लंघन मानले जात नाही. त्यामुळे जगभरातले पेटंट जर आपल्याला हवे असेल तर त्याच्यासाठी त्या त्या देशाच्या पेटंट कार्यालयाकडे स्वतंत्रपणे अर्ज करावा लागतो.

भारतासारखा विकसनशील देश या बौद्धिक स्वामित्व हक्कासाठी सध्या जागृत झाला असून, दशकभरात साधारण ४० टक्के अधिक पेटंटचे अर्ज आपल्या येथील कार्यालयामध्ये दाखल होत आहेत. जगाच्या तुलनेत भारत खूप मागे असून, पेटंट या विषयामध्ये खूप कार्य करण्याची आवश्यकता आहे.

आंतरराष्ट्रीय पेटंट फायलिंग करणाऱ्या देशांच्या एका माहितीनुसार २०२१ मध्ये चीनने ६९ हजार ५४० पेटंट फाईल केली. त्याखालोखाल युनायटेड स्टेट आॅफ अमेरिका यांनी ५९ हजार ५७०, जपानने ५० हजार २६०, रिपब्लिक आॅफ कोरियाने २० हजार ६७८, जर्मनी १७ हजार ३२२, फ्रान्सने ७ हजार २८० युनायटेड किंग्डम ५ हजार ८४१, स्वित्झर्लंड ५ हजार ३८६, स्वीडनने ४ हजार ४५३ आणि नेदरलँडने ४ हजार १२७ आंतरराष्ट्रीय पेटंट फाईल केले आहेत.

वर्ल्ड इंटलेक्चुअल प्रॉपर्टी इंडिकेटर २०१९ च्या अहवालानुसार निवासी आणि अनिवासी भारतीयांनी फाईल केलेल्या पेटंटमुळे भारत संख्येनुसार जगातल्या सर्वाधिक पेटंट फाईल करणाऱ्या देशांमध्ये जाऊन पोहोचला आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये केंद्र शासनाने बौद्धिक स्वामित्व हक्क प्रक्रियेसाठी तयार केलेली योजना तसेच याबद्दलची माहिती, सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केंद्र शासनाने मोठ्या प्रमाणावर केला आहे.

पेटंट फायलिंगपासून त्याच्या सर्व पुढील प्रक्रिया करण्यासाठी. सर्वतोपरी मदत करणारी यंत्रणा शासनाच्या माध्यमातून उभी राहिली आहे. बौद्धिक स्वामित्व हक्क संपत्तीमध्ये भारतामधील व्यक्तींचा आणि संस्थांचा सहभाग वाढवण्यासाठी शासनाने काही योजना राबविल्या आहेत. त्यामुळेच कोरोनाच्या काळातही बौद्धिक स्वामित्व हक रजिस्टर्ड करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.



डॉ. पराग काळकर
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 7 Apr 21, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत कागदपत्र पडताळणी ऑनलाइन पद्धतीने

### कागदपत्रांशिवाय प्रवेश नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी ऑनलाइन पद्धतीनेच केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, आर्थिक दुर्बल घटक पात्रता प्रमाणपत्र अकरावी प्रवेशासाठीच्या संकेतस्थळावर अपलोड करावी लागणार असून, प्रवेश अर्ज भरतानाच कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. कागदपत्रांशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही.

केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष औदुंबर उकिरडे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. ओबीसी, एस.सी, एस.टी, व्हीजे. एनटी, एस.बी.सी. या प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, व्हीजे, एनटी, ओबीसी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना (इडब्ल्यूएस) आर्थिक दुर्बल घटक पात्रता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. ही सर्व कागदपत्रे मिळवण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी सुरू करण्याची सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. तसेच अपंग, प्रकल्पग्रस्त-भूकंपग्रस्त, आजी-माजी सैनिकाचे पाल्य, स्वातंत्र्यसैनिकाचे पाल्य आणि बदलीने आलेल्या कर्मचाऱ्यांचे पाल्य यांनाही संबंधित कागदपत्रे सादर करावी लागतील. या सर्व कागदपत्रांची पडताळणी ऑनलाइन पद्धतीने केली जाईल. गरज पडल्यास कागदपत्रांची पडताळणी ऑफलाइन पद्धतीने शाळा स्तरावरून केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

| कागदपत्रे | सक्षम प्राधिकारी |
|---|---|
| जात प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकारी महसूल विभाग |
| नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट | सक्षम प्राधिकारी महसूल विभाग |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल पात्रता प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकारी महसूल विभाग |
| अपंग प्रमाणपत्र | जिल्हा शल्य चिकित्सक, अधिष्ठाता |
| प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त | जिल्हाधिकारी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी |
| बदलीने आलेल्या कर्मचाऱ्याचा पाल्य | संबंधित कार्यालय प्रमुख |
| आजी-माजी सैनिक पाल्य | संबंधित प्राधिकारी |
| स्वातंत्र्यसैनिक पाल्य | जिल्हाधिकारी |
| आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू | जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा उपसंचालक |
| अनाथ | विभागीय उपायुक्त, महिला व बालकल्याण |

### विद्यार्थी, पालकांना ऑनलाइन मार्गदर्शन

प्रवेशासाठीची आवश्यक कागदपत्रे कशी अपलोड करायची याबाबत शिक्षण विभागाकडून विद्यार्थी आणि पालकांना ऑनलाइन मार्गदर्शन केले जाणार असून ११ मे रोजी यूट्युब, फेसबुकद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल.

लोकसत्ता Fri, 22 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67581963

# Eight colleges & 9 teachers fined for mistakes in results

### SPPU Lapses Committee Action To Check Errors

Times News Network

**Pune:** The examination department has taken stern action against eight colleges affiliated to Savitribai Phule Pune University for negligence in compilation of results of students.

The errors constituted sending wrong marks and wrong totalling, among others. A committee set up by the exam department submitted its report recently after which the colleges and the teachers were fined.

Director of examination at SPPU's exam department, Mangesh Kakade, said, “This is part of our routine process after every examination. Malpractices are accounted for and every recorded complaint or malpractice undergoes a scrutiny by the lapses committee of the exam department. A hearing is also conducted and depending on the seriousness of the offence the punishment is imposed.”

From students' malpractices to errors by any college administrations and teachers, all exam-related issues are resolved by the lapses committee.

During the recent semester examination, renowned colleges were fined. Colleges from the sub-centres of SPPU in Nashik and Ahmednagar were also part of this negligence and they have been fined too, Kakade added.

Depending on the severity of the offence, the fine ranges between Rs 1,000 and Rs 1,500. Sometimes, the offender is let off with a warning.

The teachers responsible in setting the question paper are also fined if factual mistakes are made in questions and proved by the lapses committee.

Errant colleges were fined between Rs 2,000 and Rs 20,000 for errors in individual results, to announcement of results of courses and wrong names of students.

**TRACKING MALPRACTICES**

- Errant colleges are from Pune, Nashik, Ahmednagar and Daund
- Teachers fined for wrong questions in exam papers
- Fines range from **Rs 1,000 to Rs 1,500**
- Colleges fined between **Rs 2,000 and Rs 20,000**
- Part of SPPU's routine process after every examination
- Malpractices are accounted for and every recorded complaint or malpractice undergoes a scrutiny by the lapses committee of the exam department



- Hearing is conducted and depending on the seriousness of the offence the punishment is imposed

The Times of India 22.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### महाविद्यालयाचे माहितीपुस्तक, प्रवेशअर्ज मराठीतून उपलब्ध करण्याचे विद्यापीठाचे निर्देश

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थांना नामफलक मराठीतून करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच महाविद्यालयाच्या पत्रव्यवहारात प्राधान्याने मराठीचा वापर करावा, महाविद्यालयाचे माहितीपुस्तक आणि प्रवेश अर्जही मराठीतून उपलब्ध करून देण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाने शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्या अनुषंगाने युवा सेनेकडून महाविद्यालयांचे नामफलक मराठीतून लावण्याच्या मागणीचे निवेदन विद्यापीठाला देण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सहज दिसेल अशा पद्धतीने महाविद्यालयाचे, परिसंस्थेचे नाव दर्शनी भागात मराठीत असावे, महाविद्यालयाचे माहितीपुस्तक आणि प्रवेश अर्जही मराठीतून उपलब्ध करून द्यावेत, महाविद्यालयाच्या पत्रव्यवहारात प्राधान्याने मराठीचा वापर करावा, महाविद्यालयाच्या सूचना मराठीतून लिहिण्यास प्राधान्य द्यावे, कार्यशाळांमध्ये प्राधान्याने मराठीचा वापर करावा, मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात यावा, विविध चर्चासत्रे, स्पर्धांचे आयोजन करावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Sat, 23 April 2022 https://epaper.loksatta.com/c/67

### महाविद्यालयांनी करावे स्वयंमूल्यमापन

#### 'नॅक' देणार तात्पुरते मूल्यांकन



#### माहिती भरण्यासाठी कार्यशाळा

महाविद्यालयांसाठी 'नॅक'तर्फे (पॅक) योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी आवश्यक माहिती 'नॅक'च्या पोर्टलवर भरायची असून, याबाबतची माहिती भरल्याचे विद्यापीठाला कळवायचे आहे. त्यासाठी लवकरच एक कार्यशाळा घेण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाकडून देण्यात आली आहे.

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) मूल्यांकन न करणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना आता स्वयंमूल्यमापन करावे लागणार आहे. त्यांना 'नॅक'च्या पोर्टलवर माहिती भरावी लागेल. त्यानंतर त्यांना तात्पुरते नॅक मूल्यांकन दिले जाणार आहे, असे 'नॅक'तर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी 'नॅक'कडून प्रोव्हिजन ॲक्रिडेशन फॉर कॉलेज (पॅक) योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेचा राज्यातील महाविद्यालयांना फायदा होणार आहे.

या योजनेची मार्गदर्शक नियमावली 'नॅक'च्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पॅक योजनेच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी संबंधित परिपत्रकाची नोंद घ्यावी; तसेच आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास व उच्च शिक्षण संचालनालयाला सादर करावा लागणार आहे. महाविद्यालयांना संबंधित कार्यवाही करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, त्यांना विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता व सिद्धता कक्षाशी संपर्क साधावा. याबाबत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या संचालक डॉ. सुप्रिया पाटील यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

Maharashtra Times 23.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# SPPU workshop in resort angers students, teachers

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Savitribai Phule Pune University has organised a workshop for its academic council, management council, and senate members, who are the key decision-makers of the university, in a jungle resort near Bhimashankar in May.

Teachers and students said it was misuse of the university's funds when there is a guest house and several state-of-the-art halls on the campus, where such programmes can be held.

NS Umarani, pro vice-chancellor of the university, refused to divulge the amount to be spent for the workshop, *but said that organising workshops outside the university was a tradition and that budgetary provisions were made.*

"The workshop is on the National Education Policy. We need decision-makers in the university to know what it entails and how well to implement it. Hence, we have called 8-10 nationally acclaimed people like Raghunath Mashelkar for a talk. There will be 100 people from the university and we have booked the resort for three days. I cannot give out the funding proposed as the finance department has all details but its budget was passed in the management council meeting," he said. The management council members, who passed the budget, will be part of the three-day workshop.

The SPPU main building has two sprawling halls, and halls in various departments. "It has a guest house and a catering service. Another workshop on NEP was organised near Lonavla for the same group. The university has discontinued scholarships to PhD students, they pay Rs 30,000 to contract teachers, but has all the money for workshops in resorts," a teacher said.

### WHAT HAS HURT THEM?

- Students and teachers said they would protest against the increase in tuition fees and university officials' wasting money
- Earlier this month, the university had organized a musical night, exclusively for its council members, using its funds
- Students and teachers said that if there was a cultural activity planned by the university, it should be open to all students too



"They have increased the fees almost three times this academic year citing a funds crunch due to Covid-19. Just because workshops have been organised outside for a long time, doesn't mean it has to continue now. In that case, the fellowship for PhD students should be continued. Also, when you organise a musical night using university funds within the varsity, students should be invited. A public university cannot use funds for personal entertainment

An SPPU Student

The Times of India 23.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# प्राध्यापक होण्यासाठी ३० लाख द्यावे लागतात हे कोणत्या नैतिकतेत बसते?

## राजन गवस यांचा सवाल : उदगीरच्या साहित्य संमेलनात रंगली मुलाखत

राम शिनगारे
लोकमत न्यूज नेटवर्क

**भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्यनगरी**

**उदगीर (जि. लातूर) :** समाज घडविण्यासाठी शिक्षक महत्त्वाचा असतो. आज शालेय पातळीवर दर्जेदार शिक्षक मिळणे दुरापास्त झाले आहे. महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक होण्यासाठी ३० लाख रुपये द्यावे लागतात. हे कोणत्या नैतिकतेत बसते? असा सवाल करीत संस्थाचालक आणि सरकारने शिक्षणाचा बट्ट्याबोळ केला असल्याचा आरोप ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केला.

उदगीर येथे सुरू असलेल्या ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यिक राजन गवस यांच्या प्रकट मुलाखतीने झाली. नागपूरचे डॉ. प्रमोद मुनघाटे आणि पुण्यातील विनोद शिरसाट यांनी त्यांना बोलते केले.

डॉ. गवस म्हणाले, आमच्या कुटुंबात कोणीही शिकलेले नव्हते. वर्ष संपले की, गेला का पुढच्या वर्गात असे विचारले जायचे. गुरं-ढोरं सांभाळत, उनाडक्या, शेतात काबाडकष्ट करीत आमचे बालपणातील शिक्षण झाले. बालपणात लिहिलेली चार ओळींची बेढर नावाची कविता दादा सबनीस यांनी छापली. हाच आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. कवितेने मला जगवले. यानंतर कथांमधून कृषक समाजाचे चित्रण रेखाटले. हे माझ्या आयुष्याच्या संबंधितच होते. महाविद्यालयीन चळवळीत काम करताना आलेल्या अनुभवातून, वैतागातून चौंडक, भंडारभोग या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. २५ वर्षांनंतर याच कादंबऱ्यांवर जोगवा नावाचा चित्रपट निघाला. तणकट, ब-बळीचा या कादंबऱ्या गावातील जातीयता, शेतकऱ्यांचे प्रश्न यावर आहेत, असेही गवस यांनी सांगितले.




साहित्य संमेलनातील प्रकट मुलाखतीमध्ये बोलताना साहित्यिक डॉ. राजन गवस. मुलाखत घेताना डॉ. प्रमोद मुनघाटे व विनोद शिरसाठ.

### कृषिजन व नागर लोकांचे आयुष्य भिन्न

ग्रामीण भागातील लोक जेवण करताना पहिला घास इतरांसाठी बाजूला काढून ठेवतात. तेच नागर संस्कृती असलेल्या शहरात होत नाही. शहरात देणारे नव्हे ओरबडणारे असतात. त्यामुळे कृषिजन आणि नागर भद्र लोकांचे आयुष्य भिन्न स्वरूपाचे असल्याचे मत राजन गवस यांनी मांडले.

### होय, मी नेमाडपंथी

मुलाखतकारांनी आपण नेमाडे घराण्याचे असल्याचे बोलले जाते, अशी चर्चा नेहमी होते, असा प्रश्न विचारला. त्यावर गवस यांनी होय मी नेमाडपंथी आहे, असे स्पष्ट केले. तसेच ज्यांनी कांदबरी लिहिण्याचे बळ दिले. त्यांच्या नावाने आपल्याला ओळखले जात असेल तर त्यात काय चूक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### देवदासी म्हणजे वेश्या नव्हे

- महाविद्यालयीन जीवनात आम्हाला देवदासी चळवळीत काम करता आले. यातील महिलांचे खरे दुःख अनिल अवचट यांनी अतिशय प्रभावीपणे मांडले.
- उर्वरित महाराष्ट्रात देवदासी म्हणजे वेश्या असे समजतात, पण ते खरे नाही, असे राजन गवस यांनी सांगितले.

Nashik Main
Page No. 8 Apr 24, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# 'पॅक' मूल्यांकनाच्या योजनेला 'नॅक'कडून तात्पुरती स्थगिती

## योजनेचा पुनर्आढावा घेण्याचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आतापर्यंत एकदाही मूल्यांकन करून न घेतलेल्या महाविद्यालयांसाठी प्रोव्हिजनल अ‍ॅक्रिडिटेशन फॉर कॉलेजेस (पॅक) ही योजना राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेने (पॅक) सादर केली आहे. मात्र या योजनेत काही त्रुटी असल्याने नॅककडूनच या योजनेची अंमलबजावणी तात्पुरती थांबवण्यात आली असून, विद्यापीठ अनुदान आयोगाची परामर्श ही योजना आणि पॅक योजना यांचा पुर्नआढावा घेऊन पुढील काही दिवसांत निर्णय घेतला जाईल.

देशभरातील उच्च शिक्षण संस्था गुणवत्तापूर्ण होण्यासाठी नॅककडून मूल्यांकनाची प्रक्रिया राबवली जाते. त्यात अभ्यासक्रम, अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया, संशोधन आणि नवसंकल्पना, पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक स्रोत, विद्यार्थी सहकार्य आणि प्रगती, प्रशासन, नेतृत्व आणि व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्ये आणि उत्कृष्ट कामे या निकषांवर तपासणी करून श्रेणी दिली जाते. मात्र देशभरातील अनेक उच्च शिक्षण संस्थांनी एकदाही नॅक मूल्यांकन करून घेतले नसल्याने त्यांना मूल्यांकनाच्या कक्षेत आणण्यासाठी नॅककडून फेब्रुवारीत पॅक योजना सादर करण्यात आली. या योजनेच्या मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध करण्यात आल्या.

पॅक योजनेत उच्च शिक्षण संस्थांनी विविध निकषांच्या अनुषंगाने आवश्यक माहिती ऑनलाइन पद्धतीने भरणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांची प्रत्यक्ष तपासणी करून त्यांना तात्पुरती अधिस्वीकृती किंवा तात्पुरती अधिस्वीकृती नाही हा दर्जा दिला जाईल. तात्पुरती अधिस्वीकृती न मिळालेल्या उच्च शिक्षण संस्थांना सहा महिन्यांत पुन्हा अर्ज करण्याची मुभा आहे.

तात्पुरत्या अधिस्वीकृतीचा दर्जा दोन वर्षांसाठी देण्याबाबत मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने उच्च शिक्षण संस्थांच्या स्तरावर हालचालीही सुरू करण्यात आल्या आहेत. मात्र आता या योजनेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

> पॅकच्या संकल्पनेमध्ये काही त्रुटी आहेत. त्याबाबत अधिक चर्चा होणे अपेक्षित आणि आवश्यक आहे. जास्तीत जास्त महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे, पण त्यासाठी गुणवत्तेशी तडजोड करून चालणार नाही. त्यामुळे पॅकची अंमलबजावणी तात्पुरती थांबवण्यात आली आहे. एकदाही नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची परामर्श ही योजना आहे. त्या अनुषंगाने पॅक योजनेचा पुर्नआढावा घेऊन पुढील काही दिवसांत निर्णय घेतला जाईल.
>
> **- डॉ. भूषण पटवर्धन,**
> कार्यकारी समिती अध्यक्ष, नॅक

लोकसत्ता Sun, 24 April 2022 https://epaper.loksatta.com/c/67623859

# महाविद्यालयांचे पत्रव्यवहार मराठीतच

**प्रभात वृत्तसेवा**



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे आदेश**

**पुणे, दि. २३ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थांनी नामफलक मराठीतून करण्याचे निर्देश विद्यापीठ प्रशासनाने दिले आहेत. महाविद्यालयांच्या पत्रव्यवहारात प्राधान्याने मराठीचा वापर करावा, महाविद्यालयाचे माहितीपुस्तक आणि प्रवेश अर्जही मराठीतून उपलब्ध करून देण्यात यावी, असेही विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाने शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. त्या अनुषंगाने युवा सेनेकडून महाविद्यालयांचे नामफलक मराठीतून लावण्याच्या मागणीचे निवेदन विद्यापीठाला देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी या संदर्भातील (पान २ पहा) ▸▸

प्रभात Sun, 24 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67654560

## महाविद्यालयांचे पत्रव्यवहार मराठीतच

(पान १ वरून) परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सहज दिसेल अशा पद्धतीने महाविद्यालयाचे, परिसंस्थेचे नाव दर्शनी भागात मराठीत असावे, महाविद्यालयाचे माहितीपुस्तक आणि प्रवेश अर्जही मराठीतून उपलब्ध करून द्यावेत, महाविद्यालयाच्या पत्रव्यवहारात प्राधान्याने मराठीचा वापर करावा, महाविद्यालयाच्या सूचना मराठीतून लिहिण्यास प्राधान्य द्यावे, कार्यशाळांमध्ये प्राधान्याने मराठीचा वापर करावा, मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात यावा, विविध चर्चासत्रे, स्पर्धांचे आयोजन करावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान सर्वच शासकीय कार्यालयामध्ये मराठीचा आग्रह धरला जात आहे.

प्रभात Sun, 2 https:

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### महाविद्यालयांमध्ये साजरा होणार सायबर जागरूकता दिवस

पुणे, दि. २४ - केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी सायबर जागरूकता दिवस साजरा करावेत, अशा सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना दिल्या आहेत. युवा व क्रीडा मंत्रायलाने सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांना सायबर जागरूकता दिवस साजरा करण्याचे सूचित केले आहे. त्यानुसार सर्व महाविद्यालयांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सायबर जागरूकता उपक्रम राबविण्यात यावे. या उपक्रमाबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रसिद्धी द्यावी, असेही आदेशात म्हटले आहे.

प्रभात Mon, https

लोकमत

### जुलमी कारभाराविरोधात प्राध्यापकांचे आंदोलन

**पुणे** : पुणे विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालय व वरिष्ठ लेखापरीक्षक कार्यालयाच्या मनमानी व जुलमी कारभाराविरोधात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापक संघटनेतर्फे (स्पुक्टो) येत्या सोमवारी (दि.२५) आत्मक्लेश आंदोलन केले जाणार आहे. प्राध्यापकांची अवहेलना व शोषणाचा यावेळी निषेध व्यक्त केला जाणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

कॅसअंतर्गत होणाऱ्या वेतन निश्चिती वेळेत पूर्ण न करणे, वेतन निश्चिती प्रलंबित ठेवणे, कारण नसताना त्रुटी काढून भ्रष्टाचाराला पूरक वातावरण तयार करणे, पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या वेतन निश्चितीमध्ये विनाकारण त्रुटी काढून वसुलीची भीती दाखवणे, निवृत्तीवेतनाची प्रकरणे वेळेत पूर्ण न करणे, वैद्यकीय बिले, पीएफ, डीसीपीएलधारक मृत कर्मचाऱ्यांना मिळणारे सानुग्रह अनुदान परतावा याबाबत अक्षम्य विलंब करणे आदीमुळे प्राध्यापकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 25, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# Why CUET must focus more on vocational subjects

Emphasis needs to be removed from testing students' ability in a few subjects for now

Astha.Hemant
@timesgroup.com



ISTOCK

National Education Policy (NEP) 2020 emphasises on the need for vocational training, both in schools and universities. While CBSE has introduced a total of 38 vocational subjects at the senior secondary level, guidelines for the Commom University Entrance Test (CUET) reveal that the exam will test candidates on only three related subjects. Educators fear that this may dilute the focus on vocational education and reduce its value.

### Reason for the disconnect

Neharika Vohra, vice-chancellor, Delhi Skill and Entrepreneurship University (DSEU), says, "Indeed, CUET is not focussing enough on vocational subjects. A reason could be that not many higher educational institutes (HEIs) offer courses mapped with vocational training given at schools. Still, at its starting point, stakeholders are more concerned about figuring out finer details of CUET such as correlating marks with courses, than focus on including vocational subjects."

Kamlesh Singh, principal, Shanti Asiatic School, Kheda, Gujarat, says lack of faculty at HEIs may be another reason. "If the CUET will not test students on vocational subjects, students will not be interested in opting for them. This will have a cyclic effect, as lesser number of students will lead to limited faculty at both schools and HEIs. Gradually, NEP's aim to remove focus from attaining only academic excellence in shool and making students job-ready will remain unfulfilled."

### Current status

Vohra says that this step by CUET will dissuade students from opting for vocational subjects. "Students who opt for one or two vocational subjects based on interest will be at a disadvantage. Instead of being tested for five subjects in CUET, they will only be tested for three or four, depending upon their choice of subjects." This, in turn, will discourage schools from offering vocational courses, because at the end, they also have to showcase success stories, she adds.

**CUET should focus more on vocational subjects for students to opt for them**

Schools are still at the nascent stage of offering vocational courses. Anshu Mital, principal, MRG School, New Delhi, offers around 20 subjects of the list. "We offer Psychology, Marketing, Photography, Artificial Intelligence, Industrial Chemistry and more. However, CUET will test candidates on only three vocational subjects, including Agriculture, Mass Media and Yoga. While Mass Media is still being opted by various schools, the other two are not yet popular as vocational subjects."

Requirements for vocational courses vary depending upon the school's geographical location, says Singh. "We are based in a rural backdrop and currently offer only two vocational subjects, including Carpentry and Computer Applications. Even in Carpentry, we are facing issues as only a handful have opted for it while faculty speaks only in the local language, leading to hiccups in our English medium school."

### Way forward

Mital says that representatives from schools and official bodies involved in making key decisions need to have related discussions. "Schools are in a better position to communicate the needs of students so that decisions are more in tune with their requirements," she says. Singh feels that spreading awareness may ensure that vocational education is accepted at all levels.

Vohra says, "At DSEU, we offer various courses that train students to become job-ready, especially in fields for which currently hiring authorities may find it difficult to find the right talent. For this, students who have received related training at the school level are preferred and given extra weightage during admission." Unless CUET starts giving weightage to all subjects being taught at schools, it will lead to disinterest among students for them, creating a gap in practical education, which should be every HEI's focus, she adds.

The Times of India 25.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### प्रलंबित प्रश्नांबाबत प्राध्यापकांचे आंदोलन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय आणि महाविद्यालयील अध्यापक संघटनेने (स्पुक्टो) उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक कार्यालयासमोर आंदोलन केले.

या आंदोलनात पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील प्राध्यापकांनी सहभाग घेतला. कॅस अंतर्गत प्राध्यापकांना तातडीने लाभ मिळावे, वेतन निश्चितीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे ठेवणे, निवृत्ती वेतनाची प्रकरणे वेळेत निकाली काढणे, भविष्य निर्वाह निधी आणि डीसीपीएस योजनेतील सेवकांचा हिशोब अद्ययावत ठेवणे, अशा प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

सहसंचालक कार्यालयात प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली जातात. संपूर्ण कागदपत्रे असतांनाही प्रकरणांवर कार्यवाही होत नाही, निवृत्ती वेतनासाठी आवश्यक प्रमाणपत्रांबाबत त्रुटी काढून त्रास दिला जातो. प्राध्यापकांच्या प्रलंबित प्रकरणांबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आल्याचे स्पुक्टोचे अध्यक्ष डॉ. के. एल. गिरमकर यांनी सांगितले. सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर आणि अधिकारी मनोज शिंदे यांनी या संदर्भात कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे डॉ. गिरमकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue htt

### उच्च शिक्षणातील चांगल्या कार्यपद्धतींबाबत यूजीसीकडून वर्षभराचे मार्गदर्शन सत्र

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) उच्च शिक्षण संस्थांमध्ये उत्तम कार्यपद्धतीचे महत्त्व विषद करण्यासाठी वर्षभर मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. २७ एप्रिलपासून या उपक्रमाची सुरुवात होणार आहे.

यूजीसीने या संदर्भातील परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. उच्च शिक्षण संस्थांतील उत्तम कार्यपद्धतींची दखल घेऊन त्या कार्यपद्धती देशभरातील अन्य विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्येही राबवल्या जाण्याची गरज आहे. त्यासाठी यूजीसीकडून वर्षभराचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. त्या अंतर्गत दर महिन्याला देशातील आघाडीच्या शिक्षण संस्थांच्या प्रमुखांचे सत्र आयोजित करण्यात येईल, असे यूजीसीने कुलगुरू आणि प्राचार्यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्यानुसार २७ एप्रिल रोजी बंगळुरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे संचालक गोविंदन रंगराजन यांचे मार्गदर्शन होणार असल्याचे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Tue, 26 April 2022 https://epaper.loksatta.com/c/

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सकाळ

# राज्यात यंदा १,३३८ नवी महाविद्यालये

## आराखडा मंजूर; व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्राधान्य

**संजीव भागवत : सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २५ : राज्यातील ११ विद्यापीठांतर्गत यंदा पदवी, पदव्युत्तर आणि अल्पमुदतीचे अभ्यासक्रम देणाऱ्या तब्बल एक हजार ३३८ नव्या महाविद्यालयांची भर पडणार आहे. यासाठी नुकतेच महाराष्ट्र राज्य शिक्षण व विकास आयोगाने (माहेड) २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या वार्षिक बृहत् आराखड्याला मान्यता दिली.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले इरादा पत्र आणि अंतिम मान्यता देण्यासाठी ३० एप्रिल ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीपर्यंत मुदतवाढ दिली होती. त्यासाठी विद्यापीठ कायद्यात सुधारणा करणारे विधेयकही मंजूर केले होते. त्या पार्श्वभूमीवर नव्या महाविद्यालयांसाठी 'माहेड'कडून बृहत् आराखड्याला मंजुरी मिळाली. त्यानंतर आता विद्यापीठांकडून त्याबाबत जाहिराती प्रसिद्ध केल्या जातील. नव्या महाविद्यालयांच्या प्रस्तावांमध्ये पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रमाण अधिक आहे.

सकाळ @90

नव्या महाविद्यालयांच्या प्रस्तावांमध्ये सर्वाधिक प्रमाण हे मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात आहे. मुंबई विद्यापीठाने २५५, त्यापाठोपाठ एसएनडीटी महाविद्यालयाने २०३, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १६५ नवी महाविद्यालये सुरू करण्यासाठीची बिंदू नामावली दिली आहे. यामध्ये विधी, फॅशन डिझाइन, औषधनिर्माण (फार्मसी) अभ्यासक्रमासोबतच विविध प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. दुसरीकडे शहरी भागात मराठी माध्यमांसोबत पारंपरिक कला शाखेच्या नव्या महाविद्यालयांकडे मागणी घटली असल्याचेही समोर आहे.

### नव्या महाविद्यालयांची प्रस्तावित संख्या




Pune, Main
26/04/2022 Page No. 8

सकाळ

# विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाइनच

**नागपूर, ता. २५ :** राज्यात कोरोनाची लाट जवळपास संपली असल्याने सर्व विद्यापीठातील परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात याबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी निर्णय घेतला आहे. त्यांनी सोमवारी ऑनलाइन बैठकीत सर्व विद्यापीठांशी संवाद साधला. त्यानंतर हा निर्णय घेतल्याचे कळते. जून महिन्यांपर्यंत सर्व परीक्षा संपविण्याचेही आदेश सामंत यांनी दिला राज्यात आतापर्यंत कोरोनाची लाट होती. मात्र, गेल्या दीड महिन्यांपासून कोरोनाच्या रुणसंख्येत लक्षणीय घट झालेली आहे. त्यामुळे राज्यात शाळा, महाविद्यालये संपूर्ण क्षमतेने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. महाविद्यालये ऑफलाइन सुरू असताना काही विद्यापीठांद्वारे ऑनलाइन परीक्षा घेण्याचे ठरविले होते. सामंत यांनी आज सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक घेऊन परीक्षांचा आढावा घेतला. त्यात त्यांनी सर्व विद्यापीठांमध्ये ऑफलाइन परीक्षा घेण्याबाबत सूचना केली. दरम्यान बैठकीमध्ये सर्व कुलगुरूंनी तयारी दर्शविल्याचेही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

Pune, Main
26/04/2022 Page No. 7

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

### नवीन कॉलेजचे प्रस्ताव ३० एप्रिल-पर्यंत द्यावेत

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात नवीन महाविद्यालये, परिसंस्था, विषय, विद्याशाखा, तुकडी प्रवेश क्षमता वाढ आदीचे प्रस्ताव येत्या ३० एप्रिलपर्यंत स्वीकारले जाणार आहेत. इच्छुक शिक्षण संस्था चालक व महाविद्यालयांनी वेळेत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी महाराष्ट्र राज्य उच्चशिक्षण व विकास आयोगाने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार नवीन महाविद्यालय, परिसंस्था, अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेश क्षमता वाढ विषय आदींचे प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत.

ऑनलाइन पद्धतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे सादर करावी, असे विद्यापीठातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

Hello Pune
Page No. 8 Apr 26, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

### पाच हजार शिक्षकांच्या जागा रिक्त

#### उन्हाळ्याच्या सुटीत भरतीप्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी

**पुणे, ता. २५ :** उच्च माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षक अतिरिक्त नसतानाही गेली दहा वर्षे सातत्याने भरतीसाठी विलंब केला जात आहे. परिणामी राज्यात पाच हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. राज्य सरकारने शिक्षकांची ही रिक्त पदे त्वरित भरावीत, ही शिक्षक भरती प्रक्रिया उन्हाळ्याच्या सुटीत पूर्ण करावी, जेणेकरून येत्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयांमध्ये शिक्षक उपलब्ध होऊ शकतील, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने केली आहे.

राज्यात गेली १० वर्षे शिक्षकांच्या जागा भरण्यासाठी शासन स्तरावर वेगवेगळे आदेश देऊन शिक्षकांची भरती प्रलंबित राहत आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात काही शिक्षक अतिरिक्त असले तरी उच्च माध्यमिक शिक्षण विभागात मात्र पाच हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची पदे रिक्त आहेत. शासनाने या जागांवर शिक्षक भरण्यासाठी परवानगी नाकारल्यामुळे शिक्षकांच्या अनुपस्थितीत विद्यार्थी अभ्यास करून परीक्षा देत आहेत. त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर होत आहे. गेली दोन वर्षे कोरोनामुळे ऑनलाइन अध्यापन करावे लागल्यामुळे शिक्षकांची कमतरता प्रकर्षाने जाणवली नाही, परंतु गेल्या दोन महिन्यांपासून शिक्षक नसल्यामुळे वर्ग रिकामे असल्याचे महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर यांनी सांगितले.

कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक भरती प्रक्रिया त्वरित राबविण्याच्या मागणीचे निवेदन महासंघातर्फे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड आणि शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांना देण्यात आले आहे.

> **बोर्डाचे पेपर तपासणीसाठी शिक्षक पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्याने शिक्षकांना जास्त उत्तरपत्रिका तपासाव्या लागल्या आहेत. दरम्यान, शासनाने 'पवित्र पोर्टल'द्वारे शिक्षकांची भरती करण्याचे कार्य सुरू केले होते, परंतु ही प्रक्रियादेखील थांबली. त्यामुळे आता राज्य सरकारने शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत, याची त्वरित माहिती घ्यावी व उन्हाळ्याच्या सुटीत शिक्षक भरतीची प्रक्रिया पूर्ण करावी.**
>
> **– प्रा. मुकुंद आंधळकर,**
> समन्वयक, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघ

Pune, Main
26/04/2022 Page No. 4

### प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा

**'स्पुक्टो'चे आंदोलन; ३५० प्राध्यापक सहभागी**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन अध्यापक संघटनेने (स्पुक्टो) उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक कार्यालयासमोर आंदोलन केले. या आंदोलनात पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील साडेतीनशे प्राध्यापक सहभागी झाले होते.

'कॅस'अंतर्गत प्राध्यापकांना तातडीने लाभ मिळावेत, वेतन निश्चितीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे ठेवणे, निवृत्ती वेतनाची प्रकरणे वेळेत निकाली काढणे, भविष्य निर्वाह निधी आणि डीसीपीएस योजनेतील सेवकांचा हिशेब अद्ययावत ठेवणे, अशा मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

'सहसंचालक कार्यालयात अनेक प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली जातात. त्याचप्रमाणे संपूर्ण कागदपत्रे असतानाही प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे प्राध्यापकांना 'कॅस'चे; तसेच वेतनाचे लाभ मिळत नाहीत. निवृत्तिवेतनासाठी आवश्यक प्रमाणपत्र देताना त्रुटी काढून त्रास दिला जातो. आर्थिक लाभ मिळवण्याच्या उद्देशाने प्राध्यापकांच्या प्रकरणांवर कार्यवाही होत नाही. त्यामुळे प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले,' असे 'स्पुक्टो'चे अध्यक्ष डॉ. के. एल. गिरमकर यांनी सांगितले.

आंदोलनाची दखल घेऊन सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर आणि अधिकारी मनोज शिंदे यांनी सरकारच्या नियमावलीनुसार प्राध्यापकांच्या प्रकरणांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे डॉ. गिरमकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 26.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत

# विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाइन होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घ्याव्यात यावर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि विद्यापीठांचे कुलगुरू यांच्यात सोमवारी झालेल्या ऑनलाइन बैठकीत एकमत झाले.

विद्यार्थ्यांच्या हितासाठी परीक्षांची मूल्यमापन पद्धती एकसमान असावी, यामुळे शैक्षणिक स्पर्धेला अडथळा येणार नाही आणि त्यानुसार परीक्षांचा निर्णय घ्यावा, अशा सूचना सामंत यांनी कुलगुरूंना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सर्व कुलगुरूंकडून ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

बहुतांश विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होत आहेत. मात्र काहींच्या ऑनलाइन व संमिश्र पद्धतीने होत आहेत. त्यामुळे मूल्यमापनात अडथळे येत असल्याचे म्हणणे कुलगुरूंनी मांडले. ऑनलाइनमुळे काही विद्यार्थ्यांना अधिक गुण, तर ऑफलाइनमुळे कमी गुण अशी स्थिती निर्माण होऊ नये यासाठी विद्यापीठांनी ऑफलाइन परीक्षांचा मार्ग स्वीकारावा, असे मत सामंत यांनी व्यक्त केले.

या सगळ्या चर्चेअंती विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच व्हाव्यात असा मानस कुलगुरूंकडूनही व्यक्त करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद), एसआरटी मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि कवयित्री संत बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी यापूर्वीच ऑफलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

### मुंबई विद्यापीठाबाबत अद्याप निर्णय नाही

- मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षांना सुरुवात झाली असून त्या संमिश्र पद्धतीने होणार आहेत. त्यातील काही ऑनलाइन पदवी परीक्षांना सुरुवातही झाली असून, व्यावसायिक व पदव्युत्तर परीक्षा या ऑफलाइनच होणार आहेत.
- मात्र नवीन निर्णयाप्रमाणे अद्याप परीक्षा पद्धतीत बदल होणार का, याबाबत कोणत्याही सूचना अद्याप आलेल्या नाहीत.

Pune Main
Page No. 5 Apr 26, 2022
Powered by: erelego.com

# विद्यापीठांच्या परीक्षा १ जून ते १५ जुलैदरम्यान

## ऑफलाइन परीक्षांबाबत कुलगुरू ठाम असल्याची उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांकडून माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राज्यातील बहुसंख्य विद्यापीठांचे कुलगुरू प्रत्यक्ष पद्धतीने (ऑफलाइन) परीक्षा घेण्यावर ठाम आहेत. १ जून ते १५ जुलैदरम्यान विद्यापीठांकडून परीक्षा घेतल्या जाणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने महाविद्यालये प्रत्यक्ष पद्धतीने सुरू झाली आहेत. तसेच आता ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठांकडून करण्यात येत आहे. ऑनलाइन परीक्षांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांकडून कॉपीचे प्रकार होत असल्याचे, तसेच ऑनलाइन परीक्षांमध्ये परीक्षांचे निकाल प्रचंड प्रमाणात वाढल्याचेही दिसून आले आहे. मात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीनेच परीक्षा घेण्याची मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक घेतली.

बैठकीनंतर सामंत यांनी ट्विटद्वारे माहिती दिली. 'कुलगुरूंच्या बैठकीमध्ये ऑफलाइन परीक्षा घेण्यासंदर्भात बहुसंख्य विद्यापीठ कुलगुरू ठाम आहेत. परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना प्रश्नसंच विद्यापीठ देणार आहे. दोन पेपरमध्ये दोन दिवसाचे अंतर असणार आहे, परीक्षा मेमध्ये न घेता १ जून ते १५ जुलैपर्यंत होतील असे कुलगुरूंनी निश्चित केले आहे', असे उदय सामंत यांनी नमूद केले आहे.

लोकसत्ता
Wed, 27 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67684938

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सामना

# विद्यापीठांच्या परीक्षा ऑफलाइनच

## मेऐवजी आता १ जून ते १५ जुलैदरम्यान परीक्षा

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी) – राज्यातील विविध विद्यापीठांच्या या शैक्षणिक वर्षातील शिल्लक राहिलेल्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने होणार आहेत. राज्यातील विद्यापीठांचे कुलगुरू ऑफलाइन परीक्षा घेण्यावर ठाम असून मेमध्ये परीक्षा न घेता १ जून ते १५ जुलैदरम्यान परीक्षा घेतल्या जाणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी कुलगुरूंसोबत झालेल्या बैठकीनंतर ही माहिती दिली.

राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने आता ऑफलाइन परीक्षा घेण्याची तयारी सर्व विद्यापीठांकडून सुरू आहे, मात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन परीक्षांची मागणी केली जात आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाइन घेण्याचा निर्णय झाला होता. याच पार्श्वभूमीवर राज्याच्या विविध विद्यापीठांच्या परीक्षादेखील ऑफलाइनच होणार असल्याचे उदय सामंत यांनी जाहीर केले.

### प्रश्नसंच विद्यापीठ देणार

ऑफलाइन परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना प्रश्नसंच विद्यापीठ देणार आहे. तसेच दोन पेपरमध्ये २ दिवसांचे अंतर असणार आहे. तसेच परीक्षा मेमध्ये न घेता १ जून ते १५ जुलैपर्यंत होतील असे कुलगुरूंसोबतच्या बैठकीत ठरविण्यात आले आहे.

### मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा वेळापत्रकानुसार

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होणार आहेत. सध्या ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या अंतिम वर्षाच्या पदवी पूर्वपरीक्षा त्याच पद्धतीने सुरू राहतील. उर्वरित परीक्षा ऑफलाइन होणार आहेत. फेब्रुवारीमध्ये मुंबई विद्यापीठाने परिपत्रक जारी करून उन्हाळी सत्र परीक्षा ऑनलाइन तसेच ऑफलाइन घेतल्या जातील. वाणिज्य, कला आणि विज्ञान सत्र २ (नियमित) च्या सर्व यूजी परीक्षा, एटीकेटीच्या परीक्षा ऑफलाइन होतील. तसेच सेमिस्टर १, ३ आणि ५ च्या एटीकेटीच्या परीक्षा तसेच नियमित आणि एटीकेटीच्या विद्यार्थ्यांसाठी सेमिस्टर-४ च्या परीक्षा या वर्षी ऑनलाइन घेण्यात आल्या आहेत.



Pune Edition
Apr 27, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# एकात्म मानव दर्शन – शिक्षणविचार



चतु:सूत्र
एकात्म मानववाद
रवींद्र महाजन

**शिक्षण मेकॉलेच्या कचाट्यातून अद्याप सुटलेले नाही. तांत्रिक व पोटभरू शिक्षणावर एकांगी भर देण्याऐवजी भारतीय चिरंतन जीवनदृष्टीचा सांधा आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाला जोडून समतोल साधला पाहिजे...**

**मागील दोन** लेखांमध्ये आपण समाजविचार पाहिला. पाश्चात्त्य विचाराधारित सध्याच्या व्यवस्थांऐवजी यथाशीघ्र भारतीय चिंतनावर आधारित एकात्म मानव दर्शनप्रणीत व्यवस्थांकडे जाण्यासाठी शिक्षणपद्धतीत बदल करावे लागतील. कोणत्याही तत्त्वांना व्यावहारिक स्वरूप देण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. त्यातूनच पुढच्या पिढीत संस्कार, ज्ञान, रीतिरिवाज, जीवनशैली इत्यादी संक्रमित होतात. स्वातंत्र्यानंतरच्या ७४ वर्षांत शिक्षणाचा खूप प्रसार झाला असला, तरी अजूनही शिक्षण मेकॉलेच्या कचाट्यातून सुटलेले नाही.

केवळ वैज्ञानिक, तांत्रिक व पोटभरू शिक्षणावर एकांगी भर दिल्याने मानवी मूल्यांची हानी होईल. आत्यंतिक भोगवादामुळे आज पाश्चिमात्य देशांना जसे अनेक सामाजिक, नैतिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, तशीच वेळ आपल्यावरही येईल. म्हणून लोककल्याणकारी भारतीय चिरंतन जीवनदृष्टीचा सांधा आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानाला जोडून समतोल साधला पाहिजे.

वैशिष्ट्यपूर्ण आध्यात्मिक, मानवतावादी तत्त्वज्ञानाबरोबरच भारतीयांची बौद्धिक क्षमताही जगप्रसिद्ध आहे. नवे युग हे ज्ञानयुग आहे, त्यात आपली ज्ञानसंपदा हा आपल्या प्रगतीचा आधार राहील. ज्ञानरचनावादात ज्ञाननिर्मितीकेंद्री, पर्यावरण संतुलनकेन्द्री, विद्यार्थी विकासकेंद्री आणि समाज विकासकेंद्री शिक्षणप्रणाली अपेक्षित आहे. समग्र व एकात्म दृष्टी, तत्त्वज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, जैविक तंत्रज्ञान, अन्न तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, इ. तसेच हेतुपूर्ण व सफल जीवन या विषयांत भारत स्वतःच्या बौद्धिक क्षमतेच्या आधारावर झेप घेऊ शकतो. तेव्हा एकात्म मानव दर्शनाच्या प्रकाशात आपल्या शिक्षणाची पुनर्रचना (भारतीयकरण व अभिनवीकरण) करून हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे.

### प्राचीन पारंपरिक शिक्षण विचार

आपल्या देशात किमान पाच-सहा हजार वर्षांपूर्वीपासून ज्ञानपरंपरा अस्तित्वात आहे. वेद उपनिषद कालापासून ऋषी-मुनींच्या आश्रमशाळांत राजांची मुलेही सामान्यांच्या मुलांबरोबरच शिक्षण घेत असत. गुरुकुलपद्धतीतून विद्यार्थ्यांना श्रम, संयम, ज्ञानसाधना, प्रयत्नशीलता व सामूहिकता यांचे शिक्षण अधिक चांगल्या प्रकारे मिळत असे. आधुनिक शिक्षणात हे कसे साधता येईल, यावर विचारमंथन व्हावे. काही मार्गदर्शक सुभाषिते...

१- मुक्ति हे ज्याचे गंतव्यस्थान आहे ते शिक्षण. -तैत्तिरीय उपनिषद

२- माणसाला चारित्र्यसंपन्न समाजोपयोगी बनविते ते शिक्षण. -याज्ञवल्क्य

३- मानवी शिक्षण म्हणजे निसर्गाकडून माणसाला मिळणारे प्रशिक्षण होय. -पाणिनी

४- देशउभारणीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण व देशाविषयी प्रेम उत्पन्न करते ते शिक्षण. -कौटिल्य

५- मनुष्यात मुळात असलेल्या पूर्णत्वाची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण. चारित्र्यनिर्मिती, मनःशक्तीची वाढ, बुद्धीचा विकास आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद ज्यातून मिळते, ते शिक्षण. -स्वामी विवेकानंद



६- जीवनाचे समग्र आणि एकात्म दर्शन ज्याद्वारे घडते तेच खरे शिक्षण. -जे. कृष्णमूर्ती

७- भावना, विचार, प्रेरणा यांचा सुसंवाद साधणे व सुसंवादी व्यक्तिमत्त्वाचे निर्भय स्त्री-पुरुष निर्माण करणे हेच शिक्षणाचे खरे उद्दिष्ट आहे. -जे. कृष्णमूर्ती

८. सोळा वर्षांपर्यंत स्वावलंबनाचे शिक्षण व सोळा वर्षांनंतर स्वावलंबनाने शिक्षण. -आचार्य विनोबा

### शिक्षणाचा हेतू

शिक्षणाचा हेतू परिपूर्ण मानव घडवणे हा आहे. त्यासाठी चार गोष्टी जुळवाव्या लागतील- नैतिक आणि आध्यात्मिक उत्थान, सामाजिक सद्गुण (आत्मीय परस्परसंबंध, जबाबदारीची तयारी, देशभक्ती आणि पूर्णत्व) बाणवणे, शक्तीनिर्माण (शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक), व्यावसायिक क्षमतांचे व बुद्धीचे (उद्योजकता, उद्यमशीलता, व्यावसायिकता, सर्जनशीलता) उन्नयन.

### शिक्षणाचा आशय

शरीर, मन, बुद्धी, आत्मा या चारही अंगांचे संतुलित पोषण व विकास व्हावा असे शिक्षण

१- शारीर ऊर्मी, गरजा यांचा समन्वित उपशम करण्याची क्षमता देणारे, उपजीविकाही समाविष्ट

२- मनाचा समतोल, संवेदनशीलता, संयम, एकाग्रता व निर्लिप्तता या मानसशक्तींचे संवर्धन करणारे, व्यक्तीतील मानव्याचा विकास व अंतिमतः शांती यांची प्राप्ती करून देणारे

३- अनुभूतिजन्य व बुद्धिगम्य ज्ञानाचे निरीक्षण, पृथक्करण, कार्यकारणभावनिश्चिती, व्यवस्थापन, उपयोजन, इष्टानिष्टविवेक, तारतम्य या क्षमता निर्माण करणारे विज्ञाननिष्ठा वाढविणारे; बुद्धिजन्य शिक्षण

४- व्यक्तीच्या आत्मीयतेचा परीघ, कुटुंब, परिसरसमूह, समाज, राष्ट्र, मानव्य, निसर्ग, विश्वात्मक तत्त्व येथपर्यंत विकसित करण्याची ऊर्मी व क्षमता वाढविणारे. याशिवाय व्यक्तिहित साधताना समाजहिताला बाधा येणार नाही, अशा व्यवस्थेसाठी योग्य मानसिकता, तसेच ऋणकल्पनेतून आलेली कर्तव्यभावना, शाश्वत विकास संकल्पना, निसर्ग संसाधनांचा संयत उपभोग, पर्यावरणाची जपणूक, प्रत्यक्ष कार्यानुभव अशा पैलूंवरही भर द्यावा लागेल.

अभ्यासक्रमाचा काही भाग देशभर समान असावा व उरलेला त्या प्रदेशानुसार ठरवावा.

### शिक्षणाचे सिद्धांत

१ - मूल स्वतःच शिकते, शिक्षकांची भूमिका साहाय्यकाची असते. आचार्यांच्या व्यक्तिमत्त्वातून उच्च तत्त्वे व जीवनमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रभावी स्वरूपात संक्रमित होतात.

२- एकाग्रता आणि निर्लिप्तता या दोन मूलभूत क्षमतांमुळेच व्यक्ती वेगाने शिकते.

३- विद्यार्थ्याच्या निरोगी आणि वेगवान प्रगतीसाठी, त्याचा स्वतः परिपूर्ण होण्याचा ध्यास व प्रयत्नांबरोबरच परिसराशी आत्मीयतेचे संबंधदेखील पूरक. पुस्तकी शिक्षणाबरोबरच, थेट प्रयोग आणि अनुभव घेणे यांमुळे अर्थ लवकर समजतो.

४- सर्वांगीण शिक्षणपद्धती स्वावलंबन, स्वाध्याय आणि कृतिप्रधानता यांच्यावर आधारित असावी.

५- मुलांची जन्मजात वृत्ती आणि क्षमतेप्रमाणे, व्यक्तीनुसार काही बाबींवर कमीजास्त भर हवा.

६- शिक्षणाद्वारे ज्ञान आणि वर्तनात बदल घडायला हवा. शिक्षणात चारित्र्यनिर्माण करणे जास्त महत्त्वाचे असले तरी चारित्र्यनिर्माण आणि कमाईक्षमता हे एकत्र गुंफणे आवश्यक आहे.

### आचार्यांचे महत्त्व

शिक्षकाचे ज्ञान, व्यक्तित्व, चारित्र्य, जीवनदृष्टी, प्रेम, संवेदनशीलता, ध्येयनिष्ठा, कर्तव्यतत्परता, न्यायबुद्धी, विवेक, राष्ट्रभक्ती, त्याच्या दैनंदिन आचारातून प्रकट व्हावयास हवेत. विद्यार्थी आपल्या निरीक्षक नजरेतून शिक्षकाकडे पाहत असतात. म्हणून शिक्षकाचे 'आचरण' आदर्शवत असावे. ही संकल्पना 'आचार्य' या संज्ञेतून व्यक्त होते.

### शिक्षण क्षेत्र- व्यवस्था

शिक्षणव्यवस्था आपल्या जीवनदृष्टीवरच आधारित असली पाहिजे. शिक्षणक्षेत्र हे विद्यार्थीकेंद्री आचार्यप्रधान असले पाहिजे. शिक्षणव्यवस्थेची मूलतत्त्वे अशी असावीत-

१- विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुयोग्य विकास करण्याची क्षमता व गुणवत्तावर्धन हेच निकष शिक्षणव्यवस्थेसंबंधी असावेत.

२- शिक्षणक्षेत्र न्यायपालिकेसारखे स्वायत्त असावे. समाजातील संस्था व सक्षम व्यक्तींनी शिक्षणसंस्था काढून हे क्षेत्र सुयोग्यरीतीने समाजाच्या आधारावर सरकारी मदतीशिवाय चालवावे.

३- दहावीपर्यंतचे शिक्षण सर्वांना मोफत मिळावे.

४- परिसर शाळा हे सर्वसाधारण तत्त्व असावे.

५- दहावीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतूनच व्हावे. हिंदी, संस्कृत व इंग्रजी यांची सुयोग्य जोड द्यावी

६- सुयोग्य नियमनाअंतर्गत कोणालाही शिक्षणसंस्था चालवता आली पाहिजे, शिक्षकांना स्वतःच्या शाळा काढण्यास प्रोत्साहन द्यावे.

७ परदेशी मालकीच्या शिक्षणसंस्थांना बंदी. पण सर्व जगातून ज्ञानाचे स्वागत. परदेशी तज्ज्ञांचेही आवश्यकतेनुसार स्वागत. जगातील नव्या शिक्षणप्रयोगांचा अभ्यास

८- आपली पारंपरिक संशोधनपद्धती ही अनेकदा प्रचलित पाश्चात्त्य पद्धतीपेक्षा जास्त समुचित ठरू शकते. तिचा प्रसार झाला पाहिजे.

९- समाजविज्ञानशास्त्रांचे (समाजशास्त्र, समाजमानसशास्त्र, अर्थशास्त्र, राजनीतिशास्त्र, मानववंशशास्त्र, अपराधशास्त्र) तातडीने भारतीयीकरण आवश्यक, कारण आपण अजूनही पाश्चात्त्यांची पाश्चात्त्य परिस्थितीसाठी लिहिलेली शास्त्रेच वापरत आहोत.

१०- वंचित तसेच स्त्रीवर्गाच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न आजही आवश्यक.

११- मागासवर्गांसाठी आजही आरक्षणाची आवश्यकता आहे. पण हळूहळू मागासवर्गाच्या प्रगतीबरोबर त्याचे प्रमाण कमी होत होत ते समाप्त व्हावे. आरक्षणाबरोबर व नंतरही अशा गटांसाठी क्षमतासंवर्धनाचे विशेष कार्यक्रम राबवावेत.

१२- अरविंद आश्रम, गुरुकुले, रामकृष्ण मिशन, शांतिनिकेतन, नयी तालीम, ज्ञानप्रबोधिनी व तत्सम भारतीय शिक्षणप्रयोगांतील आवश्यक व शक्य तेवढा भाग राष्ट्रीय शिक्षणप्रणालीत घ्यावा.

१३- बाहेरील तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींना शिक्षणपद्धतीतील अध्यापन, अनुभववर्धन इत्यादींत सहभागी करून घ्यावे.

१४- पालकांना शालेय शिक्षणव्यवस्थेत सहभागी करून घ्यावे आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ घ्यावा.

१५- गुणवान शिक्षकांना विशेष प्रोत्साहन द्यावे.

१६- शिक्षणव्यवस्थेचा सतत आढावा घेऊन सुयोग्य बदल करीत राहावे.

लेखक अभियांत्रिकी अधिस्नातक, व्यवस्थापन सल्लागार, तसेच स्वदेशी जागरण मंचाचे माजी अ. भा. सहसंयोजक आहेत
auraent@gmail.com

लोकसत्ता
Wed, 27 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67684359

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

सामना

उत्तरपत्रिका तपासणी वेगात; ७० टक्के उत्तरपत्रिकांचे काऊंटर स्कॅनिंग पूर्ण

### १० जून बारावी तर २० जूनपर्यंत दहावीचा निकाल

नियोजनानुसार कामकाज झाल्यास वेळ पाळणार

राज्य शिक्षण मंडळ अध्यक्षांची माहिती

मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी) – उत्तरपत्रिका तपासणीचे कामकाज बोर्डाच्या नियोजनानुसार पार पडल्यास बारावीचा निकाल १० जून तर दहावीचा निकाल २० जूनपर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे, अशी माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली. सध्या विभागीय शिक्षण मंडळांतर्गत उत्तरपत्रिकांची तपासणी जोरात सुरू असून निकाल तयार करण्यासाठी ७० टक्के उत्तरपत्रिकांचे काऊंटर स्कॅनिंगही पूर्ण झाले असल्याचे गोसावी यांनी सांगितले.

राज्यातील विनाअनुदानित शिक्षकांनी दहावी, बारावीच्या पेपर तपासणीवर बहिष्कार टाकला होता. विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी विनाअनुदानित शिक्षकांनी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासणीसाठी स्वीकारलेच नाहीत. काहींनी तर हे गठ्ठे बोर्डाकडे परत पाठवून दिले. त्यामुळे दहावी, बारावीच्या पेपर तपासणीवर परिणाम होऊन निकाल वेळेत जाहीर होईल का, असा प्रश्न बोर्डासमोर उभा राहिला होता, मात्र राज्य शिक्षण मंडळाच्या अचूक नियोजनामुळे पेपर तपासणीचे काम विनाअडथळा सुरू आहे.

तपासलेल्या उत्तरपत्रिका राज्य शिक्षण मंडळात जमा होण्याचे प्रमाण वाढले आहे. आता या उत्तरपत्रिकांच्या पहिल्या पानाचे बारकोडनुसार काऊंटर स्कॅनिंग करून एकूण गुण गोळा करण्यात येत आहे. त्यानंतर निकाल तयार केला जाणार आहे, असेही गोसावी यांनी सांगितले.

**१६ लाख ३९ हजार १७२ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेला नोंदणी केली होती. १५ मार्चपासून ही परीक्षा सुरू झाली. ५०५० मुख्य केंद्रे तर १६,३३४ उपकेंद्रांवर परीक्षा पार पडली.**

४ मार्चपासून सुरू झालेल्या बारावीच्या परीक्षेला राज्यभरातून १४ लाख ८५ हजार ८२६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यातील २ हजार ९९६ मुख्यकेंद्रे तर ६ हजार ६३९ उपकेंद्रे असे मिळून एकूण ९ हजार ६३५ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली.

#### *मुंबई विभागात अशी आहे उत्तरपत्रिकांची तपासणी*

*मुंबई विभागीय शिक्षण मंडळांतर्गत बारावीच्या एकूण १८ लाख ९२ हजार ९२९ उत्तरपत्रिका तपासणीसाठी आहेत. या उत्तरपत्रिका तपासण्यासाठी एकूण १६५१ मॉडरेट्स असून यापैकी ११५७ मॉडरेटर्सनी तपासलेल्या उत्तरपत्रिका बोर्डाकडे जमा केल्या आहेत, तर दहावीच्या ३३ लाख २० हजार २०७ एकूण उत्तरपत्रिका असून २६०५ मॉडरेट्सवर तपासणीची जबाबदारी आहे. त्यापैकी २०६७ जणांनी तपासलेल्या उत्तरपत्रिका जमा केल्या आहेत. उर्वरित मॉडरेट्सकडील उत्तरपत्रिका तपासणीचे काम काही दिवसांतच पूर्ण होईल, असे मुंबई विभागीय शिक्षण मंडळ सचिव डॉ. एस. आर. बोरसे यांनी सांगितले.*

Pune Edition
Apr 27, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

पुढारी

### पुणे विद्यापीठाचा सामंजस्य करार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाईफुलेपुणेविद्यापीठाची ललित कला केंद्र या गुरुकुलापासून सुरू असलेली कलेची वाटचाल आता अधिक समृद्ध होणार आहे.

विद्यापीठाने नुकताच शंभर वर्षे जुन्या अशा संगीतातील अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाशी सामंजस्य करार केला आहे.

या करारावर सोमवारी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, ललित कला केंद्राचे विभागप्रमुख डॉ. प्रवीण भोळे, अभिनेते राहुल सोलापूरकर, गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष पंडित विकास कशाळकर उपस्थित होते.

My Pune Edition
Apr 27, 2022 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# परीक्षा 'ऑफलाइन'च घ्या

## शिक्षणतज्ज्ञांचा सल्ला; सत्राला मुदत वाढविल्याने तयारीसाठी पुरेसा वेळ

पुणे, ता. २६ : "विद्यार्थ्यांनी स्वत:च्या हिताचा, भविष्यातील उपलब्ध संधींचा विचार करता ऑफलाइन परीक्षांना सहकार्य करायला हवे. विद्यापीठाने दुसरे सत्र वाढवून दिले असल्याने अभ्यासला पुरेसा वेळ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष परीक्षा देणे, हे भविष्यात नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता ऑफलाइन परीक्षेची तयारी करावी," असा सल्ला महाविद्यालयीन प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ यांनी दिला आहे.

मागील आठवड्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाने ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी समाज माध्यमावर (सोशल मीडिया) 'विद्यापीठाच्या परीक्षा ऑनलाइन व्हाव्यात,' अशी मागणी लावून धरली. दरम्यान, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी सोमवारी ऑनलाइन संवाद साधला. त्यावेळी सर्व विद्यापीठांतील परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, असे जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील प्राचार्य आणि शिक्षणतज्ज्ञांनी सत्र

पान ४ वर »



**७०५**
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये

**६,५०,०००** (अंदाजे)
परीक्षा देणारे विद्यार्थी

**२२४**
अभ्यासक्रमांची संख्या

**५,०००** (जवळपास)
प्रश्नपत्रिकांची संख्या

- **निकाल कधी लागणे अपेक्षित** : परीक्षेनंतर ३० ते ४५ दिवसांत
- **पेपर तपासणी सुरू कधी होते** : संबंधित विषयाचा पेपर झाल्यानंतर तिसऱ्या दिवसापासून
- **पुढील शैक्षणिक सत्र कधी सुरू होणार** : १ ऑगस्ट २०२२ पासून

### परीक्षा 'ऑफलाइन'च का?

१. सत्राची मुदत वाढविल्याने परीक्षेच्या तयारीसाठी मिळतोय पुरेसा वेळ
२. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील संधीचा विचार करता 'ऑफलाइन'चा पर्याय योग्य
३. कोरोनाचा लाट नसल्याने दरवर्षीप्रमाणे 'ऑफलाइन' परीक्षा शक्य
४. गेल्या दोन वर्षांपासून असलेला 'ऑनलाइन'चा शिक्का पुसणे गरजेचे

### परीक्षा घेताना ही काळजी घ्यावी

१. लांबलेले शैक्षणिक सत्र सुरळीत होण्यासाठी विद्यापीठाने पावले उचलावीत
२. परीक्षा सुरू असतानाच, दुसऱ्या बाजूला झालेले पेपर तपासणीची यंत्रणा उभी करावी
३. निकाल वेळेत लावण्याला प्राधान्य द्यावे
४. परीक्षा झाल्यानंतर पुढील सत्र वेळेत सुरू करावे

"कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन परीक्षा पद्धती केवळ तात्पुरती सोय म्हणून स्वीकारली होती. मुळात ऑनलाइन परीक्षा पद्धतीत अनेक त्रुटी राहतात, हे विद्यार्थ्यांनी समजून घ्यायला हवे. पारंपारिक पद्धतीने ऑफलाइन परीक्षेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा कस लागतो. विद्यापीठाने ऑफलाइन परीक्षा घेताना, त्यांच्या निकालात उशीर होऊ नये, म्हणून पेपर झाल्यानंतर लगेचच पेपर तपासणीची यंत्रणा सक्षम ठेवावी. खरंतर विद्यार्थ्यांनी स्वत:च्या हिताचा विचार करून ऑफलाइन परीक्षेचा स्वीकार करायला हवा.

– नंदकुमार निकम, अध्यक्ष, प्राचार्य फोरम

**विद्यार्थ्यांनो, तुम्हाला काय वाटते?**

शिक्षणतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना 'ऑफलाइन' परीक्षेचा स्वीकार करा, असा सल्ला दिला आहे. याबाबत तुम्हाला काय वाटते याबाबतचे मत आपल्या नावासह editor.pune@esakal.con या मेलवर किंवा ८४८४९७३६०२ या व्हॉट्सअप क्रमांकावर कळवा.

---

सकाळ

# परीक्षा 'ऑफलाइन'च घ्या

» पान १ वरून

परीक्षा ऑफलाइन होणेच विद्यार्थ्यांच्या हिताचे असल्याच्या मताला दुजोरा दिला. शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, "विद्यार्थ्यांनी भविष्यात उपलब्ध संधींचा विचार करता ऑफलाइन परीक्षेला सहकार्य करणे अपेक्षित आहे. विद्यापीठाने दुसरे सत्र पुरेसे वाढवून दिल्याने परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळणार आहे. त्यामुळे नोकरीच्या दृष्टीने ऑफलाइन परीक्षाच योग्य ठरेल."

**विद्यार्थी म्हणतात...**

- **जितेंद्र गवळी (नाशिक)** : मी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात आहे. दरवर्षी दोन सत्र होतात. परंतु विद्यापीठाने निर्णय उशिराने घेतल्यामुळे हिवाळी सत्र परीक्षा मार्च-एप्रिलमध्ये घेण्यात आली. आता उन्हाळी सत्रातील जवळपास ७० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन शिकवून झाला आहे, तर केवळ ३० टक्के अभ्यासक्रम प्रत्यक्ष कॉलेजमध्ये शिकविण्यात आला. त्यामळे उन्हाळी सत्रातील परीक्षा केवळ ऑनलाइन घ्याव्यात आणि त्यानंतर सर्व परीक्षा नियमितपणे ऑफलाइन घ्याव्यात.

- **किरण वीरकर (सोलापूर)** : एका शैक्षणिक वर्षात दरवर्षी हिवाळी आणि उन्हाळी अशी दोन सत्रे होतात. विद्यापीठाने परीक्षांबाबतच्या निर्णयात दिरंगाई केल्याने पहिल्या सत्रातील परीक्षा उशिराने झाल्या आहेत. हिवाळी सत्रातील परीक्षा मार्च-एप्रिलमध्ये झाल्या. आता उन्हाळी सत्रातील परीक्षा जूनमध्ये ऑफलाइन घेण्याचे नियोजन आहे. परंतु हे विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहे.

Pune, Pune-Today
27/04/2022 Page No. 4

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# कुलगुरू निवडीची प्रक्रिया लांबणीवरच

### निवड समितीची स्थापनाच नाही



म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर येत्या १७ मे रोजी निवृत्त होत आहेत. मात्र, अद्याप नव्या कुलगुरूंच्या निवडीसाठी समितीची स्थापनाच करण्यात आलेली नाही.

कुलगुरू निवड प्रक्रिया पुढील दोन ते तीन महिने सुरू राहणार असल्याने राज्यातील सर्वांत मोठ्या असणाऱ्या पुणे विद्यापीठाचा कारभार किमान तीन महिने प्रभारी कुलगुरूंमार्फत चालविला जाणार आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. करमळकर यांच्या निवृत्तीला अवघे काही दिवस राहिले आहेत. नव्या कुलगुरूंची निवड करण्यासाठी राज्यपालांकडून समिती स्थापन होणे गरजेचे असते. या समितीमध्ये पुणे विद्यापीठ, राज्यपाल आणि सरकारकडून प्रत्येकी एक सदस्य असतो. पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडून सदस्याची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र, विद्यापीठ कायद्यातील सुधारणांमुळे राज्यपाल आणि सरकार यांच्यात वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून सदस्याची नेमणूक होत नसल्याचे समोर आले आहे.

समितीसाठी आवश्यक सदस्य उपलब्ध होत नसल्याने राज्यपाल कार्यालयाकडून समिती जाहीर करण्यात अडचणी येत आहेत. मे महिन्यात राज्यपालांकडून समिती जाहीर झाल्यानंतर कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेला दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

### शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी साधारण एक हजार महाविद्यालये आणि संशोधन संस्था संलग्न आहेत. पुणे विद्यापीठ राज्यातील सर्वांत मोठे विद्यापीठ असून, सुमारे सात लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी शिकतात. अशा वेळी पुणे विद्यापीठाचा कारभार दोन ते तीन महिने प्रभारी कुलगुरूंमार्फत चालविला जाणार असल्यास त्याचा परिणाम विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होणार आहे. याच काळात परीक्षा होऊन निकाल जाहीर होतील; तसेच नव्या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठाला पूर्ण वेळ कुलगुरू मिळणार नसतील, तर पुणे विद्यापीठाच्या कारभारावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

> " सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने कुलगुरू निवड समितीसाठी सदस्याची निवड केली असून, त्यांची माहितीही पाठवली आहे. मात्र, राज्य सरकारकडून सदस्याचे नाव अद्याप जाहीर झालेले नाही. त्यामुळे राज्यपाल कार्यालयाकडून कुलगुरू निवड समितीची घोषणा झालेली नाही. या सर्व प्रकारामुळे कुलगुरूनिवडीची प्रक्रिया ठप्प झाली आहे. पुणे विद्यापीठाला नवे कुलगुरू जुलै किंवा ऑगस्टमध्ये मिळण्याची शक्यता आहे.
>
> – राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर १७ मे रोजी निवृत्त होणार आहेत. विद्यापीठ कायद्यानुसार नव्या कुलगुरूंची निवड प्रक्रिया सहा महिन्यांपूर्वी सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, कुलगुरू निवड समितीच अस्तित्वात नसल्याने दिवाळीच्या आसपास विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता आहे. प्रभारी कुलगुरूंमार्फत पुणे विद्यापीठाचा कारभार चालणार असल्यास त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होईल.
>
> – धनंजय कुलकर्णी, माजी सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 27.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

of his flat.

but the mobile number is not reachable."

# Online exams is history, return to classrooms to write your paper!

## Decision for all colleges affiliated to varsities taken at high-level meeting; many student welcome move

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

Students of colleges affiliated to all the universities across the state will have to appear for the forthcoming annual exams offline, said state minister for higher and technical education Uday Samant on Tuesday, putting to rest months of speculations.

The announcement was made following a high-profile meeting chaired by the minister with all the vice-chancellors (VCs). Majority of VCs welcomed the move, barring one or two.

University campuses have remained largely shut for the last two years, opening for offline classes only for brief periods. Now, as students prepare to get back to colleges for the exams, there are varied reactions as regards to the offline versus online exam debate.

Most of the students' unions are in favour of online examination, saying that the pandemic has adversely affected many students financially. They said the decision on offline exams will mean additional expenses for students from other cities, in terms of lodging and conveyance.



FILE PHOTO

Many oppose move, say students from EWS may find it diffcluit

Sandhya Sonwane, city president of Nationalist Student Congress, said, "We strongly oppose the decision on offline exams in all universities, and may organise a protest. Many students belonging to the Economically Weaker Sections (EWS) of society will find it difficult. Staying in a different city and making ends meet will be too expensive for them. For the past two years, all education institutions have functioned online. Why does the Savitribai Phule Pune University (SPPU) propose a fee hike? We will agitate against the unnecessary fees hike and offline exams."

National Students' Union of India (NSUI) president Satish Pawar said the decision to opt for offline exams is unfair. "As all students have studied in online mode, they did not get much time to prepare for the exams. We hope the minister will reverse the decision," he said.

Shubhankar Bachal, Pune Mahanagar Mantri of Akhil Bharatiya Vidyarthi Parishad (ABVP), said, "We welcome the government's decision. We had demanded offline exams in all universities. During the pandemic, online classes was the only option. Now with the situation improving, the offline exam will be helpful to all students."

### Offline exams from June 1 to July 15

The offline exams will be conducted from June 1 to July 15, said state minister for higher and technical education Uday Samant. "There will be a two-day gap after two papers."

Kalpesh Yadav, state secretary of Yuva Sena, said offline education and exams should resume now, as it will help students evaluate their knowledge and establish better rapport with professors.

Dr Arun Adsul, former VC and education expert, said, "I fully support the offline exam decision. It will be helpful for students to cross-check their knowledge acquired last year. However, the fee hike issue is under the university's jurisdiction."

Attempts by *Mirror* to contact SPPU VC Nitin Karmalkar, pro VC N S Umrani and registrar Prafulla Pawar proved futile.

Pune Mirror 27.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

{ SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY }

# Student unions oppose three-fold fee hike

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** Various student organisations and unions organised a meeting to protest the proposed three-fold hike in courses conducted on the Savitribai Phule Pune University (SPPU) campus.

With the offline mode kicking in from February this year, the varsity has increased fees of campus courses by three times from next academic year.

"The Covid pandemic since last two years has hit many students, mainly those from rural background.

The fee hike will be an additional burden for them. Many student unions came together and decided to soon hold a protest at the university campus," said Sandhya Sonawane, president, Nationalist Congress Party (NCP) Students Union Pune division.

Kuldeep Ambekar, president, Students Helping Hand organisation, said, "Many students are working at various places or at the university's earn and learn scheme to support themselves and manage expenses. They cannot afford to pay such high fees."

SPPU vice-chancellor Prof Nitin Karmalkar said, "We are still looking at the fee hike proposal and a final decision will be announced soon."



Various student organisations and unions organised a meeting on Tuesday to protest the proposed fee hike HT PHOTO

# MoU with Akhil Bhartiya Gandharv Mahavidyalaya

**PUNE:** In a bid to encourage students to learn new things about music, the Savitribai Phule Pune University (SPPU)on Tuesday signed an MoU with Akhil Bhartiya Gandharv Mahavidyalaya to start new courses and research programs in music.

The collaboration was done under the Lalit Kala Kendra department of SPPU and the century old Akhil Bhartiya Gandharv Mahavidyalaya. On this occasion SPPU vice-chancellor prof Nitin Karmalkar was present along with SPPU Innovation cell director Apurva Palkar, Lalit Kala Kendra head Pravin Bhole, Akhil Bhartiya Gandharv Mahavidyalaya president Pandit Vikas Kashalkar and vice-president Pandurang Mukhade.

"Under this collaboration we are going to have exchange of students, faculties between both the institutions. New courses will be developed in music field and projects will be launched. This MoU will benefit many students as Akhil Bhartiya Gandharv Mahavidyalaya has reached out to rural areas," said prof Karmalkar.

Hindustan Times 27.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचा आदेश**

# तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यासाठी समिती नियुक्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्यातील विद्यापीठांअंतर्गत पदवी अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती नियुक्त केली आहे. त्यानुसार तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यासाठीची योजना आणि आराखडा, राज्यभरात एक समान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा, सामान्य अध्यापनशास्त्राऐवजी विधायक अध्यापन शास्त्राचा वापर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा तयार करण्यात येणार असून त्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने राज्य शासनाला सादर केला. तातडीने हाती घ्यावयाचा किंवा किमान संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, मध्यम मुदतीचा किंवा मध्यम संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, दीर्घकालीन किंवा मोठी गुंतवणूक आवश्यक असलेला कार्यक्रम या स्वरुपात समितीने केलेल्या शिफारसींचे वर्गीकरण करण्यात आले. त्या अंतर्गत तीन वर्षांचा अभ्यासक्रम चार वर्षांच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतर करण्याची योजना आणि आराखडा तयार करणे, त्यासोबतच राज्यभरात एक समान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करणे, सामान्य अध्यापन शास्त्राऐवजी विधायक अध्यापन शास्त्राचा वापर करणे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्रसिद्ध केला आहे. मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, मुंबई विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. अजय भामरे, मुंबई विद्यापीठाचे प्रा. राजेश खरात, नांदेड विद्यापीठाचे डॉ. एल. एम. वाघमारे, डॉ. अजय टेंगसे आदी २१ सदस्यांचा समावेश आहे.

### समितीची कार्यकक्षा

- चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमासाठी अध्यापन पद्धती आणि परीक्षेसाठी समग्र योजना तयार करण्यासह प्रात्यक्षिक आणि प्रकल्प अभ्यास, मुख्य आणि वैकल्पिक विषयांअंतर्गत आणि बहि:स्थ प्रद्धतीने मूल्यमापन, गुणांकन आणि श्रेयांक पद्धती समाविष्ट असणे.
- चार वर्षे पदवी अभ्यासक्रमात तयार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मापदंड विचारात घेऊन अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या प्रत्येक विषयाची निश्चित उद्दिष्टे परिणामांसह नमूद करणे.
- चार वर्षे पदवी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक वर्षाची किमान कौशल्य पातळीसंदर्भात निश्चित मार्गदर्शक सूचना करणे.
- विद्यार्थ्यांना स्वप्रेरणेने ज्ञान संपादन करता येईल, नवोन्मेषी आणि सृजनशील संशोधक निर्माण होतील या दृष्टीने अभ्यासक्रमाचे स्वरूप निश्चित करणे. अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय आणि संशोधनपर आधारित राहण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना करणे.
- चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संशोधन घटक आणि औद्योगिक प्रशिक्षणासाठीच्या सूचना देणे, स्वयंरोजगारभिमुख आणि व्यवसायभिमुख अभ्यासक्रमांसाठी सूचना करणे.
- चार वर्षे अभ्यासक्रमाची एक समान शैक्षणिक संरचना निर्धारित करण्यासाठी आराखडा तयार करणे, त्यात मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट, श्रेयांक हस्तांतरण या संदर्भात शैक्षणिक संरचना ठरवणे.

लोकसत्ता Thu, 28 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67707918

---

**सकाळ**

# शुल्कवाढीविरोधात आंदोलनाचा इशारा

**पुणे, ता. २७ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक शुल्कात तिप्पट वाढ केली आहे. याचा आर्थिक फटका सर्वसामान्य विद्यार्थ्यांना बसतो आहे. त्यामुळे शैक्षणिक शुल्क कमी करण्यात यावे, या मागणीसाठी विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

शुल्कवाढीविरोधात आंदोलनासाठी विद्यार्थी काँग्रेस, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस, युवासेना, युक्रांद, पीएचडी संघर्ष समिती, स्टुडंट हेल्पिंग हँड या संघटना एकत्र आल्या आहेत. १८ मे रोजी कुलगुरूंचा कार्यकाळ संपणार आहे. त्यापूर्वी त्यांनी शुल्कवाढ कमी करावी. अन्यथा त्यांना हा निरोप आंदोलनाने दिला जाईल. असा पवित्रा या संघटनांनी विद्यापीठाच्या आवारात झालेल्या बैठकीत घेतला. या वेळी संध्या सोनवणे, सतीश पवार, सतीश गोरे, कुलदीप आंबेकर, सुरेश देवडे, सचिन पांडुळे, अमृता शिंदे, ओम बोंधले आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

कोरोनाची परिस्थिती निवळत असताना आता कुठे अनेक कुटुंबे आर्थिक संकटातून सावरू लागली आहेत. मात्र, याचा कोणताही विचार न करता विद्यापीठाने शैक्षणिक शुल्कात तिप्पट वाढ केली आहे. विद्यापीठाचे उत्पन्न कमी झाले आहे. दहा वर्षांनी फक्त १५ टक्के शुल्क वाढवले असे विद्यापीठ एकीकडे सांगते. तर दुसरीकडे विद्यापीठाच्या आवारात बांधकाम, संगीताच्या मैफली, लाखो रुपये खर्च करून ऐतिहासिक चित्रे कुलगुरूंच्या कार्यालयासमोर लावणे, यासाठी निधी खर्च केला जातो. मात्र, विद्यार्थ्यांचा विचार केला जात नाही. त्यामुळे ही शुल्कवाढ कमी करण्याची मागणी रास्त असल्याचे या संघटनांचे म्हणणे आहे.

Pune, Pune-Today
28/04/2022 Page No. 3

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

**विश्लेषण**

# कुलगुरू निवडीवरून संघर्ष का?

**संतोष प्रधान**

**बिगर भाजपशासित** राज्यांमधील लोकनियुक्त सरकारे आणि राज्यपाल यांच्यातील संघष दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालला आहे. महाराष्ट्र, पश्चिम बंगालप्रमाणेच तमिळनाडूतील द्रमुक सरकारने राज्यपालांच्या विरोधात आघाडीच उघडली आहे. तमिळनाडूतील १३ विद्यापीठांच्य कुलगुरू नियुक्तीचे अधिकार राज्य सरकारने स्वतःकडे घेण्याचे विधेयक विधानसभेत मंजूर झाले महाराष्ट्रातही गेल्या डिसेंबरमध्ये राज्यपालांच्या अधिकारांना कात्री लावणारे व कुलगुरू नियुक्तीचे अधिकार स्वतःकडे घेणारे विधेयक मंजूर करण्यात आले. अर्थात राज्यपालांनी या विधेयकाल अद्याप संमती दिलेली नाही. तमिळनाडू विधानसभेने विधेयक मंजूर केले असले तरी राज्यपालांची संमती मिळून त्याचे कायद्यात रूपांतर होणे कठीणच दिसते.

## तमिळनाडूत कुलगुरू निवडीबाबत कोणती विधेयके मंजूर केली?

महाराष्ट्राप्रमाणेच तमिळनाडूत प्रचलित पद्धतीनुसार १३ विद्यापीठांमध्ये कुलगुरूंची निवड ही कुलपती या नात्याने राज्यपाल करतात. कुलगुरूंच्या निवडीसाठी राज्यपालांकडून शोध समिती नियुक्त केली जाते. यात तज्ज्ञांचा समावेश असतो. याशिवाय समितीत राज्य शासनाचा एक प्रतिनिधी असतो. समितीकडून इच्छुकांचे अर्ज मागविले जातात. त्याची छाननी करून पात्र ठरणाऱ्यांन मुलाखतीकरिता पाचारण केले जाते. शोध समितीकडून तीन नावांची राज्यपालांना शिफारस केली जाते. यापैकी एकाची राज्यपाल कुलगुरू म्हणून नियुक्ती करतात. तमिळनाडू विधानसभेने मंजू केलेल्या विधेयकानुसार शोध किंवा निवड समितीने शिफारस केलेल्या तीन नावांपैकी एकाची कुलगुरू म्हणून राज्य सरकार निवड करणार आहे. याचाच अर्थ राज्यपालांच्या अधिकारांना कात्री लावून कुलगुरू निवडीचे सारे अधिकार तमिळनाडू सरकारने स्वतःकडे घेतले आहेत.

## बिगर भाजपशासित राज्यांचा आक्षेप काय आहे?

कुलगुरू निवडीचे अधिकार कुलपती या नात्याने राज्यपालांकडे असले तरी कुलगुरूंची निवड करताना राज्यपालांनी राज्य सरकारशी सल्लामसलत करण्याची प्रथा असते. तमिळनाडू विधानसभेत मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी याकडेच लक्ष वेधले. पण गेल्या काही वर्षांत ही परंपरा मोडीत काढण्यात आल्याचा स्टॅलिन यांचा आक्षेप आहे. केंद्रात भाजपचे सरकार सत्तेत आल्यापासून बिगर भाजपशासित राज्यांमध्ये भाजप किंवा रा. स्व. संघाशी संबंधितांची कुलगुरूपदी निवड केली जाते असा आक्षेप घेतला जातो. रा. स्व. संघाच्या विचारांशी संबंधित व्यक्तींची कुलगुरूपदी निवड करण्यास बिगर भाजपशासित राज्यांचा विरोध असतो.

## विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका काय?

कुलगुरूपदी पात्र आणि तज्ज्ञ व्यक्तीची निवड व्हावी ही विद्यापीठ अनुदान आयोगाची स्पष्ट भूमिका आहे. याशिवाय कुलपती या नात्याने राज्यपालांनी शोध समितीने शिफारस केलेल्या नावांमधून एकाची कुलगुरूपदी निवड करावी अशी उच्चशिक्षणाशी संबंधित कायद्यात तरतूद आहे.

## ... म्हणजे राज्य शासनाचा अधिकार अवैधच ठरणार ना?

नाही; कारण राज्ये निराळे कायदे करू शकतात! भाजपची सत्ता असलेल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांचे गृह राज्य असलेल्या गुजरातमध्ये कुलगुरू निवडीचे अधिकार हे राज्य शासनाकडे आहेत. याकडे तमिळनाडू विधानसभेतील चर्चेत द्रमुक सदस्यांसह मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी लक्ष वेधले. १९४९च्या गुजरात विद्यापीठ कायद्यानुसार कुलगुरूंची निवड ही शोध व निवड समितीने शिफारस केलेल्या तीन नावांमधून एकाची निवड राज्य सरकार करेल अशी तरतूद आहे यामुळे गुजरातमध्ये कुलगूरूंच्या निवडीत राज्य सरकारचा शब्द अंतिम असतो. तेलंगणातही हे अधिकार राज्य शासनाकडे आहेत. गुजरातमध्ये जे अधिकार राज्य शासनाला आहेत तेच अधिकार आम्हाला मिळावेत अशी महाराष्ट्र व तमिळनाडू सरकारांची भूमिका आहे. पश्चिम बंगालमध्ये २०१९ मध्येच ममता बॅनर्जी सरकारने कुलगुरू निवडीतील राज्यपालांच्या अधिकारांना कात्री लावली होती

## महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील बदलाची सद्यःस्थिती काय?

राज्य विधिमंडळाने डिसेंबरमध्ये विद्यापीठ कायद्यात सुधारणा करणारे विधेयक मंजूर केले होते यानुसार शोध व निवड समितीने शिफारस केलेल्या तीनपैकी एकाची कुलगुरू म्हणून निवड करण्याचे अधिकार राज्य शासनास प्राप्त होणार आहेत. तसेच उच्च व तंत्रशिक्षणमंत्री प्र-कुलगुरू असतील अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली. गेल्या डिसेंबरमध्ये विधिमंडळाने मंजूर केलेल्या या विधेयकाला राज्यपालांची अद्याप संमती मिळालेली नाही. राज्यपालांच्या संमतीशिवाय कायदा अस्तित्वात येत नाही. राज्यपालांनी विधेयक फेटाळलेले नाही वा अद्याप तरी विधानसभेकडे परत पाठविलेले नाही. विद्यापीठाबरोबरच सहकार कायद्यात दुरुस्तीचे मंजूर झालेले विधेयक फेटाळून राज्यपालांनी विधानसभेकडे परत पाठविले होते. यावरून राजभवनने विद्यापीठ सुधारणा विधेयकाव काही निर्णय घेतलेला दिसत नाही. एकीकडे राज्यपालांच्या अधिकारांना कात्री लावण्यात येत असतानाच दुसरीकडे राज्यपालांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या निवडीसाठी प्रक्रियाही सुरू केली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांची मुदत लवकरच संपुष्टात येत आहे. नव्या कुलगुरूंच्या निवडीसाठी शोध समिती स्थापन करण्यात येत असून, त्यावर तज्ज्ञांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. आयआयटी बनारसचे संचालक प्रमोद कुमार जैन यांची शोध समितीचे सदस्य म्हणून नियुक्तीही करण्यात आली. अन्य दोन सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू आहे. म्हणजे महाविकास आघाडी सरकारने कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेत बदल केला असला तरी राज्यपालांनी जुन्याच पद्धतीने कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू केली आहे. यावरून राज्यपाल विद्यापीठ कायदा सुधारणा विधेयकाला संमती देणार नाहीत हे स्पष्टच होते.

## मंजूर विधेयकाचे भवितव्य काय असेल?

विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकाला ठरावीक कालमर्यादेत संमती देण्याचे बंधन राज्यपालांवर नाही. राज्यपाल हे विधेयक दुरुस्त्या सुचवून विधानसभेकडे परत पाठवू शकतात विधानसभेने पुन्हा विधेयक मंजूर केले तर त्याला राज्यपालांना संमती द्यावी लागते. मात्र अशा कायद्यामुळे केंद्रीय कायद्याला बाधा किंवा कायदेशीर अडथळा येत असल्यास राज्यपाल ते विधेयक विचारार्थ राष्ट्रपतींकडे पाठवू शकतात.

santosh.pradhan@expressindia.com

लोकसत्ता Thu, 28 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67715116

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

## शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणार

पुणे, दि. २७ - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची -२०२० ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १२ अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली आहे.

नवी दिल्ली येथील वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषदेचे माजी महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल गट स्थापन करण्यात आला होता. या समितीने आपला अहवाल शासनास ३० जून २०२१ रोजी सादर केला आहे. मुंबईतील श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या अध्यक्ष डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. या समितीची कार्यकक्षाही निश्चित करण्यात आली आहे. समितीने शासनाकडे अहवाल सादर करण्यास तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे कार्यासन अधिकारी प्रविणकुमार पवार यांनी आदेश दिले आहेत.

प्रभात Thu, 28 April 202 https://epaper.ep

लोकमत

## चार वर्षांचा अभ्यासक्रम कसा राबवणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यातील विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक शिफारस करण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. तीन वर्षांचा अभ्यासक्रम चार वर्षांचा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशी करावी, राज्यातील ५० वर्षे जुन्या शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा कसा देता येईल, एकल, समूह किंवा पदवी देणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांच्या स्थापनेसाठी काय करावे आदी प्रमुख मुद्द्यांवरील अहवाल या समितीच्या माध्यमातून शासनाला सादर केला जाणार आहे. त्यात विविध विद्यापीठांतील कुलगुरू व अधिष्ठात्यांचा समावेश आहे.

पारंपरिक अभ्यासक्रम तीन वर्षांचा आहे. तो चार वर्षांचा करावा लागणार आहे. मात्र, हा अभ्यासक्रम राबविताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर यांचा त्यात समावेश आहे.

शासनाकडून शैक्षणिक धोरणासह इतर शैक्षणिक कामकाजात बदल करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. परंतु, केवळ समित्या स्थापन करून उपयोग नाही, तर या समित्यांनी दिलेल्या शिफारशींची अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा शिक्षण तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

Pune Main
Page No. 4 Apr 28, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

पुढारी

# पदवी अभ्यासक्रमातील बदलासाठी आता समिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्यातील विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती नियुक्त केली आहे.



तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यासाठीची योजना आणि आराखडा, राज्यभरात एक समान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात येणार असून, त्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे डॉ. पराग काळकर, मुंबई विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.अजय भामरे मुंबई विद्यापीठाचे प्रा. राजेश खरात, नांदेड विद्यापीठाचे डॉ.एल. एम. वाघमारे, डॉ. अजय टेंगसे आदी २१ सदस्यांचा समावेश आहे. समितीकडून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी अध्यापन पद्धती आणि परीक्षेसाठी समग्र योजना तयार करणे, या योजनेत प्रात्यक्षिक आणि प्रकल्प अभ्यास तसेच मुख्य व वैकल्पिक विषयांना अंतर्गत आणि बहि:स्थ प्रतीने मूल्यमापन गुणांकन आणि श्रेयांक पद्धती समाविष्ट असणे, चार वर्षे पदवी अभ्यासक्रमात तयार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मापदंड विचारात घेऊन अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या प्रत्येक विषयाची निश्चित उद्दिष्टे परिणामांसह नमूद करणे, चार वर्षे पदवी अभ्यासक्रमासाठी प्रत्येक वर्षाची किमान कौशल्य पातळीसंदर्भात निश्चित मार्गदर्शक सूचना करणे, विद्यार्थ्यांना स्व प्रेरणेने ज्ञान संपादन करता येईल नवोन्मेषी आणि सृजनशील संशोधक निर्माण होतील यादृष्टीने अभ्यासक्रमाचे स्वरूप निश्चित करणे, अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय आणि संशोधनपर आधारित राहण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना करणे, चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संशोधन घटक आणि औद्योगिक प्रशिक्षणासाठीच्या सूचना देणे, अभ्यासक्रम स्वयंरोजगारभिमुख व व्यवसायाभिमुख राहण्याबाबतच्या सूचना करणे, चार वर्षे अभ्यासक्रमाची एक समान शैक्षणिक संरचना निर्धारित करण्यासाठी आराखडा तयार करणे, त्यात मल्टिपल एन्ट्री एक्झिट, श्रेयांक हस्तांतरण या संदर्भात शैक्षणिक संरचना ठरवणे, अशी समितीची कार्यकक्षा आहे.

Pune Edition
Apr 28, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

पुढारी

# तज्ज्ञ समिती ठरविणार बदल

**शिक्षण संस्थांसाठी निर्णय**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील ५० वर्षे जुन्या शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा, एकल, समूह किंवा पदवी देणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांची स्थापना यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती नियुक्त केली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठीच्या शिफारसीचा अहवाल सादर करण्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने राज्य शासनाला सादर केला. तातडीने हाती घ्यावयाचा किंवा किमान संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, मध्यम मुदतीचा किंवा मध्यम संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, दीर्घकालीन किंवा मोठी गुंतवणूक आवश्यक असलेला कार्यक्रम या स्वरूपात समितीच्या शिफारसींचे वर्गीकरण करण्यात आले. त्यानंतर आता एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, रुसाचे डॉ. विजय जोशी, मुंबई विद्यापीठाचे सदस्य वैभव थोरात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी १२ सदस्यांचा समावेश आहे.

एकीय किंवा समूह विद्यापीठांचे पदवी प्रदान करणाऱ्या बहुशाखीय स्वायत्त महाविद्यालयांमध्ये रूपांतर करण्यासाठी समितीकडून शिफारसी सादर केल्या जातील.

Pune Edition
Apr 28, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# शैक्षणिक धोरणासाठी नेमली समिती

**मुंबई :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत एकसमान शैक्षणिक आराखडा तयार करणे, तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाकडून चार वर्षांच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतर करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आराखडा तयार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली १९ सदस्य व एक सदस्य सचिव यांची समिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून स्थापन करण्यात आली आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल गट स्थापन करण्यात आला आहे. या गटाच्या शिफारशीनुसार ही समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या समितीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, डॉ. मनोहर चासकर, डॉ. अंजली कुरणे, मुंबई विद्यापीठातील डॉ. अजय भामरे, गोंडवाना विद्यापीठातील डॉ. एस बी. रेवटकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. अजय टेंगसे, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील डॉ. भालचंद्र वायकर, रासायनिक तंत्रज्ञान संस्थेतील प्रा. श्रीरंग जोशी, रुसाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. विजय जोशी अशा मान्यवरांचा समावेश आहे.

Pune Main
Page No. 9 Apr 28, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

लोकमत



# ऑफलाइन परीक्षांना सामोरे जाताना...

**कोरोना काळापासून तब्बल दोन वर्षे सुरु असलेल्या ऑनलाइन स्वरूपाच्या परीक्षांना यंदाच्या सत्रात पूर्णविराम मिळाला असून लवकरच शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी ही पारंपरिक स्वरूपाची पण त्या सवयीचा खंड पडलेल्या परीक्षेला सामोरे जाताना थोडीफार गडबड, भीती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लिखाणाची सवयच तुटल्यामुळे त्याचा अंतिम परिणाम विद्यार्थ्यांच्या एकत्रित गुणांवर होऊ शकतो. हे टाळण्यासाठी काही गोष्टींची पूर्वतयारी, काही क्लृप्ती अमलात आणल्यास विद्यार्थ्यांना त्याचा निश्चित फायदा होऊ शकतो.**

सगळ्यात आधी आपण आपल्या परीक्षा व्यवस्थेची एक गंमत समजून घेऊ. आपल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये आपल्याला शिक्षक 'मौखिक' म्हणजेच 'लेक्चर' पद्धतीमध्ये शिकवितात; आपण दिवसभर प्राध्यापकांचे 'ऐकत' असतो आणि त्यामानाने वर्गात लिखाण मात्र अगदीच कमी किंवा करताच नाही. परीक्षेच्या आधी आपण 'अभ्यास' म्हणून जास्त करून 'वाचन' करतो आणि यात सगळ्यात कमी वेळ लिखाणास मिळतो. बरेच विद्यार्थी सगळ्यात पहिल्यांदा परीक्षेच्या दिवशीच लिहिते होतात आणि इथेच मुलं चुकतात! जर आपली शिक्षण व परीक्षा पद्धती सरतेशेवटी आपल्या 'लिहिते' आणि 'आठवते' झालेल्या गोष्टीवरच आपल्याला गुण देत असेल तर आपण सगळ्यात जास्त सराव



हा लिखाणाचा करायला हवा की, नाही? लिखाण या गोष्टीचा कितीही कंटाळा आला तरी सरावाने हे सहज शक्य आहे. खाली दिलेल्या काही उपाययोजना करून या वेळेस परीक्षेला सामोरे जाऊ शकता.

- दिवसभर आपण ज्या विषयांचे तास / व्याख्याने ऐकतो त्यात आपल्याला नक्की काय समजलं याचे एक पान आपल्या स्वतःच्या शब्दात लिहायचे.
- शिकविलेले विषय, मुद्दे , आकृत्या, प्रमेय परीक्षेत कशा पद्धतीने विचारली जातात हे समजून उत्तरे लिहिण्याचा सराव करणे.
- उत्तरे लिहिताना शब्द आणि वाक्य यांचा कंजूसपणा अजिबात करायचा नाही. आपण लिहिलेले हे परीक्षक नावाची व्यक्ती वाचणार आहे याचे भान ठेवावे
- सविस्तर उत्तरे लिहिताना शक्यतो उदाहरणे देऊन संकल्पना स्पष्ट करावी
- समाज माध्यमांवरचे अनियंत्रित,अशुद्ध लिखाण करून आपली भाषा आणि तिचा दर्जा खालावला आहे, तर समाजमाध्यमी भाषा उत्तरे लिहिताना वापरू नये.
- कोणत्याही सविस्तर उत्तराचे तीन भाग करावेत. आधी ओळख, मुख्य मुद्दा आणि शेवटी अनुमान अशा स्वरूपात लिहिल्यास उत्तराची स्पष्टता अधिक जाणविते.

एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की,आपण गेली दोन वर्षे जरी 'ऑनलाइन' या पर्यायाचा आधार घेतला असला तरी ते शिक्षणाचे साध्य अजिबात नाही. त्या प्रकारामुळे मुलांची परीक्षेबाबतची सकारात्मक भीती आणि गांभीर्य दोन्हींनी कमी झाल्यामुळे याचा परिणाम मुळातच 'कशाला अभ्यास करायचा ?' या मानसिकतेत झाले. या प्रकारामुळे विषयाची गोडी, खोली, आणि मजा हरवून बसण्याची शक्यता निर्माण झाली. आज मुले म्हणत आहेत की, ऑनलाइन बराच आहे की,जास्त मार्क मिळतात आणि अभ्यास करण्याची गरजच नाही कारण 'लिखाण ' करायचं नाही. पण याचे दूरगामी परिणाम आज आपल्याला कळणार नाहीत.

परीक्षा तर होऊन जातील पण खऱ्या आयुष्यात आपल्याला त्या ज्ञानाचा उपयोग करता येणार नाही,नोकरी मिळताना, मुलाखतीस सामोरे जाताना आपले अज्ञान उघड होऊ शकते. मला खूप गुण मिळाले आणि मला नोकरी नाही याचा तुमच्या मनावरती गहिरा परिणाम होऊ शकतो. या सगळ्याचे भान असावे. या परीक्षांपेक्षा आयुष्य नावाची परीक्षा खूप मोठी आहे आणि तिथे मात्र कसलीही पळवाट नाही आता अजिबात वेळ न दवडता आत्तापासूनच लिहिते व्हा..!



**प्रा. स्वप्निल कांबळे**
माध्यम तज्ज्ञ

Hello Pune
Page No. 7 Apr 28, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# तीनऐवजी चार वर्षांचे कोर्स

## सरकारच्या समितीत पुणे विद्यापीठाच्या अधिष्ठात्यांचा समावेश

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमांचा कालावधी हा चार वर्षांचा करण्यासाठी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. या समितीकडून आराखडा आणि योजना तयार करण्यासोबतच एकसमान शैक्षणिक अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात येणार आहे. समितीला आपला अहवाल तीन महिन्यांच्या आत विभागाकडे सादर करायचा आहे. त्यामुळे कला, वाणिज्य, आर्ट्स शाखांचे पदवी अभ्यासक्रम आगामी काळात चार वर्षांचे होण्याची शक्यता आहे.

शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने राज्य सरकारला सादर केला. त्यानुसार तातडीने हाती घ्यावयाचा कार्यक्रम, मध्यम मुदतीचा आवश्यक कार्यक्रम, दीर्घकालीन गुंतवणूक आवश्यक असलेला कार्यक्रम या स्वरूपात समितीच्या शिफारशींचे वर्गीकरण करण्यात आले. त्यानुसार या समितीचा निर्णय घेण्यात आला आहे. या समितीला सामान्य अध्यापनशास्त्राऐवजी विधायक अध्यापनशास्त्राचा वापर करणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचा आराखडा तयार करणे, याबाबत उपाययोजना तयार करण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. एकूण २१ सदस्यीय समितीमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, मानव्य विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली करणे आणि वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर यांचा समावेश आहे.

ही समिती चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमासाठी अध्यापन पद्धती व परीक्षेसाठी समग्र योजना तयार करणार आहे. या समग्र योजनेत सैद्धांतिक, प्रात्यक्षिक आणि प्रकल्प अभ्यास; तसेच मुख्य आणि वैकल्पिक विषयांना अंतर्गत व बहिस्थ पद्धतीने मूल्यमापन गुणांकन आणि श्रेयांक पद्धतीचा समावेश राहणार आहे. चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम तयार करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मापदंडांचाही विचार करून अभ्यासक्रमात समाविष्ट केलेल्या प्रत्येक विषयाची निश्चित उद्दिष्ट्ये परिणामांसह नमूद करण्यात येतील. पदवी अभ्यासक्रम तयार करताना प्रत्येक वर्षाची किमान कौशल्य पातळी काय असावी, याबाबत निश्चित मार्गदर्शक सूचना देण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्वप्रेरणेने ज्ञानसंपादन करता येईल, नवोन्मेषी आणि सर्जनशील संशोधक निर्माण होतील यासाठी अभ्यासक्रमाचे स्वरूप निश्चित करणार असल्याची माहिती निर्णयाद्वारे दिली आहे.



### समिती काय करणार?

- चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संशोधन घटक व औद्योगिक प्रशिक्षण कसे असेल, याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात येतील.
- अभ्यासक्रम स्वयंरोजगाराभिमुख व व्यवसायाभिमुख कसा राहील, याबाबत मार्गदर्शक करणार.
- मल्टिपल एंट्री-एक्झिट व श्रेयांक हस्तांतर (क्रेडिट ट्रान्स्फर) संदर्भात शैक्षणिक संरचनेबाबत समावेश असेल.

Maharashtra Times 28.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### जुन्या संस्थांना विद्यापीठाचा दर्जा

**तीन महिन्यांत शिफारशी सादर करण्याचे बंधन**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील ५० वर्षे जुन्या शिक्षण संस्थांना एकल किंवा समूह विद्यापीठाचा दर्जा देण्यासाठी; तसेच पदवी देणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांची स्थापन करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखालील या समितीकडून उच्च शिक्षण संस्थांचा भविष्यवेधी आराखडा, अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक उत्कृष्टता केंद्राची स्थापनेसाठीच्या शिफारशींचा अहवाल येत्या तीन महिन्यांत विभागाला सादर करावा लागणार आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून, राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल सरकारला सादर केला. या समितीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, 'रुसा'चे प्रकल्प संचालक डॉ. विजय जोशी, मुंबई विद्यापीठाचे अधिसभा सदस्य वैभव थोरात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार अशा १२ सदस्यांचा समावेश आहे.

ही समिती उच्च शिक्षण संस्थांचे एकीय किंवा समूह विद्यापीठ, पदवी प्रदान करणाऱ्या बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्थांमध्ये रूपांतरित करण्यासाठी आवश्यक पात्रता, निकषांचा आराखडा मार्गदर्शक तत्त्वांसह तयार करणार आहे. उच्च शिक्षण संस्थांचे संशोधन विद्यापीठांमध्ये आणि अध्यापन विद्यापीठांमध्ये रूपांतर होण्यासाठी मानांकनाची पद्धती, क्रमवारिता पद्धती काय असावी, यासाठीची यंत्रणा तयार करण्यात येणार आहे. राज्यातील ज्या शैक्षणिक संस्था किंवा महाविद्यालयांना ५० वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा महाविद्यालयांना विद्यापीठाचा दर्जा बहाल करण्यासाठी नियमावलीचे निकष निश्चित करण्यासाठी समिती आराखडा तयार करणार आहे. या आराखड्यात शैक्षणिक उत्कृष्टता, प्रशासकीय अनुभव आणि प्रज्ञासन क्षमता, आर्थिक सक्षमता, विद्यार्थी नोंदणी, मानांकनाचा इतिहास, पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएचडी पदवी आदी अभ्यासक्रमांचा समावेश राहणार आहे. नामवंत माजी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाविषयीचा दृष्टिकोन, नोकरी व्यवसाय मार्गदर्शन केंद्रांची प्रगती, महाविद्यालयाविषयी उच्चस्तरीय निरीक्षणे व दृष्टिकोन, शिक्षकांची गुणवत्ता किंवा गुणवत्ताधारक शिक्षक, पदवीचा निकाल, महाविद्यालयाचे उद्दिष्टे व भविष्यकालीन योजना, विभागाच्या योजना अशा मानकांचा समावेश राहणार आहे.

**सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात सुधारणा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदींनुसार सध्याच्या पद्धतींमध्ये बदल करण्यासाठी सार्वजनिक विद्यापीठ कायदा आणि अन्य अधिनियमांत आवश्यक सुधारणा, शैक्षणिक संस्थांच्या अधिकार क्षेत्राबाबत पुनर्विचार आदींबाबत शिफारसी करण्याबाबतही सरकारच्या नमूद करण्यात आले आहे.

Maharashtra Times 28.4.2022

### प्राध्यापक भरतीचे आश्वासन

**पुणे :** राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहायक प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक व प्रयोगशाळा सहायकांची भरती करण्याचे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाला नुकतेच दिले.

समितीद्वारे आयोजित 'उच्चशिक्षित बेरोजगारांची वारी, बारामतीच्या दारी-सत्याग्रह २'ची दखल उदय सामंत यांनी घेतली. त्यानंतर सामंत यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात समितीच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अकृषी विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील सहायक प्राध्यापक, शारीरिक शिक्षण संचालक व प्रयोगशाळा सहायकांची भरती १०० टक्के करावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन सामंत यांनी दिल्याचे प्रा. सुरेश देवढे पाटील यांनी सांगितले. शिष्टमंडळात डॉ. परमेश्वर पौळ, डॉ. प्रमोद तांबे, डॉ. विश्वास देशमुख, डॉ. संदीप टिळे आणि प्रा. ओंकार कोरवले यांचा सहभाग होता.

Maharashtra Times 28.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# State moves to switch to 4-year bachelor's degree

Yogita.Rao@timesgroup.com

**Mumbai:** The four-year bachelor's degree may soon become a reality in the state with the higher education department setting up a committee to draw up guidelines for the transition from the existing three-year programme. The National Education Policy (NEP) 2020 recommends four-year undergraduate degrees with multiple entry and exit options.

In what could be seen as a step towards the implementation of NEP in the state, the department formed two committees to study its provisions and devise a roadmap on Tuesday. They are expected to submit their report in three months.

### REPORTS EXPECTED IN 3 MONTHS

**Key Objectives Of The NEP Committees**

- To determine eligibility criteria for autonomous colleges to be converted into degree-awarding entities
- Recommendations to ensure universities offer multidisciplinary education to students
- Devising structure for academic credit transfers
- Determining ways in which multiple entry and exit points in the four-year degree programme could be implemented
- Recommending changes in the Maharashtra Public Universities Act, 2016, for NEP implementation



The other committee will lay down policy for converting institutions with proven track records into universities, giving degree-awarding status to autonomous colleges offering multidisciplinary programmes and creating teaching and research-intensive universities. Both committees will elaborate on guidelines recommended in the Mashelkar committee report on NEP submitted last year.

A task force was formed under scientist and academician Raghunath Mashelkar in October 2020. In its report, the task force recommended implementation of NEP in three phases — short-, long- and medium-term — based on the resources required. Both the committees will be looking into the short-term goals set by the task force.

The 21-member panel which will look at the transition to four-year undergraduate degree will be headed by Mumbai University's pro-vice-chancellor Ravindra Kulkarni. The four-year programme will also have a mandatory research and industrial training component. The panel is expected to frame the norms based on guidelines by UGC.

The Times of India 28.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# उच्चशिक्षण संस्थांमध्ये बदलांसाठी समिती

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अंमलबजावणीची तयारी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : राज्यातील ५० वर्षे जुन्या शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा, एकल, समूह किंवा पदवी देणाऱ्या स्वायत्त महाविद्यालयांची स्थापना, उच्च शिक्षण संस्थांचा भविष्यवेधी आराखडा, अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक उत्कृष्टता केंद्राची स्थापना या साठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तज्ज्ञ समिती नियुक्त केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तील तरतुदींची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठीच्या शिफारशींचा अहवाल सादर करण्यासाठी समितीला तीन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करून राज्यात अंमलबजावणी करण्याबाबतचा अहवाल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या समितीने राज्य शासनाला सादर केला. तातडीने हाती घ्यावयाचा किंवा किमान संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, मध्यम मुदतीचा किंवा मध्यम संसाधने आवश्यक असलेला कार्यक्रम, दीर्घकालीन किंवा मोठी गुंतवणूक आवश्यक असलेला कार्यक्रम या स्वरूपात समितीच्या शिफारशींचे वर्गीकरण करण्यात आले. त्यानंतर आता एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, रुसाचे प्रकल्प संचालक डॉ. विजय जोशी, मुंबई विद्यापीठाचे अधिसभा सदस्य वैभव थोरात, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार आदी बारा सदस्यांचा समावेश आहे.

एकीय किंवा समूह विद्यापीठांचे पदवी प्रदान करणाऱ्या बहुशाखीय स्वायत्त महाविद्यालयांमध्ये रुपांतर करण्यासाठी आवश्यक पात्रता, निकषांचा मार्गदर्शक तत्त्वांसह आराखडा, उच्च शिक्षण संस्थांचे संशोधनाधिष्ठित आणि अध्यापनाधिष्ठित विद्यापीठांमध्ये रूपांतर होण्यासाठी मानांकन पद्धती, क्रमवारिता पद्धतीची यंत्रणा निश्चिती, ५० वर्षे पूर्ण झालेल्या उच्च शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्यासाठीचे नियम, निकष, मानके, पात्रतेचे निकष निश्चित करण्याचा आराखडा, श्रेणीबद्ध मानांकन, श्रेणीबद्ध स्वायत्तता आणि संलग्नीकरण रद्द करण्यासाठीच्या प्रक्रियेच्या मार्गदर्शक सूचना, खुले दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाइन कार्यक्रमाच्या नियमांची शिफारस, अध्ययन अध्यापनासाठी शैक्षणिक उत्कृष्टता केंद्राची स्थापना करण्याची योजना या बाबत समितीकडून शिफारशी अहवालाद्वारे सादर केल्या जातील.

### विद्यापीठ अधिनियमांत सुधारणा

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींनुसार सध्याच्या पद्धतीमध्ये बदल करण्यासाठी विद्यापीठ अधिनियम २०१६ आणि अन्य अधिनियमांत आवश्यक सुधारणा, शैक्षणिक संस्थांच्या अधिकार क्षेत्राबाबत पुनर्विचार या बाबत शिफारशी करण्याबाबतही शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Fri, 29 April 2022
https://epaper.loksatta.com/c/

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# शुल्कवाढीवरून गोंधळाची स्थिती

**शैक्षणिक शुल्क वाढविले नसल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट तर विद्यार्थी संघटना मात्र आक्रमक**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कॅम्पसमधील शैक्षणिक विभागातील विविध अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्कात तिप्पट वाढ केल्याच्या कारणावरून विद्यार्थी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.



याउलट विद्यापीठाने अद्यापपर्यंत कोणतीही शुल्क वाढ केली नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शुल्कात वाढ झाली आहे की नाही, यावरून गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. विद्यापीठाने शैक्षणिक शुल्कात तिपटीने वाढ केल्याची तक्रार विविध विद्यार्थी संघटनांनी विद्यापीठ प्रशासनाकडे केली आहे. विद्यापीठाने त्वरित शुल्क वाढ मागे घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. अन्यथा येत्या चार-पाच दिवसांत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विद्यार्थी संघटनेने दिला आहे. खुद्द कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी तीन दिवसांपूर्वी विद्यापीठाचे उत्पन्न घटल्याने शुल्कवाढ करावे लागले आहे, असे सांगितल्याचे विद्यार्थी संघटनांचे म्हणणे आहे. त्यामुळे शुल्कवाढवरून संभ्रम वाढला आहे. दरम्यान, विद्यापीठाने कोणतीच शुल्कवाढ केली नसल्याचे शैक्षणिक प्रवेश विभागाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. तसेच करोनाच्या काळात गेली दोन वर्षे कोणतीचा शुल्कवाढ न करता विद्यापीठाने विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे, असेही विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

> विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने कुठल्याही प्रकारच्या शैक्षणिक शुल्क वाढ केलेली नाही. विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कुठलाही प्रकारचा आर्थिक ताण कसा कमी करता येईल. याबाबत नेहमीच सकारात्मक भूमिका राहिलेली आहे. विद्यापीठासमोर कुठल्याही प्रकारे शैक्षणिक शुल्क वाढ करण्याचा कुठलाही प्रस्ताव नसून आहे त्या शुल्का मध्येच विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कुठल्याही प्रकारचा गैरसमज न करता शिक्षणासाठी सर्व प्रकारची मदत करण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध आहे.
>
> **– राजेश पांडे**, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

प्रभात Fri, 29 April 2022
https://epaper.eprabhat.net/c/67736466

---

पुढारी

# कारभार लवकरच प्रभारी कुलगुरूंच्या हाती

## कुलगुरू निवड प्रक्रियेला चार महिन्यांचा कालावधी; अद्याप समितीची स्थापनाच नाही

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर येत्या १७ मे रोजी निवृत्त होत आहेत. मात्र, अद्याप नव्या कुलगुरूंच्या निवडीसाठी समितीची स्थापनाच करण्यात आलेली नाही.

पुढारी वॉच

कुलगुरू निवड प्रक्रियेला तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्वांत मोठ्या पुणे विद्यापीठाचा कारभार किमान तीन महिने प्रभारी कुलगुरूंच्या हाती जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. कुलगुरू डॉ. करमळकर यांच्या निवृत्तीला अवघा वीस दिवसांचा कालावधी शिल्लक आहे.



नव्या कुलगुरूंची निवड करण्यासाठी राज्यपालांकडून समिती स्थापन होणे गरजेचे असते. या समितीत पुणे विद्यापीठ, राज्यपाल आणि सरकारकडून प्रत्येकी एक सदस्य असतो. या प्रक्रियेला विलंब होऊ नये, यासाठी पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडून सदस्याची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र, विद्यापीठ कायद्यातील सुधारणांमुळे राज्यपाल आणि सरकार यांच्यात वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून सदस्याची नेमणूक करण्यात येत नसल्याचे उघडकीस आले आहे. मे महिन्यात राज्यपालांकडून समिती जाहीर झाल्यानंतर कुलगुरू पदासाठी अर्ज मागविणे, अर्ज पडताळणी करणे, त्यानंतर पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यातून पाच नावे निवडणे, या संपूर्ण प्रक्रियेला दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

> राज्य शासनाने विद्यापीठ कायद्यातील जो बदल सुचवलेला आहे, तो कायदा राज्यपालांकडे प्रलंबित आहे. जोपर्यंत तो कायदा अमलात येत नाही, तोपर्यंत जुन्या कायद्याप्रमाणे कामकाज करणे अपेक्षित आहे, परंतु ते होत नसल्यामुळे कुलगुरू निवडप्रक्रियेला त्याचा फटका बसत आहे. कुलगुरू निवडीच्या प्रक्रियेला साधारण तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठाला नवे कुलगुरू जुलै किंवा ऑगस्टमध्ये मिळण्याची शक्यता असून, तोपर्यंत प्रभारी कुलगुरूमार्फत विद्यापीठाचा कारभार पाहावा लागणार आहे. प्रभारी कुलगुरूंमार्फत पुणे विद्यापीठाचे कामकाज करणे योग्य नाही. त्यामुळे शासनाने पुढाकार घेऊन त्वरित प्रक्रिया सुरू करावी.
>
> **- राजेश पांडे,** सदस्य, व्यवस्थापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Edition
Apr 29, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

पुढारी

# मराठी सोशल मीडिया संमेलन आजपासून

### उद्घाटनाला सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दुसऱ्या मराठी सोशल मीडिया संमेलनाला शुक्रवारी (दि.२९) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात सुरुवात होत आहे. या संमेलनात विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २९) सकाळी ११ वाजता होणार असून, या वेळी सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती असणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, माहिती व तंत्रज्ञान राज्यमंत्री सतेज पाटील, महिला व बालविकासमंत्री यशोमती ठाकूर यांच्यासह अन्य राजकीय नेते उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटनानंतर मुख्य कार्यक्रमांना सुरुवात होईल. यामध्ये 'समाजमाध्यमांची दिशा आणि दिशांतरे' या विषयावर परिसंवाद होणार आहे. त्यानंतर 'माझं एक्स्प्रेशन, माझं इम्प्रेशन', 'सायबर क्राइम : रिपोर्ट करा, कायदा आहे' या विषयांवर चर्चासत्र होणार आहे. यानंतर 'महाराष्ट्राच्या राजकारणातला सोशल मीडिया' या विषयावर परिसंवाद होणार आहे. त्यानंतर कविता सादरीकरणाचा कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी, शनिवारी (दि.३०) विविध विषयांवर व्याख्याने होतील. यामध्ये 'व्यक्त होण्यापूर्वी आणि होताना', 'कंटेंट कडक्क होण्यासाठी', 'आग्रह-दुराग्रहाच्या पल्याड भाषा व सोशल मीडिया', 'हजारो लाइक्स, कमेंट्स : कसं काय?', 'सकारात्मक ट्रॅक्शनचा ट्रॅक', 'शेकडो बदामवाली कविता, स्टोरीचा फोटो व हजार लाइक्सची फ्रेम', 'मीम : टेंप्लेटच्या अलिकडले आणि पलिकडले', 'व्हिडिओ कंटेंटचा किडा', 'रील लाइफ', 'कंटेंटचं सीमोल्लंघन' अशा विविध विषयांवर कार्यक्रम होतील. त्यानंतर दुसऱ्या दिवसाचा समारोप 'अभंग रिपोस्ट' या कार्यक्रमाने होईल.

रविवारी (१ मे) 'ग्रुप डायनॅमिक्स', 'सांस्कृतिक वारसा, आपण आणि सोशल मीडिया' 'चळवळींचा मीडिया' या विषयांवर कार्यक्रम होतील. यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थितांना लाइव्ह मार्गदर्शन करतील. 'पॅन्डेमिक, आपत्ती व्यवस्थापनासाठीचा मीडिया' या विषयावर मुरलीधर मोहोळ यांची मुलाखत होणार आहे. 'पत्रकारिता आजची आणि उद्याची' या विषयावर चर्चा होईल. यानंतर 'तुका आकाशाएवढा' या कार्यक्रमाने संमेलनाचा समारोप होईल.

Pune Edition
Apr 29, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# विद्यापीठातील पीएच.डी. स्वस्त; संशोधन केंद्रातील महाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया राबवली जात असून, विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्कच सर्व संशोधन केंद्रांनी घेणे अपेक्षित आहे .मात्र, विद्यापीठाशी संलग्न अनेक केंद्र अव्वाच्या सव्वा शुल्क आकारणी करून विद्यार्थ्यांची लूट करत आहेत. त्यामुळे विद्यापीठातील पीएच.डी. स्वस्त आणि संशोधन केंद्रातील महाग असे चित्र सध्या दिसून येत आहे.

> विद्यापीठाशी संलग्न काही केंद्रांकडून नियमबाह्य शुल्क आकारणी केली जात असल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांकडून केल्या जात आहेत. आपला प्रवेश रद्द होईल, या भीतीने विद्यार्थी समोर येऊन विद्यापीठाकडे लेखी तक्रार देत नाहीत. त्यामुळे विद्यापीठानेच काही केंद्रांना अचानक भेटी देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांकडून पीएच.डी. प्रवेशासाठी जमा केलेले शुल्क तपासावे. त्यात तफावत आढळल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करावी.
>
> **- दादाभाऊ शिनलकर, अधिसभा सदस्य**

पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांतील संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी प्रवेश दिला जातो. परंतु , पीएच.डी.साठी विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क काही केंद्रांकडून आकारले जात आहे. विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकीतही याबाबत चर्चा करण्यात आली होती. विद्यापीठाने सुद्धा यासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध करून अधिकचे शुल्क आकारणाऱ्या केंद्रावर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क संस्थांनी आकारू नये.

अधिकचे शुल्क आकारल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थेचे संशोधन केंद्र बंद करण्याबाबतची कारवाई करण्यात येईल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तरीही संस्थाचालकांकडून विद्यार्थ्यांची लूट सुरू आहे.

Pune Main
Page No. 2 Apr 29, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

# दुहेरी पदवीबाबत विद्यापीठात चाचपणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यार्थ्यांना दुहेरी पदवी (ड्युएल डिग्री) अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्याबाबतचा निर्णय घेतल्यानंतर, आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दुहेरी पदवी शिक्षण सुरू करण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे. त्यानुसार येत्या आठवड्यात तज्ज्ञांच्या समितीकडून याबाबत बैठकीत चर्चा होणार आहे, अशी माहिती पुणे विद्यापीठाकडून देण्यात आली आहे.

यूजीसीने गेल्या आठवड्यात विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचे शिक्षण देण्याच्या सुविधा उपलब्ध करण्याबाबत देशातील विद्यापीठांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना दुहेरी पद्धतीने शिक्षण देण्याबाबत चाचपणी सुरू केली आहे. याबाबत येत्या काही दिवसांत तज्ज्ञांच्या समितीकडून पदवी अभ्यासक्रम, विद्याशाखा, शिकण्याच्या वेळा, पद्धती आदींबाबत एका बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर आगामी शैक्षणिक वर्षापासून दुहेरी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. दुहेरी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आग्रही असल्याने, राज्यात दुहेरी पदवी अभ्यासक्रम सुरू करणारे पुणे विद्यापीठ पहिले विद्यापीठ ठरण्याची शक्यता आहे. 'यूजीसी'ने निर्णय घेण्यापूर्वीच पुणे विद्यापीठाने 'डिग्री प्लस'चा निर्णय घेतल्याने, विद्यापीठाला दुहेरी पदवी सुरू करण्याबाबत कोणतीही अडचण उद्भवणार नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. 'डिग्री प्लस'अंतर्गत पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक कौशल्ये प्राप्त व्हावीत; तसेच कौशल्यांवर आधारित रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर मिळाव्यात, या उद्देशाने विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमासोबतच डिप्लोमा, प्रमाणपत्र अभ्यासक्रम कमी शुल्कात शिकण्याची संधी उपलब्ध होते.

> "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांना दुहेरी पदवी अभ्यासक्रम पद्धतीने शिक्षण घेता येण्यासाठी, येत्या आठवड्यात तज्ज्ञ समितीकडून चर्चा करण्यात येईल. या बैठकीत अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतची रुपरेषा ठरविण्यात येईल. 'डिग्री प्लस'च्या अनुभवामुळे दुहेरी पदवी पद्धतीचे अभ्यासक्रम राबविणे सोपे जाणार आहे.
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times 29.4.2022

सकाळ

# पाली-बौद्ध अध्ययन जागरूकता अभियान

पुणे, ता. २९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या प्राध्यापक, विद्यार्थी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अनोख्या पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१वी जयंती साजरी केली. विभागात चालविल्या जाणाऱ्या पाली व बौद्ध अध्ययन क्षेत्रातील पदविका व पदव्युत्तर अशा १६ अभ्यासक्रमांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोचावी या उद्देशाने विभागातर्फे 'पाली व बौद्ध अध्ययन जागरूकता अभियान' राबविण्यात आले.

अभियानांतर्गत पिंपरी येथील पालिका भवनासमोरील डॉ. आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा, दापोडी येथील त्रैलोक्य बौद्ध महाविहार, तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. आंबेडकरांचा पुतळा या तीन ठिकाणी माहिती कक्ष उभारण्यात आले. माहिती कक्षांच्या माध्यमातून विभागातील अभ्यासक्रमांची माहिती देणारी पत्रके वाटण्यात आली आणि अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या संभाव्य लोकांची आगाऊ नावनोंदणी करण्यात आली. पाली व बौद्ध अध्ययन या विषयांची ओळख होण्याच्या दृष्टीने विभागातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकांचे प्रदर्शनदेखील पिंपरी येथील माहिती केंद्रात मांडण्यात आले होते. अभियानात डॉ. प्रवीण तलअत, तृप्ती तायडे, दीपाली पाटील, रितेश ओव्हाळ, प्रणाली वायंगणकर, डॉ. मृगेंद्र प्रताप व दीपक गायकवाड यांनी दिली. या अभियानात सुमारे २५०० माहिती पत्रके वितरित करण्यात आली व सुमारे ८०० इच्छुकांनी आगाऊ नावनोंदणी केली. या अभियानाची दुसरी फेरी बुद्धपौर्णिमेच्या दिवशी म्हणजेच १६ मे २०२२ रोजी राबविली जाणार असल्याचे प्रा. देवकर म्हणाले.

Pune, Pune-Today
30/04/2022 Page No. 302

# News Paper Clippings During April 2022

## Section: Education

### कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे मत

# विद्यापीठासारख्या संस्थेने समाजमाध्यमावर जाण्याच्या फंदात पडू नये

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** समाजमाध्यमाची शक्ती मोठी असल्याचे मान्य करतानाच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी विद्यापीठासारख्या सार्वजनिक संस्थेने ट्विटरसारख्या समाजमाध्यमावर जाण्याच्या फंदात पडू नये, अशी भूमिका मराठी सोशल मीडिया संमेलनाच्या व्यासपीठावरून शुक्रवारी मांडली.

डिमिप्रेमी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि मिरॅकल इव्हेंट्स यांच्यातर्फे आयोजित मराठी सोशल मीडिया संमेलनाच्या उद्घाटन सत्रात डॉ. करमळकर बोलत होते. मगरपट्टा सिटी कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक सतीश मगर, विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, ग्यान कीचे प्रदीप लोखंडे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, प्रसेनजित फडणवीस, युट्यूबर मधुरा बाचल, सुमती धामणे, आयोजक समीर आठल्ये, मंगेश वाघ, विनायक रासकर आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, विद्यापीठ ट्विटरसारख्या समाजमाध्यमात कार्यरत नाही. पण साडेसात लाख विद्यार्थ्यांशी जोडलेले आहे. समाजाभिमुख असण्याचा विद्यापीठाचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. समाजमाध्यमाची शक्ती आणि परिणामकारकता मोठी आहे. समाजमाध्यमाचा वापर करून गुन्हे घडत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे समाजमाध्यमाचा वापर जागरुकतेने केला पाहिजे. गुगल किंवा समाजमाध्यमातील सर्व माहिती खरी असते असे नाही. त्यामुळे माहिती तपासून घेणे गरजेचे झाले आहे.

समाजमाध्यमांमुळे आज गाव, शहर असा भेद राहिलेला नाही. कोणत्याही कोपऱ्यातून जगाशी जोडले जाणे शक्य आहे. या माध्यमाचा उपयोग तरुणांनी करून घेतला पाहिजे, असे लोखंडे यांनी सांगितले. सुरुवातीच्या काळात मला स्वतःला सोशल मीडियावर एकटीच असल्याचे जाणवायचे. आता मात्र मराठीमध्ये मोठ्या प्रमाणात आशयनिर्मिती होत असणे उत्साहवर्धक आणि आशादायक आहे. त्याचा मराठीलाही खूप फायदा होत आहे, असे बाचल म्हणाल्या.

### समाजमाध्यमाचे बळी ठरणार नाही याची काळजी घेणे आवश्यक

संमेलनात उद्घाटनानंतरच्या सत्रात दैवता चव्हाण-पाटील आणि नितीन वैद्य यांनी समाजमाध्यमाची दिशा आणि दिशांतरे या विषयावर मार्गदर्शन केले. समाजमाध्यमांचा वापर करून वापरकर्त्यांवर नियंत्रण मिळवण्याचे प्रकार घडत आहेत. खोट्या बातम्या हा त्याचाच एक भाग आहे. २०१४ पूर्वी समाजमाध्यमांत हृदयद्रावक घटना, यशाची कामगिरीचा आशय अधिक वाचल्या जायच्या. २०१४ नंतर द्वेष पसरवणारा आशय समाजमाध्यमात मोठ्या प्रमाणात पसरवला जात आहे. त्यातून सामाजिक तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे आपण प्रेमाचे, सकारात्मकतेचे प्रतीक व्हायचे की की द्वेषाचे हा निर्णय घ्यावा लागेल. समाजमाध्यम वापरताना आपणच त्याचे बळी ठरणार नाही याची काळजी घ्यावी लागेल, असे वैद्य यांनी सांगितले. तर समाजमाध्यमांचा वापर वाढल्याने त्याच्याशी निगडित संशोधनही वाढत आहे. या संशोधनातून मानवी वर्तणुकीतील काही महत्त्वपूर्ण बदल अधोरेखित झाल्याचे पाटील यांनी नमूद केले.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Sat, 30 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67755142

# News Paper Clippings During April 2022

## Section: Research

पुढारी

# शिवसुमन वनस्पतीत औषधी गुणधर्म

दिनेश गुप्ता

**पुणे : जगातील सर्वांत दुर्मीळ म्हणून ओळखली जाणारी 'शिवसुमन' (फेरेरिया) ही पुणे जिल्ह्यातील शिवनेरीगडाच्या परिसरात सापडणारी दुर्मीळ वनस्पती आता हरिश्चंद्रगडावर आढळली आहे.**

- शिवनेरीपाठोपाठ हरिश्चंद्रगडावरही आढळली
- 'फेरेरिया' नावाने आहे जगभर ओळख

पुढारी विशेष

पुण्यातील भारतीय वनस्पती सर्वेक्षण ऑफ इंडिया (बीएसआय) यावर सखोल संशोधन करून तिच्या संवर्धनाचे काम करीत असून, या वनस्पतीत असाध्य रोगांवर उपचार करणारे औषधी गुणधर्म कोणते आहेत, यावर पुण्यातील प्रयोगशाळेत संशोधन सुरू आहे. कोरेगाव पार्क भागात भारतीय वनस्पती सर्वेक्षण विभागाचे (बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया) कार्यालय असून, यात चार विभाग येतात. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा व दिव-दमण या भागांचा समावेश आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यातील संशोधक डॉ. सचिन पुणेकर यांना शिवनेरीगडाच्या परिसरात ही वनस्पती सापडली. शिवप्रभूंच्या जन्मस्थळी सापडल्याने त्यांनी तिचे नाव 'शिवसुमन' असे ठेवले आणि त्यानंतर तिची लागवड इतर गडांवरही करण्याचा उपक्रम राबविला. आता बीएसआयला पुणे जिल्हा आणि कोकणच्या हद्दीवरील हरिश्चंद्रगडावरही 'शिवसुमन' आढळली आहे.



> या वनस्पतीबाबत आम्ही सखोल संशोधन केले असता 'शिवसुमन' ही वनस्पती जगात दुर्मीळ असल्याचे सिध्द झाले. मात्र, याच्या उपयोगितेवर संशोधनाचे काम सुरू आहे. आम्ही हरिश्चंद्रगडावर या वनस्पतीचे नमुने आणून आमच्या प्रयोगशाळेत लागवडीचे व जतनाचे काम करीत आहोत. **- डॉ. ए. बेन्नीयामीन,** संचालक, बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया, पुणे

> शिवसुमन (फ्रेरियाइंडिका) ही प्रदेशनिष्ठ आणि अतिधोकाग्रस्त वनस्पती हरिश्चंद्रगडावर आढळून येणे अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या वनस्पतीची रोपे मोठ्या प्रमाणात तयार करून तिच्या मूळ अधिवासात पुनर्रोपण करून तिच्या औषधी गुणधर्मावर संशोधन होणे काळाची गरज आहे. शासकीय पातळीवर या वनस्पतीच्या जतन आणि संवर्धनाचा प्रकल्प कार्यान्वित व्हायला हवा. **- डॉ. सचिन अनिल पुणेकर,** वनस्पतिशास्त्रज्ञ

ही वनस्पती निवडुंगासारख्या प्रजातीची असून, ती दुर्मीळ असल्याचे समोर आले आहे. मात्र, त्याची उपयोगिता कोणत्या असाध्य रोगांवर होऊ शकते, याच्या संशोधनाचे काम बीएसआय करीत आहे.

Pune Edition
Apr 16, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

लोकमत

## चित्र अन् शिल्पकारांवर 'व्हिज्युअल आर्ट ऑफ महाराष्ट्र'

### पहिला इंग्रजी कोश, येत्या १० एप्रिलला होणार कोशाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : गेल्या दोनशे वर्षातील महाराष्ट्रातील महत्वाच्या चित्र-शिल्पकारांची नोंद घेणारा महाराष्ट्राच्या दृश्य कलेवर आधारित 'व्हिज्युअल आर्ट ऑफ महाराष्ट्र ' हा कोश साकार झाला आहे. देशात दृश्य कलेवर झालेला हा पहिलाच कोश आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते २१ व्या शतकापर्यंतचे तब्बल ३०७ चित्रकार, शिल्पकार, उपयोजित कलाकार आणि व्यंगचित्रकार यांचा परिचय... ८२८ कृष्णधवल पानांमधून कलावंत आणि त्यांच्या कलाकृतींचे छापण्यात आलेले ११८० नमुने...आणि या कोशातील १३२ रंगीत पानांमधून देशातील संग्रहालये, कला संग्राहक आणि कला संस्थांच्या संग्रहातील तब्बल ३२१ दुर्मिळ कलाकृतींचा देण्यात आलेला अनुभव...हे या कोशाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य. पंडोल आर्ट गॅलरीने हा कोश प्रकाशित केला असून, साडे सहा वर्षांच्या मेहनतीनंतर या प्रकल्पाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. या प्रकल्पाची संकल्पना ज्येष्ठ चित्रकार व कलाअभ्यासक सुहास बहुळकर यांची आहे. त्याचे प्रमुख संपादक बहुळकर व दीपक घारे तर सुधीर पटवर्धन, दिलीप रानडे हे सहसंपादक आणि भाषा संपादक म्हणून शांता गोखले यांनी कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्रातील अनेक कलावंत, कलाशिक्षक, कलासमीक्षक व कला अभ्यासकांनी लेखन व भाषांतराचे काम केले आहे. महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या वतीने येत्या १० एप्रिलला हिराबाग चौक येथील ज्योत्स्ना भोळे सभागृहात डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती डॉ. गो. बं. देगलुरकर यांच्या हस्ते या कोशाचे प्रकाशन होणार आहे.

- या कोशाविषयी सुहास बहुळकर म्हणाले, यापूर्वी २०१३ मध्ये 'दृश्यकला' शीर्षकांतर्गत मराठी कोशाचे प्रकाशन झाले आहे. त्या प्रकाशन कार्यक्रमाला पंडोल आर्ट गॅलरीचे प्रमुख दादीबा पंडोल आणि फिरोदिया गोदरेज यांना हा कोश इंग्रजीमध्ये यावा असे वाटले आणि कोशाच्या कामाला प्रारंभ झाला.
- जे. जे स्कूल ऑफ आर्ट, बॉम्बे आर्टस सोसायटी, एशियाटिक इंडिया आणि आर्टिस्ट सेंटर या महाराष्ट्राच्या दृश्यकलेच्या वाटचालीत आधुनिक काळात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या चार कला विषयक कार्य करणाऱ्या संस्थांची माहिती प्रथमच एकत्रितरीत्या संकलित केली गेली आहे.
- कोशात महाराष्ट्रातील आदिमानवाच्या कलेपासून ते आदिवासी कला, ग्रामीण कला, अभिजात कला व आधुनिक कलेचे तब्बल २२७ नमुने असून, प्रतिमांमधून हजारो वर्षांचा महाराष्ट्राचा समृद्ध कला वारसा उलगडत जातो.

Hello Pune
Page No. 4 Apr 06, 2022
Powered by: erelego.com

## दृश्यकलेवर साकारलेला पहिला इंग्रजी भाषेतील कोश

### 'व्हिज्युअल आर्ट ऑफ महाराष्ट्र'चे उद्या प्रकाशन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : गेल्या दोनशे वर्षांतील महाराष्ट्रातील महत्त्वाच्या चित्र-शिल्पकारांची नोंद घेणारा महाराष्ट्राच्या दृश्यकलेवर आधारित 'व्हिज्युअल आर्ट ऑफ महाराष्ट्र' हा इंग्रजी भाषेतील कोश साकार झाला आहे. चित्रकार, शिल्पकार, उपयोजित कलाकार आणि व्यंगचित्रकार अशा ३०७ कलाकारांचा परिचय, कृष्णधवल पानांमधून कलाकार आणि त्यांच्या कलाकृतींचे छापण्यात आलेले ११८० नमुने यांसह १३२ रंगीत पानांमधून देशातील विविध संग्रहालये, कला संग्राहक आणि कला संस्थांच्या संग्रहातील तब्बल ३२१ दुर्मीळ कलाकृतींचा अनुभव हे या कोशाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे.

साडेसहा वर्षांच्या मेहनतीनंतर हा कोश सिद्ध झाला असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची संकल्पना ज्येष्ठ चित्रकार व कलाअभ्यासक सुहास बहुळकर यांची आहे. त्यांच्यासह दीपक घारे या कोशाचे संपादक आहेत. सुधीर पटवर्धन आणि दिलीप रानडे सहसंपादक असून शांता गोखले यांनी भाषा संपादक म्हणून काम पाहिले आहे.

या प्रकल्पासाठी सुपर्णा कुलकर्णी यांनी समन्वयक म्हणून काम केले असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलाकार, कलाशिक्षक, कलासमीक्षक आणि कला अभ्यासकांनी लेखन तसेच भाषांतराचे काम केले आहे. पंडोल आर्ट गॅलरीने हा कोश प्रकाशित केला आहे. महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या वतीने रविवारी (१० एप्रिल) ज्योत्स्ना भोळे सभागृहात सायंकाळी सात वाजता होणाऱ्या कार्यक्रमात मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गो. बं देगलूरकर यांच्या हस्ते या कोशाचे प्रकाशन होणार आहे. विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. राजा दीक्षित आणि ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत या वेळी उपस्थित राहणार आहेत.

सुहास बहुळकर म्हणाले, यापूर्वी 'दृश्यकला' शीर्षकांतर्गत २०१३ मध्ये मराठी कोशाचे प्रकाशन झाले आहे. हा कोश इंग्रजीमध्ये यावा असे पंडोल आर्ट गॅलरीचे प्रमुख दादीबा पंडोल आणि फिरोदिया गोदरेज यांना वाटले आणि कोशाच्या कामाला प्रारंभ झाला.

जे. जे. कला महाविद्यालय, बॉम्बे आर्टस सोसायटी, एशियाटिक सोसायटी ऑफ इंडिया आणि आर्टिस्ट सेंटर या महाराष्ट्राच्या दृश्यकलेच्या वाटचालीत आधुनिक काळात अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या आणि कलाविषयक कार्य करणाऱ्या संस्थांची माहिती प्रथमच एकत्रितरीत्या संकलित केली गेली आहे.

लोकसत्ता Sat, 09 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67341035

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

लोकमत

विदाबुद्धी

## नकलेतून कृत्रिम अक्कल वाढवण्याची गोष्ट

**कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रावर वर्चस्व आहे यंत्रांच्या स्वयंशिक्षणाचे, मशीन लर्निंगचे! हे सगळेच प्रकरण आता मानवी बुद्धीसारखे गहिरे व गूढही होऊ लागले आहे!**



**चांगली नक्कल** करायला अक्कल लागते असे म्हणतात. ते खरे असेलही. पण, नक्कल करण्यातून अकलेत थोडी भरच पडत असते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातही हे दिसून येते. कृत्रिम बुद्धिमत्तेचे क्षेत्र ज्या आर्टिफिशियल न्युरल नेटवर्क (एएनएन) या संकल्पनेमुळे भरारी घेऊ शकले ती संकल्पनाही मेंदूच्या कार्यपद्धतीची नक्कलच. मेंदू म्हणजे चेतारज्जूंचे (न्युरॉन्स) प्रचंड आणि गुंतागुंतीचे जाळे. आपले सारे शिकणे, लक्षात ठेवणे, कल्पना करणे, भाकीत वर्तविणे म्हणजे या जाळ्यातील काही चेतारज्जूंचे पेटणे, तेवणे किंवा विझणे. त्यातून संदेशांची देवाणघेवाण होते. त्यावर प्रक्रिया होतात. असंख्य सर्किटचा, त्यांच्या विविध स्तरांचा आणि गणिती सुत्रांचा वापर करून कृत्रिम बुद्धिमत्ता मेंदुच्या या कार्यपद्धतीचीच नक्कल करते. याची सुरुवात पन्नासच्या दशकात झाली.


विश्राम ढोले



माध्यम, तंत्रज्ञान, संस्कृती या विषयांचे अभ्यासक


त्याचं नाव पर्सेप्ट्रॉन. पण त्यावेळच्या यांत्रिक मर्यादांमुळे पर्सेप्ट्रॉनची संकल्पना काही फार रुजली नाही. या मर्यादा जसजशा कमी होत गेल्या तसे एएनएनचे सामर्थ्य लक्षात येत गेले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रावर आज वर्चस्व आहे ते यंत्रांच्या स्वयंशिक्षणाचे अर्थात मशिन लर्निंगचे. या यांत्रिक स्वयंशिक्षणाचा मुख्य तांत्रिक आधार आहे ते एएनएनचे जाळे. पण नकलेतून कृत्रिम अक्कल वाढविण्याची गोष्ट इथेच संपत नाही. या जाळ्याने शिकावे कसे याबाबतही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्राने मानवी पद्धतींचे अनुकरण करत बराच पल्ला गाठला आहे. शिकण्याच्या कोणत्या पद्धतीला मध्यवर्ती स्थान द्यावे, विचारांची कोणती शैली स्वीकारावी, यावरून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातही हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्राप्रमाणे काही घराणी निर्माण होत गेली.

पेड्रो डोमिंगोज या तज्ज्ञांच्या मते कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात शिकण्याची अशी पाच प्रमुख घराणी आहेत.

आद्य घराणे चिन्हवाद्यांचे. भाषा, गणित म्हणजे मुख्यत्वे चिन्ह आणि प्रतिकांचा व्यवहार. त्यामुळे संगणकानेही मानवी विचार अशा मूलभूत भाषिक आणि गणिती चिन्हांमधूनच शिकायचे हे या घराण्याचे मुख्य सूत्र.

गणित, भाषा, तत्वज्ञान, तर्कशास्त्र हे या घराण्याचे आधारभूत विषय. मात्र विचार, भाकिते अशा चिन्हांमध्ये मांडण्यात खूप अडचणी येतात. शिवाय संगणकाला हे शिकविण्यातच खूप शक्ती खर्ची पडते. त्यामुळे आज हे घराणे काहीसे मागे पडले आहे.

दुसरे घराणे उत्क्रांतीवाद्यांचे. यांच्या मते शिकणे म्हणजे समस्या सोडविणे. संगणकासमोर एखादी समस्या मांडायची. कृत्रिम बुद्धिमत्ता त्यावरील सर्व संभाव्य उपाय वर्तविल. मग सुरुवातीच्या परिस्थितीमध्ये छोटा अनपेक्षित बदल घडवून आणायचा. आधी वर्तविलेल्यांपैकी जे उपाय या नव्या बदलांच्या दृष्टिने उपयुक्त ठरणार नाहीत, ते सोडून द्यायचे. बदलांचे चक्र बराच काळ चालविल्यानंतर जे टिकतील ते खरे उपाय.

डार्विनने सांगितलेल्या उत्क्रांतीच्या तत्त्वासारखेच हे. तत्व आहे उत्तम. पण वेळखाऊ आणि उत्क्रांतीप्रमाणेच मंदगती. आणि कायमस्वरुपी खुले. त्यामुळे घराण्याचा तात्विक आधार भक्कम असला तरी वापर तुलनेने मर्यादितच आहे.

तिसरे घराणे बेझवाद्यांचे. अठराव्या शतकातील ब्रिटिश सांख्यिकीतज्ज्ञ, तत्वज्ञ आणि ख्रिश्चन धर्मगुरू थॉमस बेझ हे या घराण्याचे आद्य गुरु. त्यांच्या बेझियन उपपत्ती (थिअरम) नुसार एखाद्या अनिश्चित गोष्टीबद्दल प्रथम भाकितं वर्तवायची आणि येणाऱ्या प्रत्येक नव्या पुराव्याच्या पार्श्वभूमीवर त्या भाकितांवर कितपत विश्वास ठेवायचा ते प्रमाण सांख्यिकी सुत्रांच्या साह्याने ठरवत जायचे. अशा प्रकारे भाकिताच्या विश्वासार्हतेची पातळी बरेचदा पडताळली तर अंतिमतः विश्वासार्ह भाकीत करण्याचे प्रतिमान (मॉडेल) हाती लागते यावर बेझवाद्यांचा विश्वास. कृत्रिम बुद्धिमत्तेचे स्वयंशिक्षण भाकितांच्या विश्वासार्हतेच्या सांख्यिकी पडताळणीतून व्हावे असे बेझवाद्यांचे म्हणणे. आज या घराण्याचा बराच दबदबा आहे.

चौथे घराणे साधर्म्यवाद्यांचे. यांचा भर तुलनेवर. त्यानुसार एखादी नवी घटना यापूर्वीच माहीत असलेल्या कोणत्या घटनेशी मिळतीजुळती आहे हे आधी बारकाईने तपासायचे. त्यांच्यातले साधर्म्य लक्षात आले, की मग नव्या घटनेचे परिणाम काय होऊ शकतील, याचे माहीत असलेल्या घटनेच्या साह्याने भाकीत करायचे हे साधर्म्यवाद्यांचे सूत्र. जुन्या घटनांची माहिती जितकी जास्त तितके तुमचे भाकीत विश्वासार्ह यावर यांचा विश्वास. दैनंदिन जगण्यातील डिजिटल विद्येचे प्रचंड प्रमाण आणि सारखेपणा शोधण्यातील सहजता यामुळे या घराण्याची लोकप्रियता आणि उपयुक्तता वाढत आहे. मात्र, अकल्पित किंवा अभूतपूर्व घटनांच्या बाबतीत मात्र हे घराणे मार खाते.

पाचवे आणि आजघडीला सर्वात प्रभावी ठरलेले घराणे आहे जोडणीवाद्यांचे. यांचे काम असते विणकरांसारखे.

विणकर ताणे आणि बाण्यांच्या साह्याने धाग्यांशी धागे जोडत जातो, त्यांचे पातळ - जाड थर बनवित जातो. त्यावर धाग्यांची नक्षी काढत जातो. न्युरल नेटवर्कचा वापर करून जोडणीवादी मंडळी असेच काहीसे करू बघतात. इथे पहिल्या स्तराला एखाद्या भाकितासंबंधी प्राथमिक माहिती - इनपूट - दिली जाते. या स्तरामध्ये त्यावर काहीएक प्रक्रिया होऊन निर्माण झालेली नवी माहिती नंतरच्या स्तराला इनपूट म्हणून दिली जाते. हे नवे इनपूट काळ्या - पांढऱ्या रंगासारखे कप्पेबंद असण्याची गरज नसते. प्रत्येक इनपूट कितपत महत्त्वाचे हे ठरवता आले तर त्याला त्याप्रमाणात वजन लावून पुढे पाठवता येते. म्हणजेच या पद्धतीला फक्त काळ्या पांढऱ्याच नव्हे तर करड्या छटांमध्येही विचार करता येऊ शकतो. जितके स्तर जास्त तेवढ्या विचार करण्याच्या छटाही जास्त. शिवाय अशा अनेक छटांमधून आलेले उत्तर अंतिमतः चूक ठरले तर त्यानुसार छटांमध्ये, वजनांमध्ये बदल करण्याची सोयही उपलब्ध. वाढत्या विद्येमुळे इनपूटच्या शक्यता वाढत आहे. वाढत्या गणनक्षमतेमुळे प्रक्रियेचे स्तर आणि वेग वाढतोय. या सगळ्यांमुळे जोडणीवादी यांत्रिक स्वयंशिक्षण खूप यशस्वी ठरतेय. ते मानवी बुद्धिमत्तेच्या नुसते जवळच सरकतेय असे नव्हे तर मानवी बुद्धिसारखे गहिरे आणि गूढही होऊ बघतेय.

- म्हणूनच अशा यांत्रिक स्वयंशिक्षणाला डिप लर्निंग हे नाव पडले आहे. या डिप लर्निंमधील गहिरेपण आणि गूढता याबद्दलची थोडी चर्चा पुढल्या लेखात.

vishramdhole@gmail.com

Pune Main
Page No. 6 Apr 09, 2022
Powered by: erelego.com

## क्रांतिकारकांवरील पुस्तकांचे पुण्यात ग्रंथालय

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांच्या जीवनावरील तसेच क्रांतिकारकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे ग्रंथालय पुण्यामध्ये फरासखाना पोलीस ठाण्याजवळील हुतात्मा स्मारक येथे साकारण्यात आले आहे. जुलमी रँडचा वध करणारे क्रांतिकारक दामोदर हरी चापेकर यांना ब्रिटिश सरकारने १८ एप्रिल १८९८ रोजी फाशी दिली. या घटनेला सोमवारी १२४ वर्षे पूर्ण झाली. या दिवसाचे आणि जागतिक वारसा दिनाचे औचित्य साधून सेव्ह हेरिटेज चळवळ आणि सामर्थ्य प्रबोधिनीतर्फे सुरू करण्यात आलेल्या क्रांतिकारी सामर्थ्य ग्रंथालयाचे सोमवारी उद्घाटन करण्यात आले. विविध वारसा स्थळी भविष्यात अशी ग्रंथालये उभारण्याचा मानस असल्याचे सामर्थ्य प्रबोधिनीचे सुशांत भिसे यांनी सांगितले.

एकाच घरातील तीन बंधूंनी स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती दिलेले जगाच्या इतिहासातील चापेकर बंधूंचे बलिदान हे एकमेव उदाहरण आहे, असे इतिहासाचे अभ्यासक मोहन शेटे यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले.

ज्या क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य चळवळीची धगधगती मशाल पेटवली आणि स्वातंत्र्याचे विचार प्रज्वलीत केले, त्यांच्या स्मृती पुण्याच्या मध्यवर्ती स्थळी कायमस्वरूपी जागृत ठेवण्यासाठी 'क्रांतिकारी कट्टा' या तरुणांच्या संस्थेची कामे निश्चितच कौतुकास्पद आहेत, असे रोटरी क्लब ऑफ पुणे पर्वतीचे किरण वाळिंबे यांनी सांगितले.

या ग्रंथालयात माझी जन्मठेप, झाशीची राणी, शहीद, १८५७ चे स्वातंत्र्य समर, काळे पाणी, बोस बंधू, शौर्य कथा, क्रांतिवीर, भारताचे १०५ सुपुत्र, लोकमान्य टिळक आणि उमाजी राजे अशी पुस्तके वाचकांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत, असे सेव्ह हेरिटेज चळवळीचे स्वप्नील नहार यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue, 19 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67526930

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

# वा. सी. बेंद्रे यांच्या दुर्मीळ साहित्याला उजाळा

**मटा विशेष**

**नऊ दुर्मीळ ग्रंथ, नव्या चित्रांचे लवकरच प्रकाशन**

Prasad.Pawar
@timesgroup.com
Tweet : @PrasadPawarMT





वा. सी. बेंद्रे

### 'इतर भाषांमध्येही आणणार'

इतिहासाचार्य वा. सी. बेंद्रे यांची ऐतिहासिक ग्रंथसंपदा इंग्रजी आणि अन्य भारतीय भाषांमध्ये आणायचा मानस असल्याचे साधना बेंद्रे यांनी नमूद केले. 'माझे आजोबा म्हणून नाही, तर इतिहासाचे तटस्थपणे संशोधन करणारे संशोधक म्हणून त्यांचा हा ठेवा नव्या पिढीसमोर ठेवायचा आहे. परकीय साधनांमधून त्यांनी आपला इतिहास शोधला व संकलित केला. आता त्यांचे हे साहित्य इतर भाषांतही उपलब्ध होण्याची गरज आहे. त्यांची सगळीच पुस्तके टप्प्याटप्प्याने व इतर भाषांतही प्रकाशित करण्याचा प्रयत्न करणार आहोत,' असेही त्यांनी नमूद केले.

**पुणे** : इतिहासाचार्य वासुदेव सीताराम उर्फ वा. सी. बेंद्रे यांची दुर्मीळ साहित्यसंपदा पुन्हा इतिहास अभ्यासकांसमोर येणार आहे. बेंद्रे यांचे नऊ दुर्मीळ ऐतिहासिक संदर्भग्रंथ पुनर्प्रकाशित होत आहेत.

'बेंद्रे कुटुंबीय', 'मराठी देशा प्रकाशन' आणि 'प्राकृत प्रकाशन' यांच्यातर्फे ही ग्रंथसंपदा पुन्हा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 'माझे आजोबा वा. सी. बेंद्रे यांनी आयुष्यभर केवळ इतिहासाला वाहून घेतले. अतिशय तटस्थपणे त्यांनी परकीय साधनांतून इतिहास संशोधन केले. छत्रपती संभाजी महाराज यांचा कार्यकर्तृत्वाचा ध्यास घेऊन चाळीसहून अधिक वर्षे त्यांनी केवळ शंभूराजांसाठी दिली. विशेष म्हणजे आजही अमेरिकेसह, ब्रिटन आणि जगभरातील मोठ्या ग्रंथांलयांमध्ये त्यांचे ग्रंथ उपलब्ध आहेत. हा ठेवा आता दुर्मीळ झाला आहे. नव्या पिढीसमोर तो यावा, या हेतूने आम्ही हे ग्रंथ पुन्हा आणत आहोत,' अशी माहिती बेंद्रे यांची नात साधना बेंद्रे यांनी 'मटा'शी बोलताना दिली. आपल्या इतिहासाच्या प्रचार प्रसाराचे कार्य 'छत्रपती शिवाजी महाराज मंडळा'च्या माध्यमातून परदेशातही सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

'महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच एकाच वेळी नऊ संदर्भग्रंथ प्रकाशित होणे ही दुर्मीळ बाब आहे. प्रकाशित होणाऱ्या नऊ पुस्तकांपैकी चार पुस्तके दुर्मीळ असून, ४० ते ५० वर्षांनी प्रकाशित होत आहेत. यातील पाच पुस्तके पूर्णपणे नव्या रूपात, काही मूळ ऐतिहासिक पत्रांसह; ज्यामध्ये मूळ पत्रांची छायाचित्रे आणि लिप्यंतरही असेल. मुखपृष्ठांसाठी शहाजी महाराज, शिवछत्रपती आणि शंभूछत्रपती यांची अभ्यासपूर्ण तैलचित्रे साकारण्यात आली आहेत. बेंद्रे यांनी शोधलेले महाराजांचे कृष्णधवल स्केच रंगीत स्वरूपात नव्याने प्रकाशित केले जाईल. डिजिटल टूल्सचा वापर त्यासाठी करण्यात आला आहे. राजाराम महाराजांचे आणि शंभूराजांचे भारदस्त चित्रही यानिमित्ताने समोर येईल. गोवळकोंड्याची कुतुबशाही आणि जिंजीचा प्रवास ही पुस्तकेही अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरणार आहेत,' अशी माहिती 'मराठी देशा फाउंडेशन'चे डॉ. दामोदर मगदूम यांनी दिली.

Maharashtra Times 21.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

### सर्व प्रस्ताव शासन दरबारी धूळ खात; साहित्यिकांनी पुढे येण्याची मागणी

# साडेतीन हजार प्राचीन हस्तलिखिते संवर्धनाच्या प्रतीक्षेत

सुहास सरदेशमुख लोकसत्ता

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सहा भाषांतील व दहा लिपीमधील तीन हजार ४१४ हस्तलिखिते संरक्षण आणि संवर्धनाविना पडून आहेत.

भाषा व त्यांच्या विकासाचा आलेख व अभ्यासाला उपयोगी पडेल, असा इ.स. १४७० पासूनचा ऐवज असताना त्याच्या संवर्धनासाठी दिलेले प्रस्ताव काही शासन दरबारी पुढे सरकले नाहीत. ग्रंथालय कर्मचारी ही कागदपत्रे जपतात. त्याचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी साहित्यिक व लिहित्या हातांनी आता पुढाकार घ्यायला हवा, अशी मागणी आता होऊ लागली आहे.

मराठीचा विकास आलेख सांगणारा अभ्यास अभिजात मराठीचा प्रस्ताव दाखल करताना प्रा. रंगनाथ पठारे व हरि नरके यांनी केला. पण भाषेच्या प्रवासातील अनेक अप्रकाशित हस्तलिखिते आजही पडून आहेत. 'त्या काय पोथ्या', असे हिणवून त्या कागदपत्रांकडे दुर्लक्षही होत गेले. खरे ही कागदपत्रे जपून ठेवण्यात आली आहेत. पण ती वर्षानुवर्षे अभ्यासासाठी उपलब्ध व्हावीत. त्यातून त्या काळातील भाषा, समाजजीवन असा अभ्यास होऊ शकतो असे वाटणाऱ्या काही जणांना याचे मोल कळाले. कागदपत्रांच्या डिजिटायझेशनची प्रक्रिया प्राथमिक स्वरुपात आहे. तिला वेग यायला हवा. भाषा व लिपी या अंगाने या कागदपत्रांकडे पाहायला हवे. हे सांस्कृतिक संचित आहे. ते जपायला पुढाकार घ्यायला हवा. पण तसे होताना दिसत नाही. महानुभाव *(पान ४ वर)*

### गरज का?

या विद्यापीठात हिंदी, मराठी, संस्कृत, पंजाबी भाषेतील तसेच मोडी, सकल, सुंदरी, अंक, सुभद्रा या लिपीतील प्रचंड कागदपत्रे उपलब्ध आहेत. काही कागदांवरील अक्षरे धुसर होऊ लागली आहेत. त्यामुळे त्याचे जतन व संवर्धन आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### निधीअभावी...

या कागदपत्रांचे डिजिटायझेशन करण्यासाठी राष्ट्रीय हस्तलिखित मिशनकडेही देण्यात आले. विद्यापीठ निधीतूनही संवर्धनासाठी काही रक्कम मागण्यात आली होती. पण ती पुरेशी नसल्याने मोठे संचित आजही पडून आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Fri, 22 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67595701

---

# साडेतीन हजार हस्तलिखिते संवर्धनाच्या प्रतीक्षेत

**(पान १ वरून)** साहित्यामध्ये विद्यावाचस्पती करणारे चक्रधर कोठी म्हणाले,' हा ठेवा भाषिक अंगाने मौलिक आहे. संचित म्हणता येईल. त्याची उपयोगिता किती असे प्रश्न न विचारता त्याचा भाषाअभ्यासकांनी व मराठीप्रेमी व्यक्तींनी तरी विचार करायला हवा.' चक्रधर कोठी स्वतः ही कागदपत्रे जतन करण्याच्या कामात नेहमी पुढाकार घेतात.

**इतिहास, भाषा सांगणारी ही कागदपत्रे जतन करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असतोच. पण त्याला साहित्यिक व लिहित्या हातांची मदत झाली तर त्याचा आनंद वाटेल. ही कागदपत्रे आपल्या भाषांचा आलेख व अभ्यास करण्यासाठी उपयोगी पडतील.**

**- डॉ. धर्मराज वीर**, संचालक, नॉलेज सेंटर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

लोकसत्ता Fri, 
https

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

लोकमत

# मुलांनो, पुस्तक दिन सेलिब्रेट करूया...



मुलांनो, तुम्ही अनेक वेळा ऐकलं असेल 'वाचाल तर वाचाल'. या म्हणजे वाचनाने तुमचं व्यक्तीत्व उत्तम होईल, तुमची वैचारिक क्षमता वाढेल, तुमच्यातील सृजनशीलता वाढेल. पण, हल्ली मोबाईलच्या युगात वाचनाचा तुम्हाला फार कंटाळा येतो. हो ना... मात्र जसं अभ्यास करणे आवडत नसले तरी तो केल्याने त्याचा फायदा होतोच, वाचनाचंही तसंच आहे. त्यासाठी वाचनाला सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी मुहूर्त शोधत असाल तर तो उद्याच आहे. म्हणजे २३ एप्रिल. हो २३ एप्रिल हा दरवर्षी 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस आपण सेलिब्रेट केलाच पाहिजे.

किमान यानिमित्ताने भारतीय साहित्याचा विचार केल्यास आपल्याकडे विविध भाषांमध्ये विपूल साहित्य आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास पौराणिक, ऐतिहासिक, विश्वखंडबरोबरच आधुनिक साहित्य आहे. काळानुरुप साहित्यात मोठी वाढ झालेली आहे. यापूर्वी हस्तलिखित स्वरूपात लेखन केले जात होते. मात्र, मुद्रणाचा शोध लागल्यावर ग्रंथांची छपाई होऊ लागल्यानंतर पुस्तकांकडे वाचक आकृष्ट झाला. ही पुस्तके कोठेही हाताळू शकत असल्याने वाचन संस्कृतीत मोठी वाढ झाली आहे. वाचन संस्कृती वाढल्याने दर्जेदार लेखन वाचण्यासाठी आजचा वाचक आसुसलेला आहे. यामुळे प्रकाशकांकडूनही उत्तमोत्तम साहित्य पुस्तकांच्या माध्यमातून सातत्याने देण्याचा प्रयत्न केला जातो आहे. उत्तम, कसदार व सशक्त साहित्य असणाऱ्या पुस्तकांना वाचक नेहमीच डोक्यावर घेतो. हीच पुस्तके आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग होऊन जातात. यामुळे वाचकांची बदलती अभिरुची लक्षात घेऊन सकस साहित्य निर्मिती करण्याचे आव्हान नेहमीच लेखक स्वीकारत असतात. यामुळेच उत्तमोत्तम साहित्य पुस्तक रूपात वाचकांपर्यंत येत असते. भारतीय संस्कृती पुस्तकांच्या रूपात जगासमोर येत आहे. सध्या दृकश्राव्य प्रसार माध्यमांमुळे वाचन संस्कृतीवर परिणाम झालेला दिसत असला तरी आजही पुस्तक वाचक टिकून आहे. आजही पुस्तके वाचणारांची पावलं दुकानात अथवा ग्रंथालयात वळतात हे विशेष. वाचन संस्कृती वाढावी, यासाठी ग्रंथालयाची चळवळ उभारली जात आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाबळेश्वरजवळील 'भिलार' हे गाव. महाराष्ट्र सरकार विविध पाच ठिकाणी भिलारचा उपक्रम राबवणार आहे. यामुळे विविध साहित्य पुस्तक रूपात वाचकांसाठी उपलब्ध होणार आहे. उद्याच्या पुस्तक दिनाच्या निमित्ताने वाचन संस्कृती वाढण्याच्या दृष्टीने लेखक, प्रकाशक, वाचक या तिन्ही घटकात एक सेतू निर्माण झाला पाहिजे. तरच दर्जेदार साहित्य वाचकांपर्यंत पोहोचते. चला, संकल्प करूया, पुस्तकांच्या अधिक जवळ जाऊया ! पुस्तक दिन सेलिब्रेट करून सुरुवात करूया.

**शशिकांत जाधव**

लेखक शिक्षक आहेत.

Hello Pune
Page No. 8 Apr 22, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

# विदर्भातील शंभर वर्षे जुन्या ग्रंथालयांची दुरवस्था

राम भाकरे, लोकसत्ता

**नागपूर :** वाचनाने माणूस घडतो आणि ही जडणघडण ग्रंथालयांमधून होते. अशाप्रकारे वाचन संस्कृतीला हातभार लावणारी विदर्भातील शंभर वर्षे जुनी १८ ग्रंथालयांची अवस्था सध्या अतिशय वाईट आहे. जागतिक ग्रंथ दिवस शनिवारी साजरा होतो आहे, त्या पार्श्वभूमीवर हे चित्र क्लेशदायक ठरते.

अनेक ग्रंथालयातील प्राचीन ग्रंथांना वाळवी लागलेली आहे, तर काही ग्रंथालयाच्या इमारती जीर्ण झाल्या आहेत. शासकीय अनुदान मिळणे कमी झाल्याने व उत्पन्नाचे फारसे साधन नसल्यामुळे इमारती दुरुस्त करण्यासाठी निधी नाही, असे या ग्रंथालयांचे चित्र आहे.



शंभर वर्षे जुन्या ग्रंथालयांमध्ये नागपूरमधील महालातील राष्ट्रीय ग्रंथालय त्यापैकीच एक. त्याची स्थापना १८६१ ची. लोकमान्य टिळकांसह अनेक थोर पुरुषांनी याला भेटी दिल्या. पण आज ग्रंथालयाची इमारत पडायला आली. वर्धा जिल्ह्यातील आर्वीचे लोकमान्य ग्रंथालयाला स्वातंत्र्यवीर सावरकर, महर्षी कर्वे यांनी भेटी दिल्या असून त्याची तीच अवस्था आहे. अचलपूर, अमरावती, परतवाडा, खामगाव, वाशीम, अकोला, पुसद, यवतमाळ, वर्धा येथील ग्रंथालयांना मिळणारे अनुदान दोन वर्षापासून बंद आहे.

शंभर वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना ५ लाख रुपये देण्यात येणार असल्याचे यापूर्वी शासनाने जाहीर केले होते. पण तेही काही निवडक ग्रंथालयांना देण्यात आले.

गेल्या पाच-दहा वर्षात विदर्भातील ग्रंथालयाकडे सरकारचे दुर्लक्ष असल्यामुळे येणाऱ्या काळात ही शतकी पार केलेली ग्रंथालये बंद होतात का, अशी भीती कर्मचारी व ग्रंथालय व्यवस्थापनामध्ये निर्माण झाली आहे.

"पश्चिम महाराष्ट्रातील ग्रंथालयांना प्रोत्साहन देताना विदर्भातील ग्रंथालयाकडे शासनाचे दुर्लक्ष आहे. जुन्या ग्रंथालयांना टिकवणे आवश्यक आहे. शतकोत्तर अनुदान एक वर्ष देण्यात आले नंतर बंद करण्यात आले."

- रवींद्र पांडे
सहसचिव, ग्रंथालय भारती-

"शंभर वर्षापेक्षा अधिक जुन्या ग्रंथालयांच्या इमारत जीर्ण झाल्या आहेत. अनुदान पुरेसे मिळत नाही, त्यामुळे देखभाल दुरुस्तीवर मर्यादा आल्या आहेत. अनेक ग्रंथालयांना स्वमालकीच्या इमारती नाहीत."

- पद्मश्री तांबेकर
अध्यक्ष, राष्ट्रीय ग्रंथालय, महाल

### विदर्भातील शंभरी पार केलेली ग्रंथालये

- राष्ट्रीय वाचनालय महाल, नागपूर स्थापना- १८६१
- राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय - १८६९
- लोकमान्य वाचनालय, आर्वी - १८६५
- सत्यनारायण बजाज सार्वजनिक ग्रंथालय, वर्धा - १८७०
- महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय, हिंगणघाट - १८९५
- सार्वजनिक वाचनालय, परतवाडा - १८६९
- अमरावती नगर वाचनालय - १८६७
- सार्वजनिक वाचनालय, अचलपूर शहर - १८९५
- नगर वाचनालय, वणी - १८७४
- नागर वाचनालय, यवतमाळ - १८८७
- देशभक्त शंकरराव सर नाईक सार्वजनिक वाचनालय - १८८६
- नगर वाचनालय अकोट - १८८५
- दस्तुर रतनजी ग्रंथालय खामगाव - १८८९
- सार्वजनिक वाचनालय भंडारा - १८९१
- राजे वाकाटक सार्वजनिक वाचनालय, वाशीम - १८९९
- लोकमान्य टिळक वाचनालय, ब्रम्हपुरी - १९०३
- बाबूजी देशमुख वाचनालय, अकोला - १८६०

लोकसत्ता Sat, 23 April 2022
https://epaper.loksatta.com/c/67603819

सकाळ

# व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचा पुस्तके!

**जागतिक पुस्तक दिन विशेष** बालसाहित्यकार, संपादकांचा मुलांना सल्ला

पुणे, ता. २२ : 'आज मुलांसमोर पुस्तकांना पर्याय म्हणून टीव्ही, मोबाईल, टॅब्लेट अशी अनेक साधने उपलब्ध आहेत. पुस्तकांतून होणारी मुलांची सर्वांगीण जडणघडण या साधनांमधून होणे शक्य होत नाही. ही साधने पुस्तकांना पर्याय ठरू शकत नाहीत. त्यामुळे मुलांनो, तंत्रज्ञानाचा वापर कराच, मात्र व्यक्तिमत्त्व विकासासाठी पुस्तके वाचाच', असा सल्ला बालसाहित्यकार आणि संपादकांनी 'जागतिक पुस्तक दिना'च्या निमित्ताने 'सकाळ'शी बोलताना दिला.

बाल साहित्यासाठी २०२१ चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेले लेखक संजय वाघ म्हणाले, "पुस्तक ही मित्रांप्रमाणे असतात, असे म्हणतात. खरोखर मित्रांप्रमाणे ते प्रत्येक पावलावर साथ देतात. तसेच, शिक्षकांची भूमिकाही ते पार पाडत असतात. कितीही आधुनिकिकरण झाले, तरी पुस्तकांना पर्याय उभा राहणे, जवळपास अशक्य वाटते. आज तंत्रज्ञानाचा पर्याय उभा राहिला असला तरी त्याच्या तोट्यांमुळे पुस्तके कधीही उजवी ठरतात. त्यामुळे मुले पुस्तके सोडून स्क्रीनकडे वळणार नाहीत, असा विश्वास वाटतो."

कुमारांसाठीच्या साहित्य निर्मितीसाठी कार्यरत असलेल्या 'छात्र प्रबोधन'चे संपादक महेंद्र सेठिया म्हणाले, "शहरी भागात तंत्रज्ञानाचा प्रसार बऱ्यापैकी झाला असला तरी ग्रामीण भागात मात्र अजूनही पुस्तकांना पर्याय नाही. तसेच, शहरी भागातही खर्चिकता, विजेची उपलब्धता, तंत्रज्ञान व साधनांची उपलब्धता आदी अडथळ्यांमुळे तंत्रज्ञानालाही मर्यादा आहेत. तंत्रज्ञान पुस्तकांना पर्याय उभे करत नाही, हे काही अंशी खरे आहे. मात्र नावीन्यपूर्ण प्रयोग करून मुलांना पुस्तक वाचनाची गोडी लावणे सहज शक्य आहे. त्यामुळे येत्या दहा-वीस वर्षांत तरी पुस्तकांना पर्याय उभा राहू शकत नाही."

### वाचनाचे फायदे

- मुलांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास
- कल्पनाशक्तीचा विकास होण्यास मदत
- शब्दसंग्रहात वाढ
- एकाग्रतेत वाढ
- भाषेचे उत्तम आकलन होण्यास मदत
- माहिती नाही, तर ज्ञानात पडते भर
- दूरगामी प्रभाव पाडणारे साधन

### मुलांनो, ही पुस्तके वाचाच

- दस नंबरी फोन - राजीव तांबे
- समशेर आणि परग्रहावरचा माणूस - भारत सासणे
- तू मोठ्ठा कधी रे झालास - कविता मेहेंदळे
- अंतरिक्षातील शेजारी - रेखा बैजल
- जोकर बनला किंगमेकर - संजय वाघ
- देवराई - रमा हर्डीकर
- आबाची गोष्ट - आबा महाजन
- आपला भारत भाग १ ते २५ - राजा मंगळवेढेकर
- विंचू चावला हो - आश्लेषा महाजन
- जिद्दीची गुरुकिल्ली - प्रवीण दवणे
- शब्दांची नवलाई - एकनाथ आव्हाड
- गोष्टीमागच्या गोष्टी - मृणालिनी वनारसे
- गिरिजाताईंच्या गोष्टी भाग १ ते १० - गिरिजा कीर
- झाड आजोबा - संगीता बर्वे
- अलगड्डी गालगड्डी - अंबरिश मिश्र
- आधुनिक स्फूर्तिकथा - श्रुती पानसे
- मृदू भाव जागे होता - सुहासिनी देशपांडे
- यशच्या कल्पककथा - डॉ. अश्विनी धोंगडे
- बाराखडीच्या कविता - वसुधा पाटील
- जपून ठेवू सृष्टी... नाती - अंजली कुलकर्णी

Sakaal 23.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous



चांगली पुस्तके वाचणे म्हणजे गेल्या अनेक शतकांतील लोकोत्तर अशा व्यक्तिमत्त्वांशी संवाद साधणे होय.

– रेने देकार्त, तत्त्वज्ञ

# ग्रंथी धरोनि विश्वास...

पुस्तक हा संस्कृत भाषेतलाच ग्रंथाला पर्यायी शब्द. त्याचे पुढे रुढार्थाने पुस्तक असे नामकरण झाले. आग, चाक, वस्त्रे आणि कागद- म्हणजेच ग्रंथ - यांचे शोध माणसाच्या उत्क्रांतीतले महत्त्वाचे टप्पे मानले जातात. यापैकी पहिल्या तीन शोधांनी माणूस गुहेतून बाहेर आला. कागदाच्या शोधामुळे मात्र तो सुसंस्कृत होण्याकडे वाटचाल करू लागला. ज्ञानाचे जतन आणि संवर्धन करण्याचा शाश्वत मार्ग त्याला गवसला. प्रारंभिक काळात पाषाणशिळांवरच लिहिले जात असे. विटांवरही मजकूर लिहिला जात असे, त्यांना इष्टिकाग्रंथ म्हणत. या शिळा किंवा इष्टिकाग्रंथांना पहिले ग्रंथ मानायचे झाले, तर इतिहासात तीनेक हजार वर्षे मागे जावे लागते. मेसोपोटेमियामधला विटांवरचा मजकूर किंवा इजिप्तमधल्या पपायरसच्या गुंडाळ्या हेच प्राचीनतम लिखाणाचे पुरावे आढळले आहेत. त्याकाळातले लिखाण हे सामान्यत: धार्मिक असे, किंवा राजाज्ञा, न्यायनिवाडे या प्रकारचे. विद्यार्जनाशी निगडित आशय गुरुमुखातून शिष्यांच्या श्रवणीं तेवढा जात असे. ज्ञानार्जनाचा तोच एकमेव स्रोत होता. कागदाचा शोध लागला आणि माणसाने कुठल्याकुठे उड्डाण केले. आताशा हातात पुस्तक घेतले तर त्यामागे केवढा तरी मोठा इतिहास दडलेला आहे, याची ना वाचकाला जाणीव असते, ना लेखकाला. हल्ली तर कागदही कालबाह्य होत चालला आहे. अक्षरांनी आता कागदाशी काडीमोड घेत डिजिटल लागेबांधे जुळवले आहेत.



तरीही हे जग शहाणे करुन सोडले ते कागदावर काळे करणाऱ्या लेखकांनीच, यात शंका नाही. परंतु, ज्ञानाचा आवाका जसजसा वाढतो, तसतशी ग्रंथांची निर्मिती आणि उपयोगही वाढावा, अशी जी अपेक्षा असते, तिला मात्र फाटा मिळू लागला आहे. आज (शनिवारी) जागतिक पुस्तक दिन; आणि त्याच्या पूर्वसंध्येलाच महाराष्ट्रात उदगीर येथे सुरू झालेले साहित्य संमेलन. वाचनसंस्कृतीला पुन्हा बहर यावा, असा संकल्प सोडण्यासाठी याइतके चांगले निमित्त दुसरे कोणते? गेल्या काही वर्षात पुस्तक वाचनाची आवडच मंदावल्याची जागतिक ओरड होत आहे. आपल्या मराठीत तर ग्रंथांचे हाल विचारायची सोय उरली नाही. कोलकात्यात दरवर्षी प्रचंड पुस्तक मेळा भरतो. महिनाभरापूर्वी हा मेळा पार पडला, तिथं सुमारे २३ ते २५ कोटी रुपयांच्या ग्रंथांची सपाटून विक्री झाली. दिल्लीची 'बुक फेअर'ही अशीच कोटीच्या कोटी उड्डाणे करणारी. गेली काही वर्षे जयपूरला साहित्य सोहळा पार पडतो. जगभरातील नामवंत वैचारिक तिथे आवर्जून हजेरी लावतात. पुढला 'जयपूर लिट फेस्ट' मालदिवला आयोजण्याचे घाटत आहे. तिथेही ग्रंथांची विक्री मुबलक होते. मराठी साहित्य संमेलनात मात्र दोन-चार कोटींची विक्री झाली तर प्रकाशक समाधानाने आपापल्या गावी परततात. जे कोलकात्यात किंवा दिल्लीत घडू शकते, ते मराठी साहित्य संमेलनाच्या मांडवात घडायचे असेल, तर काय करावे लागेल? यावर गांभीर्याने चर्चा होण्याची गरज आहे. कागदी बांधणी असो, वा पुठ्ठ्याची, कापडी बांधणी असो वा डिजिटल आवृत्ती, पुस्तकांनी भले आपले अवतार बदलोत, ते हाती धरणारा वाचकवर्गाच्याही 'आवृत्त्या' बदलायला हव्यात. त्यासाठी मराठीने भाषा-प्रांताच्या सरहद्दी ओलांडायला हवी. मराठी भाषेच्या अभ्युदयासाठी हेच एकमेव आशास्थान दिसते. या सगळ्यात अर्थातच लेखकांची भूमिका आणि जबाबदारी महत्त्वाचीच.

### आशावादाला तरणोपाय नाही!

९५व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांनी आपल्या भाषणातून लेखकांना कर्तव्याची जाणीव करून दिली. सत्य बोलणे आणि निर्भय असणे हे लेखकाचे धर्म आहेत. आपल्याठायी असलेल्या सर्जनबळाचे विस्मरण त्याला परवडणार नाही, लेखकाला आशावादी राहण्यावाचून तरणोपायही नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले. लेखकच काय, लेखन व्यवसायाशी संबंधित सर्वांनीच आणि मुख्य म्हणजे वाचकांनाही आशावाद टिकवून ठेवण्याला पर्याय उरलेला नाही. लेखकाकडे जसे सर्जनबळ असते, तसेच वाचकाकडेही तारतम्याचे बळ असावे लागते. प्राप्त परिस्थितीत हे बळ उभयपक्षी उताराला लागल्याचे जाणवते, हे वेगळे सांगायची गरज नाही. संमेलनाध्यक्ष सासणे यांच्या भाषणात मराठी साहित्याकडे वेगळ्याच परिप्रेक्ष्यातून बघण्याचा प्रयत्न दिसतो. प्रतिभेचा 'अद्भुत वारा' आणि तो अंगावर घेणारा सर्वसामान्य वाचकवर्ग यांचा अन्योन्य संबंध उकलून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. मराठी साहित्याच्या न्यूनत्वाविषयी चार शब्द सांगण्याचे त्यांनी टाळलेले नाही. उदाहरणार्थ, स्वातंत्र्य चळवळ किंवा महात्मा गांधींची हत्या यांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात पुरेसे पडलेले नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. हमाल, कष्टकरीवर्ग किंवा वंचितांची शब्दचित्रे प्रभावीपणाने रेखाटणारा एखादा सआदत हसन मंटो मराठीत अजूनही जन्मला नाही, असे ते म्हणतात. त्यात बऱ्याच अंशी तथ्यही आहेच. परंतु, भाऊ पाध्ये, नामदेव ढसाळ आदींचे साठोत्तरी साहित्य जागतिक साहित्याच्या तुलनेत कुठेही कमी पडलेले दिसत नाही, याचाही आवर्जून उल्लेख करायला हवा. काळ्या- पांढऱ्या एक आड एक चौकटींवर स्त्री-पुरुषांचे मोहरे फेकून प्रारब्धाचे खेळ बघणाऱ्या 'काळा'च्या भर्तृहरीलिखित दृष्टांतापासून अफगाणिस्तानातील रुमीच्या रुपकांपर्यंत अनेक संकल्पना, जाणीवा आणि विचारांनी संपृक्त अशा सासणे यांच्या भाषणात अनेक मुद्दे राहून गेले असले तरी त्याचे पडसाद मराठी रसिकांच्या मनात निश्चितच उमटले असतील. चार महिन्यांच्या कालखंडात हे दुसरे साहित्य संमेलन घेण्याची पाळी ओढवली. नियम आणि घटनेतील कलमांवर बोट ठेवून त्यामधली अपरिहार्यता दाखवता येईलही आणि चार महिन्यांत लागोपाठ दुसऱ्यांदा संमेलन होणे, हा आपल्या उत्सवप्रियतेचा पुरावा म्हणता येईल. पण त्यांना भक्कम अशा वाचनसंस्कृतीची जोड दिली तरच मराठीचिये नगरीतील साहित्योत्सवाचे प्रयोजन सुफळ, संपूर्ण होईल, याचीही जाणीव ठेवायला हवी.

Sakaal 23.4.2022

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

सामना

प्रासंगिक

# वाचाल तर समृद्ध व्हाल

**दरवर्षी** २३ एप्रिल रोजी जागतिक पुस्तक दिन साजरा केला जातो. विल्यम शेक्सपियर यांचा जन्मदिन आणि मृत्युदिन २३ एप्रिल आहे. २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी हा दिवस साजरा केला. प्रत्येक देशात हा दिवस साजरा करण्याची पद्धत वेगवेगळी आहे.

आज रोजी जवळपास सर्वच तालुके आणि जिल्ह्याच्या ठिकाणी वाचनालये आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागातही ती पोहोचली आहेत. यातील बऱ्याच ठिकाणी वाचन वाढीस लागावे म्हणून तर कार्यक्रम राबवले जातात, तर जिल्ह्याच्या ठिकाणी पुस्तक प्रदर्शन भरवून वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचतील अशी व्यवस्था केली जाते. वाचकांपर्यंत पुस्तके पोहोचवण्यासाठी आणि वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी म्हणून १९७५-७६ च्या सुमारास ग्रंथाली वाचक चळवळीची स्थापना करून महाराष्ट्रभरात अगदी तालुका पातळीपर्यंत ही चळवळ पोहोचवली आणि तीही स्वस्त दरात. तसेच पुस्तक वाचकापर्यंत पोहोचवण्यासाठी नवनवीन प्रयोग केले. ढवळे ग्रंथयात्रा, अक्षरधाराची पुस्तक प्रदर्शनांद्वारे प्रयत्न झाले. त्याचबरोबर नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे विश्वस्त विनायक रानडे यांनी बारा वर्षांपासून सुरू केलेला



'ग्रंथ तुमच्या दारी' हा नवीन प्रयोग. जवळपास ५०हजारांहून अधिक वाचक याच्यात जोडलेले आहेत. पुंडलिक पै यांची डोंबिवली येथील पै फ्रेंड्स लायब्ररी हीसुद्धा वाचकांसाठी नवनवीन कार्यक्रम करून वाचन संस्कृती वाढीस मोलाचे योगदान देत आहे. त्याचबरोबर बदलापूर येथील श्याम जोशी यांच्या ग्रंथसखा वाचनालयाचाही उल्लेख करावा लागेल. त्यांनीसुद्धा सुरुवातीला व्यक्तिगत भांडवलातून हे वाचनालय सुरू केले.

अनेक जण वैयक्तिक पातळीवर वाचनासाठी प्रयत्न करीत आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये काशीराम कोळी नावाचा तरुण बैलगाडीत पुस्तक घेऊन फिरतो. गावोगावी तो पुस्तके घेऊन फिरतो आणि लोकांना वाचायला प्रवृत्त करतो. गाडीमध्ये पाचशे-सहाशे पुस्तके असतात. अकोला शहरात गजानन नारे यांचेही असे फिरते वाचनालय आहे. मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून ते पुस्तकांची गाडी घेऊन फिरतात. विद्यार्थीदशेतच वाचनाची आवड निर्माण व्हावी हा प्रामाणिक हेतू आहे असे ते सांगतात. अशी ही साहित्यप्रेमी मंडळीसुद्धा सेवा करून वाचन संस्कृती रुजवत आहेत ही अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे.

जीवन इंगळे यांची लहानाबरोबर मोठ्यांनी पुस्तक वाचावे हीच तळमळ आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यांतील अनेक गावांना त्यांनी भेट दिली आहे. पुस्तके ही सर्वात जवळचे मित्र असतात आणि त्यांच्या सान्निध्यात राहिलो तर आपण विचारांनी समृद्ध होऊ अशी त्यांची भावना आहे.

विदर्भातील वर्धा येथे सचिन सावरकर हे शिक्षक यांनी 'पुस्तक दोस्ती जागर' म्हणून कल्पना पुढे आणली आहे. पाच ते वीस वर्षे वयोगटातील बालक व युवकांना एकत्र आणून त्यांना पुस्तके वाचायला द्यायची आणि युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करायची. वाचन हा संस्कार असून लहानपणापासून मुलांवर रुजवण्याची गरज आहे ही त्यांची त्यामागची भूमिका आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पुस्तकांविषयी फार प्रेम होते. ज्या वेळी त्यांच्याकडे पुस्तक खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते, त्या वेळी ते ग्रंथालय उघडे त्या वेळी जात व त्याची वेळ संपेपर्यंत तिथे वाचन करीत. नंतरच्या काळात मुंबई दादर येथील राजगृह या ठिकाणी बाबासाहेबांनी पन्नास हजारांहून अधिक पुस्तकांचा संग्रह केला होता आणि जगातील हे त्यांचे सर्वात मोठे व्यक्तिगत ग्रंथालय होते. त्यात विविध ग्रंथांचा समावेश आहे. त्यांच्या 'वाचाल तर वाचाल' या विचाराने अनेकांना प्रेरणा मिळाली. बाबासाहेब नेहमी म्हणत "तुमच्याकडे दोन रुपये असतील तर त्यातील एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल, तर पुस्तक तुम्हाला कसे जगावे हे शिकवेल." आज या जागतिक पुस्तक दिनानिमित्त संकल्प करू आणि आपण असं वाचन करू की, त्यातून स्फूर्ती व प्रेरणा मिळेल. वाचाल तर समृद्ध व्हाल.

▮ दिलीप देशपांडे
dilipdeshpande24@gmail.com

Pune Edition
Apr 23, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

लोकमत

दृष्टिक्षेप

### कोण म्हणतं पुस्तकं कुणीच वाचत नाही ?

जागतिक बाजारपेठेत ई-बुक्स आणि छापील पुस्तकं विक्रीच्या महसुलाचा अंदाज




सर्व आकडे अब्ज डॉलर्समध्ये

**संदर्भ :** स्टॅटिस्टा ऍडव्हर्टायझिंग ॲण्ड मीडिया मार्केटिंग आऊटलूक

अख्खं जग हातात आलेल्या चिटुकल्या स्क्रीनपासून तर घराघरात परवडू लागलेल्या होम थिएटरच्या भल्या मोठ्या स्क्रीनवरून सतत वाहात असलेल्या स्वस्त मनोरंजनाच्या समुद्रात मनसोक्त डुबत राहायला सोकावलेलं असल्यामुळे आधीच कमी झालेली पुस्तकं वाचकांची संख्या आणखी रोडावणार आहे आणि यापुढे पुस्तकं विकत घेणारे अगदी दुर्मीळच होत जातील, अशी तुमची ठाम समजूत असेल, तर जरा थांबा... कोविडच्या महामारीनंतर जगभरात पुस्तकं खरेदी-विक्रीला अधिक वेग आला असून, २०२३ या वर्षात तब्बल ११२ अब्ज डॉलर्स इतकी प्रचंड उलाढाल या व्यवसायात होईल, असा एका अभ्यासाचा निष्कर्ष आहे. ही बातमी पुस्तकप्रेमींना दिलासा देईल, हे नक्कीच! २०२२ आणि २०२३ या वर्षात यापूर्वीचे सर्व टप्पे ओलांडणारी उलाढाल या व्यवसायात अपेक्षित आहे.

Pune Main
Page No. 8 Apr 23, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

आज पुस्तक दिन : एका वेळच्या जेवणाइतके पैसेही पुस्तकावर खर्च करणे येते जिवावर; पायरेटेड पुस्तकांचा गोरखधंदा अन् आता पीडीएफ फिरविल्यामुळे पुस्तके कोणी घेईना

# पायरेटेड पुस्तकांचा काळाबाजार बोकाळला; लेखक-प्रकाशकांची राजरोस लूट !

नम्रता फडणीस
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाचन संस्कृती एका बाजूला कमी होतेय; पण दुसऱ्या बाजूला फुकट्या वाचकांची संख्याही वाढतेय. एका बाजूला पायरेटेड (परवानगीशिवाय छपाई) पुस्तकांचा गोरखधंदा बोकाळला आहे. दुसऱ्या बाजूला पुस्तकांच्या पीडीएफ फाईल समाजमाध्यमांवर टाकल्या जातात. त्यामुळे मूळ पुस्तक विकत घेऊन वाचण्याकडे कल कमी होत आहे. अगदी हॉटेलातील एक वेळच्या जेवणाइतके पैसेही पुस्तकासाठी खर्च करणे जीवावर येत आहे.

पायरेटेड पुस्तके अन् पीडीएफचा होणारा काळाबाजार ही ग्रंथ खरेदी-विक्री व्यवहारातील सर्वांत मोठी अडचण ठरत आहे. लेखकांची रॉयल्टी बुडण्याबरोबरच प्रकाशकांनाही कोट्यवधी रुपयांच्या नुकसानाला सामोरे जावे लागत आहे. ही लूट जशी पायरेटेड पुस्तकांचा धंदा करणाऱ्या विक्रेत्यांकडून होतेय, तशीच अप्रत्यक्षपणे वाचकांकडूनही केली जात आहे. याबाबत लेखक-प्रकाशकांकडून आवाज उठविल्यानंतर तेवढ्यापुरता हा बाजार ठप्प होतो, पण पुनश्च 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती होत असल्याचे दिसून येत आहे.

लूटशाही Vs लोकशाही
लोकमतची लोकचळवळ
लोकमत पत्रकारिता परमो धर्म

## लेखकाच्या मेहनतीवर पाणी, प्रकाशकांची गुंतवणूकही धोक्यात

- लेखक मेहनत करून पुस्तक लिहितो आणि प्रकाशकांकडून त्या पुस्तकांच्या पहिल्या टप्प्यात किमान हजार प्रती काढल्या जातात.
- पुस्तकाच्या खपावर लेखकाला रॉयल्टी मिळते, हे ग्रंथ खरेदी-विक्री व्यवहाराचे एक साधेसरळ समीकरण आहे. मात्र, पायरेटेड पुस्तके आणि पायरेटेड पीडीएफमुळे या व्यवहाराला ब्रेक लागला आहे.

## कोरोना काळात झाली सुरुवात

कोरोना काळात पुस्तकांची दुकाने बंद ठेवण्यात आली होत. या काळात पुस्तकांच्या पीडीएफ फॉरवर्ड करण्याचे प्रमाण वाढले. कॉपी राइट कायद्याचा भंग करीत पुस्तकांना स्कॅन करून त्याला पीडीएफ स्वरूप दिले जाऊ लागले. घरबसल्या वाचकांना पीडीएफ स्वरूपात पुस्तके मिळाल्यानंतर पुस्तके विकत घेण्याचे प्रमाण कमी झाले. त्याचा प्रकाशन संस्थांना अधिकच फटका बसला.

## ५०० पुस्तकांच्या पीडीएफ एकाच संकेतस्थळावर होत्या

सुमारे ५०० पुस्तकांच्या पीडीएफ एका संकेतस्थळावर डाऊनलोड केल्याचे निदर्शनास आल्यानंतर प्रकाशक कै. सुनील मेहता यांनी सायबर पोलिसांकडे धाव घेतली होती. लेखक विश्वास पाटील यांनीदेखील पायरेटेड पीडीएफ अन पुस्तकांची विक्री करणाऱ्यांना शोधून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र, त्यानंतरही जंगली महाराज रस्ता, फर्गसन महाविद्यालय रस्ता, कॅम्प आणि डेक्कन परिसरात पायरेटेड पुस्तकांची विक्री खुलेआम होत आहे.



ई-बुक्सला २० टक्के, तर छापील पुस्तकांना ८० टक्के मागणी आहे. छापील पुस्तकांइतकीच पायरेटेड पुस्तके विकली जातात. पोलीस काहीही करीत नाहीत. पायरसीमुळे लेखकाला मानधन मिळत नाही. वर्षभर प्रकाशकांच्या पुस्तक खरेदी - विक्रीची उलाढाल ८० ते १०० कोटी रुपयांची आहे. पुस्तके स्कॅन करून त्याच्या पीडीएफ स्वरूपात प्रती विकल्या जातात. प्रिंट ऑन डिमांडची मशीन्स आली आहेत, त्यावर पायरसी प्रती तयार होतात. वाचकांना दोष देता येत नाही. पायरेटेड पुस्तके प्रकाशकांच्या पुस्तकासारखीच परफेक्ट बाईंडिंगची असतात. सरकारने याविरोधात कायदा करण्याची गरज आहे.

-राजीव बर्वे, अध्यक्ष अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ

माझ्या पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफ आणि ई-बुक्सची क्रॅक व्हर्जन वाचली असल्याचे अनेक जणांनी सांगितले. यामध्ये लेखक अन प्रकाशकांचे खूप मोठे नुकसान होते. लेखकांना रॉयल्टी मिळत नाही. जंगली महाराज रस्त्यावर किंवा मुंबई - पुणे महामार्गावरही मॉलमध्ये अधिकृतपणे पुस्तकांच्या स्टॉलवर नामवंत लेखकांची पायरेटेड पुस्तके पाहायला मिळतात. 'हिंदू' पुस्तकाचे नावच चुकीचे प्रिंट झाल्याचे निदर्शनास आले. मुखपृष्ठ पाहूनच ते कळते. यात वाचकांचा दोष आहे की नाही, नंतरचा मुद्दा आहे. मुळात वाचकांना त्या दृष्टीने शिक्षित करायला हवे.

- हृषिकेश गुप्ते, प्रसिद्ध लेखक

पायरेटेड पुस्तकांच्या विक्रेत्यांना शोधून काढले आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून, चार जणांवर केसेस सुरु झाल्या आहेत. गुन्हा सिद्ध झाल्यास कॉपिराईट कायद्यानुसार आणि भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ४२०अंतर्गत तीन वर्षांची शिक्षा होऊ शकते. या कारवाईच्या बडग्यामुळे प्रमाण काहीसे कमी झाले आहे. पायरेटेड पुस्तके काही महिन्यांनंतर काळी पडतात. त्याचे बाईंडिंग निसटते. वाचकांनी पुस्तकांची खरेदी करताना किमान ती बघून घ्यावीत.

-विश्वास पाटील, प्रसिद्ध लेखक

Hello Pune
Page No. 3 Apr 23, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

सामना

# 'ज्ञानेश्वरी'ची आत्मानुभूती आता ऑडिओ बुकच्या स्वरूपात



### मराठी भाषा विभागाचा पुढाकार

### भक्ती हा दुःखाकडून सुखाकडे जाण्याचा एकमेव मार्ग

### ज्ञानेश्वरांचा सिद्धांत आधुनिक रूपात विश्वासमोर

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) – मध्ययुगातील संतांचे विविधांगी वाङ्मय हा मराठी साहित्यातील महत्त्वाचा सांस्कृतिक ठेवा आहे. वारकरी भक्ती संप्रदायाचा पाया रचणाऱ्या संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' आजही अनेकांच्या नित्यपठणात आढळते. त्यामुळे आता आधुनिक काळाला अनुसरून व नव्या पिढीसाठी 'ज्ञानेश्वरी' आता ऑडिओ बुकच्या स्वरूपात विश्वासमोर येणार आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने मराठीतील पुस्तके, ग्रंथ ऑडिओ बुकच्या स्वरूपात आणण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आखला आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात श्री रामदासस्वामी रचित 'दासबोध' तसेच कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या 'निवडक कवितांवरील रसयात्रा' व 'प्रवासी पक्षी' हे दोन काव्यसंग्रह व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र मराठीतील नामवंत कलाकारांच्या आवाजात ऑडिओ बुकच्या स्वरूपात केले असून हे ऑडिओ साहित्य मराठी राज्य विकास संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. या सर्व ऑडिओ बुक्सना जागतिक स्तरावरून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

या प्रकल्पासाठी मराठी भाषा विभागाने पुढाकार घेतला आहे. हा प्रकल्प अतिशय महत्त्वाकांक्षी आहे. त्यामुळे 'ज्ञानेश्वरी'तील ओव्यांचे ध्वनिमुद्रण करताना शब्दांचे उच्चार, वृत्त, छंद तसेच स्वाभाविक लय, गती व नाद यांची विशेष काळजी घेतली जात आहे. 'ज्ञानेश्वरी'तील त्या काळातील विशिष्ट शब्दांचे अर्थ कळणे कठीण आहे असे वाटल्यास अशा काही शब्दांचा आजच्या व्यवहारातील अर्थ मराठीजनांना तिथेच बघता येईल. यासाठी वेबसाईटवर आवश्यक ती सुविधा करण्यात येत आहे. या प्रकल्पाचे काम लवकरच पूर्ण होईल आणि राज्य मराठी विकास संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध होईल, असे मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.

▮ या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात ज्ञानेश्वरी, नामदेव व तुकाराम गाथा ऑडिओ स्वरूपात येणार आहे. सध्या ज्ञानेश्वरी ऑडिओ बुकच्या स्वरूपात मराठी जनांसमोर आणण्याचे काम राज्य मराठी विकास संस्थेने हाती घेतले आहे. प्रख्यात संगीतकार राहुल रानडे या ऑडिओ बुकसाठी संगीत दिग्दर्शन करीत आहेत. मराठीतील २२ गायकांच्या स्वरात 'ज्ञानेश्वरी' जगभरातील श्रोत्यांना ऐकायला मिळणार आहे. सुमारे ६५ ते ७० तासांचे व एकूण ९ हजार ३९ ध्वनिमुद्रित ओव्यांचे हे ऑडिओ बुक तयार होईल.

Pune Edition
Apr 25, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

---

लोकमत

# पेटंट नोंदणीमध्ये पुन्हा महाराष्ट्राची आघाडी!

## आज जागतिक बौद्धिक संपदा दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : जगात बौद्धिक संपदेच्या अर्थात इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी या क्षेत्रात विविध संशोधनांचे पेटंट नोंदविण्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाली असून बहुतांश पेटंट हे ऑनलाइन नोंदवले गेले आहेत. विशेष म्हणजे, पेटंटच्या संख्येत महाराष्ट्राने देशपातळीवर पुन्हा आघाडी घेतली आहे.

नवीन कल्पना सुचल्यास पेटंट करून ठेवले जाते. मर्यादित काळानंतर कालबाह्य होऊ शकते. त्यातील कायदेशीर मुद्दे आणि त्या संपदेचा प्रकार लक्षात घेऊन किती वर्षासाठी संरक्षण मिळेल, हे पेटंट सल्लागाराशी बोलून ठरवता येते. पेटंट घ्यायचा खर्च केवळ काही हजारांतील असतो. मात्र, त्याला अनुसरून उत्पादनासाठी ते केल्यास त्या पेटंटचे लाखो रुपयेदेखील मिळू शकतात. केंद्र शासनाच्या अधिकृत 'इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी इंडिया' या राष्ट्रीय संस्थेच्या अहवालात ही माहिती पुढे आली आहे. देशात आघाडी नोंदवतानाच, गत वर्षाच्या तुलनेत नोंदणीत महाराष्ट्राने १५ टक्क्यांची वाढ नोंदवत पेटंटचा ४७४१ पर्यंतचा आकडा गाठला आहे. त्याखालोखाल तामिळनाडूने ३५४६, त्यानंतर कर्नाटकने २२३० इतके पेटंट नोंदवले आहेत. सर्वात कमी पेटंट आसाम या राज्याने अवघ्या १०२ पेटंटची नोंदणी केली आहे. मूलभू[त] विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधन ही दो[न] क्षेत्रे पेटंट मिळवण्यात गतव[र्षी] आघाडीवर आहेत.




### बौद्धिक संपदेची चळवळ

इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी अर्थात बौद्धिक संपदा म्हणजे बुद्धिरूपातील संपत्ती . ज्याप्रमाणे प्रत्येकाचा आपल्या वस्तूंवर, मालमत्तेवर हक्क असतो, तसाच हक्क हा बुद्धिमत्तेने निर्मिलेल्या गोष्टींवरदेखील असावा, या हेतूने जगभरात 'बौद्धिक संपदा आणि स्वामित्व' याची चळवळ निर्माण झाली आहे. त्याला इंटलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स मूव्हमेंट असेही संबोधले जाते. अनेक हस्तलिखिते, डिझाइन्स, नव्याने निर्मिलेले तंत्रज्ञान, वस्तूंचे आकार, नवे संशोधन, कल्पना अशा अनेकानेक अभिनव गोष्टी या बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात येतात. पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क अशा कायद्यांनी ते संरक्षित केले जातात.

Pune Main
Page No. 7 Apr 26, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous

लोकमत

# दर्जाहीन शोधनिबंधासाठी तयार केला बोगस 'कविता रती' अंक

## प्राध्यापकांची शोधनिबंध छापून आणण्यासाठीची 'बोगसगिरी'

नम्रता फडणीस

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा व काव्यात्मक चिंतनासाठी वाहिलेले नियतकालिक असा नावलौकिक असलेल्या 'कविता रती'च्या अंकाने मराठी वाङ्मयविश्वात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

इतकेच काय तर विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राध्यापकांचे शोधनिबंध प्रसिद्ध करण्यासाठीच्या मान्यताप्राप्त नियतकालिकांच्या (यूजीसी) केअरलिस्टमध्ये 'कविता रती' चा समावेश केला आहे. मात्र, या अंकात प्राध्यापकांचे दर्जाहीन शोधनिबंध छापण्यास नकार दिला जात असल्यामुळे काही प्राध्यापकांनीच 'कविता रती'चा बनावट अंक तयार केल्याची धक्कादायक बाब 'कविता रती' च्या संपादकांनीच उघडकीस आणली आहे. संबंधितांविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

कवी पुरुषोत्तम पाटील यांनी १९८५ साली 'कविता रती' या त्रैमासिकाची मुहूर्तमेढ रोवली. 'कविता रती'चे संपादक आशुतोष रमेश पाटील यांनी 'कविता रती'चा बनावट अंक छापला जात असल्याची माहिती सोशल मीडियावर बनावट अंकासह टाकल्यामुळे खळबळ उडाली आहे.

आशुतोष पाटील म्हणाले, कवितेला वाहिलेले आणि दीर्घकाळ सुरू असणारे वाङ्मयीन क्षेत्रातील हे एकमेव त्रैमासिक आहे. हा अंक कसा असतो? त्याचे स्वरूप, मांडणी याची वाचक आणि वर्गणीदारांना ओळख आहे. २०१० नंतर यूजीसीने एपीआय पद्धत आणली. त्यानुसार प्राध्यापकांनी विशिष्ट नियतकालिके किंवा जर्नल्समध्ये शोधनिबंध छापून आणले तर त्यांना गुण दिले जातात.

चार वर्षांपूर्वी यूजीसीने केअरलिस्ट नावाचा प्रकार आणला. ज्यामध्ये नियतकालिकांना यूजीसी केअरलिस्टमध्ये समाविष्ट करून त्यांना मान्यता दिली आहे. यूजीसीकडून त्याचे सातत्याने अद्ययावतीकरण केले जाते. या यूजीसी केअरलिस्टमध्ये 'कविता रती' हे नियतकालिक पूर्वीपासूनच आहे. त्यामुळे 'कविता रती' मध्ये प्राध्यापकांचे शोधनिबंध छापण्याचा सातत्याने आग्रह होत आहे.

प्राध्यापकांचे शोधनिबंध दर्जेदार असतातच असे नाही. ते बहुतांशपणे कामचलाऊ असतात. अशाप्रकारचे दर्जाहीन शोधनिबंध 'कविता रती' मध्ये छापले जात नाहीत. तुमच्या अंकात एक लेख छापण्याचे किती पैसे घेता अशी विचारणा पण होते. पण आम्ही त्यांना भीक घालत नाही. त्यामुळे मराठीमध्ये दहा वर्षांमध्ये कित्येक गल्लाभरू नियतकालिके निघाली आहेत. जी प्राध्यापकांचे शोधनिबंध छापून पैसा गोळा करीत आहेत. प्राध्यापकही पदोन्नती प्राप्त करून पगाराचे आकडे वाढवत आहेत.




### बोगस अंकात काय आहे?

'कविता रती'च्या बनावट अंकात संस्थापक म्हणून पुरुषोत्तम पाटील, संपादक म्हणून माझे नाव आहे. सदस्य म्हणून टाकलेल्या नावांचा 'कविता रती'शी काहीही संबंध नाही. सुजय प्रकाशन असे नाव त्यावर टाकले आहे. अनुक्रमणिका पाहिली की, प्राध्यापकांचे इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र विषयांचे शोधनिबंध छापले आहेत. दलालांना निबंध द्यायचे, त्यांच्या खात्यावर पैसे पाठवायचे अशा साखळीतून हा बनावट अंक निघाला आहे.

Hello Pune
Page No. 4 Apr 29, 2022
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During April 2022

## Section: Miscellaneous



# प्रतिबिंब

अवतीभवती

## रक्तदात्यांना मिळणार डिजिटल प्रमाणपत्र : डॉ. वाचासुंदर

खडकी : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मित्र परिवार फाउंडेशन व जनकल्याण रक्तपेढी यांच्या सहकार्याने प्रथमच नियमित रक्तदाते व शिबिर संयोजक यांचा मेळावा झाला. रक्तदात्यांच्या मागणीवरून डॉ. अविनाश वाचासुंदर यांनी रक्तदात्यांना डिजिटल प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिले. अशा शिबिरांमुळे अनेकांचे प्राण वाचले आहेत. त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संघाचे सहकार्यवाह महेश पोहनेरकर यांनी दिली. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत रक्तदानाचे महत्त्व समजले पाहिजे, असे मत जनकल्याण रक्तपेढी पुणे कार्यकारी संचालक डॉ. अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केले. रक्तदात्यांना डिजिटल प्रमाणपत्र मिळाली तर त्यांना पुढे रक्ताच्या पिशवीत सूट मिळण्यासाठी सोपे होईल, असेही ते म्हणाले. दिलीपराव परब, शीतलकुमार मुकणे, सुभाषराव कदम, संतोष अनगोळकर आदी उपस्थित होते. राजू जाधव यांनी सूत्रसंचालन केले. दिनेश शहा यांनी आभार मानले.



# Condolence Message

प्रा. के. टी. काशीद, Statistics विभागातील निवृत्त प्रोफेसर, वय ८३, यांचे वृद्धापकाळामुळे, ८ एप्रिल २०२२ रोजी दुःखद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



# *Upcoming Events*

## May 2022

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3<br>*Mahatma Basweshwar Jayanti*<br> | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21<br>*Anti Terrorism Day* |
| 22 | 23 | 24 | 25<br>*Maharana Pratap Singh Jayanti*<br> | 26 | 27 | 28<br>*Swatantryaveer Savarkar Jayanti*<br> |
| 29 | 30 | 31<br>*Ahilyadevi Holkar Jayanti*<br> | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images, Pinterest, Freepik.Com.*